जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष : ३१ | अंक : १९ | मूल्य ४ रुपये | पृष्ठे ८+ ८ = १६ | जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

**भुसावळमध्ये दोन पोलिसांनी फोडला लाचखोरीचा पोळा!**

वाचा पान ७ वर

### विचारपुष्प



हिंदू धर्म जितका उच्च स्तरावर आहे तितकाच तो खोल व गहन आहे, जितका व्यक्तीकेंद्रित तितकाच समष्टिव्यापक आहे, जितका जुना तितकाच नवा आहे; जितका चिरंतन तितकाच गतिमान आहे, जितका बहुआयामी तितका एकाग्र आहे. तो सर्वभूत हितकारी असा अमृत कलश आहे, विश्वकल्याणी कल्पवृक्ष आहे.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

### 'आसमंत' आजच्या अंकात

आजच्या अंकात शनिवारी दिली जाणारी 'आकांक्षा' व रविवारी दिली जाणारी 'आसमंत' ही पुरवणी देत आहोत. पुरवणी ८ पानी असेल, याची जाहिरातदार, वाचक, वितरक यांनी नोद घ्यावी.

**- संपादक**

# श्वानांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालण्यावर बंदी

## सर्वोच्च न्यायालयाचा आदेश, लसीकरणानंतर करावे मुक्त

◆ **नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

राजधानी दिल्लीतून ताब्यात घेतलेल्या सर्व भटक्या श्वानांना लसीकरण व निर्बिजीकरण केल्यानंतर निवारागृहातून सोडण्यात यावे, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्याच दोन सदस्यीय न्यायासनाने ११ ऑगस्ट रोजी दिलेला निर्णय बदलत सुधारित निकाल दिला आहे. तसेच श्वानांना अन्न देण्यासाठी एक विशिष्ट ठिकाण निश्चित करावे, असा निर्देश देत सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, असे निकालात नमूद केले आहे.

प्राणीप्रेमी किंवा भटक्या श्वानांना खाऊ घालणाऱ्यांसाठी हा मुद्दा भावनिक झालेला असताना या श्वानांमुळे प्रचंड मनस्ताप आणि प्रसंगी शारीरिक इजा सहन कराव्या लागणाऱ्यांसाठी हा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयातील या प्रकरणाच्या सुनावणीकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. विशेष म्हणजे यायालयाने शुक्रवारी दिलेले आदेश जरी राजधानी दिल्लीशी निगडित प्रकरणी दिले असले, तरी ते देशातील सर्व राज्यांना लागू असतील, असं न्यायालयाने नमूद केलं आहे.



न्यायालयाच्या निकालानंतर श्वानप्रेमींनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता व न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. ज्या कुत्र्यांना रेबिजची लागण झाली आहे किंवा जे कुत्रे आक्रमक वर्तन करताना दिसत आहेत, अशा कुत्र्यांनाच फक्त त्यांच्यासाठीच्या निवारा केंद्रांमध्ये ठेवण्यात येणार आहे.

यासंदर्भात ११ ऑगस्ट रोजी दोन सदस्यीय न्यायासनाने दिलेल्या निर्णयात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. तसेच कोणतीही व्यक्ती वा संस्था प्रशासकीय अधिकारी वा कर्मचाऱ्यांना यासंदर्भातील त्यांची कर्तव्ये पार पाडण्यापासून रोखू शकत नाहीत. यात अडथळा आणणाऱ्यांना दंड ठोठावला जाणार आहे.

### निकालातील महत्त्वपूर्ण मुद्दे

- रस्त्यावर भटक्या श्वानांना खाऊ घालण्यावर बंदी
- अन्न खाऊ घालण्यासाठी स्वतंत्र जागेची व्यवस्था करावी
- रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना दत्तक घेण्यासाठी प्राणीप्रेमी अर्ज सादर करू शकतात. एकदा संबंधित कुत्र्याला त्यांनी दत्तक घेतले, की त्यानंतर ते कुत्रे पुन्हा रस्त्यावर येणार नाहीत, याची जबाबदारी संबंधित प्राणीप्रेमींची असेल.
- ज्या प्राणीप्रेमी व संस्थांनी सर्वोच्च न्यायालयाने कुत्र्यांबाबत ८ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशांना आव्हान देणारी याचिका केली होती, त्यांनी अनुक्रमे २५ हजार व २ लाख रुपये रजिस्ट्रारकडे दंडाची रक्कम म्हणून जमा करावी

**बिहार मतदार यादी पुनरीक्षण**

# मतदार नोंदणीसाठी आधार स्वीकारा

## सर्वोच्च न्यायालयाचा आयोगाला आदेश

◆ **नवी दिल्ली, २२ ऑगस्ट**

बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष मतदारयादीतील सुधारणेवर आक्षेप घेणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मतदार नोंदणीसाठी आधार कार्डसह ११ कागदपत्रे ग्राह्य धरण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले. मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांना ऑनलाईन अर्ज करूनदेखील उपरोक्त कागदपत्रे सादर करता येणार असल्याचा निर्णय यावेळी न्यायासनाने दिला. ११ कागदपत्रांपैकी आधार कार्डसह ड्रायव्हिंग लायसन्स, बँक खाते पुस्तिका, पाणी बिल यांचाही समावेश राहणार आहे.





न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने बिहार मतदारयादी पुनरीक्षण प्रकरणी केलेल्या सुनावणीत मतदारांची नावे दुरुस्त करण्यासाठी राजकीय पक्ष पुढे येत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. एसआयआर मोहिमेत ६० लाखांपेक्षा मतदारांना वगळण्यात आले असताना राज्यातील १२ राजकीय पक्षांपैकी केवळ तीनच पक्षांनी यावर आक्षेप घेतला ही गंभीर बाब आहे.

तसेच ८५,००० नवीन मतदार यादीत आले आणि राजकीय पक्षांच्या मतदान केंद्र सदस्यांनी यावर केवळ दोन आक्षेप दाखल केल्याच्या निवडणूक आयोगाच्या विधानावर न्यायासनाने आश्चर्य व्यक्त केले.

### वगळलेल्या मतदारांचा तपशील जारी

निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून म्हटले की १४ ऑगस्टच्या न्यायासनाच्या आदेशानुसार प्रारूप मतदार यादीत समाविष्ट नसलेल्या बिहारमधील ६५ लाख मतदारांची नावे आणि तपशील राज्यातील सर्व ३८ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले. निवडणूक आयोगाने यादीत त्यांचा समावेश न होण्याची कारणे देखील सांगितली.


बिहारमधील सर्व १२ राजकीय पक्षांना आधार कार्डसह ११ कागदपत्रे आणि आवश्यक फॉर्म दाखल करण्यासाठी मतदार यादीतून वगळलेल्या ६५ लाख लोकांना मदत करण्याचे निर्देश दिले. याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वतःहून किंवा बीएलएच्या मदतीने ऑनलाइन अर्ज करू शकते आणि अर्ज प्रत्यक्ष स्वरूपात सादर करणे आवश्यक नसल्याचे नमूद केले.

**पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी**

सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाचे वकील राकेश द्विवेदी यांनी युक्तिवादात म्हटले की, नागरिकांनी निवडणूक आयोगावर विश्वास ठेवावा. कोणालाही यादीतून वगळण्यात येणार नाही. यावर न्यायासनाने याप्रकरणी पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी होणार असल्याचे स्पष्ट केले.

### ओपन एआयचे भारतातील पहिले कार्यालय नवी दिल्लीत

**बंगळुरू, २२ ऑगस्ट** : चॅटजीपीटीची मूळ कंपनी ओपन एआय या वर्षाच्या अखेरीस भारतामध्ये आपले पहिले कार्यालय नवी दिल्लीत सुरू करणार आहे. यासाठी कंपनीने कर्मचारी भरती सुरू केली आहे. वापरकर्त्यांच्या संख्येनुसार भारत ही ओपन एआयसाठी दुसरी सर्वात मोठी बाजारपेठ असून, या निर्णयामुळे कंपनी भारतातील आपले स्थान अधिक मजबूत करत आहे. मायक्रोसॉफ्टच्या पाठबळाने स्थापन झालेल्या ओपन एआयने भारतात आपली कायदेशीर संस्था नोंदवली असून स्थानिक टीमची भरती सुरू केली असल्याची माहिती कंपनीने दिली. भारतात जवळपास एक अब्ज इंटरनेट वापरकर्ते आहेत. त्यांना लक्ष्य करत ओपनएआयने याच आठवड्यात ४.६० डॉलरचा (अंदाजे ३८५ रुपये) सर्वात स्वस्त मासिक प्लॅन भारतात सादर केला होता. त्यामुळे भारताला एक महत्त्वपूर्ण बाजारपेठ म्हणून पाहिले जात आहे. एकीकडे विस्तार करत असताना ओपनएआयला भारतात कायदेशीर आव्हानांनाही सामोरे जावे लागत आहे. अनेक वृत्तसंस्था आणि पुस्तक प्रकाशकांनी चॅटजीपीटीला प्रशिक्षित करण्यासाठी आपला मजकूर परवानगीशिवाय वापरल्याचा आरोप केला आहे. तथापि, कंपनीने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी एका निवेदनात म्हटले आहे, भारतात आमचे पहिले कार्यालय उघडणे आणि स्थानिक टीम तयार करणे, हे प्रगत एआय देशभरात अधिक सुलभ बनवण्याच्या आणि भारतासाठी व भारतासोबत एआय तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेतील एक महत्त्वाचे पहिले पाऊल आहे.





### मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदी विखे पाटील

**मुंबई** : राधाकृष्ण विखे पाटील यांची मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यापूर्वी चंद्रकांत पाटील अध्यक्ष होते. मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टपासून मुंबईत उपोषण करणार आहेत. त्यापूर्वी सरकारने उपसमितीचे पुनर्गठन केले आहे. एकनाथ शिंदे सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले आहे.

# रा. स्व. संघाचा विजयादशमी उत्सव २ ऑक्टोबरला

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे

◆ **नागपूर, २२ ऑगस्ट**

रा. स्व. संघाचा विजयादशमी उत्सव गुरुवार, २ ऑक्टोबर रोजी साजरा होत असून, यंदा माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे उद्बोधन होईल. रा. स्व. संघाची स्थापना विजयादशमीला झाली होती. संघाचे हे शताब्दी वर्ष असल्याने या कार्यक्रमास विशेष महत्त्व आहे.



हिंदू समाजात पौरुष व शक्ती जागरण विजयादशमीच्या पावन पर्वावर होत असते. विश्व शांती व मानव कल्याणाचे उद्दिष्ट ठेवून युगानुयुगे सुरू असलेल्या हिंदू समाजाच्या प्रदीर्घ यात्रेचे हे सांप्रत रूप आहे. रेशीमबाग मैदानावर सकाळी ७.४० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन महानगर संघचालक राजेश लोया यांनी केले आहे.

# सातासमुद्रापार पोहोचली सिंदी रेल्वे तान्हा पोळ्याची महती

## राजे रघुजी भोसल्यांनी लावली होती हजेरी

**नरेंद्र सुरकार**

◆ **सिंदीरेल्वे, २२ ऑगस्ट**

पूर्व विदर्भात साजरा होणाऱ्या तान्हा पोळा म्हणजे बालगोपालांच्या आनंदाचा दिवस. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सिंदी रेल्वे येथील तान्हा पोळ्याची महती देशविदेशात पोहचली आहे. एवढेच नव्हे तर नागपूरकर राजे रघुजी भोसले यांनी पोळ्याला हजेरी लावली होती. येथील गांधी चौकात तान्हा पोळा साजरा होतो.



टाकाऊपासून तयार करण्यात आलेला नंदी

यावर्षी ४३ विविध मंडळांचे नयनरम्य देखावे सादर केले जाणार आहेत. यावर्षी पहिल्यांदाच टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेला नंदी येथील पोळ्यात दाखल होत आहे. कृष्णा परांडे यांनी तयार केलेल्या या नंद्याची किंमत ७० हजार रुपये ठेवली आहे. शनिवारी सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत नंदी पोळ्याचा जल्लोष राहणार आहे. या पोळ्याची महत्ती साता समुद्रापार केव्हाच पोहोचली, अशी प्रतिक्रिया शिकागो (अमेरिका) येथे वास्तव्यास असणाऱ्या अभियंता प्रमोद ढोके यांनी आमच्या प्रतिनिधीशी भ्रमणध्वनीवर बोलताना दिली. यंदा पोळ्याचे हे १४१ वे वर्ष आहे. महाराष्ट्र शासनाने २०१६ मध्ये या पोळ्याला प्रशासकीय मान्यता दिली.

२० व्या शतकात नागपूरचे राजे रघुजी भोंसले येथील गौरी शंकर महाराज आणि नानासाहेब टालाटुले यांच्या भेटीला आले होते. त्यांनी टालाटुले यांच्यासोबत बैलजोडीच्या पुजनाचे औचित्य जाणून घेतले. साधारणतः १९४२ च्या दरम्यान ही परंपरा साधेपणाने सुरू होती. नानासाहेबांचे पुत्र प्रभाकर उर्फ बाबासाहेब टालाटुले यांच्या जन्मदिनी पारशिवनी येथील एका सुताराकडून त्यांनी ४ फूट उंच, ४.५ फूट लांब लाकडी नंदी तयार करून घेतला. तो आजही त्यांच्या घरी आहे.

# काँग्रेस, राजद घुसखोरांच्या पाठीशी

## गयाजी येथील सभेत पंतप्रधान मोदींची सडकून टीका



**गयाजी, २२ ऑगस्ट**

घुसखोरांमुळे बिहारच्या सीमावर्ती भागात लोकसंख्येची रचना झपाट्याने बदलत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल घुसखोरांच्या पाठीशी असल्याने घुसखोरांची हिंमत वाढली, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. गयाजी येथील सभेत पंतप्रधान बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर होते. बिहारमधील विविध प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झाले. सभेला संबोधित करताना मोदी यांनी काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलावर जोरदार टीका केली. या दोन्ही पक्षांचे अनेक नेते तुरुंगात होते किंवा जामिनावर बाहेर आहेत. पंतप्रधान असो की मंत्री, जे गंभीर स्वरूपांच्या गुन्ह्यासाठी ३० दिवस अथवा ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस तुरुंगात राहिले असल्यास त्यांना पदावरून हटविणारे घटनादुरुस्ती (१३० वे दुरुस्ती) विधेयक आम्ही संसदेत आणले आहे. पण, या विधेयकाला काँग्रेस, राजदसह अन्य विरोधी पक्षांनी विरोध केला आहे. एखाद्या साध्या लिपिकाने थोडे दिवस जरी तुरुंगात घालविले तर त्याला निलंबित केले जाते. पण,

### १३ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १३ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन झाले. याप्रसंगी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, केंद्रीय मंत्री जितन राम मांझी आदी उपस्थित होते. पंतप्रधान मोदी नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री समर्थ चौधरी यांच्यासह खुल्या जीपमधून नागरिकांचे अभिवादन स्वीकारत सभास्थळी आले.

### बिहारी जनतेने जागरूक राहावे

राज्यात घुसखोरांची समस्या मोठी आहे. राजद आणि काँग्रेसने मतपेढीसाठी लांगुलचालन करण्याचे धोरण स्वीकारले असल्याने घुसखोरांचे फावत आहे. हे घुसखोर बिहारी नागरिकांचे हक्क हिरावत आहेत. मात्र, आम्ही तसे होऊ देणार नाही. जनतेनेही याबाबत जागरूक राहावे, असे आवाहन मोदींनी केले.



देशात असे काही राजकारणी आहेत, ज्यांनी तुरुंगात राहून सत्ताकारण केले. आमच्या ११ वर्षांच्या काळात एकही भ्रष्टाचाराचा आरोपी एनडीए सरकारवर लागला नाही. म्हणूनच भ्रष्टाचारी, डागाळलेल्या नेत्यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी जे विधेयक आणले आहे, त्याला काँग्रेस आणि राजद विरोध करीत असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

राजद अथवा काँग्रेसच्या काळात बिहारमध्ये एकही मोठा उद्योग आला नाही. त्यांनी केवळ मतपेढीचे राजकारण केले. राजदचे नेते तर भ्रष्टाचार करण्यातच गुंग होते. जनतेच्या भल्यापेक्षा या नेत्यांनी स्वतःचेच खिसे भरले, असा हल्लाबोलही त्यांनी केला.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ९
(जेवण पार्सल उपलब्ध)
शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा, उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रू.
वरण, बट्टी ३० रू.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रू
पार्सल मिळेल
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# आमच्या भूमीवरून कटाचे राजकारण नाही

## बांगलादेश सरकारचे दावे भारताने फेटाळले

**नवी दिल्ली, २२ ऑगस्ट** :

माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाचे काही कार्यकर्ते भारतात सरकारविरोधात राजकीय कारवाया करत असल्याचा आरोप बांगलादेशच्या सरकारने केला होता. यावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशच्या अंतरिम सरकारच आरोप फेटाळून लावले. सरकारला भारतातील अवामी लीग कार्यकर्त्यारकडून बांगलादेशविरुद्ध कोणत्याही कारवायांची माहिती नाही. भारत आपल्या भूमीवरून कोणत्याही देशाविरुद्ध राजकीय कारवायांना परवानगी देत नसल्याचे भारताने स्पष्ट केले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, बांगलादेशच्या अंतरिम सरकारची टिप्पणी चुकीची आहे. बांगलादेशात मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका व्हाव्यात, जेणेकरून लोकांची इच्छा काय आहे, हे कळेल, अशी भारताची इच्छा आहे. आम्ही कोणत्याही देशाविरोधात राजकीय कारवाया करण्यासाठी कोणालाही परवानगी दिली नाही.

### एल्विशच्या घरावर गोळीबार करणाऱ्या आरोपीला अटक

**गुरुग्राम** : हरियाणातील गुरुग्राम येथे यूट्यूबर आणि बिग बॉस ओटीटी विजेता एल्विश यादवच्या घरावर गोळीबार करणाऱ्या आरोपी इशांत ऊर्फ इशू गांधीला फरिदाबाद गुन्हे शाखेने एन्काउंटरनंतर अटक केली आहे.

इशांत फरिदाबादमध्ये लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. इशांतने एल्विशच्या घरी गोळीबार केल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, चकमकीत इशांतच्या पायाला गोळी लागली आहे. तो सध्या रुग्णालयात दाखल आहे. १७ ऑगस्ट रोजी पहाटे साडेपाचला सेक्टर ५७ मधील एल्विशच्या घरावर २४ राउंड गोळीबार झाला होता.

# खगोलशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताला चार सुवर्ण, एक रौप्य

## जागतिक स्तरावर शास्त्रज्ञांचा पराक्रम

◆ **मुंबई, २२ ऑगस्ट**

१८ व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या तरुण खगोलशास्त्रज्ञांनी अभूतपूर्व यश मिळवले. आरुष मिश्रा, अक्षत श्रीवास्तव, बानीपब्रत माझी आणि पाणिनी यांनी सुवर्णपदक पटकावले, तर सुमंत गुप्ताला रौप्यपदक मिळाले. ६४ देशांतील ३२० तरुण शास्त्रज्ञ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

अंतिम निकाल गुरुवारी मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक सभागृहात जाहीर झाला. या कार्यक्रमाला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. दीपांकर बनर्जी आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव, तसेच होमी भाभा राष्ट्रीय संस्थेचे कुलगुरू डॉ. अनिल काकोडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जिज्ञासा, सौहार्द आणि जागतिक प्रगतीच्या भावनेतून विज्ञानाच्या नव्या क्षितिजांचा सातत्याने शोध घ्या, असे आवाहन डॉ. काकोडकर यांनी विद्यार्थ्यांना केले. डॉ. बनर्जी यांनी भारतातील अवकाश विज्ञान नव्या टप्प्यात प्रवेश करीत असल्याचे सांगितले.



गट स्पर्धेत शनी गटा या संघाला विशेष विजेतेपद मिळाले. यात बांगलादेशचा फर्हान साजिद, बोलिव्हियाचा अडेमीर जयमेस रिवेरा, ब्राझीलचा लुका पिर्मता, बल्गेरियाचा स्वेतोस्लाव अराबोव, फ्रान्सची चार्लेन इलोय आणि जॉर्जियाची मरियम बेकौरी यांचा समावेश होता.

### ५४ पैकी पाच विद्यार्थ्यांची निवड

कठीण चाचण्यांमधून एकूण ५४ पैकी पाच विद्यार्थ्यांची भारतामधून या स्पर्धेसाठी निवड झाली. २१ ऑगस्ट रोजी एकूण १४५ पदके प्रदान केली यामध्ये ५० सुवर्ण, ४४ रौप्य, ५१ कांस्य पदकांसह २६ विशेष उल्लेखपत्रांचा समावेश होता. या ऑलिंपियाडचे आयोजन होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च यांनी संयुक्तपणे केले.

### इम्रान खान यांना आठ खटल्यांत जामीन

**नवी दिल्ली, २२ ऑगस्ट** :

पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी माजी पंतप्रधान आणि पीटीआयचे संस्थापक इम्रान खान यांना ९ मे २०२३ रोजी झालेल्या दंगलीशी संबंधित आठ प्रकरणांमध्ये जामीन मंजूर केला. या वेळी लाहोर उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला, ज्यामध्ये त्यांना यापूर्वी दिलासा नाकारण्यात आला होता. या निर्णयामुळे त्यांचा तुरुंगातून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश याह्या आफ्रिदी यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर इम्रान खान यांना जामीन देण्याचा निर्णय दिला. विशेष सरकारी वकील झुल्फिकार नक्वी यांनी आग्रह धरला की, जामीन आदेश नेहमीच अंतरिम असतात आणि खटल्याच्या कार्यवाहीवर परिणाम करत नाहीत. त्यांनी १९९६ ते २०२४ पर्यंतच्या अनेक उदाहरणांचा उल्लेख केला.

## रायपूरमध्ये सहकार भारतीतर्फे आज विणकामगारांसाठी राष्ट्रीय अधिवेशन

**जळगाव :** सहकार भारतीतर्फे विणकर कामगारांसाठी रायपूर (छत्तीसगढ) येथील श्री जैनम मानस भवन येथे पहिले राष्ट्रीय अधिवेशन शनिवारी (२३ ऑगस्ट) होणार आहे. या अधिवेशनाला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री गिरीराज सिंह उपस्थित असतील. छत्तीसगढ विधानसभेचे अध्यक्ष डॉ. रमन सिंह अध्यक्षस्थानी राहतील. तसेच छत्तीसगढचे उपमुख्यमंत्री अरुण साव, विजय शर्मा, कृषिमंत्री रामविचार नेताम, अर्थ व उद्योगमंत्री लखनलाल देवांगन, रायपूरच्या महापौर मीनल चौबे, सहकार विभागाचे मंत्री केदार कश्यप हे उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनला मार्गदर्शक म्हणून सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया, राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर हे मार्गदर्शन करणार आहेत. अधिवेशनाला उपस्थितीचे आवाहन सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष राधेश्याम चंद्रवंशी आणि महामंत्री कनिराम यांनी केले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### पटेल अभियांत्रिकीच्या १०० विद्यार्थ्यांचा 'सॉफ्टवेअर डेव्हलपर'मध्ये सहभाग

**शिरपूर :** आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात सिम्बायोसिस स्किल युनिव्हर्सिटीतर्फे (पुणे) 'फुल स्टॅक सॉफ्टवेअर डेव्हलपर सर्टिफिकेशन' हा प्रशिक्षण-कार्यक्रम नुकताच झाला. ३०० तासांचा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम नामांकित कंपन्यांच्या सीएसआर निधीतून झाला. यामध्ये अंतिम वर्षाच्या १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. जे. बी. पाटील यांनी सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मिल्केश जैन, प्रा. कृणाल राणे, प्रा. मयूर पाटील, प्रा. कैलास देवरे यांनी प्रयत्न केले.




### वाल्मीकनगरमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात

**शिरपूर :** शहरातील वाल्मीकनगरमधील आर. सी. पटेल प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्मोत्सव व दहीहंडी कार्यक्रम उत्साहात झाला. मुख्याध्यापिका रेखा सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होत्या. विद्यार्थ्यांनी गवळण व कृष्ण गीते गायन करत श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा केला. त्यानंतर गोविंदांनी दहीहंडी फोडली. बालवाडी व पहिलीसाठी राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत बालवाडीत नित्या सनी महाले प्रथम व विहान प्रशांत पाटील, नव्या सनी महाले व जिग्नेश जयपाल राजपूत द्वितीय, तनुश्री योगेश पाटील व नैतिक महेंद्र गिरासे तृतीय, पहिलीमधून प्रिया ज्ञानेश्वर पाटील प्रथम व तनिश उमाकांत पाटील, नताशा भूषण करंकाळ व नैतिक भरत कोळी द्वितीय, गायत्री प्रफुल्ल जाधव व दक्ष चंद्रशेखर चौधरी तृतीय आणि उत्तेजनार्थासाठी कुलवंश नितीनसिंग राजपूत याने यश प्राप्त केले.




### धरणगावात पोळ्यानिमित्त शेतकरी कर्जमुक्तीचा संदेश

**धरणगाव :** शहरासह तालुक्यातील बहुतांश ग्रामीण भागात बैलपोळा उत्साहात झाला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख भागवत भगवान चौधरी यांनी बैलजोडीच्या झुल्यावर राज्य शासनास निवडणुकीत केलेल्या घोषणांची आठवण करणारे बॅनर लावून दिलेला शब्द पाळा व शेतकऱ्याचा ७/१२ कोरा करा आणि संपूर्ण कर्जमाफी करा, असा संदेश लिहून शेतकरीवर्गात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शासनाने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली तरच पोळ्याचे महत्त्व असेल. बैलजोडीवर बॅनर लावून वाजंत्री लावून सर्व शहरात मिरवणूक काढली, याची चर्चा ठिकठिकाणी होत असून, शेतकरी कर्जमुक्ती व्हायला हवी, या वृत्ताला दुजारा मिळत आहे.



### आदर्शनगरातील इंग्रजी शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी

**शिरपूर :** येथील आदर्शनगर भागातील आर. सी. पटेल इंग्रजी प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्मोत्सव व दहीहंडी उत्सव उत्साहात झाला. सुरुवातीला भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक हेमंतकुमार देवरे, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भगवान श्रीकृष्ण यांची माहिती सांगितली. विद्यार्थी श्रीकृष्ण व राधा यांच्या वेशभूषेत आले होते. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी श्रीकृष्ण जन्म यावर आधारित नाटिका व नृत्य सादर करून मंत्रमुग्ध केले. शिक्षक व विद्यार्थी यांनी समूह नृत्य सादर केले. शिक्षकांनी दहीहंडी फोडून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. महेश चौधरी व वैशाली बाविस्कर यांनी सूत्रसंचालन केले.

## निधन वार्ता



### लता चौधरी

**फैजपूर (ता. यावल) :** येथील खुशालभाऊ रोडवरील रहिवासी लता श्रीधर चौधरी (वय ८४) यांचे गुरुवारी (२१ ऑगस्ट) निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सप्तशृंगी गॅस एजन्सीचे संचालक जितेंद्र चौधरी यांच्या त्या आई होत.



### विशाल कंडारे

**सोयगाव :** शहरातील रहिवासी विशाल पारस कंडारे (वय ३५) यांचे शुक्रवारी (२२ ऑगस्ट) पहाटे चारच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, आई, वडील, असा परिवार आहे. रमेश कंडारे यांचा तो पुतण्या होय.

# मंडई, मॉलसह पाचकंदील मार्केटचा आराखडा त्वरित तयार करा

## आमदार अनुप अग्रवाल : धुळ्यात महापालिका आयुक्तांसोबत आढावा बैठकीत सूचना

**धुळे :** शहरातील पाचकंदीललगत महापालिका मालकीच्या जुन्या मार्केटचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. तसेच देवपूरमधील नवरंग जलकुंभालगतच्या जागेवर चारमजली मॉलसह भाजीपाला विक्रेत्यांसाठी २०० ते २५० ओटे तयार करण्यासाठी लवकरात लवकर प्रशासकीय कार्यवाही करा. यासाठीचे आराखडे, नकाशे, व अंदाजपत्रक तातडीने तयार करा. यात महापालिका आयुक्तांसह अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून कार्यवाही करावी, अशा सूचना आमदार अनुप अग्रवाल यांनी शुक्रवारी (२२ ऑगस्ट) केल्या.

नवरंग जलकुंभाच्या जागेत व्यापारी संकुलासह भाजी विक्रेत्यांसाठी ओटे तयार करणे, पाचकंदीललगत महापालिकेच्या मालकीच्या चारही मार्केटची नूतनीकरणाच्या नियोजनासंदर्भात आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील यांच्या दालनात आमदार अग्रवाल यांनी ही बैठक घेतली. आयुक्त दगडे-पाटील, सहाय्यक आयुक्त किशोर सुडके, नगरसचिव मनोज वाघ, उपअभियंता चंद्रकांत उगले, उपअभियंता पी. डी. चव्हाण, उपअभियंता कमलेश सोनवणे, उपअभियंता प्रकाश सोनवणे आदी उपस्थित होते.

आमदार अग्रवाल यांनी सांगितले, की नवरंग जलकुंभाजवळ मॉल बांधण्याचे नियोजन आहे. यामध्ये तळमजल्यावर दुकाने, पहिल्या मजल्यावर फूड कोर्ट, दुसऱ्या



मजल्यावर गेम झोन आणि सर्वांत वरच्या मजल्यावर मल्टिप्लेक्स थिएटरचे नियोजन आहे. तसेच भाजी मंडईमध्ये विक्रेत्यांसाठी शेड स्वरूपात २०० ते २५० गाळे बांधण्याचे नियोजन आहे. याबाबत महापालिका स्तरावर सुरू असलेल्या कार्यवाहीची आयुक्त दगडे-पाटील यांनी आमदार अग्रवाल यांना माहिती दिली. आमदार अग्रवाल यांनी मॉल, भाजी मंडई आणि पाचकंदील मार्केटचा आराखडा, त्यात समाविष्ट करावयाच्या बाबी, नकाशे, अंदाजपत्रक आदी मुद्द्यांवर महापालिका पॅनलवरील वास्तुविशारद आनंद खैरनार यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा करत माहिती जाणून घेतली. तसेच ओट्यांच्या बांधकामाबाबत काही सूचनाही केल्या. नवरंग जलकुंभाजवळील व्यापारी संकुल, भाजी मंडई आणि पाचकंदीललगतच्या चारही मार्केट विकसनासाठी निधी पूर्ततेची जबाबदारी आमदार अग्रवाल यांनी स्वीकारली. त्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. तसेच याबाबत पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पाठपुरावा करत जिल्हा नियोजन मंडळाकडेही निधी मागणीचा प्रस्ताव देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

### रस्त्यांची डागडुजी करा : आमदार अग्रवाल

आबालवृद्धांचा हवाहवासा वाटणारा गणेशोत्सव पुढील आठवड्यात सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख रस्त्यांसह विविध भागांतील रस्त्यांवर पडलेले खड्डे त्वरित बुजवावेत, गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी महापालिका स्तरावर पांझरा नदीकाठी तसेच हत्तीडोह परिसरात पाण्याचे हौद ठेवावेत, हायमास्ट दिवे लावावेत, निर्माल्य संकलनासाठी ट्रॅक्टर अथवा घंटागाड्यांची सोय करावी, आदी सूचनाही आमदार अग्रवाल यांनी केल्या.

# शांतता समिती बैठकीत मार्गदर्शनासह पोलिसांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा

## विशेष पोलिस महानिरीक्षक कराळे यांची विशेष उपस्थिती

**नंदुरबार :** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती, गणेश मंडळासह विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या विशेष उपस्थितीत बैठक घेण्यात आली. बैठकीत मार्गदर्शनासह प्रावीण्यप्राप्त पोलिस पाल्यांचा सत्कारही करण्यात आला.

जिल्ह्यातील आगामी गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद हे महत्त्वाचे सण शांततेत पार पडून सर्वत्र कायदा-सुव्यवस्था अबाधित राहून प्रत्येकाला सण आनंदाने साजरा करता यावा यासाठी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या विशेष उपस्थितीत येथील पोलिस मुख्यालयात गुरुवारी (२१ ऑगस्ट) सायंकाळी शांतता समिती तसेच गणेश मंडळांचे पदाधिकारी व सदस्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीस शांतता समितीचे १२० ते १५० सदस्य



तसेच गणेश मंडळांचे पदाधिकारी व विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत विशेषतः आगामी सण- उत्सवांच्या अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजनांसंदर्भात चर्चा करण्यात आली.

विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या हस्ते जिल्हा पोलिस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या पाल्यांचा शिक्षण, खेळ, कला, स्पर्धा परीक्षा आदींमध्ये विशेष प्रावीण्य प्राप्त केल्याने गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलिस अधीक्षक आशित कांबळे, पोलिस उपअधीक्षक अनिल पाटील, नंदुरबारचे उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन, शहाद्याचे दत्ता पवार, अक्कलकुव्याचे सुभाष भोये, महावितरणचे अधीक्षक अभियंता दराडे, नगरपालिकेचे कार्यकारी अधिकारी राहुल वाघ, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांच्यासह जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### सिद्धेश्वर मंदिरात महारुद्राभिषेक स्वाहाकार कार्यक्रम

**तळोदा :** शहरातील ब्राह्मण गल्ली परिसरातील वृंदावनवाडीशेजारील ३०० वर्षांपूर्वीच्या म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील अतिप्राचीन सिद्धेश्वर महादेव मंदिरात १७ ते २१ ऑगस्टदरम्यान महारुद्राभिषेक स्वाहाकार कार्यक्रम घेण्यात आला. आचार्य बाळकृष्ण जोशी (तळोदा), वेदमूर्ती अभय शास्त्री जोशी (अमळनेर), वेदमूर्ती प्रसाद कुलकर्णी (जळगाव), वेदमूर्ती अवधे शास्त्री पंड्या (नंदुरबार), वेदमूर्ती जयेश शास्त्री पाठक (नंदुरबार) व ब्रह्मवृंदांनी पौरोहित्य केले. कार्यक्रमाचे यजमान रजनीबाई चौधरी, मीनाक्षी चौधरी, योगेश चौधरी, लीना चौधरी, साई चौधरी आदी होते. कार्यक्रमाचा समारोप २१ ऑगस्टला सायंकाळी झाला. रात्री महाआरती व महाप्रसादाचे वाटप झाले. कार्यक्रमासाठी आई सप्तशृंगी पदयात्रा मंडळ, सर्वोदय गणेश मित्रमंडळ, सिद्धेश्वर गणेश मित्रमंडळ (तळोदा) आदींचे विशेष सहकार्य लाभले.

# गाडी लोहार समाज महासंघातर्फे शहाद्यात उद्या विद्यार्थी गुणगौरव

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, २२ ऑगस्ट**

येथे गाडी लोहार समाज महासंघ, धुळे (महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश) व नंदुरबार जिल्हा गाडी लोहार समाज मंडळ यांच्यातर्फे विद्यार्थी गुणगौरव व सन्मान सोहळा रविवारी (२४ ऑगस्ट) सकाळी साडेदहाला होणार आहे.

सोहळा लोणखेडा बायपास रोडवरील शिव प्लाझा मंगल कार्यालयात होणार असून, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व सन्मान सोहळामान्यवरांच्या उपस्थितीत केला जाणार आहे. गाडी लोहार समाज महासंघाचे संस्थापक अध्यक्ष दिलीप जयराम लोहार (शिरपूर) अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी डॉ. मित्ताली सेठी व जिल्हा पोलिस प्रमुख श्रवण दत्त एस. तर प्रमुख अतिथी म्हणून विधान परिषदेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी, शहादा-तळोदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन दीपक पाटील, माजी नगराध्यक्ष मोतीलाल पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी कृष्णकांत कनवारिया, पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारकाचे समन्वयक प्राचार्य मकरंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाला गाडी लोहार महासंघाचे माजी अध्यक्ष अमृत दलपत लोहार, शहादा शहर गाडी लोहार समाजाचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र मिस्त्री,जळगाव येथील बाहेती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल गणपत लोहार, अशोक मायाराम लोहार, अमित रमेश गोराणे आदींची उपस्थिती राहील. सोहळ्यासाठी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# धुळ्यात उद्या मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## एबी फाउंडेशनतर्फे गणेशोत्सवानिमित्त उपक्रम; लाभ घेण्याचे आवाहन

**धुळे :** महाराष्ट्र आरोग्य हमी सोसायटी व एबी फाउंडेशनतर्फे श्री गणेशोत्सवानिमित्त येत्या रविवारी (ता. २४) भव्य मोफत आरोग्य शिबिर होत आहे. या शिबिराचा शहरातील विविध आजारांच्या रुग्णांसह नागरिकांनी लाभ घ्यावा, तपासणी करून उपचार घ्यावेत, असे आवाहन एबी फाउंडेशन, शिबिराचे संयोजक समाधान शेलार व शेलार ॲक्वा वॉटर मित्रपरिवाराने केले आहे.

येथील साक्री रोडवरील जे. के. ठाकरे हॉस्पिटलजवळील सिंहस्थनगरमध्ये सकाळी दहा ते दुपारी दोन या कालावधीत हे आरोग्य तपासणी शिबिर होईल. पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होईल. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रावसाहेब गिरासे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते संजय शर्मा, प्रदेश सरचिटणीस डॉ. सुशील महाजन, एबी फाउंडेशनच्या अध्यक्षा अल्पा अग्रवाल यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी उपस्थित असतील. शिबिरात आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने विविध आजारांच्या निदानासाठी रक्त चाचण्यांसह हृदयरोग, त्वचाविकार, नाक-कान-घसा, संसर्गजन्य रोग, बालरोग, प्लास्टिक सर्जरी, पॉली ट्रामा, स्त्रीरोग, नेत्ररोग, अस्थिरोग, फुफ्फुसाचे आजार, संधिवात, न्यूरोसर्जरी आदी आजारांच्या तपासण्या करून रुग्णांवर उपचार केले जातील. आवश्यक त्या रुग्णांना संदर्भसेवेसाठी मुंबई-पुण्यातील रुग्णालयांत उपचारांसाठी पाठविले जाईल. शस्त्रक्रियांची गरज भासल्यास त्यांच्यावर मोफत अथवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील. शहरासह जिल्ह्यातील विविध तज्ज्ञ डॉक्टर तपासण्या व उपचार करतील.

धुळेकरांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन एबी फाउंडेशनच्या अध्यक्षा अल्पा अग्रवाल, समन्वयक कमलेश देवरे, संयोजक शेलार ॲक्वा वॉटरचे समाधान शेलार यांनी केले.

## तळोद्यातून ४० हजारांची रोकड लंपास

**तळोदा :** शहराच्या मुख्य भागातील छत्रपती मल्टी सर्व्हिसेस मिनी बँकेतून दुपारी तीनच्या सुमारास अनोळखी व्यक्तीने ४० हजारांची रोकड लंपास केल्याचे बँकमालकांनी सांगितले. बँकचालक योगेंद्र साठे हे रोकड घेण्यासाठी बँकेत गेले असता, चोरीचा प्रकार समोर आला. त्यामुळे परिसरात घबराट पसरली असून, व्यापाऱ्यांनी व्यवसाय करणे कठीण झाले आहे. दहा महिन्यांपूर्वी कॉलेज रोडवरील मिनी बँकेत साडेचार लाखांची रोकड लंपास झाली होती. त्यापाठोपाठ महिन्यानंतर तळवे येथील शिक्षकाचे पेन्शनचे पैसे दिवसाढवळ्या हातातून चोरीला गेले. त्यापैकी कोणतीच रोकड पोलिस प्रशासनाच्या हाती लागली नाही. आता पुन्हा मिनी बँकेतून ४० हजार लंपास झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. चोरीबाबत योगेंद्र साठे यांनी तक्रारअर्ज दाखल केला आहे.

### धुळ्यात लायन्स क्लबतर्फे सामूहिक नृत्य-गायन स्पर्धा

**धुळे :** लायन्स क्लबतर्फे रंग दे तिरंगा फेस्टिव्हलअंतर्गत आंतरशालेय सामूहिक नृत्य व गायन स्पर्धा हिरे भवनात घेण्यात आली. स्पर्धेत पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, नॉर्थ पॉइंट स्कूल, चावरा पब्लिक स्कूल, सिस्टेल इंग्लिश मीडियम स्कूल, स्वेस उर्दू हायस्कूल, डॉलीस हाऊस इंग्लिश मीडियम स्कूल, सिंधुरत्न एसवीसी, महात्माजी इंग्लिश स्कूल, सेंट अँथनी स्कूल, छत्रपती शिवाजी पब्लिक स्कूल, होराइजन इंटरनॅशनल स्कूल (अजंग), सरस्वती ज्ञान निकेतन या शाळांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात चंद्रकांत पाटील, अथर्व लोखंडे, अर्णव लोखंडेप्रा. गिरीश साळुंखे, प्रा. उमेश भांडारकर, प्रा. योगेश साळुंखे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी लायन्स क्लबच्या अध्यक्षा सोनल बरडिया, सचिव सोनाली लोखंडे, खजिनदार पूजा कानुगो आदी पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

**Change In Name**

I HAVE CHANGED MY NAME FROM" **SHAIKH FEROZ"**. TO " **SHAIKH FIROZ MANJUR "** . ALL DOCUMENTS ARE BELONG TO MY NAME.

**Change In Name**

OLD NAME
**MO.ARIF HAJI MO.YUSUF**
NEW NAME
**ARIF HAJI YUSUF BAGWAN**
JOSHI PETH
JALGAON

**Change In Name**

OLD NAME
**JAWEED SHAIKH ABDUL BAGWAN**
NEW NAME
**JAVED ABDUL BAGWAN**
JOSHI PETH
JALGAON

**Change In Name**

I Archana Jagannath Patil (old name) W/O **Mr. Makarand Ramesh Rane** R/O P. NO. 18, JIVAN MOTI COLONY, MOHADI ROAD, JALGAON, 425001, Maharashtra, INDIA have changed my name to **MANASWI MAKARAND RANE** (New Name) for all future purpose

# ऐतिहासिक नामसप्ताह महोत्सव उद्यापासून

## पिंपळनेरमध्ये विविध कार्यक्रमांचे नियोजन; ३१ ऑगस्टपासून यात्रोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**पिंपळनेर (साक्री), २२ ऑगस्ट**

येथील प्रदीर्घ व अखंड परंपरा असणारा १९७ वा श्री नामसप्ताह महोत्सवाचा प्रारंभ रविवारपासून (२४ ऑगस्ट) होणार आहे. ३० ऑगस्टला श्री समर्थ सद्गुरू खंडोजी महाराजांची १९७ वी पुण्यतिथी आहे. महाकाकड आरती ३१ ऑगस्टला पहाटे ५ ते ७ वाजता, पालखी सोहळा रात्री ११.३० ते सोमवारी सकाळी ८ पर्यंत, कुस्त्या व गोपालकाला १ सप्टेंबरला, पारंपरिक नृत्य स्पर्धा २ सप्टेंबरला, तर ३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत पिंपळनेर शहराची यात्रा भरणार आहे. अशाप्रमाणे नामसप्ताहातील विविध कार्यक्रम होणार आहेत.

दररोज पहाटे ५ वाजता भुपाळ्या, काकडा आरती, सकाळी ८ वाजता गीतापाठ, दि.२५,२६ २७ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता व्याख्यान,सायंकाळी ५ वाजता महिलांचे



भजन,६ वाजता हरिपाठ, ८ वाजता पंचपदी भजन,रात्री ९ वाजता आरती, रात्री ९.३० ते ११.३० पर्यंत कीर्तन असे विविध कार्यक्रम आयोजीत केले असुन २५ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट या कालावधीत दुपारी २ ते ४ या वेळेत श्रीमती कविता गायधनी, नाशिक यांचे संस्कारित स्त्री व स्त्री संस्कार,२६ ऑगस्ट रोजी वैजयंती सिन्नरकर, नाशिक यांचे कुटुंबव्यवस्था-आत्मचिंतन, २७ ऑगस्ट रोजी श्रीमती अचला वाघ,नाशिक यांचे महिला संत या विषयावर व्याख्यान होणार आहे.तर २८ ऑगस्ट रोजी संगीताचार्य डॉ.शेखर रुद्र व सहकारी, पुणे यांचे भक्तिसंगीत कार्यक्रम सादर होणार आहेत.सप्ताहाच्या कालावधीत दररोज रात्री ९.३० ते ११.३० या वेळेत ह.भ.प.श्री.निनाद कुलकर्णी (नाशिक),ह.भ.प.सौ. रोहिणीताई माने-परांजपे (पुणे),ह.भ.प.श्री.संतोष महाराज काळोखे (देहुकर),ह.भ.प.ज्योतिताई बिडगर (उसवाड,नाशिक),ह.भ.प.श्री.देविदास महाराज आणि सहकारी (धुळे), ह.भ.प.श्री.योगेश्वर महाराज देशपांडे (पिंपळनेर,धुळे) यांच्या भजन-कीर्तनाचा कार्यक्रम आयोजीत केला आहे.याच दरम्यान शहरातील विविध मंडळांकडून दररोज रात्री पायदळी सोंग, ट्रॅक्टरवरील सजीव देखावे साजरे केले जातील.पिंपळनेरसह पंच क्रोशीतील भाविकांनी नामसप्ताह महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.योगेश्वर महाराज देशपांडे यांनी केले आहे.

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
भारतात प्रथम क्रमांकावर असलेले
बिर्लांचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप
ZENITH-BIRLA LIGHT
ZENITH-BIRLA MEDIUM
ZENITH-BIRLA HEAVY
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ,
जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

क्रमांक/ ध उ आ-/२९४६/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, मायादेवी मंदिरा समोर महाबळ रोड, सामाजिक न्याय भवना शेजारी जळगांव. दिनांक ०८/०८/२०२५

### जाहीर चौकशी नोटीस

**फेरफार अर्ज क्रमांक-४५९/२०२५, कलम २२ अन्वये**

सार्वजनिक न्यासाचे नाव- इंदिरा ललवाणी मेडीकल रिसर्च सेंटर जळगांव ता. जि. जळगांव. नोदणी क्रमांक एफ- ४५६/जळगांव

अर्जदार सौ नितिका मनिष जैन रा. जळगांव ता जि जळगांव. सर्व संबधीत लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त जळगांव विभाग जळगांव हे वर नमुद केलेल्या अर्जासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुददयावर चौकशी करणार आहे.

**खालील प्रमाणे बांधकाम रेकॉर्डवर घेण्यांत यावे.**

| मौजे शेंदुर्णी | गट नं | हे आर |
|---|---|---|
| ता. जामनेर जि.जळगांव. | १) ४२२/१ | १.५१ |
| | २)४२२/२ | १.५३ |
| | ३)३३/३ | ०.८० |
| | एकुण- | ३.८४ |

वरिल जमीनीवर खालील प्रमाणे शाळेची ईमारत बांधकाम करण्यांत आलेले आहे.
तळमजला- १२ वर्गखोल्या १०x७,
११ टॉयलेट बाथरुम १.०२x१.२०
१-रिसेप्शन हॉल ७.५ x १०, १-मुख्यध्यापक रुम ४.७७x४.७७, १-उपमुख्यध्यापक रुम ४.७७x४.७७
१-वेटींग रुम ४.७७x३.५८, १-स्टाफ रुम ३.५२x७.२७
१-स्टाफ रुम ३.५२x७.२७, ११-टॉयलेट बाथरुम, १.०२x१.२०, १-ऑफीस ४.७७x७.२७, १-लायब्ररी ९.७७x७.२७, १-सेमिनार हॉल ७.५x७.५, १-मुलींची कॉमन रुम ७.५x७.५, २-जिने
**पहिला मजला-** ८-वर्ग खोल्या २४.०x२६.०, १-प्रिंसीपल रुम २०.०x२४.०, १-संगणक कक्ष १४.३x२०.०, १-लायब्ररी १७.६x२४.०, १-पुरुषांचे टॉयलेट, व्हरांडा ८.०

पहिला मजला एकुण बांधकाम ७७८०.०० स्के. फीट रु. ९५,४५,५००/- अंदाजे बांधकाम खर्च तळमजला व पहिला मजला तसेच सदर न्यासाच्या बाबतीत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये न्यासाचे स्थावर मालमत्तेवर बांधकाम करण्यांत आलेले आहे. त्याबाबतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरिल पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठवावी.त्या नंतर आलेल्या कैफितीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून सदर अर्जाची चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्यते आदेश दिले जातील. ही नोटीस. आज माझ्या सही निशी व मा. धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्यानिशी आज दिनांक ०७/०८/२०२५ रोजी दिली.

सही/-
(शक्तीकुमार रा. पाटील)
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग, जळगाव.
शिक्का

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक संजय प्रभाकर नारखेडे यांनी पी.एम.उद्योग, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : चंद्रशेखर दिगंबर जोशी यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com



# आपलं महानगर



## महत्त्वाचे

### ‘रामायण समजून घेताना’ कार्यक्रम जळगावात आज

**जळगाव** : संस्कृती जळगावतर्फे शनिवारी (२३ ऑगस्ट) सायंकाळी सहाला भय्यासाहेब गंधे सभागृहात ‘रामायण समजून घेताना’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला अलिबाग येथील ॲड. श्रीराम ठोसर हे व्याख्यान देणार आहेत. कार्यक्रमाला शहरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### भुसावळमध्ये बामसेफचे उद्या राज्यस्तरीय अधिवेशन

**जळगाव** : बामसेफ व राष्ट्रीय मूलनिवासी संघाचे ३९ वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवारी २४ रोजी भुसावळ येथील कमल गणपती हॉल शांतीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनच्या अध्यक्षस्थानी बामसेफचे अध्यक्ष वामन मेश्राम हे असून उद्‌घाटक म्हणून राज्य संघटक किशोर ढमाले हे उपस्थित राहणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मगन ससाणे, ॲड. राजेश झाल्टे, व्ही.व्ही. जाधव, दीपक वासनिक, माया जमदाडे, संदीप मानकर, डॉ. अनिलकुमार माने, पी.के. मेश्राम, शिवाजी पाटील, मौलाना उमरैन महफूज रहेमानी, प्रा. डॉ. दयानंद गोगले, नितीन गायकवाड, डी.आर. गायकवाड, बी.एस. हस्ते, सुर्यकांत पाटील, ॲड. गुणवंत रामटेके, डॉ. रघुनाथ बोरकर आदी उपस्थित राहतील.

### सुसाट कारच्या धडकेत सायकलस्वार जखमी

**जळगाव** : सुसाट कारने धडक दिल्याने सायकलस्वार तरुण गंभीर जखमी झाला. मंगळवारी (१९ ऑगस्ट) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास ही घटना जळगाव संभाजीनगर महामार्गावर एमआयडीसी परिसरात घडली. या प्रकरणी गुरुवारी कार चालकावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उज्वल प्रकाश साळुंखे (वय २८,रा. सुरेश नगर,महाबळ) हे मजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. एमआयडीसीतील काम आटोपून ते सायकलने जात असताना वेगातील कार ( एमएच ४८ ए ९७४०) ने मागवून धडक दिली. या घटनेत उज्वल साळुंखे रस्त्यावर पडल्याने ते जखमी झाले. त्यानंतर जागेवर न थांबता चालक कार घेऊन पसार झाला. प्रत्यक्षदर्शीनी घटनास्थळी धाव घेत जखमीला शासकीय वैद्यकीय रुग्णालयात हलविले. हवालदार गणेश वंजारी तपास करीत आहेत.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७)
२२३६१६६, २२२३६९९

**अंकासाठी संपर्क**

‘तरुण भारत’ अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# शहरात बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी

## सार्वजनिक मंडळांकडून गणेशोत्सव तयारीला वेग; घरगुती मूर्ती बाजारात दाखल

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

जिल्ह्यासह राज्य देशभरात सध्या सर्वत्र भक्तीमय वातावरण आहे. आगामी सप्ताहात बुधवार २७ ऑगस्ट रोजी लाडक्या गणरायाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाला आता केवळ मोजकेच दिवस शिल्लक असल्यामुळे गणेशभक्तांनी या उत्सवाच्या तयारीला सुरुवात केली आहे.

जळगाव शहरासह जिल्हाभरात गणपती कार्यशाळेतून सार्वजनिक मंडळांच्या मोठ-मोठ्या गणपतींचे आगमन सुरू झाले आहे. दुसरीकडे घरगुती गणपती मूर्ती बाजारात दाखल झाले आहेत. छोट्या आणि सुबक मूर्त्या पाहून भाविक नागरिकांचे मन मोहून जात आहे.

गणेश चतुर्थीला आता अवघ्या काही दिवसांचा अवधी शिल्लक राहिला असून, बुधवार २७ ऑगस्ट रोजी गणरायाची स्थापना केली जाणार आहे. त्याची लगबग जळगाव जिल्ह्यासह शहरात अनेकांच्या घरात, सार्वजनिक लहान मोठ्या मंडळांमध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणामध्ये सुरू झाली आहे.

**सामाजिक एकता आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक**

जळगाव जिल्ह्यासाठी गणेशोत्सव केवळ एक धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकता आणि सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. २७ ऑगस्टपासून ते पुढील १० दिवस चालणाऱ्या या उत्सवादरम्यान लाखो भक्त गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी मंडपात येतील.



### मुर्त्यांना सजवण्याचे काम अंतिम टप्प्यात

जळगाव शहरातील शांताई मुर्ती कला केंद्र, घोडके कला केंद्र, माया आर्ट स्टेशन रोड, मंगेश कला केंद्र, ओमकार, कलाकार, कुंभ कलाकृती यासह विविध अन्य १८ गणेश मुर्ती कला केंद्र आहेत. तसेच तालुकास्तरावर देखील गणेश मूर्ती कारखान्यांमध्ये गणपतीच्या मुत्यांना सजवण्याचे काम अंतीम टप्प्यात सुरू झाले असून लवकरच गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे.

### पर्यावरण प्रदूषण रोखण्यास प्राधान्य

जळगाव शहरात सुमारे सार्वजनिक लहान मोठ्या गणेश मंडळे आहेत. तर जिल्हाभरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा समावेश आहे. यंदा पर्यावरणाचा मुद्दा लक्षात घेऊन अनेक सार्वजनिक मंडळांकडून यंदा इको-फ्रेंडली मूर्ती नोंदविण्यास प्राधान्य देण्यात आले आहेत. जेणेकरून विसर्जनाच्या वेळी नदी नाले तलावांमधील होणारे प्रदूषण रोखले जाईल.

**विविध रूपातील गणेशमूर्ती**

जळगाव शहरात आकाशवाणी चौकासह विविध ठिकाणी यंदा अनेक नवनवीन गणेश मूर्त्या दाखल झाल्या आहेत. यात बाल गणेश, बटरफ्लाय गणराज, कृष्ण रुपातील मूर्ती, सिद्धीविनायक, दगडू शेठ हलवाई प्रतिकृती, नियमित आकारातील गणेश मुर्ती, धूर्मवर्ण, महादेव रुपातील गणेश मूर्ती यंदाचे प्रमुख आकर्षण असल्याचे पहायला मिळत आहे.

### जळगावात ९० रुपयांपासून ६५ हजारांपर्यंत आहेत दर

इको फ्रेंडली पर्यावरणपूरक तसेच पीओपींच्या गणेश मुर्तींसाठी लागणारे साहित्याच्या किमतीत नैसर्गीक आणि अन्यरंगसंगती साहित्यात यावर्षी वाढ झाली आहे. गणेश मुर्ती ६ इंच ते ८ इंचापासून लहान मुती ९० रूपयांपासून ते १५० तसेच २५०रूपये, १४ ते १८ इंच १२०० ते १५०० रूपये, इको फ्रेंडली ३९९ रूपयांपासून ते १२हजार ९९९ रूपये. तसेच पीओपी प्रकारात ८ इंच ते ५ फूट मूर्तीचे ५०० रूपयांपासून ते ४हजार, १०हजार रूपयांपर्यंत आहेत. मोठया मुर्तीमध्ये ८ ते १५ फूटांसाठी सर्वसाधारणपणे ५हजारापासून ते ३५हजारांसह सर्वात मोठया मुर्तीसाठी ६५ हजारांहून अधिक रकमेपर्यंत दर आहेत. धातूच्या मुर्ती यात ब्रांझ, ब्रास, चांदी, लाकडी मुर्ती देखील ५५०० रूपयांपर्यंत आहेत.

**असंख्य रोजगाराच्या संधी**

महाराष्ट्राचे लाडके आराध्य दैवत गणपती बाप्पाचे आगमन होत आहे. गणेशोत्सवा दरम्यान या व्यवसायात होणारी गुंतवणूक आणि उलाढाल ही हजारो करोडोंची असते. गणेश कारखान्यात विविध रूपातील गणपती मूर्ती साकारण्यात येवून रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लहानांपासून मोठ्या कारागिरांकडून मूर्ती घडवण्याचे काम करत आहेत. गणेशमूर्ती कला केंद्रांमध्ये जळगावसह परराज्यातून आलेल्या हजारो कारागिरांचा समावेश असून, गणेशोत्सवानिमित्त या बेरोजगारांना कामाची संधी दरवर्षी प्राप्त होते.





# शहर स्वच्छतेसाठी १० ई-घंटागाड्यांसह ११ वाहने दाखल होणार

## सप्टेंबरपासून प्रत्यक्ष कचरा संकलनाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

वॉटरग्रेसच्या कराराची मुदत संपुष्टात आल्यामुळे शहर स्वच्छतेचा मक्त आता बीव्हीजी या कंपनीला देण्यात आला आहे. या कंपनीचे अधिकारी जळगावात दाखल झाले असून त्यांनी शहराची पाहणी केली आहे. दरम्यान शहर स्वच्छतेसाठी १० ई-घंटागाडीसह ११ वाहने जळगावात दाखल होणार आहे.

शहरातील दैनंदिन स्वच्छता व कचरा संकलन कंत्राटाबाबत बीव्हीजी आणि वॉटरग्रेस कंपनीच्या वादावर न्यायालयात पडदा पडला आहे. ११ ऑगस्टला बीव्हीजी कंपनीकडून निकाल दिला. त्यानुसार कंपनीने कामाची तयारी सुरू केली आहे. त्यानुसार १ सप्टेंबरपासून बीव्हीजी कामास सुरुवात करणार आहे. यासाठीची तयारी सुरू करण्यात आली आहे. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी जळगावात दाखल झाले असून, ३१ रोजी सर्व वाहने ताब्यात घेणार आहेत. तर पुढच्या आठवड्यात मक्तेदार बीव्हीजीच्या १० ई घंटागाड्या, ११ डिझेलच्या घंटागाड्या शहरात दाखल होणार आहेत. प्रत्यक्ष कामास सुरुवात केल्यानंतर जेथे वाहने कमी पडली त्यानुसार वाहने उपलब्ध करून देणार आहेत. घंटागाड्यावर चालक, कामगार, सुपरवायझर व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. वाहन चालकासाठी १५०, सुपरवायझरसाठी २० अर्ज आले आहेत. पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण असे भाग करणार स्वच्छतेसाठी शहराचे पूर्व-पश्चिम व आहे. त्यानुसार कार्यालये व उत्तर-दक्षिण असे दोन भाग केले जाणार आहे. त्यानुसार मनुष्यबळाचे



विभाजन होईल. या वर्षांच्या निविदेत एमआयडीसीतही कचरा संकलनाचे नमूद आहे. त्यामुळे येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ असे ८ तास कचरा संकलन करण्यात येणार आहे.

**५०० कामगार लागणार**

बीव्हीजी कंपनीला ५०० कामगारांची आवश्यकता असून, १८ ते ४५ या वयोगटातील कामगारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. ४५ वयोगटावरील कामगारांचा या क्षेत्रातील अनुभव पाहून त्यांचीही निवड केली जाणार आहे. सर्व कामावर देखरेख व तक्रारींची सोडवणूक करण्यासाठी महापालिकेला कार्यालयाची मागणी कंपनीकडून करण्यात आली आहे. जुन्या मक्तेदाराकडील व नव्याने काम करू इच्छिणाऱ्यांसाठी २१ ते २४ ऑगस्ट या कालावधीत मुलाखती होणार आहेत.

# शिरसोली येथे बँकेच्या अधिकाऱ्यांनी साधला ग्रामस्थांशी संवाद

## सेंट्रल बँकेतर्फे ग्रामीण आर्थिक समावेशन संतृप्ती अभियान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

केंद्र शासनाच्या वित्तीय सेवा विभागाच्या सूचनेनुसार, जळगाव तालुक्यात शिरसोली येथे सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे ग्रामीण आर्थिक समावेशन संतृप्ति अभियान राबविण्यात आले. यात बँकेत खाते उघडण्यासह ई-केवायसी, शेतकरी कृषी योजनांच्या लाभ तसेच अन्य विविध तांत्रीक बाबींसंदर्भात बँक प्रशासन अधिकाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांसमवेत संवाद साधला.

याप्रसंगी बँकेचे विभागीय प्रमुख अजय कुमार सिंह, प्रादेशिकप्रमुख रमेश जेठानी, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक सुनील कुमार दोहरे, मुख्य व्यवस्थापक अभिषेक नंदेश्वर आणि हर्षल भगत, शिरसोली येथील सेंट्रल बँकेचे शाखा व्यवस्थापक मनोज तडवी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील ग्रामपंचायत पातळीवर १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान ग्रामीण आर्थिक समावेशन संतृप्ति अभियान राबविण्यात येत असून ग्राहकांना ई-केवायसी प्रक्रिया, सामाजिक सुरक्षा योजना आणि आर्थिक साक्षरता, शून्य बॅलन्ससह प्रधानमंत्री जन धन खाते उघडणे, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना सारख्या सामाजिक सुरक्षा विमा योजनेत नोंदणी, १० वर्षे किंवा त्याहून अधिक जुन्या अथवा निष्क्रिय खात्यांसाठी पुन्हा केवायसी, डिजिटल फसवणुकीविरुद्ध सतर्कता आणि रिझर्व्ह बँकेच्या दावा न केलेल्या खात्यांमधून रक्कम दावा काढण्याची प्रक्रिया आदी विषयांवर शिरसोली येथे शिबिरादरम्यान, बँकेचे विभागीयप्रमुख अजय कुमार सिंह यांनी ग्रामस्थ व बँकेच्या ग्राहकांशी संवाद साधला.



‘‘आधुनिक महिलांमध्ये पुरुषांसोबत खांद्याला खांदा लावून काम करण्याची क्षमता आहे, त्यासाठी त्यांना अधिक माहितीसह आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्णतेची आवश्यकता आहे. सेंट्रल बँक तुमच्या आर्थिक गरजा पूर्ण करेल, त्यातून तुमच्या सेवेची संधी द्या.’’ असे बचत गटाच्या महिला शक्तीला संबोधित करताना, प्रादेशिक प्रमुख रमेश जेठानी यांनी सांगीतले. तसेच बँका वेळोवेळी तुमच्या गरजांनुसार उत्पादने आणत असून ग्राहकांनी बदलत्या काळानुसार मागे न राहता त्यांना बँकिंग सुविधासंदर्भात येणाऱ्या समस्यांचे जलद निराकरण करण्याचे आश्वासन अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक सुनील कुमार दोहरे यांनी दिले.

शासन योजनांचे फायदे गावातील प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचावेत, यासाठी इतर लोकांना सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये सामील व्हावे, असे आवाहन करीत मुख्य व्यवस्थापक अभिषेक नंदेश्वर यांनी आभार मानले.



# विवेकानंद प्रतिष्ठानच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत बैलपोळा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

विवेकानंद प्रतिष्ठानच्या वाघनगर येथील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत बैलपोळा व मातृदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक हेमराज पाटील, समन्वयक सचिन गायकवाड, शैलेश बागडे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधींच्या हातून बैलजोडीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यश वाणी या विद्यार्थ्याने भारतात विविध ठिकाणी होणारा बैलपोळा विषयी माहिती दिली. तर ईश्वरी देसले या विद्यार्थिनीने आईची महती, प्रत्येकाच्या आयुष्यात आईचे महत्त्व, आईच्या विचारांनी मिळणारी प्रेरणा मातृदिनानिमित्त सांगितली. साने गुरुजी व त्यांच्या आई या भूमिकेतून शौर्य दुसाने, प्रांजल पाटील यांनी तर जिजाऊ व शिवबा यांच्या भूमिकेत रजत जोशी व श्रावणी या विद्यार्थ्यांनी नाट्य तसेच प्रेरणादायी संवाद केला. याप्रसंगी मुख्याध्यापक हेमराज पाटील यांनी मार्गदर्शनातून आईचे महत्त्व व पोळ्याचा धार्मिक व सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट केला. सूत्रसंचालन जयश्री पाटील यांनी केले. राजश्री कोळी यांनी आभार मानले.



# डॉ. उल्हास पाटील महाविद्यालयात सर्जा-राजाप्रति कृतज्ञता

**जळगाव** : येथील डॉ. उल्हास पाटील कृषी व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात बैलपोळ्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गोदावरी फाउंडेशनच्या सदस्या डॉ. केतकी पाटील यांच्या हस्ते सर्जाराजाचे पूजन करण्यात येऊन त्यांना पुरणपोळी आणि सप्तधान्यांचा नैवेद्य खाऊ घालण्यात आला.

बैलपोळ्याच्या या सणाला गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, डॉ. वैभव पाटील, अनिल पाटील, वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, कृषी महाविद्यालयाचे डॉ. अशोक चौधरी, डॉ. शैलेश तायडे, डॉ. पूनमचंद सपकाळे, देवेंद्र भंगाळे उपस्थित होते. पारंपारिक पध्दतीने हा बैल पोळ्याचा सण महाविद्यालयात साजरा करण्यात आला. तसेच कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि आयुर्वेद कॉलेजचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जैन हिल्स येथे पोळा उत्साहात

## अविनाश गोपाळ, हंसराज जाधव यांना पोळा फोडण्याचा मान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

आदिवासी पारंपारिक नृत्य विश्वगर्जना युवा सदस्यांचे ढोलताशांच्या वादनासह सादरीकरण, पारंपरिक संबळ वाद्यावर कंपनीच्या विविध ठिकाणी कामावर असलेल्या सालदारांचे नृत्य कृषीसंस्कृतीते मोलाचे स्थान असलेल्या वृषभ राजाची निघालेली भव्य मिरवणूक.. जैन हिल्सवरील पारंपारिक पोळा सण.. डोळ्यांचे पारणे फेडत होता. अशोक जैन यांच्यासह शहरातील मान्यवरांसह अनुभूती स्कूल व गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी ठेका धरत आनंदोत्सव साजरा केला. जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी २९ वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा करण्याची पद्धत सुरू केली होती. जैन हिल्स येथील ध्यानमंदीर येथे कृषी संशोधन प्रात्याक्षिक केंद्राच्या शेती विभागाच्या विविध ठिकाणाच्या सालदार मंडळींनी बैलांना एकत्र करून त्यांना पोळ्यासाठी तयार केले. तेथूनच सवाद्य मिरवणूक निघाली. कंपनीचे संस्थापक (कै.) भवरलालजी जैन यांचे स्मृतिस्थळ ‘श्रद्धा ज्योत’ येथे भाऊंच्या स्मृतिंना अभिवादन केले गेले. मारुतीच्या मंदिराचे दर्शन घेऊन सरस्वती पॉईंट, गुरुकुल पार्किंग मार्गे निघालेली सवाद्य मिरवणूक जैन हिल्स हेलीपॅडच्या मैदानात पोहोचली.



यावेळी अशोक जैन यांच्या हस्ते धवल ध्वज फडकावून बैल पोळाची सुरवात झाली. अविनाश गोपाळ, हंसराज जाधव यांना पोळा फोडण्याचा मान कंपनीचे सह व्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांच्या संकल्पनेने यावर्षी पोळा फोडण्याच्या रोख पारितोषिकात वाढ करण्यात आली होती. त्यानुसार यावर्षी २० हजार रुपयांचे रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते वितरीत झाले. त्यात जैन वाडा येथील सालदार हंसराज थावरस जाधव, अविनाश गोपाळ यांना पहिला मान मिळाला. हंसराजने यावर्षी सलग चौथ्यांदा पोळा फोडण्याचा मान मिळविला आहे. त्यांना प्रत्येकी (रोख ५ हजार रुपये) तर जैन सोसायटीचे दिलीप पावरा, साजन पावरा यांना दुसरा मान मिळाला (प्रत्येकी २ हजार रुपये) तर उर्वरित सहा जणांना तिसऱ्या क्रमांकाचा मान मिळाला. त्यात गोविंद पावरा, भगवान सावळे, वाल्मिक शिंदे, किशोर शिंदे, रामसिंग पवार यांना गौरविण्यात आले.



**यांची होती उपस्थिती**

पोळा उत्सवाप्रसंगी अशोक जैन व ज्योती जैन, निशा जैन, शोभना जैन, डॉ. भावना जैन यांच्यासह जैन परिवाराच्या हस्ते वृषभराजाचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, ऐश्वर्या रेड्डी, जेडीसीसी बँकेचे चेअरमन संजय पवार, व्यवस्थापकीय संचालक जितेंद्र देशमुख, डॉ. शेखर रायसोनी, अग्रणी बँकेचे सुनील दोहरे, महाराष्ट्र राज्य क्रेडाईचे उपाध्यक्ष अनिश शहा, आर्किटेक्ट शिरीष बर्वे, स्वरुप लुंकड, पारस राका, गोटूशेठ बंब, नंदलाल गादीया, माजी नगरसेवक अमर जैन, डॉ. उल्हास पाटील फिजोथेरेपीचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर, नॅचरोपॅथीच्या डॉ. कल्याणी नागूलकर, गांधी रिसर्च फाउंडेशनच्या डीन प्रो. गीता धरमपाल यांची उपस्थिती होती. सालदारगडींचा सपत्नीक सन्मान

सर्व सालदारगडींचा भेटवस्तु देऊन सपत्नीक गौरव मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला. अशोक जैन, ज्योती जैन, जैन इरिगेशनचे वरिष्ठ शास्त्रज्ज्ञ डॉ. अनिल ढाके, डॉ. बी. के. यादव, संजय सोनजे, सेवानिवृत्त वन अधिकारी राजेंद्र राणे, डॉ. इंगळे, विजयसिंग पाटील, डॉ. कल्याणी मोहरीर, प्रो. गीता धरमपाल आदी मान्यवरांच्याहस्ते गौरव झाला. किशोर कुळकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.



## अग्रलेख...

# वाहून गेलेले पावसाळी अधिवेशन

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले म्हणण्यापेक्षा विरोधकांच्या गदारोळामुळे हे संपूर्ण अधिवेशन वाहून गेले वा अधिवेशनावर पावसाने पाणी फेरले, असे म्हणावे लागेल. २१ जुलैला या अधिवेशनाची सुरुवात झाली आणि २१ ऑगस्टला हे अधिवेशन संपले, पण यात जनतेच्या जिव्हाळ्याच्या आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या किती मुद्यांवर चर्चा झाली, याचा विचार केला तर एक मोठे शून्य समोर येते. संसदेच्या कामकाजावर दर मिनिटाला काही लाख रुपयांचा खर्च होत असतो, पण कामकाज न झाल्यामुळे हा सारा खर्च वाया जातो, याचाही विचार व्हायला पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून संसदेच्या अधिवेशनात रोजच गदारोळ होणे हे ठरलेले आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांत एकवेळ प्रश्नोत्तराचा तास होणार नाही, शून्य तास होणार नाही, पण गोंधळ आणि गदारोळ झाल्याशिवाय राहत नाही. गोंधळ आणि गदारोळ हा संसदेच्या कामकाजाचा कुळाचार झाला, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. बरं गोंधळ हा फक्त लोकनिर्वाचित सभागृहात म्हणजे लोकसभेतच होतो असे नाही तर ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यसभेतही होतो आणि हे करताना सर्व सांसदीय संकेत, मर्यादा आणि शिष्टाचार पायदळी तुडवला जातो. हा गोंधळ आणि गदारोळ किती व्हावा तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाज वाटेल, एवढा असतो.

ऑपरेशन सिंदूरवर दोन दिवस दोन्ही सभागृहांत झालेली चर्चा वगळता या अधिवेशनाची एकही उपलब्धी सांगण्यासारखी नाही. काही विधेयके नाही म्हणायला पारित करण्यात आली, पण यातील एखाददुसरा अपवाद वगळता एकाही विधेयकावर व्यापक आणि सखोल चर्चा झाली नाही. विरोधी पक्षांच्या गदारोळात सरकारला ही विधेयके पारित करून घ्यावी लागली. विधेयकांवरील चर्चेत सरकारला घेरण्याची संधी विरोधी पक्षांनी गमावली, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. आपण लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात बसलो आहोत, याचे भानही गोंधळ घालणारे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य ठेवत नाही. गुन्हा दाखल झालेल्या आणि ३० दिवसपर्यंत जामीन मिळू न शकलेल्या लोकप्रतिनिधीचे पद आपोआप रद्दबातल होण्याबाबतचे विधेयक गृहमंत्री अमित शाह लोकसभेत मांडत असताना काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी कपडे घालून जो नंगानाच केला, ते पाहून देशातील समस्त लोकांची मान लज्जेने खाली झुकली. हेच आमचे लोकप्रतिनिधी आहे का, कशाला यांना आम्ही निवडून दिले, असा प्रश्न त्यांना पडला. सभागृहात पोस्टर्स घेऊन येणे अध्यक्ष तसेच सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणाबाजी करणे ही आता संसदेच्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षांच्या सदस्यांची नियमित प्रथा झाली आहे. विशेष म्हणजे अशी घोषणाबाजी करताना विरोधी पक्षांचे सदस्य सत्ताधारी बाजूला येतात. गृहमंत्री अमित शाह विधेयक मांडत असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी त्यांच्यासमोरील माईक हिसकण्याचा प्रयत्न केला, भाजपा सदस्य अमित शाह यांच्या संरक्षणासाठी धावले नसते, त्यांनी सुरक्षाकडे केले नसते, तर विरोधी पक्षांच्या संतप्त सदस्यांनी शाह यांना सभागृहात धक्काबुक्की करायलाही मागेपुढे पाहिले नसते. मुळात या विधेयकात गैर काय आहे, ते विरोधी पक्षांच्या सदस्यांनी देशातील जनतेला सांगितले पाहिजे. या विधेयकाच्या कक्षेत सरकारने फक्त मुख्यमंत्री आणि राज्यांच्या मंत्र्याचाच समावेश केला नाही, तर पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्र्यांनाही आणले आहे. त्यामुळे त्यामुळे उद्या विरोधी पक्षांच्याच नाही तर सत्ताधारी पक्षांच्या पंतप्रधानाने वा केंद्रीय मंत्र्याने चुकीचे काही केले तर त्यालाही त्याची किंमत चुकवावी लागेल, यात शंका नाही. याउपरही अमित शाह यांनी यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयके सखोल आणि व्यापक चर्चेसाठी संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवली आहेत. सरकारने आणखी काय करणे विरोधी पक्षांना अपेक्षित आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत १२० तास कामकाज होणे अपेक्षित होते, प्रत्यक्षात ३७ तासच कामकाज झाले. कामकाजाची टक्केवारी ३७ होती. उत्तीर्ण होण्यासाठी ३५ टक्के गुण लागत असतात. त्याचा निकष लावला तर संसदेच्या कामकाजाच्या परीक्षेत सर्व खासदार काठावर उत्तीर्ण झाले, असे म्हणावे लागेल.

प्रश्नोत्तराच्या तासात ४५५ प्रश्नांवर चर्चा व्हायला पाहिजे होती, प्रत्यक्षात ५५ प्रश्नांचीच तोंडी उत्तरे देता आली. राज्यसभेची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. त्यामुळेच अधिवेशनाच्या समाप्तीची घोषणा करताना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंशनारायणसिंह यांना सदस्यांच्या वागणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त करावी लागली, सदस्यांची कानउघाडणी करावी लागली. पण विरोधी पक्षांच्या सदस्यांवर त्याचा कोणताही परिणाम होईल, असे वाटत नाही. बिहारमधील स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (सर) च्या मुद्यावर सभागृहात चर्चा घडवावी, अशी विरोधी पक्षांची मागणी होती, याच मुद्यावरून विरोधकांनी सभागृहाचे कामकाज बंद पाडले. निवडणूक आयोग ही घटनात्मक यंत्रणा आहे, तिच्या कार्यपद्धतीवर संसदेत चर्चा करणे योग्य ठरणार नव्हते, कारण या चर्चेतून होणाऱ्या आरोपांना संसदेत येऊन मुख्य निवडणूक आयुक्त उत्तर देऊ शकणार नव्हते, या तांत्रिक बाबीमुळे सरकार या मुद्यावर चर्चेला तयार नव्हते. आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल काही आक्षेप असतील तर विरोधकांनी न्यायालयात धाव घ्यायला हरकत नाही. विरोधकांनी सरकारची ही बाजू समजून घ्यायला पाहिजे होती. मुळात संसदेच्या दोन्ही सभागृहांत गोंधळ घालून आपण काय साध्य केले, याचे आत्मपरीक्षण विरोधकांनी करायला पाहिजे. मुळात आपण विरोधक आहोत, म्हणून सरकारच्या सर्व गोष्टींना विरोध केलाच पाहिजे, गोंधळ घालून सभागृहाचे कामकाज बंद पाडलेच पाहिजे, असे नाही. संसदेचे कामकाज सुरू ठेवून विविध सांसदीय आयुधांचा वापर करत सरकारला घेरण्याचे कौशल्य विरोधकांनी दाखवणे अपेक्षित आहे. पण विरोधकांची संसदेच्या दोन्ही सभागृहांतील कृती देशातील सर्वसामान्य जनतेची निराशा करणारी म्हटली पाहिजे. हेचि फळ काय मम तपाला असे म्हणण्याची वेळ विरोधी पक्षातील काही गोंधळी सदस्यांनी जनतेवर आणली आहे.

काही वर्षांपूर्वी संसदेत एकापेक्षा एक संसदपटू होते. विशेष म्हणजे हे संसदपटू जसे विरोधी पक्षांत होते, तसेच सत्ताधारी पक्षातही होते. हे संसदपटू जेव्हा भाषणाला उभे राहात तेव्हा त्यांच्या शब्दांची परिणामकारकता एवढी असायची की सत्ताधारी पक्षाच्या पोटात गोळा फिरत असे. विरोधी पक्षांचे सदस्य सभागृहात आक्रमक व्हायचे, पण त्यात आक्रस्ताळेपणा नसायचा. सध्याच्या विरोधी पक्षांत आक्रमकता कमी आणि आक्रस्ताळेपणा जास्त दिसतो.

सभागृहात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यातील सौहार्द कमी झाल्यासारखे दिसते. सत्ताधारी पक्ष हा आपला शत्रू क्रमांक १ आहे, अशी विरोधी पक्षांची वागणूक असते. त्यामुळे भाषण करताना वा घोषणा देताना सभ्यपणा खुंटीला टांगून भाषेची मर्यादा ओलांडली जाते. पंतप्रधानपदाची गरिमा आणि प्रतिष्ठा विरोधी पक्षांनी राखली पाहिजे. तुम्हाला नरेंद्र मोदी नावाची ॲलर्जी असू शकते, पण ते देशाचे पंतप्रधान आहेत, लोकनेते आहेत, देशातील सर्वांत लोकप्रिय नेते आहेत, विशेष म्हणजे देशातील जनतेने सलग तीनदा निवडून देत त्यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे, याचे भान विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ठेवले पाहिजे.

जनतेला खासदार निवडून देण्याचा जसा अधिकार आहे, तसा त्यांच्या कसोटीवर न उतरणाऱ्या खासदाराला परत बोलवण्याचा अधिकारही असला पाहिजे. या संदर्भातील मागणी अधूनमधून डोके वर काढत असते. पण आता या मागणीवर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. सरकार अनेक वेळा घटनादुरुस्ती करत असते, तर जनतेच्या अपेक्षांवर आणि कसोटीवर न उतरणाऱ्या खासदारांना परत बोलवण्याचा अधिकार सरकारने जनतेला घटनादुरुस्तीच्या माध्यमातून करून दिला पाहिजे. त्याचप्रमाणे एकेका खासदारावर सरकार दरवर्षी पगार आणि भत्यापोटी कोट्यवधी रुपये खर्च करत असते. ज्या दिवशी गोंधळामुळे संसदेचे कामकाज होणार नाही, त्या दिवसाचा पगार आणि भत्ता खासदारांना मिळणार नाही, अशी तरतूदही कायद्यात करण्याची वेळ आली आहे. त्याशिवाय गोंधळी खासदारांचे डोळे उघडणार नाहीत. .

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# यांना बुद्धी दे गणनायका!

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणात सध्या एका छोट्या टिप्पणीने मोठा गदारोळ उडवला आहे. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री आणि त्यांच्या पत्नी अभिनेत्री पल्लवी जोशी यांनी 'कर्ली टेल्स' या युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत महाराष्ट्रीयन जेवणाबद्दल बोलताना वरण-भाताचा उल्लेख केला. ही मुलाखत ४४ मिनिटांची असून त्यातील १५ मिनिटांच्या आसपासचा भाग आता वादाचा केंद्रबिंदू बनला आहे. मात्र, माध्यमांनी या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढून द्वेष पसरवला, ज्यामुळे मराठी समाजात अनावश्यक प्रतिक्रिया उमटल्या. विवेक अग्निहोत्री दिल्लीचे रहिवासी असून त्यांना मसालेदार, स्पायसी जेवणाची सवय होती. पल्लवी जोशींसोबत लग्न झाल्यावर त्यांनी पहिल्यांदा महाराष्ट्रीयन जेवण चाखले. मुलाखतीत पल्लवी म्हणाल्या, 'महाराष्ट्रीयन पदार्थ बनवले तरी त्यांना आवडत नव्हते. ते म्हणायचे, 'ये गरीबों का खाना है.' विवेक अग्निहोत्री यांनीही याला दुजोरा दिला. ते म्हणाले, 'मी दिल्लीतून आलो होतो. जेवणात मसाले, घी भरपूर. इथे वरण-भात दिला, ज्यात मीठही कमी. लिंबूही वरून पिळलं जायचं. हा कल्चरल शॉक होता.' मात्र, पुढे त्यांनी याच मुलाखतीत लगेच स्पष्ट केले की, आता त्यांना महाराष्ट्रीयन थाळी आवडते. हे जेवण परवडणारे, आरोग्यदायी आणि सोपे आहे. ते म्हणतात, 'जो महाराष्ट्रीयन थाली है ना, बहुत इकॉनॉमिकल, व्हेरी हेल्दी और व्हेरी गुड थाली है.' आता यात महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा अपमान काय आहे?

ही मुलाखत 'कर्ली टेल्स'च्या 'संडे ब्रंच' भाग १८२ मध्ये आहे, ज्यात ते दोघे भोपाळी नॉन-व्हेज आणि सात्त्विक जेवणाबद्दल बोलतात. मात्र, माध्यमांनी फक्त सुरुवातीचा भाग उचलला आणि 'विवेक अग्निहोत्री यांनी महाराष्ट्रीयन जेवणावर टीका केली' अशी बातमी पसरवली. परिणामी, सोशल मीडियावर ट्रोलिंग सुरू झाली. लोकांनी विवेक यांना हिणवले, त्यांच्या चित्रपटांवर बहिष्काराची मागणी केली. पण कुणीही पूर्ण मुलाखत पाहिली नाही. विवेक यांनी नंतर स्पष्टही केले की, हे वक्तव्य विनोदी होते व हा नवरा-बायकोमधील संवाद होता. वरण-भात आता त्यांचा आवडता पदार्थ आहे. तरीही वाद थांबला नाही. माध्यमे असा द्वेष का पसरवतात? आणि मराठी माणसं मूळ स्रोत जाणून न घेता का टीका करतात? महाराष्ट्राला ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बौद्धिक परंपरा लाभली आहे. त्यामुळे माझी नेहमीच अशी इच्छा असते की, महाराष्ट्राने ही बौद्धिक परंपरा जपायला हवी. मराठी माणूस हा मुळातच प्रचंड बुद्धिमान आहे. मात्र, १९६० नंतर मतांच्या राजकारणासाठी मराठी माणसाची बौद्धिक क्षमता संकुचित करण्यात आली. मराठी नेत्यांनी मराठी माणसाच्या हातातील विद्येची प्रतीक असलेली लेखणी हिसकावून घेतली आणि त्याच्या हातात दगड दिला. जेणेकरून नेते चाळीतून बंगल्यात गेले. मात्र मराठी माणसाची सामाजिक प्रगती खुंटली. आजही तोच प्रकार सुरू आहे. गंमत पाहा ना, काँग्रेसने १०५ मराठी माणसांचा जीव घेतला, ज्यांना आज आपण हुतात्मा म्हणतो. पण उद्धव ठाकरे मुंबई वाचवणार, अशी वल्गना राहुल गांधींच्या हातात हात घालून करतात. राहुल गांधी सतत मराठी माणसाचा अपमान करीत आले आहेत. त्यांनी सावरकरांवर गलिच्छ आरोप केले. आता तर सात्यकी सावरकर यांच्यावर ते गोडसेचे नातेवाईक आहेत म्हणून माझ्या जिवाला धोका आहे, असा खोटा आरोप करीत आहेत. हा महाराष्ट्राचा अपमान नाही का? सावरकर कुटुंब हे मराठी कुटुंब आहे आणि देशभक्त कुटुंब आहे. त्यांचा किती अपमान हे काँग्रेसी करणार आहेत? आणि इथले मराठीच्या नावावे मते मागणार, स्वत:ला मराठीचा कैवारी समजणारे याबाबत काही बोलणार आहेत की नाही?



दुसरीकडे मराठी अस्मितेच्या नावाने राजकारण करणारे नेते धार्मिक सणांवर विवादास्पद वक्तव्ये करतात, तरी माध्यमे त्यांचा समाचार घेत नाहीत. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या एका नेत्याने कृष्ण जन्माष्टमीला मांस वाटल्याची चर्चा आहे. आमदार आदित्य ठाकरे म्हणाले की, 'स्वातंत्र्य दिनी काय खावे हे आमचे स्वातंत्र्य आहे.' उद्या तळीराम म्हणतील की दारू पिणे हा आमचा अधिकार आहे. गांधी जयंतीला ड्राय डे ठेवू नका! उद्धव ठाकरेंची ही कथा तर त्यांचे बंधू राज ठाकरे यांनी दहीहंडीच्या निमंत्रणावर 'मी दही हंडीचे नाही, फक्त मटण हंडीचे आमंत्रण स्वीकारतो,' असा विनोद केला. दहीहंडीसारखे मराठी उत्सव असले घाणेरडे विनोद करण्यासाठी आहेत काय? दहीहंडी हा मराठी माणसाचा मोठा उत्सव आहे. तेव्हा माध्यमे बोटे तोंडात घालून का बसली होती. राज ठाकरेंनी मागे कुंभस्नानावरही टीका केली. तरी माध्यमे यावर फार आक्रमक दिसली नाहीत. हा माध्यमांचा दुटप्पीपणा म्हणायचा का? मुळात जे वक्तव्य जसे आहे तसे दाखवणे माध्यमांचे कर्तव्य आहे. समाजात द्वेष पसरवणे, भांडणे लावणे, दंगलीसदृश वातावरण निर्माण करणे हे माध्यमांचे काम नाही. आता गंमत पाहा, माध्यमे कशी कामे करतात. संजय राऊत यांनी कुणावर टीका केली तर 'संजय राऊत यांचे शरसंधान, घणाघात' वगैरे मथळे देतात. मात्र विरोधकांनी टीका केली तर 'अमुक अमुक यांची जीभ घसरली. अमुक अमुक बरळले.' इ. मथळे देतात. संजय राऊत उघडपणे माध्यमांसमोर शिव्या देतात, महिलांनाही शिव्या देतात तेव्हा त्यांच्याबद्दल बातम्या चालवायला माध्यमांना अवघड का जात असेल? 'ये रिश्ता क्या कहलाता है?' असं काय मिळतं या पत्रकारांना की, विशिष्ट नेत्यांबद्दल ते अवाक्षरही काढत नाहीत? हल्लीच राज ठाकरेंच्या पत्रपरिषदेत त्यांचा कुत्रा 'रायनो' आला, ज्याने सर्वांचंच लक्ष वेधलं. सोशल मीडियावर मीम्स फिरू लागले.

लक्षात घ्या मराठी माणसांनो, उद्या मराठीच्या जिवावर कुणी उठला तर आपण सगळे मिळून त्याला शिंगावर घेऊ. पण ऊठसूट शिंगे दाखवत फिरणे बरे नव्हे! मला माध्यमांकडून कोणतीच अपेक्षा नाही. पण मराठी माणसाने यांच्या नादी लागू नये. मराठी लोकांनी मूळ स्रोत जाणून घेऊन प्रतिक्रिया द्याव्यात. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीपासून ते सावरकरांच्या उपयुक्ततावादापर्यंतची परंपरा ही तर्कशुद्ध आहे. मराठी माणूस हा तर्कशुद्धच असला पाहिजे, तर्कहीन किंवा तर्कट नव्हे. त्यासाठी मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांच्या नादी न लागता डॉ. आंबेडकरांसारख्या बौद्धिक व्यक्तीच्या ग्रंथांचे पारायण मराठी माणसाने केले पाहिजे. आता गणेशोत्सव सुरू होईल. गणपती ही बुद्धीची देवता, महाराष्ट्राची देवता आहे. मी गणपती बाप्पाकडे या निर्बुद्ध लोकांसाठी एकच मागणे मागीन, 'यांना बुद्धी दे गणनायका!'

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# अन्यथा निसर्ग माफ करणार नाही

निसर्गाचा समतोल बिघडल्याने याही वर्षी बदलत्या वातावरणाचा फटका अखेर बसलाच. धो धो बरसलेल्या पावसाने क्षणाधार्थ सर्व काही उद्ध्वस्त केले. हजारो हेक्टर शेतजमीन खरडून गेली. भविष्यामध्ये कधीही भरून न निघणारी हानी झाली. शेतकरीच नव्हे, तर सामान्य माणूसही या पावसाने भरडला गेला. हवामानाच्या बदलांमुळे मानवी आयुष्याला अनेक गंभीर धोके निर्माण होत आहेत. रोगराईचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. याकडे आमचे अजूनही लक्ष वेधले गेले नाही. आमचे आज होणारे हे दुर्लक्ष भविष्यामध्ये अती गंभीर परिणामाकडे सर्वांना घेऊन जाणारे आहे. निसर्गाला अक्षरक्ष: ओरबाडणे सुरू आहे. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनाचे प्रमाण वाढत असून संपूर्ण जगाच्या तापमानामध्ये वाढ झाली आहे. मानवाने विकासाच्या नावावर नैसर्गिक संसाधनाचा अमाप विध्वंस केला. त्यामुळे पूर, प्रदूषण, तापमानामध्ये वाढ, हवामान बदल, ओझोनचा विरळ होणारा थर तसेच नैसर्गिक आपत्ती आणि त्यामुळे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. निसर्ग नियमामध्ये केलेली मानवी ढवळाढवळ तोही किती दिवस सहन करणार, हा खरा प्रश्न आहे. तरीही मानव त्याकडे अजूनही आपल्या उघड्या डोळ्यांनी निव्वळ बघ्याची भूमिका घेत आहे. ही विनाशकारी वृत्ती आम्ही किती दिवस पोसणार आहोत? विनाशाकडे घेऊन जाणारी ही दुर्लक्षित वृत्ती मानवाच्या मुळावर उठली आहे. ऑगस्ट महिन्यातील नैसर्गिक आपत्तीचा सर्वाधिक फटका वऱ्हाड प्रदेशाला बसला.



वाशीम जिल्ह्यातील पावसाने तर सर्व उच्चांक मोडलेत. हजारो हेक्टरमधील पिके शेतामध्ये सडली. शेती खरडून गेली ती वेगळीच. शेतकऱ्यांच्या तोंडापर्यंत आलेला घास धो धो पावसाने हिरावून नेला. बदलत्या वातरणाची ही तर फक्त सुरुवात आहे. विकासामधून विध्वंस ही नाण्याची दुसरी बाजू आहे. याकडे आम्ही कधीच लक्ष दिले नाही. पूर्वी वातावरणाशी समरस होणारी भारतीय पीक पद्धत वेगळी होती. काळानुरूप त्यामध्ये बदल होत आम्ही हायब्रीड आणि रासायनिक युगामध्ये येऊन ठेपलो आहोत. भारतीय परंपरा आणि ज्ञानाला समाजाने तिलांजली दिल्याने ही गंभीर परिस्थिती उद्भवली आहे. शेतामध्ये अमाप टाकली जाणारी रासायनिक खते आणि कीटकनाशकाने होणारे अतिशय गंभीर परिणाम आम्ही भोगत आहोत. कॅन्सर, मधुमेह, हृदयरोग वाढण्यामागे बदललेली जीवनशैलीच कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे ठाम मत आहे. अतिहव्यासापायी आमची विनाशाकडे कशी वाटचाल सुरू झाली, हे अजूनही आम्हास समजलेच नाही. कधीही धो धो बरसणारा पाऊस, उन्हाळ्यामध्ये वाढलेले तापमान अन् हिवाळ्यामध्ये गायब झालेली थंडी हा निसर्गाने दिलेला स्पष्ट इशारा असला, तरी भविष्यामध्ये त्याचे होणाऱ्या गंभीर परिणामाची आम्ही साधी दखलही घेतली नाही. अमेरिका हा जगामधील क्रमांक १ चा हरितगृह उत्सर्जक देश असून हे उत्सर्जन कमी करण्याची सर्वाधिक जबाबदारी या देशाचीच आहे. परंतु, जगाचा दादा म्हणून मिरवणारा अमेरिका या बाबीकडे डोळेझाक करीत आहे. त्यास मानव जातीशी काहीएक देणेघेणे नाही. त्यामुळे अमेरिकेपेक्षाही सर्वाधिक नुकसान पृथ्वीचे झाले आहे. अमेरिका आपल्या स्वार्थापायी संपूर्ण जगाला विनाशाच्या खाईमध्ये लोटत आहे. हवामानामध्ये होणाऱ्या बदलाचे परिणाम भारतामध्येही जाणवू लागले आहेत. अनियंत्रित पाऊस आणि असह्य उन्हाचे चटके हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. त्याची सुरुवात जर एवढी भयावह असेल तर त्याचा अंत केवढा गंभीर असेल याची कल्पनाही न केलेली बरी. मनुष्य निसर्गाच्या मुळावर उठल्याने निसर्गाच्याही सहनशीलतेचा अंत झाला आहे. त्यामुळे निसर्ग आपला रंग दाखविणार हे ठाम आहे. स्वार्थी मनुष्याने फक्त आणि फक्त निसर्गाला ओरबडल्याचे कार्य इमानेइतबारे केले. त्याचे गंभीर परिणाम आता आमच्याच पुढ्यात येऊन ठेपले आहेत. त्यामुळे सजगता हेच आम्हाला या पाशामधून मुक्त करू शकते. अन्यथा वेळ निघून गेल्यावर हातावर हात देऊन बसल्याशिवाय आमच्याकडे काहीच शिल्लक उरणार नाही. क्षणिक सुखाची भौतिक लालसा असंख्य दु:खाची जननी आहे, हे जेव्हा कळेल तोच मानवाच्या कल्याणाचा सुदिन असेल.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# 'बलसागर' भारत होवो!

भारताचे सैन्य, सशस्त्र दल व अत्याधुनिक शस्त्रसज्जतेमुळे गेल्या दशकात भारताने संरक्षण सिद्धतेच्या संदर्भात जागतिक स्तरावर आघाडी घेतली. नुकत्याच लंडन येथे भारत-इंग्लंड दरम्यान झालेल्या व्यापक संरक्षण कराराने भारताचे संरक्षण क्षेत्रातील व्यापक महत्त्व आणि माहात्म्य सर्वमान्य झाले व यातूनच बलशाली भारताचे नवे रूप व स्वरूप अवघ्या जगानेही पाहिले. कधी भारतावर राज्य गाजविलेल्या ब्रिटनला आज भारताशी संरक्षण क्षेत्रासंदर्भात धोरणात्मक करार करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागणे, ही बाब जगातील संरक्षण क्षेत्रातील दिग्गजांसाठी अचंबित करणारी, भारताची संरक्षण क्षेत्रातील क्षमता व सिद्धता सर्वमान्य करणारी ठरली आहे. भारताची संरक्षण सिद्धता व आपल्या सैनिकी तंत्रज्ञांचे कौशल्य जगासमोर नव्याने व प्रभावीपणे झळकले ते ६ मे २०२५ रोजी. केवळ २५ मिनिटांत भारताने पूर्वनियोजितपणे व अचूक स्वरूपात पाकिस्तानातील सर्वदूर व प्रसंगी आत शिरून, दहशतवाद्यांसह मुख्य संरक्षण केंद्रांना हेरून, हल्ला करून पाकिस्तानी दहशतवाद्यांसह दहशतवादी केंद्रेही नष्ट केली. एवढेच नव्हे, तर एवढ्या वेळेत निर्णायक स्वरूपात युद्ध जिंकण्याचा इतिहाससुद्धा यानिमित्ताने भारताने रचला.

भारत आणि भारतीयांच्या संरक्षण सिद्धतेतील कौशल्य पाकिस्तानच्या मनात धडकी भरविणारे व उभ्या जगाला स्तिमित करणारे ठरले. भारताचे २०१६ सालामधील उटी येथील पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ल्याला अचूक उत्तर म्हणून अशीच चढाई केल्याचे यानिमित्ताने स्मरण होणे स्वाभाविक होते. मात्र, यावेळच्या भारताच्या कारवाईचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी भारताचे आपल्या धोरणात्मक आक्रमकतेला विकसित तंत्र, तंत्रज्ञान, नियोजन व पाकिस्तानचे कमरतोड नुकसान करतानाच संरक्षणाला संपूर्ण सिद्धतेची साथ दिली. परिणामी, विकृत मेजर जनरल व विख्यात संरक्षणतज्ज्ञ राजन कोचर यांनी नमूद केल्यानुसार 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने भारत आणि भारताच्या लष्करी सज्जतेला राजकीय स्थिरता, प्रशासकीय परिपक्वता, परराष्ट्र धोरणाची भक्कमता याची साथ मिळाल्यानेच 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत कारवाई केवळ संरक्षकच न राहता संरक्षणसज्ज सिद्ध झाली.

जाणकारांच्या मते, सध्याच्या आंतरराष्ट्रीय संदर्भात लष्करी कारवाई सुरू करताना अथवा त्याचा प्रतिकार करताना आर्थिक बाजू भरभक्कम असणे गरजेचे व फायदेशीरही ठरते. यावेळी भारताची प्रगत व प्रगतिशील आर्थिक व्यवस्था व सुस्थितीने भारताला मोठेच पाठबळ लाभले. भारताच्या अर्थव्यवस्थेची सध्याच चार ट्रिलियन डॉलर्सकडे वेगवान घोडदौड सुरू असून याची नोंद जग आणि जागतिक पातळीवर वेळोवेळी घेण्यात येत आहे. या आर्थिक प्रगतीलाच भारताच्या देश आणि जागतिक पातळीवरील उत्पादन वाहतूक व्यवस्थेची अव्वलता आता जगाने मान्य केली आहे. याचे प्रत्यंतर यावेळी नव्या संदर्भात आले. ब्रिटनच्या पुढाकारातून नुकत्याच व नव्याने झालेल्या भारत-ब्रिटन संयुक्त कराराने भारताच्या आर्थिक, औद्योगिक व परराष्ट्र धोरणाची छाप पाश्चिमात्य देशांवर पडलेली दिसून येते. विशेषत: ट्रम्प-आयात शुल्काच्या गदारोळातही हे घडू शकले, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सिद्ध झालेली बाब म्हणजे, जेव्हा भारताच्या सुरक्षा संरक्षणाचा प्रश्न येतो, त्यावेळी आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था वा पाकिस्तान, अमेरिका, चीन वा रशिया यांना काय वाटते, हे महत्त्वाचे न ठरता, देश आणि देशवासीयांना काय वाटते, ते महत्त्वाचे ठरते व नेमकी हीच बाब पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानसह डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्या-वल्गनांना बळी न पडता, देशहितासाठी व देशाच्या संरक्षणासाठी काय महत्त्वाचे आहे, त्यावरच विचार करून प्रत्यक्षात आणली. यातूनच 'बलशाली भारत' नव्याने साकारला. त्याचवेळी भारताने गेल्या सुमारे १० वर्षांत विविध प्रकारच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हानांचा सामना करावा लागू शकतो, याचा सर्वांगीण विचार करून, त्यानुसार देश आणि देशहित रक्षण यासाठी काय करावे लागू शकते, याचा व्यापक विचार करून आपली संरक्षण सिद्धता दाखवून दिली आहे. या धोरणात्मक तयारीमध्ये देशाची भौगोलिक व सागरी सीमा, महत्त्वाची संशोधन केंद्र व औद्योगिक, समुद्री बंदर, वाहतूक व्यवस्था इत्यादींच्या सुरक्षा राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. उदाहरणार्थ मुंबई-जेएनपीटी, कांडला ही बंदरस्थाने, सर्वांत मोठी अशी जामनगर रिफायनरी, मुंबईतील भाभा अणुसंशोधन केंद्र, राजस्थानमधील पोखरणसह ढोलेरा परिसरातील विशाल सौर ऊर्जा प्रकल्प, बाडमेर येथील रिफायनरी, दक्षिण भारतातील पारादीप व विशाखापट्टणम बंदर यांच्या संरक्षणाची विशेष काळजी या प्रकल्पांच्या निर्माण काळापासूनच घेतल्यामुळे त्यांचा उपयोग यावेळी प्रकर्षात जाणवला व सिद्ध झाला. या प्रमुख प्रकल्पांच्या संरक्षण सिद्धतेत मिसाईल क्षेपणास्त्रांसह ड्रोनच्या माऱ्यापासून पुरवलेली भरभक्कम सिद्धतेची यशस्वी चाचणी 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने जगमान्य ठरली व भारत आणि भारतीयांच्या विशेष कौशल्यांचा व बलशाली क्षमतेचा परिचय सर्वांना झाला. याच्याच जोडीला चीनसारख्या शेजारी देशांचा सर्वच बाबतीतील बेभरवशीपणा लक्षात घेता, तांत्रिक क्षेत्रातील संरक्षणाला भारताने विशेष खबरदारी घेण्यासाठी देशांतर्गत तंत्रज्ञान क्षमता विकसित केली आहे. यामध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित अशी व्यापक सायबर सुरक्षा, आर्थिक व्यवहार योग्य व सुचारू पद्धतीने होण्यासाठी स्वयंसिद्ध तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा, आवश्यक ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास व प्रयोग आणि त्याशिवाय अंतराळ क्षेत्रातील संशोधनाचा उपयोग आता भारत आणि तटीय सागरी क्षेत्राच्या संरक्षणासाठी केला जात आहे, हे विशेष.

सद्य:स्थितीतील भारताची संरक्षण संदर्भातील बलशाली व स्वयंसिद्ध होण्याच्या संदर्भातील सिद्धता सप्रमाण सिद्ध करणारी बाब म्हणजे 'वर्ल्ड इकोनॉमिक फोरम.' या फोरमने संरक्षणात्मकदृष्ट्या सध्या असणाऱ्या वा नजीकच्या भविष्यातील जोखमीच्या संदर्भात 'जागतिक जोखीम अहवाल २०२५' नुकताच प्रकाशित केला आहे. त्यानुसार विशेषत: २०२४-२५ सालच्या दरम्यान आशियाई देशांमध्ये झालेल्या वा सुरू असणाऱ्या युद्ध वा युद्धसदृश बंडाळींच्या पृष्ठभूमीवर संरक्षण सिद्धता प्रमुख औद्योगिक केंद्रांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही तितकीच महत्त्वाची ठरेल, असा प्रामुख्याने इशारा दिला आहे. याचाच अर्थ, देशाच्या सीमेसह देशांतर्गत औद्योगिक-व्यवसायाची प्रमुख व संवेदनशील प्रगती केंद्रांचे संरक्षण तेवढेच महत्त्वाचे ठरेल. या साऱ्या पृष्ठभूमीवर पहलगाम व त्यानंतरच्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने 'आकाश' क्षेपणास्त्राचा यशस्वी व परिणामकारक उपयोग करून भारताने आपली बलशाली संरक्षण सिद्धता सिद्ध केली आहे. आता आव्हान आहे 'आकाश'ला गवसणी घालू शकणाऱ्या 'ब्रह्मांडाचा' संशोधनपर शोध घेण्याचा!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### 'धर्म अध्यात्म'मधील माहिती अतिशय उपयुक्त

मागील पाच-सहा महिन्यांपासून तरुण भारतमध्ये 'धर्म अध्यात्म' या शीर्षकांतर्गत दर शुक्रवारी सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि धार्मिक कार्यकर्तृत्वाचा तथा ठिकाणांचा ठावठिकाणा प्रकाशित केला जात आहे. बरेच वेळा काही उपयुक्त माहिती किंवा ठिकाणे काळाच्या ओघात विस्मरण पावतात. परंतु धर्म अध्यात्मच्या निमित्ताने अनेक चांगल्या सनातन गोष्टींना उजाळा मिळतो आहे. त्यामुळे धर्म अध्यात्मच्या संयोजिका शिल्पाताई विवेक कवठेकरांचे आणि तरुण भारतचे मनापासून आभार मानावेसे वाटतात. मागील दोन अडीच महिन्यांपासून श्रीराम स्पर्शाने पावन स्थळे या शीर्षकांतर्गत प्रभू श्रीराम आपल्या वनवास काळात जिथे कुठे वास्तव्यास होते त्या ठिकाणाची अतिशय सुंदर माहिती उपलब्ध विविध लेखिकांद्वारे होते आहे. आता पुढच्या शुक्रवारी कुठल्या ठिकाणाची माहिती वाचायला मिळणार याचीही मनाला ओढ लागलेली असते. सोबतच त्या त्या तीर्थक्षेत्रांची चित्रेही प्रसिद्ध होत असल्यामुळे ती तीर्थक्षेत्रे संपूर्णपणे डोळ्यापुढे उभी राहतात. श्रीरामाबद्दल अधिक आस्था आपल्या हिंदू भाविकांना आहे परंतु पुढील पिढीला ही पावन स्थळे कळणे अतिशय आवश्यक आहे . तरुण भारतने या पृष्ठावर ही माहिती वाचकांसाठी/भाविकांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद. अशाच विविध लेखमाला धर्म अध्यात्माद्वारे पुढील अंकात आम्हाला अपेक्षित आहे.

**संजय मुरूगकर**

●● ●●

## वाचक पत्रे

### रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरुवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरुद्ध मोठा लढा उभा करणे हा होता. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरीतीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दिष्ट ठरले. येणारे विघ्न दूर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरुवात झाली. यानंतर १८८४ मध्ये पिवळ्या मारबतीची सुरुवात झाली. दोन्ही मारबती मांडण्यामागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने संपन्न होते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल. कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात. त्यामुळे ही नागपूरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पूजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा होतात. मारबतीचा सण पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्ह्या पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढून येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जयघोष करून 'ईडा-पीडा, माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत' अशा घोषणांनी केला जातो व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होऊन संपूर्ण नागपूर दुमदुमते. मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावास्येला घरोघरी पळसाच्या फांद्यांची पूजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते 'माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत' अशा घोषणा दिल्या जातात. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे. त्यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे. याचे प्रायश्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे म्हणावेसे वाटते भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

**रमेश कृष्णराव लांजेवार**

●● ●●

### तुळस दिसे नयना

तरुण भारतची शंभर वर्षे आणि त्या निमित्ताने तुळशीचे महत्त्व सांगून तुळस दान करण्याचा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. 'जिकडे पाहावे तिकडे तुळस दिसे नयना' असे काहीसे वातावरण झाले आहे. एक लहानसे सहज लागणारे, वाढणारे आणि त्यातून शुद्ध पवित्र वातावरण करणारी ही तुळस आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत तुळशीचे अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. पण आज अंगणात, दारात तुळस दिसत नाही, पण इतर शोभिवंत झाडे दिसतात.

आता या उपक्रमातून मात्र सगळीकडे तुळस दिसू लागली आहे. दररोज वृत्तपत्रातून येणाऱ्या लेखाच्या माध्यमातून ती किती अनमोल आहे याची जाणीव झाली आहे. जिथे अनेक लोक एकत्र येतात अशा मंदिर, संस्था, शाळा, कार्यक्रम यातून तुळस भेट देणे, दान करणे यातून घरोघरी तुळस राहील. तुळशीच्या मंजिरीतून पुन्हा रोप तयार होते. त्यासाठी वेगळे काहीच करावे लागत नाही. म्हणजे आता भविष्यकाळात तुळस घराघरात दिसेल. शुद्ध आणि पवित्र वातावरण निर्मिती होईल, सकारात्मकता वाढीस लागेल आणि पर्यायाने शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहील हे निश्चित. तुळस लावा पर्यावरण वाचवा हे ध्येय लवकरच नक्की साध्य होणार. एक एक लहानसे पुढे पडणारे पाऊल आपल्याला आपल्या ध्येयाकडे निश्चित घेऊन जाते. तरुण भारतचे हार्दिक अभिनंदन!

**संगीता वाईकर**

●● ●●

## थोडक्यात महत्त्वाचे....



### रेल्वे अतिक्रमणधारकांची पुनर्वसन प्रक्रिया सुरू

**भुसावळ :** रेल्वे प्रशासनाने विस्थापित केलेल्या अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वेक्षणाला सुरुवात केली आहे. गुरुवारी (२१ ऑगस्ट) पालिकेचे अभियंता व कर्मचाऱ्यांनी यशवंतनगर येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील रहिवासी अतिक्रमणधारकांच्या झोपड्यांची पाहणी करून त्यांच्या नावांची नोंद करून घेतली, तसेच छायाचित्र काढून सर्वेक्षणाला सुरुवात केली. रेल्वे अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी वंचित बहुजन आघाडीने भुसावळ पालिकेसमोर सहा दिवस बेमुदत ठिय्या आंदोलन केले होते. यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री संजय सावकारे व जिल्हाधिकाऱ्यांनी पालिका प्रशासनाला पुनर्वसनाची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. आता प्रत्यक्षात प्रक्रियेला सुरुवात झाल्याने अतिक्रमणधारकांनी समाधान व्यक्त केले आहे.



### बरडिया शाळेत गणेशमूर्तीनिर्मिती कार्यशाळा

**बोदवड :** येथील श्री ति. र. बरडिया मराठी शाळेत चौथीचे तंत्रस्नेही वर्गशिक्षक संदीप पारधी यांनी मुलांना पर्यावरणपूरक शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याविषयी मार्गदर्शन केले. शाडूच्या मातीच्या गणपतीचे महत्त्व सांगितले. उपक्रमात ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार केल्या. ज्येष्ठ शिक्षक देवकर, सुवर्णा पाटील, रेणुका बडगुजर, सपकाळ यांनी मूर्ती बनवण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत केली. संदीप पारधी यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बसविण्याचे आवाहन केले.



### महाजन इंग्लिश स्कूलमध्ये बैलपोळा सण साजरा

**यावल :** येथील जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलमध्ये बैलपोळा सण साजरा करण्यात आला. प्राचार्या रंजना महाजन अध्यक्षस्थानी होत्या. प्राचार्या दीपाली धांडे, पर्यवेक्षिका राजश्री लोखंडे, गौरी भिरुड उपस्थित होत्या. रंजना महाजन यांनी मातीच्या बैलांचे व बैलजोडीचे पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला. शिक्षिका लक्ष्मी कवडीवाले यांनी बैलपोळा सणाबद्दल माहिती दिली. प्राचार्या धांडे यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका श्रद्धा बडगुजर यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा चौधरी यांनी आभार मानले.



### भास्करराव महाजनांच्या पुण्यस्मरणानिमित्त उपक्रम

**यावल :** साकळी (ता. यावल) येथील पुस्तकप्रेमी व बहुआयामी व्यक्तिमत्त्व (कै.) प्रा. भास्करराव रामजी महाजन यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. गावातील कष्टकरी महिलांना साड्या, फराळ, पुस्तके, जळगाव येथील केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित मातोश्री आनंदाश्रमात वृद्धांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले. याप्रसंगी (कै.) भास्करराव महाजन यांचे ज्येष्ठ सुपुत्र तसेच शारदा विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष आणि श्री संत सावता महाराज बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष सुभाष महाजन, त्यांची पत्नी रजनी महाजन यांच्यासह समस्त परिवार उपस्थित होता. वडिलांचा कार्याचा वसा अविरत सुरू राहण्यासाठी सामाजिक उपक्रम समस्त महाजन परिवाराकडून भविष्यातही योजले जाणार आहेत, असे परिवाराकडून सांगण्यात आले.



### पर्यावरणपूरक गणेशमूर्तीनिर्मिती कार्यशाळा


**न्हावी (ता. यावल) :** येथील भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पर्यावरणपूरक शाडू मातीपासून गणेशमूर्तीनिर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. शिल्पकार जयेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतः मुलांसमोर गणेशमूर्ती तयार करून दाखविली. त्यांनी विद्यार्थ्यांकडून गणेशमूर्ती तयार करून घेतली. परीक्षण करून विजेत्या विद्यार्थी जाहीर केले. त्यात पाचवी ते दहावीच्या गटात चेतन बेंडाळे, वेदांत चोपडे, डिंपल चौधरी, वेदांत चौधरी, प्रणाली तायडे आणि अकरावी व बारावीच्या गटात युक्ता बोरोले, छायल बढे यांचा समावेश आहे. मुख्याध्यापक व्ही. बी. वारके यांनी शिल्पकार पाटील यांचा सन्मान केला. याप्रसंगी उपमुख्याध्यापिका संगीता फिरके उपस्थित होत्या.

### जामनेर तालुक्यात आरोग्य विभागातर्फे सर्वेक्षण मोहीम

**जामनेर :** सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने व पारेषण काळ असल्याने आरोग्य विभागामार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कंटेनर सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत आरोग्यसेवक व आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविकांमार्फत घरोघरी जाऊन डास अळी सर्वेक्षण करण्यात येत आहे. जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रमोद सोनवणे, साथरोग अधिकारी बाळासाहेब वाबळे यांनी शेंदुर्णी व वाडी येथे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सोनवणे यांच्यासह भेटी देऊन सर्वेक्षण कामकाजाची पाहणी करण्यात आली. याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज माळी, तालुका मलेरिया पर्यवेक्षक अण्णा जाधव, आरोग्य सहाय्यक प्रमोद चऱ्हाटे, आरोग्यसेवक जितेंद्र पाटील, योगेश देवरे, आशा स्वयंसेविका पल्लवी सोनवणे, कल्पना वराडे, मनीषा कापसे, वर्षा पाटील, शैला चौधरी आदी उपस्थित होते.

### विजेच्या धक्क्याने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

**फैजपूर (ता. यावल) :** विरोदा (ता. यावल) येथील योगेश कृषी केंद्रचालक



तरुण शेतकरी योगेश गंगाधर चौधरी (वय ५०) यांचा २१ ऑगस्ट रोजी दुपारी मांगी (ता. रावेर) येथील शेतात गेले असता, लोंबकळत असलेल्या वीजवाहिनीच्या तारेचा धक्का बसल्याने जागीच मृत्यू झाला. त्यांना भुसावळ येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये दाखल केले असता डॉ. अजय राख यांनी तपासणीअंती मृत घोषित केले. त्यांनी दिलेल्या माहितीवरून हवालदार कैलास बावीस्कर यांनी भुसावळ तालुका पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली. हवालदार विकास बावीस्कर तपास करीत आहेत.

# बियाणी मिलिटरी स्कूलमध्ये साडेसहा वर्षांपासून वीजचोरी

## दोन कोटींच्या वीजचोरीप्रकरणी प्राचार्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**भुसावळ, :** येथील जामनेर रोड परिसरात बियाणी मिलिटरी स्कूलमध्ये सुमारे साडेसहा वर्षांपासून (८१ महिने ) अनधिकृतरित्या वीजेचा वापर केला जात होता. या वीज चोरी प्रकरणी मिलीटरी स्कूलच्या प्राचार्यांविरूद्ध भुसावळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मीटर बायपास करून वीज चोरी**

भुसावळ येथील जामनेर रोड परिसरात बियाणी मिलीटरी स्कूलमध्ये महावितरण कंपनीच्या भरारी पथकाने वीज मिटरची तपासणी केली. यात म ुला-मुलींच्या वसतिगृहाचे वीज वापराचे मीटर बंद स्थितीत असून प्राचार्य ज्ञानेश्वर मुरलीधर पाटील (रा. मीरगव्हाण शिवार, जामनेर रोड, भुसावळ) यांच्याकडून वीज चोरी केली जात असल्याचे भरारी पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले.

**या पथकाने केली कारवाई**

महावितरण भुसावळ विभागाचे सहाय्यक अभियंता स्वप्नील माळी, सहाय्यक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी अंकुश परसनकर, वरिष्ठ तंत्रज्ञ सचिन सोनवणे, विलास सुरवाडे, संजय धनगर यांच्या पथकाने तपासणी दरम्यान कारवाई केली.



**पावणे नऊ लाख युनिट वीज चोरी**

यात ८ लाख ७७ हजार १८२ युनिटसची तब्बल दोन कोटी १३ लाख ९५ हजार ४५० रुपयांची वीजचोरी केली असल्याचे निष्पन्न झाले. यासंदर्भात महावितरण कंपनीच्या भरारी पथकाने बियाणी मिलिटरी स्कूलचे वीजमीटर जप्त करीत 'सील' केले असून विजचोरीच्या गुन्ह्यात तडजोड रक्कम अंदाजे १८ लाख ४० हजार देय आहे. विज चोरी प्रकरणी बियाणी मिलिटरी स्कूलच्या प्राचार्यांविरुद्ध भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी भुसावळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



**८१ महिन्यांपासून अनधिकृत वापर**

बियाणी मिलिटरी स्कूल मधील वीज पुरवठा मीटर मधून नसून बायपास करीत अनधिकृतरित्या वापर करीत असल्याचे आढळून आले. यात गेल्या ८१ महिन्यांपासून (सुमारे साडेसहा वर्षापासून) वीज चोरी केली जात आहे.

# भुसावळ विभागातील तीन स्थानकांत एक्स्प्रेसना थांबे

## नागपूर-पुणे मलकापूरला, दानापूर-पुणे रावेरला, अमरावती-सुरत गाडी बोदवडला थांबणार

**भुसावळ :** भुसावळ विभागात प्रवाशांच्या सोयीसाठी नागपूर-पुणे गरीबरथ एक्स्प्रेसला मलकापूर, दानापूर-पुणे एक्स्प्रेसला रावेर आणि अमरावती-सुरत एक्स्प्रेसला बोदवड येथील स्थानकांवर प्रायोगिक तत्त्वावर अतिरिक्त थांबे देण्यात आले आहेत. गाडी क्रमांक १२११३/१२११४ नागपूर पुणे गरीब रथ एक्स्प्रेसला मलकापूर स्थानकात २ मिनिटांचा थांबा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक १२१४९/१२१५० दानापूर- पुणे एक्स्प्रेसला रावेर स्थानकात २ मिनिटांचा थांबा देण्यात आला आहे, तर गाडी क्रमांक २०९२५/२०९२६ अमरावती- सुरत एक्स्प्रेसला बोदवड स्थानकात २ मिनिटांचा थांबा देण्यात आला आहे.

**असे आहे विवरण**

नागपूर- पुणे गरीबरथ एक्स्प्रेस गाडी क्रमांक १२११४ नागपूर- पुणे गरीबरथ एक्स्प्रेस प्रवास सुरू. २४ ऑगस्ट पासून मलकापूर येथे आगमन २३.०४ वाजता आणि प्रस्थान २३.०५ वाजता अतिरिक्त थांबा असेल. गाडी क्रमांक १२११३ पुणे- नागपूर गरीबरथ एक्स्प्रेस प्रवास सुरू. २५ ऑगस्टपासून मलकापूर येथे आगमन ०३.१४ वाजता आणि प्रस्थान ०३.१५ वाजता अतिरिक्त थांबा असेल. दानापूर- पुणे एक्स्प्रेस गाडी क्रमांक १२१५० दानापूर- पुणे एक्स्प्रेस प्रवास सुरू. २२ ऑगस्टपासून रावेर येथे आगमन १७.४४ वाजता आणि प्रस्थान १७.४५ वाजता अतिरिक्त थांबा असेल. गाडी क्रमांक १२१४९ पुणे- दानापूर एक्स्प्रेस प्रवास सुरू. २३ ऑगस्टपासून रावेर येथे आगमन ०५.२२ वाजता आणि प्रस्थान ०५.२३ वाजता अतिरिक्त थांबा असेल. अमरावती- सुरत एक्स्प्रेस गाडी क्रमांक २०९२६ अमरावती- सुरत एक्स्प्रेस प्रवास सुरू. २५ ऑगस्टपासून बोदवड येथे आगमन १२.०९ वाजता आणि प्रस्थान १२.१० वाजता अतिरिक्त थांबा असेल. गाडी क्रमांक २०९२५ सुरत-अमरावती एक्स्प्रेस प्रवास सुरू. २८ ऑगस्टपासून बोदवड येथे आगमन १८.३७ वाजता आणि प्रस्थान १८.३८ वाजता अतिरिक्त थांबा असेल.

# रस्ते खड्डेमुक्त झाले अन् मुसळधार पावसाने 'जैसे थे'...

## भुसावळमधील लोखंडी पूल, जामनेर रस्त्यावर साचली पाण्याची तळी

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, २२ ऑगस्ट**

शहरात गुरुवारी (२१ ऑगस्ट) दुपारी सव्वाचारच्या सुमारास मुसळधार पाऊस झाला. शहरात तासभर झालेल्या पावसाची ३३.८ टक्के इतकी नोंद करण्यात आली. पावसामुळे शहरातील लोखंडी पूर, जामनेर रस्त्यावर तळी साचली असून, चालकांची वाहने चालविताना कसरत सुरू आहे. शहरात गुरुवारी (२१ ऑगस्ट) सकाळपासून उन्ह पडले होते. दुपारी अचानक पावसाने जोरदार हजेरी लावली. अवघ्या काही मिनिटांत पावसाचा जोर इतका वाढला की, दहा फुटांवरचेही स्पष्ट दिसत नव्हते. यामुळे शहरातील विविध भागांतील रस्त्यांवर पाण्याची तळे साचली होते. यातून वाहनधारकांनी मार्ग काढत घर गाठले. मुसळधार पावसामुळे रस्त्यावरील फळ विक्रेते, भाजी विक्रेते व छोट्या व्यापाऱ्यांना आपापल्या गाड्या व दुकाने आवरताना धावपळ करावी लागली. अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचल्याने वाहनचालकांना अडचणींना सामोरे जावे लागले.

पावसाचा मारा, वाहनधारक त्रस्त पावसामुळे भुसावळकरांची त्रेधा उडाली. जळगाव रस्त्यावरील गुरुकुल ते साकेगाव परिसरात पावसाचा विशेषतः मोठा मारा झाला. तेथे दहा फुटांवरचे दिसत नसल्याचे वाहनचालकांनी सांगितले. सायंकाळी सहाच्या सुमारास पावसाची तीव्रता कमी झाली. मुसळधार पावसामुळे शहरातील वातावरणात गारवा निर्माण झाला असून, उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. भुसावळकरांनी पावसाचा अनपेक्षित आनंद लुटला असला, तरी रस्त्यांवर पाण्याची तळी साचल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. बाजारपेठ पोलिस ठाण्यासमोरील बोगद्यांमध्ये २ ते ३ फूट पाणी साचले होते, तर जामनेर रस्त्यावरील विविध भागांत पाणी साचले होते, पांडुरंग टॉकीजजवळ पाण्याचे तळे निर्माण झाले होते, बसस्थानकात प्रवाशांची धावपळ झाली.

# धनाजी नाना महाविद्यालयात अन्न स्पर्धा उत्साहात

**फैजपूर (ता. यावल) :** येथील धनाजी नाना महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे प्राचार्य डॉ. राजेंद्र बी. वाघुळदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'इंडियन ट्रेडिशनल फरमेंटेड फूड फेस्ट-२०२५' या रोगप्रतिकारशक्ती वाढवणारी अन्न स्पर्धा पार पडली. स्पर्धेत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत पारंपरिक जैविक अन्नपदार्थांचे आरोग्यासाठी महत्त्व अधोरेखित केले.

स्पर्धेचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. हरीश नेमाडे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रा. डॉ. पद्माकर पाटील यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्या डॉ. कल्पना पाटील, प्रा. डॉ. जयश्री पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या वेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुवर्णा पाटील, प्रा. योगेश पाटील, प्रा. जयंत भारंबे, प्रा. वसीम शेख आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी इडली, डोसा, अप्पम, कांजी, पांता भात, दही कोशिंबीर, लोणचे, मुरंबा, कढी, जिलेबी, सॉरकृट, श्रीखंड, शाही तुकडा, लस्सी, सोलकढी, अनारसे आदी २५ पेक्षा अधिक पारंपरिक फरमेंटेड अन्नपदार्थांचे आरोग्यदायी फायदेविषयक सादरीकरण केले.

दैनंदिन जीवनात जैविक अन्नाचे प्रकार, त्यांचे मानवी



आरोग्याशी संबंध आणि निरामय जीवनासाठी त्यांचे उपयुक्तता यावर डॉ. हरीश नेमाडे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. सुवर्णा पाटील यांनी प्रास्ताविकात पारंपरिक अन्न पदार्थांतील सूक्ष्मजीव व त्यांचा अन्न पचनाशी संबंधित आजारांवरील पर्यायी उपाय म्हणून उपयोग याविषयी माहिती दिली. तेजस्विनी चौधरी व सपना वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. चंचल कराड हिने आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रयोगशाळा सहाय्यक महेंद्र चौधरी, प्रयोगशाळा परिचर कन्हैया, तसेच सूक्ष्जीवशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, पारंपरिक अन्नपदार्थांचे आरोग्यदायी महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य या स्पर्धेतून साध्य झाले, असे मत भेट देणाऱ्या विविध तज्ज्ञांनी मांडले.



# गांजाची वाहतूक करताना मध्य प्रदेशातील तरुण जाळ्यात

## स्थानिक गुन्हे शाखा, भुसावळ बाजारपेठ पोलिसांची संयुक्त कारवाई

**भुसावळ :** स्थानिक गुन्हे शाखा आणि भुसावळ बाजारपेठ पोलिस ठाण्याच्या संयुक्त पथकाने शहरात गांजाची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या मध्य प्रदेशातील तरुणाला अटक केली आहे. त्याच्याकडून १०.२७५ किलो गांजासह सुमारे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे हवालदार गोपाळ गव्हाळे यांना शुक्रवारी (२२ ऑगस्ट) पहाटे पावणेदोनच्या सुमारास एक व्यक्ती दुचाकीवरून गांजाची वाहतूक करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल सुरुची इनसमोर पोलिसांनी सापळा रचला. गोपनीय माहितीनुसार काळ्या रंगाच्या सीबी शाइन दुचाकीवर संशयित दिसून आला. पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत्न करताच, तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र, पथकाने शिताफीने त्याला ताब्यात घेतले. त्याची ओळख अनारसिंग वालसिंग भिलाला (३०, रा. शमलकोट, ता. झिरण्या, जि. खरगोन, मध्य प्रदेश) अशी झाली. संशयिताकडून ७५ हजारांची दुचाकी, दोन लाख पाच हजार ५०० रुपये किमतीचा १०.२७५ किलो गांजा, दहा हजारांचा मोबाइल, असा सुमारे दोन लाख ९० हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी पोलिस शिपाई विकास सातदिवे यांच्या फिर्यादीवरून भुसावळ बाजारपेठ पोलिस ठाण्यात अनारसिंग भिलालाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलिस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलिस अधिकारी संदीप गावित, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोलिस निरीक्षक राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शरद बागल, रवी नरवाडे, हवालदार गोपाळ गव्हाळे, संदीप चव्हाण, उमाकांत पाटील, विकास सातदिवे, प्रशांत पाटील, विकास सातदिवे, प्रशांत परदेशी, राहुल वानखेडे, महेश सोमवंशी, सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन पाटील, हर्षल महाजन, परेश बिऱ्हाडे यांच्या पथकाने केली.

# डांभुर्णी येथील आरोग्य उपकेंद्रात टीबीमुक्त अभियानावर मार्गदर्शन

**डांभुर्णी (ता. यावल) :** येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात गुरुवारी (२१ ऑगस्ट) वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना निकम यांच्या मार्गदर्शनाखाली टीबीमुक्त अभियान राबविण्यात आले.

यावेळी सरपंच कल्पना बाविस्कर व उपसरपंच पुरुजित चौधरी यांच्या हस्ते धन्वंतरी मूर्तीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमात समुदाय अधिकारी डॉ. धनंजय जोशी यांनी टी बी. रोगाबाबत अचूक मार्गदर्शन केले. आरोग्य समुदाय डॉ. सोनल भंगाळे यांनी या रोगाची प्रमुख लक्षणे सांगितली. टीबी हा आजार संसर्गजन्य असून यावर तातडीने उपचार केल्यास परिपूर्ण बरा होतो. नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने उपचार करावे. या आजारात तीन आठवडे पेक्षा जास्त खोकला असणे, अचानक वजन कमी होणे, भूक न लागणे, सतत ताप असणे, मानेवर गाठी सुजन येणे ही लक्षण जाणवत असल्यास रुग्णांनी भीती



न बाळगता औषधोपचार करून आपले आरोग्य सुधारावे. हा आजार विषारी बॅक्टेरिया (ट्यूबर क्युली) नावाच्या व्हायरसने निर्माण होतो. या आजारापासून मुक्त होण्यासाठी उपकेंद्रात लस उपलब्ध असल्याचेही डॉ. सोनल भांगळे यांनी सांगितले. या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भायेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तडवी, शेख मॅडम यांची उपस्थिती होती. डॉ. अशपाक, डॉ. मोहसीन, डॉ. वकार, डॉ. जोशी तसेच आरोग्य सेवक पद्माकर कोल्हे, संदीप काळे, उमर अब्दुल्ला आणि आशा वर्कर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# यावल महाविद्यालयात आहार, आरोग्यावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**यावल, २२ ऑगस्ट**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे आहार व आरोग्य मार्गदर्शन कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे उद्‌घाटन रावेर येथील व्ही. एस. नाईक महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागप्रम ुख डॉ. अविनाश सोनार यांच्या हस्ते झाले. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे अध्यक्षस्थानी होत्या. ग्रामीण रुग्णालयातील डॉ. वैशाली निकुंभ, उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार, डॉ. हेमंत भंगाळे, विद्यार्थी विकास विभागप्रमुख प्रा. नरेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

समतोल आहाराचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत असून, सत्व, रज आणि तम अशा तीन प्रकारांसह शक्य तितक्या प्रमाणात सात्त्विक तसेच सुदृढ आरोग्यासाठी वयानुसार आहाराविषयी, तसेच शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या



आरोग्यविषयक अनेक योजनांविषयी डॉ. अविनाश सोनार, डॉ. वैशाली निकुंभ, प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे, डी. सी. पाटील यांनी माहिती दिली. एजाज शेख यांनी प्रात्यक्षिकातून नाडी चिकित्सा करत वात, पित्त आणि कफ प्रवृत्ती कशी ओळखावी तसेच या तिन्ही प्रवृत्तींचा संबंध थेट आहाराशी असल्याने याविषयी मार्गदर्शन केले. आरोग्यावर परिणामकारक केमिकलयुक्त पेस्ट, पिझ्झा, बर्गरऐवजी संतुलित आहार घेत शारिरीक व मानसिक आरोग्य सुधारून सामाजिक जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडण्याविषयी उपप्राचार्य डॉ. हेमंत भंगाळे, पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी डी. सी. पाटील, आरोग्य निरीक्षक जयंत पाटील तसेच जीवन संजीवनी नॅचरोपॅथीचे (भोर, पुणे) प्रशिक्षक एजाज शेख आदींनी मार्गदर्शन केले. प्रा. एम. डी. खैरनार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रतिभा रावते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रत्नाकर कोळी यांनी आभार मानले. दरम्यान प्रातिनिधिक स्वरूपात तीन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.



# कुऱ्हे पानाचे येथे आज चौरंगीनाथ यात्रोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, २२ ऑगस्ट**

तालुक्यातील कुऱ्हे पानाचे गावापासून एक किलोमीटरवरील उंच टेकडीवर निसर्गरम्य परिसरात चौरंगीनाथ महाराजांच्या मंदिरात शनिवारी (२३ ऑगस्ट) यात्रोत्सव होत असून, यात्रा पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी भरते. निसर्ग पर्यटनस्थळ पाहण्यासाठी आणि नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी होते.

तालुक्यातील कुऱ्हे पानाचे गावापासून एक किलोमीटरवरील उंच टेकडीवर निसर्गरम्य परिसरात विक्रम सवंत ११११ मधील हेमाडपंथी पद्धतीनें बांधलेले नाथसंप्रदायातील चौरंगीनाथ महाराजांचे मंदिर आहे. ब्रिटिश काळात १२ जून १८६३ रोजी सनद घोषित झालेले हे नाथपंथीय मंदिर श्री क्षेत्र चौरंगीनाथ बाबा मंदिर हे क वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता मिळाली आहे. निसर्गरम्य परिसरामुळे पर्यटनस्थळ मोठ्या संख्येने या ठिकाणी भेट देतात. शनिवारी (२३ ऑगस्ट) पोळा सणाच्या पाडव्याला येथे यात्रा भरते. जिल्ह्यातील नव्हे तर परिसरातून नोकरीनिमित्त मुंबई , नाशिक , इंदोर , पुणे येथे गेलेले भाविक मानलेले नवस फेडण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थिती देतात. यातूनच या स्थळाची पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिकता व नैसर्गिक वातावरण जोपासण्यात आले आहे. याची दखल घेवून भाविकांसाठी नागरी सुविधा व सुशोभिकरणासाठी २००८-०९ मध्ये शासनाकडून क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. त्यानुसार सुशोभिकरण म्हणून काही कामे केली आहेत. त्यात मंदिराला मुख्य प्रवेशद्वार व टेकडीवर चढण्यासाठी पायऱ्या व कठडे, भक्त निवास (सभागृह) याचा समावेश आहे. त्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून मंदिर सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे येथील तीर्थक्षेत्र आता भाविकांचे मन खेचून घेत आहे.

**नवस फेडण्यासाठी होते गर्दी**

चौरंगीनाथ महाराजांच पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी यात्रोत्सव असतो. जिल्ह्यातील व रिसरातील गोजोरे, सुनसगाव, बेलव्हाय, नशिराबाद, वराडसीम, जोगलखोरी, खंडाळा, मोंढाळा, शिंदी, सुरवाडा, मानमोडी, महादेवमाळ, मुशाळतांडा, भिलमळी, मांडवेदिगर, गारखेडा, गंगापुरी, साकेगाव, भुसावळ, जामनेर येथील भाविकांनी मानलेले नवस फेडण्यासाठी मंदिरावर गर्दी होत असते. भाविक चौरंगीनाथ महाराजांना कळण्याची भाकरी व लाल चटणी (सांड्या सांभार) हा नैवेद्य दाखवतात. काही भाविक बैलजोडीला घेऊन दर्शनासाठी येतात. दरम्यान, यात्रेसाठी मंदिराला व मंदिरापर्यंत जाणाऱ्या मार्गाला रंगरंगोटी केली होते. आदल्या दिवशी गावातून चौरंगीनाथ बाबांच्या पालखी सोहळा काढण्यात येतो. यात्रेत विविध प्रकारची खेळणे, पाळणे, खाद्यपदार्थांची दुकाने सजलेली असतात.



# शाळा, शैक्षणिक संस्थांवर दोन दिवसांत कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करणार

## क्रीडा गणवेश सक्तीवर उपोषणकर्ते नरेंद्र पाटील यांचा इशारा

**नंदुरबार** : शासन आदेश नसताना बहुतांश शाळांनी विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेश घेण्याची सक्ती केली आहे. अशा शाळा, शैक्षणिक संस्थांवर ठोस कारवाईच्या मागणीसाठी हिंदू सेवा सहाय्य समितीचे नरेंद्र पाटील यांनी २० ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. शाळा, शैक्षणिक संस्थांवर पुढील दोन दिवसांत शिक्षण विभागाने कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करणार असल्याचा इशारा उपोषणकर्ते नरेंद्र पाटील यांनी दिला आहे.



माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी कार्यालयातील प्रतिनिधींनी २० ऑगस्टला उपोषणस्थळी येऊन उपोषणकर्त्यांना पत्र दिले. पत्रात नमूद केले आहे की, शाळांनी विद्यार्थ्यांना गणवेश सक्ती केली आहे, त्या शाळेचा उल्लेख किंवा पुरावा दिलेला नाही. १९ ऑगस्टला जिल्हातील प्रातिनिधिक मुख्याध्यापक-प्राचार्यांची सहविचार सभा घेऊन त्यात क्रीडा गणवेश उपक्रम स्थगित करून विद्यार्थी- पालकांना सक्ती करू नये, अशा सूचना सहविचार सभेत देण्यात आल्या असून, उपोषण मागे घेणेविषयी पत्रात नमूद केले आहे.

शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना भेटीचे नियोजन करावे. त्यात अनेक शाळांमध्ये एकाच कंपनीचे एकसारखे क्रीडा गणवेश दिसून येतील. त्यावर आम्ही पुरावे किंवा शाळांची नावे देण्याची काय गरज आहे? शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, क्रीडा गणवेश उपक्रम स्थगित करून विद्यार्थी व पालकांना सक्ती करू नये, असे म्हटले आहे. स्थगित केले, याचा अर्थ ते सुरू होते, असा होतो व ते आपल्याला माहित आहे, म्हणून हिंदू सेवा सहाय्य समितीला नावे व पुरावे देण्याची गरज नाही. तरी दोषी शैक्षणिक संस्था आणि शाळांच्या मुख्याध्यापकांवर कारवाई करावी, या मूळ मागण्या मान्य न झाल्याने उपोषण सुरूच राहणार असल्याचे उपोषणकर्त्यांनी शिक्षण विभागाला लेखी कळविले आहे.

शाळा शैक्षणिक संस्था, मुख्याध्यापक- प्राचार्यांवर कारवाई करण्यास शिक्षण विभागाकडून टाळाटाळ होत असल्याने पुढील दोन दिवसांत कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करणार असल्याचा इशारा उपोषणकर्ते नरेंद्र पाटील यांनी दिला आहे.



## खंबाळे विद्यालयात विद्यार्थ्यांनी लुटला तारांगणाचा आनंद

**शिरपूर** : खंबाळे येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात थ्रीडी एनिमेशनद्वारा चंद्र व चंद्राशी जोडलेल्या रहस्य तसेच भारताने राबविलेली सर्व चंद्रयान मोहीम, मंगळयान मोहीम, भारताची अंतराळातील कामगिरी याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या या अनोख्या अनुभवाबाबत समाधान व्यक्त केले. नेहरू विज्ञान केंद्रात (मुंबई) ज्याप्रमाणे अवकाशातील ग्रह, तारे यांच्या हालचाली होतात, तशा सर्व हालचाली थ्रीडी एनिमेशनद्वारे पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी अनुभवल्या. पोलाद स्टील, भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल व वैष्णवी स्टील यांच्यातर्फे प्राचार्य एन. ई. चौधरी यांच्या प्रयत्नाने कार्यक्रम झाला. पोलाद स्टीलतर्फे शालेय कामासाठी बॉक्स फाइल भेटस्वरूपात देण्यात आल्या. यासाठी पोलाद स्टीलचे मनोज आगलावे व रामकृष्ण चव्हाण, वैष्णवी स्टीलचे संचालक दिनेश पाटील यांनी सहकार्य केले. प्रत्येक वर्गातील ३५ विद्यार्थ्यांना २० मिनिटात चंद्र व चंद्राशी जोडलेले रहस्य विषय आपल्या भौगोलिक व खगोल ज्ञानात भर घालण्यासाठी थ्रीडी स्वरूपात उपयुक्त माहिती देण्यात येऊन ती माहिती शाळेच्या ४९१ विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरली.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### नवागावात बालमजूर प्रतिबंधक जनजागृतीपर कार्यक्रम

**नवापूर** : धुळे येथील लुपिन ह्यूमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशनतर्फे नवापाडा येथील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बालमजूर प्रतिबंधात्मक प्रभात फेरी व जनजागृतीपर कार्यक्रम झाला. मुख्याध्यापक सुवर्णा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभात फेरी निघाली. याप्रसंगी कोणताही विद्यार्थी शाळेपासून वंचित राहणार नाही यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. कृषिमित्र नितीन गावित, अंकेश गावित, प्रकल्प व्यवस्थापक सतीश पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राथमिकचे मुख्याध्यापक महेंद्र वळवी, माध्यमिकच्या मुख्याध्यापक सुवर्णा पाटील, प्रा. डॉ. जगदीश काळे, सहयोगी प्रा. डॉ. किशोर सोनवणे, डॉ. नितीनकुमार माळी, सतीश नेरपगार, विनोद बच्छाव, संदीप बिराडे, एम. बी. मोरे, शीतल निकम, शांताराम जाधव, कनकसिंग सिसोदे, पुष्पा वसावे, अमरिता पाडवी, हरीश वाडिले आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी प्रकल्पप्रमुख सुनील सैंदाणे यांचे मार्गदर्शन लाभले.



### कैलास सोलंकींना उत्कृष्ट शिक्षकेतर गौरव पुरस्कार

**नंदुरबार** : शहादा येथील वसंतराव नाईक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्रयोगशाळा परिचर कैलास सोलंकी यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी सेवा गौरव पुरस्कार-२०२४ मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रशासकीय, शैक्षणिक, अभ्यासेतर, विद्यार्थीहित, शिक्षकेतर कर्मचारी संघटना, शिक्षकेतर कर्मचारी सहाय्यता व इतर उपक्रमांत प्रामाणिकपणे व निष्ठेने केलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. सोलंकी यांना प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्रा. विजय माहेश्वरी आदींच्या हस्ते सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचा सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा भारतज्योती जाधव, सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव, सचिव प्रा. संजय जाधव, वर्षा जाधव, संस्थेचे विश्वस्त व प्रशासकीय प्रमुख हिमांशू जाधव, संस्थेचे समन्वयक संजय राजपूत, प्राचार्य डॉ. डी. डी. राठोड, विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम आदींनी गौरव केला.



### समाजकल्याण कार्यालयात तृतीयपंथी कक्ष स्थापन

**नंदुरबार** : येथील समाजकल्याण कार्यालयात तृतीयपंथी कक्षाचे उद्घाटन पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते झाले. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, उपविभागीय अधिकारी व सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सहाय्यक आयुक्त सुंदरसिंग वसावे, समाजकल्याण निरीक्षक विवेकानंद चव्हाण, नीती आयोगाचे प्रतिनिधी षण्मुख सोनवणे व वैष्णवी रामडोहकर आदी उपस्थित होते. कक्ष जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांच्या संकल्पनेतून साकारला आहे. तृतीयपंथीयांच्या तक्रारींचे निवारण, त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे व योजनांचे १०० टक्के उद्दिष्ट साध्य करणे, हे या कक्षाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

### शिवाजी महाविद्यालयात संस्कृत दिन उत्साहात

**नवापूर** : येथील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात संस्कृत दिन उत्साहात झाला.



उपमुख्याध्यापक ए. एन. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. पर्यवेक्षक हरीश पाटील, जी. डी. सूर्यवंशी प्रमुख अतिथी होते. यानिमित्त वक्तृत्व, एकल संस्कृत गीत, स्तोत्र गायन तसेच समूह संस्कृत गीत अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. ६० विद्यार्थ्यांनी कलाप्रकार सादर केले. मुख्याध्यापिका कमल कोकणी यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धांचे परीक्षण प्रशांत पाटील, निळकंठ बागूल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बी. बी. गावित, हेमंत पाटील, गायत्री पाटील व जयेश सूर्यवंशी यांनी सहकार्य केले. सिद्धेश्वर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. उन्नती पाटील, तेजस्विनी पवार, कल्याणी पवार व भाग्यश्री मंगळे यांनी सूत्रसंचालन केले.दिव्यता ठाकरे हिने आभार मानले.




### काणे हायस्कूलचे जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत यश

**नंदुरबार** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे) व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय (नंदुरबार) यांच्यातर्फे चावरा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित १४ व १७ वर्षांआतील गटात जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी यश प्राप्त केले. त्यात १४ वर्षांआतील गटात संस्कृती पाटील व विद्या कोकणी आणि १७ वर्षांआतील गटात भूमिका पाटील व गेहना तमायचेकर यांनी यश प्राप्त केले. त्या विभागस्तरावरील स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांना कलाशिक्षक चंद्रशेखर चौधरी व क्रीडाशिक्षक महेश भट यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींचा नंदुरबार एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नरेंद्रभाई सराफ, अध्यक्ष राहुल पाठक, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र पाटील, सचिव प्रशांत पाठक, कार्यकारिणी सदस्य- सदस्या, मुख्याध्यापिका सीमा मोडक, पर्यवेक्षक मिलिंद चव्हाण, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गौरव केला.

### सकल मराठा समाजाची आज नियोजन बैठक

**नंदुरबार** : मराठा समाजास आरक्षणासाठी मनोज जरांगे- पाटील हे मुंबई येथील आझाद मैदानावर २९ ऑगस्टपासून बेमुदत उपोषणास बसणार आहेत. समाजाच्या हक्कांसाठी ही शेवटची लढाई असून, जरांगे- पाटील यांच्या समर्थनासाठी व मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी शनिवारी (२३ ऑगस्ट) दुपारी एकला येथील होळतर्फे हवेली शिवारातील नंदुरबार व धुळे जिल्हा मराठा समाज सार्वजनिक ऊन्नती मंडळाच्या लिंबाई भवनात नियोजन बैठक घेण्यात येणार आहे. समाजबांधव, युवक व विविध संघटनांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन सकल मराठा समाजातर्फे करण्यात आले आहे.

## शहाद्यात सेना महाराजांना नाभिक समाजातर्फे अभिवादन!



**शहादा** : येथे नाभिक समाजातर्फे आराध्य दैवत वारकरी संप्रदायातील व संतपरंपरेतील अग्रज सुधारक, मानव जातीच्या कल्याणाचे पुरस्कर्ते व सुधारक असलेले संतशिरोमणी श्री संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्ताने प्रतिमापूजन, अभिषेक, समाजप्रबोधनपर व्याख्यान, भजन- कीर्तन, महाप्रसाद वितरण आदी कार्यक्रम घेण्यात आले.

शहरातील श्री संत सेना चौकात कार्यक्रम झाले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हिरालाल बोरदेकर अध्यक्षस्थानी होते. समाज पंचमंडळाचे कोषाध्यक्ष लाला कन्हैया, तुंबा पटेल, संत सेना नाभिक पतसंस्थेचे चेअरमन संजय जांभळे, अशोक जाधव, प्रा. डॉ. अनिल साळुंके, हेमराज पवार, योगेश कन्हैया, दत्तात्रय अमळथेकर, दिलीप कन्हैया, कैलास सोलंकी, संतोष जाधव, मगन जांभळे, भिका अमळथेकर, सुदाम कन्हैया, रमेश पटेल, लक्ष्मण पटेल, ताराचंद पटेल, सुभाष अमळथेकर, नीलेश जांभळे, गणेश जांभळे, माधव जांभळे, अंबालाल बोरदेकर, भिलू जांभळे, हेमंत जांभळे, दिलीप जांभळे, पंकज जांभळे, पंकज जाधव, नरेंद्र पटेल, छोटू बोरदेकर, आशुतोष सोनवणे, प्रतीक चव्हाण, उमेश सोलंकी, चेतन जांभळे, सुनील बोरदेकर, हेमंत जांभळे, भीमा जांभळे आदी नाभिक समाजबांधव उपस्थित होते.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवर व योगेश कन्हैया यांनी सपत्नीक श्री संत सेना महाराज, कुलस्वामिनी लिंबच माता यांची प्रतिमा व अंबिकादेवी मूर्तीचे पाद्यपूजन करून अभिवादनासह वेदमूर्ती लाला महाराज व्यास यांच्या मंत्रोच्चाराने पूजन झाले. या वेळी अशोक जाधव यांनी, संत सेना महाराजांनी दिलेल्या शिकवणीतून सर्वांनी संघटित होऊन वाईट प्रवृत्तींवर मात करून समाजात परिवर्तन घडवावे. युवकांसह सर्वांनी समाजासोबत मानवतेच्या कल्याणासाठी सत्कार्य करण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

याप्रसंगी प्रा. डॉ. अनिल साळुंके यांनी, वारकरी संतपरंपरेतील श्री संत सेना महाराज हे एक प्रमुख समाजप्रबोधन करणारे सुधारक संत असून, त्यांनी सामाजिक विषमता नष्ट करून समानता प्रस्थापित करण्यासाठी आपल्या जीवन व कार्यातून प्रेरणा दिली. अंधश्रद्धेच्या नादी न लागता श्रद्धा ठेवून विज्ञानवादी झाले पाहिजे, शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन असून, शिक्षणाच्या मानवी कल्याणासाठी वापर झाला पाहिजे. रंजले, गांजले, दीनदुखी मनुष्याची सेवा हीच खरी परमेश्वर सेवा आहे, अशी शिकवण दिली असून, त्याचे प्रत्येकाने जीवनात आचरण केले पाहिजे, असे सांगितले.

या वेळी संजय जांभळे यांनी मनोगत व्यक्त केले. संत सेना नवरात्रोत्सव मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त संगीतमय श्रीदेवी भागवत कथेच्या आयोजनासंदर्भात माहिती देण्यात आली. राहुल अमळथेकर यांनी प्रास्ताविक केले. योगेश सोलंकी यांनी सूत्रसंचालन केले. भूषण सोलंकी यांनी आभार केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हरीश सोलंकी, दीपक सोलंकी, ऋषिकेश पटेल, नीलेश कन्हैया, संदीप कन्हैया, भावेश पटेल, यश सोलंकी यांच्यासह श्री. संत सेना नवरात्रोत्सव मंडळ व श्री संत सेना चौकातील कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.



## दोंडाईचात संत सेना महाराजांना वंदन

**मेथी (शिंदखेडा)** : दोंडाईचा येथील नाभिक समाज हितवर्धक संस्थेतर्फे आराध्य दैवत श्री संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम शहरातील पंचवटी मंदिरात घेण्यात आला. निवृत्त शिक्षक व इतर संघटनांत काम करणाऱ्या समाजबांधवांचा समाजातर्फे सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ समाजसेवक तथा निवृत्त प्रा. गोकुळ सैंदाणे अध्यक्षस्थानी होते. दुकानदार संघाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र सैंदाणे, तालुकाध्यक्ष रवींद्र चित्ते, नाभिक हितवर्धक संस्थेचे शहराध्यक्ष दिलीप सैंदाणे, युवक मंडळाचे अध्यक्ष राजेश मिस्त्री, दुकान संघाचे शहर उपाध्यक्ष महेंद्र चित्ते, जगदीश ईशी, छोटू महाले, गोकुळ सैंदाणे, रमेश मोरे, समाधान ठाकरे, राजेंद्र मोरे, अशोक सोनवणे, सुनील सैंदाणे, बालू मोरे, श्रावण भदाणे, भोला सैंदाणे, किरण सूर्यवंशी, साहेबराव अहिरराव, मुकेश चित्ते, संदीप पवार, भरत सैंदाणे, शशिकांत खोंडे, भरत वरसाळे, रमेश खोंडे, लोटन पवार, मच्छिंद्र पवार, सोनू सैंदाणे, हिम्मत सैंदाणे, राजेंद्र सैदाणे, विशाल महाले, जगदीश वरसाळे, मधुकर चित्ते, संजय पवार, गुलाब पवार, योगेश चित्ते, कैलास पवार, विलास शिरसाठ, भरत जयपाल, हिम्मत पवार, अजय पवार, गोपाल बोरसे, कैलास चित्ते, रमेश चित्ते, अनिल सोनवणे, नितीन सूर्यवंशी, किरण मोरे, अनिल चित्ते, अजय ईशी यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. रवींद्र सैंदाणे यांनी सूत्रसंचालन केले.

**समाजातर्फे निवृत्तांचा सत्कार**

कार्यक्रमात नाभिक समाज हितवर्धक संस्थेतर्फे समाजातील निवृत्त व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती साहेबराव अहिरराव, जी. वाय. बोरसे, हिम्मत सैंदाणे, संजय सैंदाणे यांचा सत्कार समाजाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आला. निवृत्त व्यक्तींनी समाजाचे काम पुढे न्यावे, असे अपेक्षा समाजबांधवांनी व्यक्त केली.

## शहादा येथील नाईक महाविद्यालयात विद्यार्थी प्रेरणा, उद्बोधन कार्यशाळा

**नंदुरबार** : शहादा येथील वसंतराव नाईक कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्षातर्फे प्रथम वर्ष कला शाखेत नव्यानेच प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा व उद्बोधन कार्यशाळा घेण्यात आली.



प्रारंभी प्राचार्य डॉ. डी. डी. राठोड व विद्यार्थ्यांच्या हस्ते माता सरस्वतीचे प्रतिमापूजन झाले. प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना गुलाबफूल देऊन स्वागत करण्यात आले. प्रा. डॉ. बी. वाय. बागूल यांनी प्रास्ताविक केले.विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. जी. एस. पाटील यांनी कार्यान्वित अनेक योजनांची माहिती दिली. वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. जी. एस. चौधरी यांनी गरीब विद्यार्थी सहाय्यता कक्ष, क्रीडा संचालक प्रा. डॉ. राजेश सोनवणे यांनी क्रीडा विभाग, प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. डी. पाटील यांनी कमवा शिका, प्रा. डॉ. मालिनी अढाव यांनी युवती सभा, कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. के. पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजना एकक, ग्रंथालयप्रमुख प्रा. डॉ. विजय बर्फे यांनी ग्रंथालय, परीक्षा विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र डोंगर पाटील यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील अंतर्गत व बाह्य मूल्यांकनाच्या परीक्षांची माहिती दिली. प्रा. डॉ. बी. वाय. बागूल यांनी विद्यार्थ्यांचा, पालकांचा, माजी विद्यार्थ्यांचा व विद्यार्थी समाधान सर्वेक्षण अभिप्राय भरण्यासंदर्भात माहिती दिली। कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असणाऱ्या प्राध्यापकांनी विविध समित्यांची ओळख करून दिली.

कार्यशाळेत प्राचार्य डॉ. राठोड यांनी हा कार्यक्रम सर्वस्वी एक नावीण्यपूर्ण उपक्रम असून, विद्यार्थ्यांसाठी उपयोगाचा आहे, असे सांगितले. भूगोलशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. वाय. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अजित चव्हाण यांनी आभार मानले. प्रा. राम हजारी यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव प्रा. संजय जाधव, सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या सचिव व नंदुरबार जिल्हा स्काउट-गाइड आयुक्त वर्षा जाधव, प्रशासकीय प्रमुख प्रा. डॉ. हिमांशू जाधव व संस्थेचे समन्वयक संजय राजपूत यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

## गावित शैक्षणिक संकुलात स्काउट्स-गाइड्स नोंदणी मोहिम

### कोरीट येथील १३७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**नंदुरबार** : 'सेवा हीच खरी साधना आणि शिस्त हीच खरी शक्ती' हा संदेश घेऊन कोरीट येथील के. डी. गावित शैक्षणिक संकुलात राज्य भारत स्काउट्स अँड गाइड्सच्या येथील कार्यालयातर्फे नोंदणी सोहळा पार पडला. सोहळ्यात १३७ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.



याप्रसंगी प्राचार्य मुकेश पाटील यांनी सांगितले की, 'स्काउट म्हणजे जीवनपद्धती आहे. शिस्त, संघभावना, समाजसेवा आणि नेतृत्वगुण विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारे हे व्यासपीठ आयुष्यभर दिशा दाखवेल. प्राथमिकचे मुख्याध्यापक शशिकांत पाटील यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणा देत सेवा आणि समाजहितासाठी कार्य करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाला राकेश पाटील, व्ही. एस. पाटील, सुनीता निकम, सुरेश पटेल, विश्वासराव शिरसाठ, रवींद्र सोनवणे, चारुशीला निकम, शंकर ओगले, मीनाक्षी पाटील, प्रा. नयना पवार, प्रा. भरत चव्हाण, प्रा. सुनील खाडे, प्रा. स्वाती बारी, प्रा. प्रशांत बोरसे, सुनंदा पाटील, सविता पाटील, ज्योत्स्ना देवरे, किशोर भिलावे, कौशिक बाविस्कर आदी उपस्थित होते. रवींद्र सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. सुनीता निकम यांनी आभार मानले.

## शहाद्यातील महाविद्यालयात एमएसएफडीए परिचय कार्यक्रम

**शहादा** : पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पुणे येथील महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमीच्या सहकार्याने नवकल्पक अध्यापन व व्यावसायिक विकासासाठी कार्यक्रम झाला. कार्यक्रमात ५० पेक्षा अधिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले.



याप्रसंगी एमएफएसडीएचे सूरजकुमार बाबर व भार्गव वालंजू यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात प्राचार्य प्रा. डॉ. एम. के. पटेल उपस्थित होते. बाबर व वालंजू यांनी एमएसएफडीएमार्फत वर्षभर राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

आयक्यूएसी समन्वयक डॉ. मिलिंद एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, संचालक मयूर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## डॉ. सुप्रिया गावित यांच्या वाढदिवसानिमित्त क्रीडा महोत्सव

### विजय गौरव समितीतर्फे विविध स्पर्धांसाठी नावनोंदणीचे आवाहन

**नंदुरबार** : जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. सुप्रिया विजयकुमार गावित यांच्या वाढदिवसानिमित्त क्रीडा महोत्सव होणारा असून, महोत्सवांतर्गत विविध स्पर्धांसाठी नावनोंदणी करावी, असे आवाहन विजय गौरव क्रीडा महोत्सव समितीने समस्त क्रीडापटूंना केले आहे.

विजय गौरव क्रीडा महोत्सव समितीतर्फे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धा २४ व २५ ऑगस्टला श्रॉफ हायस्कूल, एस. ए. मिशन हायस्कूल, जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहेत. स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी शाळा-महाविद्यालयांनी स्पर्धकांची नावनोंदणी करावी, तसेच स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंनी मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचा जन्मतारखेचा पुरावा म्हणून बोनाफाईड सर्टिफिकेट व सोबत आधार कार्ड आणणे आवश्यक आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीने केले आहे.

स्पर्धास्थळ अन् नावनोंदणीसाठी संपर्क साधा

१७ वर्षांआतील आणि १९ वर्षे वयोगटातील टग ऑफ वार म्हणजे रस्सीखेच स्पर्धा एस. ए. मिशन हायस्कूल मैदानावर होईल. १७ वर्षांआतील मुले वजन-४७० गटासाठी ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, १७ वर्षांआतील मुलींच्या (वजन-३९०) गटासाठी ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, १९ वर्षांआतील मुलांच्या (वजन ५५०) गटासाठी ५०००, ३०००,



२००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, तर १९ वर्षांआतील मुलींच्या (वजन ४३०) गटासाठी ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम ठेवण्यात आली आहे.

फुटबॉल स्पर्धेत १४ वर्षांआतील मुलांच्या गटासाठी ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम आणि १७ वर्षांआतील मुलांच्या गटासाठी ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम देण्यात येणार आहे. यासाठी स्पर्धकांनी ईश्वर धामणे (९४२२२८५७०९), बलवंत निकुंभ (८७८८८७६०४४), योगेश निकुंभ (९७६४२२७११६) यांच्याकडे नावनोंदणी करावी.

लंगडी स्पर्धा श्रॉफ हायस्कूलमध्ये होईल. १० वर्षांआतील मुले (१ ली ते ४ थी)- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, मुली (१ ली ते ४ थी)- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम असेल. १२ वर्षांआतील मुले (५ वी ते ७ वी)- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, १२ वर्षांआतील मुले (५ वी ते ७ वी)- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम असेल. संपर्कप्रमुख करण चव्हाण (८६६८५४६८४२), जगदीश वंजारी (९४०३३८४५३९), तुषार सोनवणे (७९७२०८२६४५).

बॅडमिंटन स्पर्धा : ठिकाण- जिल्हा क्रीडा संकुल.- गट १७ वर्षांआतील मुले - ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम. १७ वर्षांआतील मुली- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, १९ वर्षांआतील मुले- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम, तर १९ वर्षांआतील मुली- ५०००, ३०००, २००० अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक रक्कम असेल. संपर्कप्रमुख- भिकू त्रिवेदी (९२२६७५३०७७), राजेश शहा (९४२३१९१३१२).



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : २३/०८/२०२५ **वार** : शनिवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षीण **ऋतू** : शरद **मास** : श्रावण **पक्ष** : कृष्ण **महिना** : ऑगस्ट
**संवत** : २०८१ **अयनांश** : २४-१२-५९ **तिथी** : अमावस्या **नक्षत्र** : मघा
**योग** : परिघ **करण** : नाग **सूर्योदय** : ६-२३ **सूर्यास्त** : १९-५९
**चंद्रराशी प्रवेश** : सिंह **शुभाशुभ** : सामान्य.

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : आपणास आजचा दिवस कार्यसफलतेचा असेल.
**वृषभ** : नको ते विचार मनातून काढून टाका.
**मिथून** : सर्व कार्य आज सपंन्न होतील.
**कर्क** : आपण आपल्याच विचारांच आग्रह कराल.
**सिंह** : आज आपली इच्छा आपली कामे.
**कन्या** : नको त्या विचारात दिवस जाईल.
**तुला** : मनाप्रमाणे भोजनाचा स्वाद घ्याल.
**वृश्चिक** : आज गत इतिहासत वेळ जाईल.
**धनू** : आपण कसे होते याचा विचार कराल.
**मकर** : सत्य जाणले तर यश मिळवाल.
**कुंभ** : संसार पुरते मर्यादीत रहाल.
**मीन** : नको त्या विचारंना तिलांजली घ्यावी.
**विशेष** : आज गव्हाची पुरण पोळी ताजी गायीस द्यावी.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु. पो. रावेर, जि. जळगाव मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### साकळीतील आदिवासी वस्तीत मुलांना खाऊवाटप

**यावल** : साकळी येथील भोनक नदीकाठावरील आदिवासी वस्तीत व भवानी माता मंदिराजवळील आदिवासी वस्तीत हिंदू जनजागृती न्यासतर्फे आदिवासी बांधवांना व त्यांच्या मुलांना खाऊवाटप करण्यात आला. हिंदू जनजागृती न्यासतर्फे आदिवासी बांधवांना गरजेच्या वस्तू, कपडे, खाऊवाटप तसेच रक्ततपासणी, आरोग्य तपासणी असे विविध उपक्रम महाराष्ट्रभर घेण्यात येतात. याअंतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात आला. तालुक्यातील आसराबारी व यावल येथील भिलवाडी येथे अन्नदान करण्यात आले. आदिवासी बांधवांना हिंदू जनजागृती न्यासच्या नीलिमा नेवे यांच्या हस्ते आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तू, त्यांच्या मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. भिलवाडीमधील ग्रामस्थांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले.



### चितोडे वाणी गणेश मंडळ उपक्रम राबविणार

**यावल** : येथील चितोडे वाणी सार्वजनिक गणेश मंडळातर्फे समाजसेवा, प्रबोधन, नागरिकांना योजनांचा लाभ अशाप्रकारचे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. ३० ऑगस्टला सकाळी दहा ते रात्री १० पर्यंत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना/आयुष्यमान भारत कार्ड योजना राबविण्यात येणार आहे. परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांना या योजनेचे आयुष्यमान भारत कार्डवाटप करण्यात येणार आहे. योजना राबविण्यात येणार असल्याचे निवेदन तहसीलदारांना मंडळाच्या पदाधिकाऱ्यानी दिले. परिसरातील लाभार्थ्यांनी उपक्रमात नाव नोंदवून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.



### फैजपूरला आज आज पादुका धान्यपूजन सेवा

**फैजपूर (ता. यावल)** : अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व बालसंस्कार केंद्राच्या श्री स्वामी समर्थ पादुका विजय रथाचे आगमन येथील विद्यानगर भागातील श्री स्वामी समर्थ केंद्रात शनिवारी (२३ ऑगस्ट) होत आहे. याप्रसंगी खेमराज भंगाळे व भाग्यश्री भंगाळे यांच्या हस्ते संध्या आरती होईल. सकाळी आठ ते दुपारी बारापर्यंत स्वामी समर्थ पादुका व धान्य पूजन सेवेकऱ्यांना करता येणार आहे. याचा फैजपूर व पंचक्रोशीतील सेवेकरी भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी समर्थ केंद्राने केले आहे.



### तिरुपती-हिसार एक्स्प्रेसला अमळनेरला थांबा

**अमळनेर** : उत्तर महाराष्ट्रातील भाविकांसाठी व प्रवाशांसाठी खासदार स्मिता वाघ यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे तिरुपती-हिसार (खाटू श्याम) एक्स्प्रेसला अखेर अमळनेर स्थानकात अधिकृत थांबा मिळाला आहे. शुक्रवारी (२२ ऑगस्ट) एक्स्प्रेसचा पहिला थांबा अमळनेर येथे घेण्यात आला. याक्षणी स्थानकात गाडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले. सोहळ्याला डॉ. अनिल शिंदे, शहर मंडळ अध्यक्ष योगेश महाजन, ग्रामीण मंडळ अध्यक्ष राहुल पाटील, लालचंद सैनानी, हरचंद लांडगे, नीरज अग्रवाल, श्याम पाटील, प्रीतपालसिंग बग्गा, सरचिटणीस भरतसिंह परदेशी, महेश पाटील, सुभाष मामा, महेश संदनशिव तसेच स्टेशन मास्टर अनिल जी. शिंदे उपस्थित होते. खासदार स्मिता वाघ यांच्या प्रयत्नांमुळे मिळालेला हा थांबा अमळनेर शहर व परिसरातील नागरिकांसाठी मोठी सोय ठरणार आहे. खाटू श्याम बाबांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसह तिरुपतीकडे जाणाऱ्या यात्रेकरूंनीही याचा लाभ होणार असून, त्यांनी यावेळी खासदार स्मिता वाघ यांचे आभार मानत गाडीचे उत्स्फूर्त स्वागत केले.

### नाबार्डच्या संचालकपदी सतीश मराठे

**जळगाव** : सतीश काशिनाथ मराठे यांची रिजर्व बँकेच्या नाबार्डच्या संचालकपदी सतीश काशिनाथ मराठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सतीश मराठे यांची ही नियुक्ती तीन वर्षांसाठी राहणार आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल सतीश मराठे यांचे सहकार भारती अध्यक्ष प्रा डॉ उदय जोशी, महामंत्री दिपक चौरसिया, राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर, राष्ट्रीय मंत्री दिलीप पाटील, स.भा.प्रशिक्षण केंद्र अध्यक्ष संजय बिर्ला यांनी अभिनंदन केले आहे. तसेच कृषी क्षेत्रातील विविध पतपुरवठ्यासंदर्भातील नियोजनातही सतीश मराठे यांची नियुक्ती महत्वाची ठरणार आहे.

# भुसावळमध्ये दोन पोलिसांनी फोडला लाचखोरीचा पोळा!

## समर्थकासह तिघांना अटक; वॉरंट रद्द करण्यासाठी दोन हजारांची लाच भोवली

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, २२ ऑगस्ट**

अटक वॉरंटप्रकरणी एकाला अटक न करता वॉरंट रद्द करण्याची मुदतवाढ देण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच घेताना भुसावळ तालुका पोलिस ठाण्यातील दोन पोलिसांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. ही कारवाई भुसावळ परिसरात करण्यात आल्याने पोलिस दलात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. तक्रारदाराला गुन्हेगारी प्रकरणी अटक वॉरंट आले होते. ते रद्द करण्याची मुदतवाढ देण्यासाठी तालुका पोलिस ठाण्याचे एएसआय बाळकृष्ण मुकुंदा पाटील व एएसआय आत्माराम सुधाकर भालेराव यांनी तक्रारदाराकडे दोन हजार रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने यासंदर्भात जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पथकाने सापळा रचला. पथकाने सापळा रचून दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांसह खासगी व्यक्ती ठामसिंग प्रतापसिंग जेटवे यांना दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. या कारवाईमुळे पोलिस दलातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्यावर पुढील कायदेशीर कारवाई केली जात आहे.

**पोलिस दलाच्या प्रतिमेला तडा**

या घटनेमुळे पोलिस दलाच्या प्रतिमेला मोठा तडा गेला आहे. ज्यांच्यावर कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे, तेच अशा प्रकारच्या गैरकृत्यांमध्ये सहभागी असल्याचे उघड झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. ऐन पोळ्याच्या दिवशी गावोगावी पोळा फ ुटण्याच्या तयारीत असतानाच या भ्रष्टाचाऱ्यांनी भ्रष्टाचाराचा पोळा फोडल्यामुळे तालुक्यात संताप व्यक्त केला जात आहे.

# आदिवासींच्या मृत्यूप्रकरणी शेतकऱ्यावर सदोष मनुष्यवधासह विविध गुन्हे दाखल

## दुर्घटनेत बचावलेली दीड वर्षीय दुगाला आजोबांकडे सुपूर्द

**तभा वृत्तसेवा**
**एरंडोल, २२ ऑगस्ट**

शेतास तारेचे कुंपण करून त्यात वीजप्रवाह सुरू करून आदिवासी समाजातील एकाच परिवारातील पाच सदस्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या वरखेडी (ता. एरंडोल) येथील शेतमालक बंडू युवराज पाटील यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधासह अन्य दोन गुन्हे दाखल करण्यात आले. गुरुवारी (२१ ऑगस्ट) रात्री अकराच्या सुमारास बंडू पाटील यांना अटक करण्यात आली.

दरम्यान, विजेच्या धक्क्याने मृत पावलेल्या पाचही जणांवर त्यांच्या मूळ गावी ओसरणी (मध्य प्रदेश) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दुर्घटनेत बचावलेली दीड वर्षाच्या दुर्गास तिच्या आजोबांच्या स्वाधीन करण्यात आले. शेतमालक बंडू पाटील यांच्याविरुद्ध वीज वितरण कंपनी व वनविभागानेदेखील गुन्हा दाखल केला आहे.

वरखेडी येथील शेतकरी बंडू युवराज पाटील यांनी वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण व्हावे यासाठी कोणतीही परवानगी न घेता शेताला तारेचे कुंपण करून त्यामध्ये वीजप्रवाह सोडला होता. मध्य प्रदेशातील ओसरणी येथील एकाच कुटुंबातील सासू, मुलगी, जावई व तीन लहान नातवंडे असे सहा सदस्य रोजगाराच्या शोधासाठी वरखेडी आले होते. रात्री आदिवासी परिवारातील सर्व सदस्य बंडू पाटील यांच्या शेतात थांबले होते. शेतात तारेच्या कुंपणात सोडलेल्या वीजप्रवाहाचा धक्का बसून लीलाबाई जामसिंग पावरा (वय ६०), विकास रामलाल पावरा (वय ३०), सुमन पावरा (वय २५), पावन पावरा (वय ४) व कवल (वय ३) या पाच जणांचा जागीच मृत्यू झाला होता, तर दुर्गा झोपलेली असल्याने या दुर्घटनेत सुदैवाने बचावली होती. पाचही आदिवासींचा मृत्यू विजेच्या धक्क्याने झाला का घातपात आहे, यादृष्टीने पोलिसांनी तपास सुरू केला होता. घटनास्थळी श्वानपथकासह फॉरेन्सिक टीमचे कर्मचारीही दाखल झाले होते. मृत्युमुखी पडलेल्या पाचही जणांच्या हातावर व पायावर विजेच्या तारांचा शॉक लागल्याच्या खुणा दिसत होत्या. याच शेतात विजेचा धक्का बसून दोन रानडुकरेही मृत्युमुखी पडली होती. पाच आदिवासींचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याने घटनास्थळी पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांच्यासह वीज वितरण कंपनी, वनविभाग, महसूल प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले होते.

शेतमालक बंडू युवराज पाटील यांच्या निष्काळजीमुळे पाच निरपराध व्यक्तींच्या मृत्यू झाल्याने त्यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाकःल करण्यात आला, तसेच पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने शेताच्या तारेचे कुंपण काढून, तसेच वीजपुरवठा करणारी वायर काढून शेतातील पत्री शेडमध्ये लपवून ठेवल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेताच्या कुंपणात वीजप्रवाह सोडल्याने दोन रानडुकरे मृत्युमुखी पडल्याने वनविभागाने बंडू पाटील यांच्याविरुद्ध वन्यजीव अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरखेडी येथील विजेच्या धक्क्याने मृत झालेल्या पाचही आदिवासींच्या मृतदेहांची उत्तरीय तपासणी जळगाव येथे करण्यात आल्यानंतर त्यांच्या मूळ गावी ओसरणी (ता. खकना, जि. बऱ्हाणपूर) येथे एकाच वेळी अंत्यसंस्कार करण्यात आले. दुर्घटनेत बचावलेली एक वर्षाची दुर्गा हिस तिच्या आजोबांच्या स्वाधीन करण्यात आले. पाचही मृतदेहांचे फॉरेन्सिकचे नमुने पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.



# सिल्लोड येथे पोळा सण उत्साहात

## आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मशनाच्या बैलाचे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, २२ ऑगस्ट**

सिल्लोड येथे पारंपरिक पद्धतीने श्री.हनुमान मंदिर येथील वेशीतून पोळा सणाला सुरुवात झाली. या वेळी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मानाच्या बैलाचे पूजन करून पोळा सणाला सुरुवात करण्यात आला.

सिल्लोडच्या ग्रामदैवत श्री म्हसोबा महाराज संस्थानच्या वतीने यंदा रामेश्वर कैलास पा.हाडोळे या शेतकऱ्याला मान देण्यात आला. प्रारंभी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मानाच्या बैलाची पूजन करण्यात आले. त्यानंतर शेतकरी रामेश्वर कैलास हाडोळे यांचा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक शंकरराव खांडवे, शेख जावेद, विठ्ठल सपकाळ, राजेंद्र ठोंबरे, प्रताप प्रसाद, शिवसेना जिल्हा उपप्रमुख किशोर अग्रवाल, जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, शहरप्रमुख मनोज झंवर, व्यापारी महासंघाचे दुर्गेश जैस्वाल, माजी नगरसेवक प्रशांत क्षीरसागर, जितू आरके, राजू गौर, मतीन देशमुख, शिवा टोम्पे, आशिष कुलकर्णी, फहिम पठाण, बाबूराव वाकडे, अशोक बनसोड, पांडुरंग डवणे, पंडित मिरगे, रामेश्वर भाग्यवंत, कृष्णा वाघ, मनोज महाराज भाग्यवंत, दिलीप वाघ, जगन्नाथ कुदळ, देवराव भाग्यवंत, संदीप हाडोळे, रत्नाकर कोठाळे, विठ्ठल वाघ, कैलास इंगे, राजेश्वर आरके, रत्नाकर वाघ, गणेश शेलार, आनंद सिरसाट, रत्नाकर वाघ आदींसह गावकरी उपस्थित होते.

# भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

## आचार्य महंत यांचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीला भरधाव ट्रकने धडक दिली. या अपघातामध्ये दुचाकीवर बसलेले कबीर गुरु आश्रम पिंप्री बु.(ता. एरंडोल) येथील महंत प्रियरंजनदास गुरु आचार्य महान साहेब यांचा जागीच मृत्यू झाला. गुरुवारी (२१ ऑगस्ट) संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास ही घटना पिंप्री बु. बसस्टॉपजवळ एरंडोल-जळगाव महामार्गावर घडली. ही वार्ता कळताच पिंप्रीसह परिसरातील लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. महंत वयाच्या अकराव्या वर्षापासून अध्यात्मिक साधनेत रमले. ते ब्रम्हचारी होते. महंत यांच्या मृत्यूची वार्ता कळाल्यानंतर पंचक्रोशीत हळहळ व्यक्त करण्यात आली.

महंत प्रियरंजनदान हे शेतकरी प्रवीण नारायण पाटील यांच्यासोबत पल्सर ( एमएच १९ ईआर ६७०४) दुचाकीवर मागे बसुन प्रवास करीत होते. दुचाकी पिंप्री फाट्यावरुन रस्ता ओलांडत असताना मागवून भरधाव ट्रक (एमएच १८ बीए ०१८८) वरील चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण घटनेत दुचाकीवरुन खाली पडलेले महंत प्रियरंजनदास गुरु आचार्य यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या सोबतचे दुचाकी चालक प्रवीण पाटील हे गंभीररित्या जखमी झाले.दोघांना एरंडोल येथे रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी महंत यांना मृत घोषीत केले. जखमी पाटील यांच्यावर उपचार करुन त्यांना जळगाव येथे हलविण्यात आले.

**ग्रामस्थांचा ठिय्या**

पिंप्री बुद्रुक, माळपिंप्री, पिंपळकोठा खुर्द येथील ग्रामस्थांनी महामार्गावर ठिय्या मांडुन रास्ता रोको आंदोलनास सुरुवात केली. पोलीस निरीक्षक यांच्यासह एरंडोल पोलिसांनी धाव घेत ग्रामस्थांचे म्हणणे ऐकुन घेतले. तसेच समजुत घातली. तहसिलदार यांनी योग्य ती कारवाई त्वरीत करण्यात येईल,अशी ग्वाही दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

या प्रकरणी महेंद्र साहेबराव पाटील (वय ४७,रा. पिंप्री बु.) यांच्या तक्रारीनुसार एरंडोल पोलीस ठाण्यात ट्रक चालक वकील अहमद शकील अहमद (रा. मौलवीगंज, कलंदर चौक,धुळे) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार संदीप पाटील हे तपास करीत आहेत.

# खिडकीचे ग्रील वाकवून घरात एन्ट्री; सोने-चांदीचे दागिने घेत चोरटे फरार

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,२२ ऑगस्ट**

बंद घराचा लोखंडी दरवाजा उघडला नाही. त्यामुळे चोरट्यांनी किचन रुमची ग्रील वाकविली. खिडकीचा काच उघडून घरात एन्ट्री केली. घरातील दोन रुमम धील कपाटात मुद्देमालाचा शोध घेत सोने-चांदीचे दागिने घेत चोरटे पसार झाले. बुधवारी (२० ऑगस्ट) सकाळी आठ वाजता ही घटना शांती निकेतन सोसायटी, ट्रान्सपोर्टनगरमागे उघडकीस आली.

शंकर रामचंद्र इंदाणी (वय ६९,रा.८४ ब, शांती निकेतन सोसायटी) येथे त्यांच्या पत्नी शोभा इंदानी असे वास्तव्यास आहेत. ते सेवानिवृत्त आहेत.त्यांचा मुलगा पुणे येथे वास्तव्यास आहे. त्याला मुलगी झाल्याने इंदानी दाम्पत्य घराच्या दरवाजाला कुलूप लावुन त्याच्याकडे बुधवारी (१३ ऑगस्ट) सकाळी सात वाजता येथुन रवाना झाले होते.

कुलूपबंद हेरत चोरट्यांनी या घराला लक्ष्य केले. कुलुप उघडून घराचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न विफल झाल्यानंतर चोरट्यांनी घराच्या किचन रुमच्या खिडकीचे लोखंडी ग्रिल वाकवुन घरात प्रवेश केला. घरातील डायनींग रुममधील लोखंडी कपाट तसेच बेडरुममधील दोन लाकडी कपाटाचे लॉकर तोडुन त्यातील सामान अस्तव्यस्त करुन मुद्देमालाचा शोध घेतला.

**दागिने वस्तू घेऊन पोबारा**

कपाटात ठेवलेले सोनेचांदीचे दागिने,वस्तू तसेच रोख रक्कम असा सुमारे एक लाख तीस हजार रुपयाचा मुद्देमाल घेत चोरटे पसार झाले. बुधवारी सकाळी इंदानी दाम्पत्य येथे निवासस्थानी आले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी तक्रारीनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुरुवारी (२१ ऑगस्ट) गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके हे तपास करीत आहेत.

उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावित, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड,गुन्हे शोध पथकाचे कर्मचारी यांनी घटनास्थळी जावून प्रकार जाणुन घेतला. परिसरात सीसीटीव्हीचा शोध घेऊन फ ुटेज प्राप्त करण्याच्या कामाला पोलिसांनी गती दिली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय आवारात विवाह नोंदणीनंतर फोटोसेशनची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

जिल्ह्यात सद्यस्थितीत विवाह मुहूर्त नसले तरी मिया बिबी राजी साठी नोंदणी विवाह होत आहेत. परंतु, नोंदणी विवाह करून आलेल्या बहुतांश जोडप्यांकडून जिल्हाधिकारी यांच्या वाहनतळावरच पोर्चमध्येच फोटोसेशन केले जात असल्याचे चित्र दिसून आले आहे.

जिल्ह्यात बॅडबाजा, बारात वाजतगाजत धुमधडाकयात लग्नसमारंभांचा मोसम जुलैच्या पूर्वीच संपला आहे. परंतु मंडप, वाजंत्री, मानपान, आहेर असा जास्त गाजावाजा न करता, कमी खर्चात चार ते पाच जणांच्या उपस्थितीत नोंदणी पद्धतीने विवाहांना विवाहेच्छूक तरूणाईकडून पसंती दिली जात आहे.

जळगाव जिल्हास्तरावर पाऊस असला तरी शहर रजिस्टॉर कार्यालयात आतापर्यत दर महिन्यात सरासरी २२ ते २५ विवाह नोंदणी पद्धतीने होत असल्याचे सूत्रांनी सांगीतले.

जिल्हाधिकारी कार्यालय इमारत तळमजल्यावर दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालय असून गुरूवार दुपारच्या सुमारास जिल्हाधिकारी यांच्या वाहनतळाच्या ठिकाणीच नोंदणी विवाह केलेले जोडपे पिकनिकस्पॉटप्रमाणेच त्या परिसरात तसेच ध्वजस्तंभाजवळ वा फोटोसेशनमध्ये गर्क होते.

**बेशिस्त पार्किंग कारवाई नावालाच**

तर दुसरीकडे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात लहान तसेच मोठया वाहनांसाठी विस्तीर्ण असे वाहनतळासाठी जागा आहे. याठिकाणी फक्त जिल्हाधिकारी नव्याने बदलून आल्यानंतर सुरूवातीचे काही महिने अथवा कालावधीसाठी वाहनतळाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी उभी केलेल्या वाहनांवर तोंडदेखली दिखावूपणे कारवाई केली जाते. व नंतर पुन्हा या परिसरात दुचाकी वाहनांचा गराडा जिल्हाधिकारी कार्यालय ध्वजस्तंभाच्या बागेभोवती वा उपजिल्हाधिकारी निवडणूक विभागाच्या बाजूने पडलेला दिसतो. आंदोलन निषेधकर्ते देखील त्यांची वाहने लावून युट्यूबरला मुलाखती देत एक प्रकारे रस्ता रोकोच करत असल्याचेच दिसून येत आहे.



# हद्दपार दोन गुन्हेगार ताब्यात

**जळगाव** : जळगाव जिल्ह्यातून हद्दपार केलेले दोन गुन्हेगार शहरात वावरत होते. गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. शनिपेठेतील रहिवासी तेजस दिलीप सोनवणे तसेच सागर उर्फ बीडी सुरेश सपकाळे अशी दोघांची नावे आहे.

बुधवारी (२० ऑगस्ट) संध्याकाळी पेट्रोलींग दरम्यान पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर यांना या दोघांबद्दल गोपनीय माहिती प्राप्त झाली. त्यानुसार त्यांच्यासह पथकाने खात्री केली असता दोघे संशयित त्यांच्या राहत्या घरात मिळुन आल्यानंतर ताब्यात घेतले. याप्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पो.नि. कमलाकर यांच्यासह गणेशकुमार नायकर, दीपक गजरे, शशिकांत पाटील, गणेश ढाकणे, नवजीत चौधरी, काजोल सोनवणे यांनी ही कारवाई केली.

**गावठी कट्टा बाळगताना मिळाला**

एमआयडीसी पोलीस ठाणे अंतर्गत हद्दपार स्वप्नील उर्फ गोल्या ठाकुर हा शनिपेठ पोलीस ठाणे हद्दीत डीएनसी कॉलेज परिसरात गावठी कट्टा बाळगताना मिळुन आला. त्याच्यावर शस्त्र अधिनियम कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# डांभुर्णी भागात पीक नोंदणी करणे शेतकऱ्यांसाठी ठरतेय डोकेदुखी!

## प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा**
**डांभुर्णी (ता. यावल), २२ ऑगस्ट**

परिसरात खरीप हंगामाच्या पिकांची ऑनलाइन नोंदणी करून शेतकऱ्याने ७/१२ उताऱ्यावर स्वतःच्या हाताने पिकांची नोंद करावी व 'मीच नोंदविणार माझा पीकपेरा' ही संकल्पना दोन-तीन वर्षांपासून राबवली जात आहे. मात्र, यावर्षी ऑगस्टचे २१ दिवस उलटूनही शेतातील पीक नोंदणी होत नसल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. त्यामुळे पीक नोंदणी ही शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र आहे.

शेतात वारंवार जाऊन म ोबाइलद्वारे 'ई पीक पाहणी' या ॲपद्वारे आपल्या शेतातील पीक पेरा नोंदवित असतांना अनेक अडचणी येत आहेत. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांची माहिती नोंदवली असता नोंदणीकृत गटात असताना देखील मॅपद्वारे आपण गटापासून दूर असल्याचे कळवणे, अक्षांश-रेखांश येणे, वारंवार येरर येणे, तसंतास प्रतीक्षा करावी लागणे, फोटो अपलोड न होणे अशा अनेक समस्यांनी शेतकरी ग्रासला आहे. आपला पीक पेरा लावुन घेणे म्हणजे डोकेदुखी ठरू लागले आहे.

याबाबत काही शेतकऱ्यांनी तलाठी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता जास्तीचा पदभार असल्याने तलाठी यांचे दर्शन होत नाही. तर मंडळ अधिकारी सचिन जगताप यांच्याशी संपर्क साधला असता साईट स्लो चालत असल्याचे सांगण्यात आले. तहसीलदार मोहन्माला नाझीरकर यांच्याशी शेतकऱ्यांनी संपर्क साधून पीक नोंदणी होत नसल्याची व्यथा मांडली. त्यांनी सांगितले की, मंडळ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आपण आपली समस्या त्यांना सांगावी. तसेच मी देखील याबाबत पुण्याची एन. आय. सी. च्या टीम ला माहिती पाठवीते तसेंच आपल्या व शेतकऱ्यांच्या समस्या लवकरच मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले. संपूर्ण नकाशे हे सर्व्हे ऑफ इंडियाकडून अपलोड झालेल्या मॅपमुळे शेतकऱ्यांना आपले क्षेत्र कळेनासे झाले आहे. त्याबाबत ही टीम लवकरच सुधारणा करेल असे तहसीलदार नाझीरकर यांनी सांगितले. तरी प्रशासन व पदाधिकारी यांनी याबाबत दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**
**E-TENDER NOTICE NO : 2025_DOAWB_1212194_1**
**(Supply, Installation, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery)**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Chintamani Farmer Producer Co. Ltd. At- Bhendala, Tah- Paoni, Dist-Bhandara is one of the beneficiaries under the project and inviting online bids on https://mahatenders.gov.in for above mentioned Machinery. The last date for submission of online bid is 22/09/2025 up to 01:00 PM. Any updates or notices shall be published on aforementioned website only.
District Implementation Unit, SMART Project, Dist.: Bhandara

**TENDER NOTICE**
Jalgaon Janata Sahakari Bank Ltd, Jalgaon invites bids for supply, installation and maintenance of Early Warning System (EWS) at Jalgaon Janata Sahakari Bank. Details of EWS are available on banks website www.jjsbl.com under news section.
Any Addendum/ Corrigendum including modification in the bid shall be notified only on bank's official website www.jjsbl.com in news section. Bidders should refer the same before submission of their bids. EWS proposal should be sent on itsupport@jjsbl.co.in email id.
**Extended date of submission of online bids: 31.08.2025 up to 5 PM**
Place: Jalgaon
Date: 21.08.2025
Sd/-
Deputy General Manager (IT) & CIO
**JALGAON JANATA SAHAKARI BANK LTD.,JALGAON**
(Scheduled Bank)
H.O.: 'Seva', 117/119, Navi Peth, Jalgaon- 425001 (0257) 2223699
www.jjsbl.com jjsbl_jal@jjsbl.co.in
सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।

## थोडक्यात महत्त्वाचे...



### स.ध.भावसार यांनी केला शर्व पाटीलचा गौरव

**पारोळा** : येथील शर्व अभय पाटील याने व्हीआयटी विद्यापीठाच्या एम. टेक. (संगणकशास्त्र) पदव्युत्तर परीक्षेत ८६.५० टक्के गुण मिळवून यश मिळविले. विशेष गुणवत्ता असल्याने परिसर मुलाखतीतून नामांकीत कंपनीत सेवेची संधीही मिळाली आहे. राज्य पुरस्कारप्राप्त आदर्श निवृत्त शिक्षक सदानंद धडू भावसार यांनी शर्व याचा त्याच्या निवासस्थानी जाऊन शाल, पुष्पहार, अभिनंदनपत्र, गौरवपत्र व दोनशे पन्नास रुपये रोख बक्षीस देऊन सन्मानित केले. शर्वचे वडील पत्रकार अभय पाटील, आई ज्योत्स्ना व आजी चंद्रकला यांनी भावसार यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून आभार मानले.



### डी. जी. पाटील यांचा वाढदिवस साधेपणाने

**धरणगाव** : येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, भाजपचे मार्गदर्शक डी. जी. पाटील यांचा ६६ वा वाढदिवस साधेपणाने साजरा करण्यात आला. पूर्वी ते काँग्रेस प्रदेश पातळीवरील पदाधिकारी असताना पक्षचिन्हावर विधानसभा निवडणूक लढविली होती. मात्र, त्यात पराभव झाल्यानंतरही त्यांनी सम ाजजीवनात राजकारणापलीकडे जाऊन समाजसेवा केली. मराठा समाजाचे अध्यक्ष पांडुरंग मराठे, ज्येष्ठ पत्रकार कडू महाजन यांनी डी. जी. पाटील यांचा सत्कार केला. याप्रसंगी कुणबी पाटील समाजाचे अध्यक्ष भीमराज पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील, सचिव महेश पाटील, मोहन पाटील, आनंद पाटील, पत्रकार कल्पेश महाजन आदी उपस्थित होते..



### धरणगाव महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांवर मार्गदर्शन

**धरणगाव** : येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा विभाग, वाणिज्य विभाग, आयक्यूएसी आणि युनिक ॲकॅडमी यांच्यातर्फे स्पर्धा परीक्षांविषयक मार्गदर्शन वर्ग उत्साहात पार पडला. प्राचार्य डॉ. उदय जगताप अध्यक्षस्थानी होते. मार्गदर्शक युनिक अकॅडमीचे सुनील देशमुख, नरेंद्र पाटील आदी वक्त्यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्वावर मार्गदर्शन केले. या वेळी डॉ. विजयानंद वारडे, प्रा. संदीप पालखे, डॉ. ए. डी. वळवी, डॉ.सुषमा तायडे आदी उपस्थित होते. रीना पाटील हिने सूत्रसंचालन केले. डॉ. गौरव महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. हर्षवर्धन भालेराव यांनी आभार मानले.



### पाचोऱ्यात बेटावद येथील घटनेचा निषेध

**पाचोरा** : काँग्रेसच्या येथील शाखेतर्फे जामनेर तालुक्यातील बेटावद येथील खुनाच्या घटनेचा निषेध करण्यात आला. आरोपींना तत्काळ अटक करा, या मागणीसाठी तालुकाध्यक्षांच्या नेतृत्वात प्रांताधिकाऱ्यासह पोलिस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. जामनेर तालुक्यातील बेटावद येथे वीस ते पंचवीस लोकांच्या जमावाने सुलेमान खान नावाच्या युवकास बेदम मारहाण करून त्याची हत्या केली. घटनेचा निषेध करून काँग्रेसच्या तालुकाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात निवेदन देण्यात आले. या वेळी उपविभागीय कार्यालयाचे निवासी नायब तहसीलदार रणजित पाटील, पोलिस निरीक्षक राहुल पवार यांनी निवेदन स्वीकारले. काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या निवेदनातून आपल्या भावना शासनापर्यंत आम्ही पोहोचवतो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी सामाजिक, राजकीय कार्यकर्ते उपस्थित होते.



### तिरुपती-हिस्सार एक्सप्रेसचे जल्लोषात स्वागत

**धरणगाव** : येथील रेल्वेस्थानकात खासदार स्मिता वाघ यांच्या प्रयत्नाने व धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या मागणीनुसार सुरू झालेल्या तिरुपती-हिस्सार एक्स्प्रेसला शुक्रवारी (२२ ऑगस्ट) सकाळी भाजपचे ज्येष्ठ नेते शिरीष बयस यांच्या हस्ते जल्लोषात स्वागत करून हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संजय महाजन, भाजपचे गटनेते कैलास माळी, चिटणीस सदाशिव महाजन, नारायण महाजन, प्रा. अरुण शिंदे, प्रा. एस. झेड. पाटील, प्रथम प्रवासी उदय भावे, धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांसह डॉ. हेडगेवारनगर परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी, उपाध्यक्ष रवींद्र भागवत, सचिव एस. डब्ल्यू. पाटील, सहसचिव किरण वाणी, मंडळाचे सदस्य हितेश पटेल, डॉ. मिलिंद डहाळे, आनंद बाचपाई, किरणसिंह परिहार, दिनकर पाटील, ललित येवले, सुनील चौधरी, सुशील कोठारी, सुरेश कासार, संतोष सोनवणे, राजेंद्र पडोळ, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. पंकज अमृतकर, राजेश मकवाने, सुदाम चौधरी, ॲड. हर्षल चव्हाण यांनी प्रयत्न केले.

### शेंदुर्णी येथील घटनेचा जाहीर निषेध

**नशिराबाद (जळगाव)** : शेंदुर्णी येथे महापुरुषाच्या पुतळ्याची विटंबना घटनेचा येथील बौद्ध समाजातर्फे निषेध करण्यात आला. या वेळी समाजाचे अध्यक्ष विनोद रंधे यांनी शेंदुर्णीत घडलेल्या घटनेमुळे सामाजिक अस्थिरता निर्माण झाली आहे. जो दोषी असेल, त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद करा, अशी मागणी केली. या वेळी शांताराम सोनवणे, रमेश रंधे, श्रावण बिऱ्हाडे, सतीश सावळे, आनंदा रंधे, तुषार रंधे, अनिल देवळे, प्रदीप सुरवाडे, संदीप सुरवाडे, राजू वाघ, यशवंत करडे, दीपक सोनवणे, दीपक सपकाळे, शुभम सपकाळे, किरण सोनवणे, पंकज रंधे, रतन सुरवाडे, संतोष रगडे, रवी रंधे, गणेश रंधे, अभय सपकाळे, विपुल रंधे, बौद्ध समाजाचे उपासक, उपासिका उपस्थित होत्या.

# होय, मी पक्षांतर केले नाही अन् गद्दारीही नाही

## वैशाली सूर्यवंशींचे स्पष्टीकरण; भाजपप्रवेशापूर्वी ठाकरेंची घेतली होती भेट

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, २२ ऑगस्ट**

'होय, मी पक्षांतर केले आहे; पण ही गद्दारी नाही. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सोडताना मी पळून गेले नाही, तर स्वतः 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरेंना भेटले, त्यांना माझ्या मनातील वेदना आणि निर्णयाची कल्पना दिली. त्यामुळे माझ्या भूमिकेत कोणतीही लपवाछपवी नाही. खुर्ची, पैसा किंवा वैयक्तिक फायद्यासाठी मी हा निर्णय घेतलेला नाही,' असे भाजपप्रवेश केलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या वैशाली सूर्यवंशी यांनी सांगितले.

पाचोरा-भडगाव मतदारसंघातील शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या वैशाली सूर्यवंशी यांनी अखेर भाजपमध्ये प्रवेश करून आपल्या नव्या राजकीय इनिंगची सुरुवात केली. मुंबईत झालेल्या प्रवेश सोहळ्यानंतर शुक्रवारी (२२ ऑगस्ट) येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी आपल्या निर्णयाचे स्पष्टीकरण दिले. त्यांनी स्पष्ट केले की, त्यांची खरी निष्ठा खुर्चीशी किंवा सत्तेशी नसून मतदारांशी आहे. समाजसेवा आणि विकासाचा ध्यास घेऊनच त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. मला 'पॉलिटिकल ॲक्टिव्हिझम' हवा होता. लोकसेवेचा नवा मार्ग म्हणून मी भाजपची निवड केली आहे,' असे त्या म्हणाल्या.



भाजपमध्ये प्रवेश हा कोणत्याही दबावाखाली किंवा प्रलोभनाखातीर घेतलेला निर्णय नसल्याचेही वैशाली सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले. 'आमचे सर्व व्यवहार स्वच्छ आणि पारदर्शक आहेत. आमचे कोणतेही नंबर दोनचे व्यवसाय नाहीत. त्यामुळे ईडी, सीबीआय किंवा इन्कम टॅक्सच्या भीतीने मी भाजपमध्ये गेले, हा आरोप पूर्णपणे खोटा आहे. ज्यांनी खोक्यांनी घरे भरली, टक्केवारीतून गब्बर झाले, त्यांनाच भीती वाटते. आम्ही निर्भय आहोत,' असे प्रत्युत्तर त्यांनी दिले.

आपला निर्णय हा केवळ वैयक्तिक नसून निकटवर्तीय, कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मतदार यांच्याशी चर्चा करून सामूहिक पद्धतीने घेतल्याचे त्यांनी सांगितले. 'मी कोणत्याही कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडलेले नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असून, त्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभी राहणार आहे,' असे त्यांनी सांगितले.

पक्षांतराच्या प्रक्रियेत जलसंपदामंत्री गिरीश महाजन आणि आमदार मंगेश चव्हाण यांनी दिलेला पाठिंबा मोलाचा ठरल्याचे वैशाली सूर्यवंशी यांनी नमूद केले. वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करूनच मी पक्षांतराचा निर्णय घेतला. स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनीही माझ्या विचाराला पाठिंबा दिल्याने मला आत्मविश्वास मिळाला, भाजपचा विचार हा सेवेचा, देशहिताचा आणि प्रगतीचा आहे. या व्यापक प्रवाहात मी नव्या इनिंगची सुरुवात करत आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी माजी आमदार दिलीप वाघ, सदाशिव पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस मधुकर काटे व भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.





# नशिराबादमध्ये सलग दुसऱ्या वर्षी बाळू नारखेडेंच्या बैलाने फोडला पोळा!

**सुनील महाजन**
**नशिराबाद (जळगाव), २२ ऑगस्ट**

नशिराबाद येथे अडीचशे वर्षांच्या परंपरेनुसार बैलपोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. गावाच्या पोळ्याचे विशेष म्हणजे बैलांची शर्यत लावली जाते. शर्यतीमध्ये जो बैल गाव दरवाजामध्ये प्रथम येईल, त्यास विजय घोषित करून बैलमालकास मानाचा फेटा व बैलास पुरणपोळीचा नैवेद्य देऊन सन्मानित केले जाते. यंदा सलग दुसऱ्या वर्षी बाळू नारखेडे यांच्या बैलाने पोळा फोडला.



यावर्षी पीकसंरक्षण सोसायटीचे अध्यक्ष डिगंबर जीवराम रोटे यांनी बंदुकीचा बार फोडून बैलांची शर्यत सुरुवात केली. ही बैलांची शर्यत नशिराबाद वाकी नदीच्या पलीकडे असलेल्या ऐतिहासिक कल्याण बुरुजापासून ते विठ्ठल मंदिराजवळील गाव दरवाजापर्यंत असते. याही वर्षी ही शर्यत मागील वर्षाची परंपरा राखत सलग दुसऱ्या वर्षी बाळू नारखेडे (खालची आळी माळीवाडा) यांच्या बैलाने जिंकून मान मिळविला. नागरिकांनी एकच जल्लोष केला.

सकाळी सर्जा-राजाचे पूजन, आरती करीत शेती अवजारांचे पूजन करण्यात आले. पुरणपोळीचा नैवेद्य देऊन बैलजोड्यांना भगवान शिवशंकर, हनुमान मंदिरात दर्शनासाठी नेण्यात आले. बैलांना मंदिरात नेण्याची येथील परंपरा आहे.

या वेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष लालचंद पाटील, माजी सरपंच विकास पाटील, पंकज म हाजन, किरण पाटील, विनोद रंधे, मुकुंदा रोटे, तुळशीराम येवले, चंदू पाटील, मनोज पाटील, गणेश नारखेडे, अरुण भोई, सोसायटीचे सदस्य, उत्सव समितीचे सदस्य उपस्थित होते. नशिराबाद पोलिस ठाण्यातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**शर्यत मार्गावर खड्ड्यांचा अडथळा**

बैलपोळा शर्यत मार्गावर खड्डे होते. नगरपरिषदेने आदल्या दिवशी तात्पुरती मलमपट्टी करून खड्डे बुजवले, काही ठिकाणी पसरवला नसलेला मुरूम शर्यत मार्गावर अडचणींचा ठरताना दिसून आला. त्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

# संतश्रेष्ठ सेना महाराजांचा धरणगावात पुण्यतिथी सोहळा

**धरणगाव.** येथे सकल नाभिक समाजातर्फे संत श्री सेनाजी महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध कार्यक्रमांतून महाराजांना अभिवादन करण्यात आले.

संत सेनाजी महाराज यांच्या प्रतिम ेचे पूजन महारू बोरसे निर्मला बोरसे, विजय बोरसे, गायत्री बोरसे यांच्यासह बोरसे, फुलपगार, निकम, झुंजारराव, इंगळे गायकवाड, वारुडे, सोनवणे आदी परिवाराकडून करण्यात आले. या प्रसंगी शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रतापराव पाटील, लोकनियुक्त माजी नगराध्यक्ष नीलेश चौधरी, नगरसेवक कैलास म ाळी, वासुदेव चौधरी, विजय महाजन, भागवत चौधरी, ज्येष्ठ पत्रकार भरत चौधरी, चर्मकार समाज राष्ट्रीय अध्यक्ष भानुदास विसावे, अभिजित पाटील, विलास माळी, पत्रकार विनोद रोकडे या मान्यवरांनी सेनाजी महाराज यांना अभिवादन केले. तसेच महारू नागो बोरसे बांभोरी यांच्यातर्फे महाप्रसादाचे वितरण करण्यात आले होते. कमलेश बोरसे, गोपाल फुलपगार, सतीश बोरसे, राजेंद्र फुलपगार, अनंत फुलपगार, प्रशांत फुलपगार, रवींद्र निकम, दिगंबर निकम, आबा फुलपगार, मनोज निकम, हेमंत फुलपगार, अशोक झुंजारराव, गणेश झुंजारराव, न्यानेश्वर झुंजारराव, दीपक झुंजारराव, संजय झुंजारराव, बापू झुंजारराव, महेश निकम, प्रभाकर बोरसे, मोहन फुलपगार, विनोद झुंजारराव, दिनेश बोरसे, बापूजी फ ुलपगार, सुभाष बोरसे, गणेश निकम, भूषण वारुळे, आबा झुंजारराव, राजेंद्र फुलपगार, रवींद्र फुलपगार, राजेंद्र बोरसे, गजानन फुलपगार, सुपडू झुंजारराव, गणेश गायकवाड, अमोल महाले, तापीराम इंगळे, रामचंद कुवर, पांडुरंग कुवर, किरण गायकवाड, अनिल निकम, मनोहर निकम, विजय निकम, अमोल निकम, प्रकाश गायकवाड यांच्यासह माता भगिनी उपस्थित होते.



# ध्येयावर लक्ष केंद्रित करा, यश निश्चित -डॉ. सुरेश पाटील

## पारोळ्यात मार्गदर्शनपर कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, २२ ऑगस्ट**

पाहिलेले स्वप्न पूर्ण होतात. फक्त स्वतःवर विश्वास ठेवा, ध्येय ठरवा आणि त्यावर लक्ष केंद्रित करा, यश निश्चित मिळेल, असा आशावाद श्रद्धा हौस्पिटलचे संचालक डॉ. सुरेश पाटील यांनी व्यक्त केला.



येथील प्रवक्ता ॲकॅडमीतर्फे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम गुरुवारी झाला, त्या वेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्रारंभी वृक्षाला जल अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. व्यासपीठावर ॲकॅडमीचे संस्थापक रवींद्र पाटील उपस्थित होते. डॉ. पाटील म्हणाले की, मोठी स्वप्ने पाहा आणि ती सत्यात उतरविण्यासाठी मेहनत घ्या. जिद्द, चिकाटी, अविचल ध्येय ही त्रिसूत्री यशाचा मार्ग सुकर करते. म्हणून स्वतःवर विश्वास ठेवा. पाहिलेली स्वप्ने साकार होतात. फक्त स्वतःला झोकून द्या, यश निश्चित मिळेल, असा सल्लाही त्यांनी दिला.

विद्यार्थ्यांसह पालकांनी प्रश्न विचारले. त्यावर डॉ. पाटील यांनी समर्पक उत्तरे देऊन शंकांचे निरसन केले. या वेळी संचालिका रूपाली पाटील यांच्यासह विद्यार्थी- पालक उपस्थित होते. जान्हवी पाटील, प्रद्युम्न पवार यांनी सूत्रसंचालन केले.

# उत्राण गु. ह.मधील २०० विद्यार्थ्यांना मोफत अपघाती विम्याचे संरक्षण

**एरंडोल** : तालुक्यातील उत्राण गु. ह. येथील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील २०० विद्यार्थ्यांना महा-एनजीओ डेव्हलपमेंट असोसिएशनच्या राष्ट्रीय विद्यार्थी सुरक्षा योजनेंतर्गत एक लाखाचे अपघाती विमा कवच मोफत काढून देण्यात आले.

हा उपक्रम जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर आमले यांच्या सौजन्याने शिवकमल शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून साकारण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अमोल महाजन आणि संचालक विलास महाजन यांनी विशेष प्रयत्न करून विद्यार्थ्यांना संरक्षण कवच मिळवून दिले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्टला गावातील मान्यवरांच्या हस्ते विमा प्रमाणपत्रांचे औपचारिक वितरण करण्यात आले. उपसरपंच वाल्मीक ठाकरे अध्यक्षस्थानी होते. या वेळी माजी सरपंच राजेंद्र पाटील, माजी उपसरपंच योगेश महाजन, ग्रामपंचायतीचे सदस्य जितेंद्र महाले, हरीश पांडे, दिनेश सोनवणे यांच्यासह पीक संरक्षण संस्थेचे चेअरमन रघुनाथ कुंभार, पत्रकार प्रकाश कुवर, पोलिसपाटील राहुल महाजन, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विकास कोळी, मुख्याध्यापक बळीराम सैंदाणे, माजी अध्यक्ष राजेंद्र मिस्त्री, सामाजिक कार्यकर्ते मनोहर खेडकर, वैभव महाजन, जय मोरे आदी उपस्थित होते.



# धावत्या रेल्वेत गुंगीचे औषध देऊन लुटले; तिघे बेशुद्ध

## अमळनेर आरपीएफच्या सतर्कतेने पंजाबच्या सराईत गुन्हेगार जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, २२ ऑगस्ट**

धावत्या रेल्वेमध्ये तिघांना गुंगीचे औषध देऊन त्यांच्या साहित्याची लूटमार करून पळून जाणाऱ्या पंजाबच्या सराईत गुन्हेगारास अमळनेरच्या आरपीएफचे अधिकारी कुलभूषणसिंग चौहान यांच्या तत्परतेने अटक करण्यात आली. दरम्यान, तिघेही प्रवासी अद्याप बेशुद्धावस्थेत आहेत. ही घटना बुधवारी पहाटे घडली.

अहमदाबाद- हावडा एक्स्प्रेसमध्ये नवापूर शहराजवळ पंजाबमधील प्रवासी तिघांना काहीतरी पेय देत असल्याचे म हिलेने पाहिले. काही वेळात तिघेही बेशुद्ध झाले आणि त्या व्यक्तीने त्यांच्याजवळील साहित्य, बॅगा, पैसे काढून घेतले. महिला घाबरल्याने तिने कोणालाच सांगितले नाही. नवापूरहून गाडी निघताच तो संशयित सर्व चोरलेले साहित्य घेऊन धावत्या रेल्वेत उतरून गेला. महिलेने ही घटना जितेंद्र पाटील यांना सांगितली. त्यांनी अमळनेरच्या आरपीएफचे अधिकारी कुलभूषणसिंग चौहान यांना कळविले. संशयित रस्त्यात उतरला म्हणजे तो परत सुरतकडे जाण्याचा प्रयत्न करेल आणि एकमेव मेमू गाडी आहे. म्हणून वरिष्ठ अधिकारी पोलिस निरीक्षक सत्यजित कुमार, नंदुरबार पोलिस निरीक्षक बसंतराय यांना कळवले. त्यांनी तातडीने उधना येथील पोलिस निरीक्षक दौलतसिंग शिसोदिया यांना घटना सांगितली. त्यांनी उधना स्थानकात तगडा बंदोबस्त लावला. भुसावळहून सुरत जाणारी मेमू गाडी सकाळी नऊला उधना येथे पोहोचताच पोलिसांनी गाडी तपासणी सुरू केली. त्यात एकमेव पंजाबमधील तो व्यक्ती तीन बॅग घेऊन जात असल्याचे दिसताच त्याच्यावर झडप घातली. पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने त्याचे नाव निशांतसिंग (रा. गुरुदासपूर, पंजाब) असे सांगितले. संशयिताने रस्त्यात आपले कपडे बदलवून घेतले होते. त्याच्याजवळून सात हजार रुपये, पाच मोबाइल, गुंगीचे औषध व इतर साहित्य जप्त करण्यात आले. निशांतसिंग हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे समजले.

दरम्यान इकडे सकाळी ९ वाजून २० मिनिटांनी अहमदाबाद हावडा एक्स्प्रेस अम ळनेर स्टेशनवर आली असता हेडकॉन्स्टेबल सुनीलकुमार, राकेशकुमार, राजुराम यांनी तिघा बेशुद्ध व्यक्तींना उतरवून ग्रामीण रुग्णालयात नेले. डॉ. आशिष पाटील, डॉ. जी. एम. पाटील यांनी प्राथमिक उपचार केले. गुंगीचे नेमके कोणते औषध दिले याची माहिती काढण्यासाठी धुळे येथील शासकीय हिरे वैद्यकीय महाविद्यालयात तिघांना रवाना केले. तिघे बेशुद्ध असल्याने त्यांची नावे अद्याप कळालेली नाहीत. त्यांच्या भाषेवरून ते कोलकाता येथील असल्याचे प्रवाशांनी सांगितले.

# जिल्हाभरात लम्पी साथरोग नियंत्रणात

## साधेपणाने बैलपूजन करीत सण साजरा करा- जिल्हा प्रशासन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २२ ऑगस्ट**

जुलै २०२५ च्या पुर्वार्धात गोवंशीय पशुधनावर सुरूवातीला तीन तालुक्यात व त्यानंतर संपूर्ण जळगाव जिल्ह्यात लम्पीचा प्रादूर्भाव झाला होता. पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार संसर्ग बाधित केंद्राच्या पाच किलोमीटर परिसरात गोवंशीय पशुधनास गोट पॉक्स, लम्पी प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम राबविण्यात आल्यामुळे लम्पी साथरोग नियंत्रणात असल्याचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ, प्रदीप झोड यांनी म्हटले आहे.

असे असले तरी लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव निरोगी पशुधनास होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शुक्रवार दि.२२ ऑगस्ट रोजीच्या पोळा सणादरम्यान गोवंशांच्या मिरवणुका टाळून, घरगुती पद्धतीनेच आपापल्या घरीच बैलपूजन करीत साजरा करावा, असे आदेश जिल्हा प्रशासनाने काढले आहेत.

### दिरंगाई आढळल्यास दंडात्मक कारवाई

लम्पी साथरोग हा अधिसूचित रोग असल्यामुळे प्रादुर्भाव नियंत्रणासाठी शासकीय, निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून कार्यवाही दिरंगाई किंवा अडथळा आढळल्यास प्राण्यांमधील संक्रमण आणि सांसर्गीक रोग प्रतिबंध तथा नियंत्रण अधिनियम २००९ मधील कलम ३१, ३२ आणि ३३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

**सद्यस्थितीत १२४ संसर्ग बाधीत केंद्र**

जुलै महिन्याच्या पूर्वाधात एरंडोल तालुक्यात व नंतर जिल्ह्याच्या १५ तालुक्यात गोवंशीय पशुधनावर लम्पी चर्मरोगाचे संक्रमणाने विळखा घातला होता. संपूर्ण जिल्हाभरात १२४ संसर्गबाधीत केंद्र प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत आहेत.

**बाराशेहून अधिक पशुधन उपचारांअंती बरे**

लम्पीमुळे २ हजाराहून अधिक गोवंश बाधीत झाले आहेत. सद्यस्थितीत १ हजार ८३९ पशुधनावर उपचार सुरू असून आतापर्यंत १ हजार २२० पशुधन पूर्णपणे बरे झाले आहेत.

**बरे होण्याचे प्रमाण ६६ टक्के**

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद प्रशासनांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर गोठा स्वच्छता मोहीम, औषधी फवारणीसह पशुधनाचे लसीकरण व सुश्रुषा उपचारांमुळे बाधीत पशुधनाचे बरे होण्याचे प्रमाण ६६ टक्के पर्यंत पोचले आहे. याशिवाय ५४७ सक्रिय संसर्ग बाधीत पशुधन आहे.

**मृत्यूचे प्रमाण ३.९ टक्के**

संसर्गबाधेमुळे आतापर्यंत ७२ पशुधनाचा मृत्यू झाला असून मृत्यूचे प्रमाण सरासरी ३.९ टक्के असल्याचे पशुसंवर्धन विभाग अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

**ग्रामविकास अधिकारी, तलाठी, पशुपालकांनी दक्षता घ्यावी,**

जिल्ह्यात शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा सण साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर गोवंश एकत्रीत आणून मिरवणूक किंवा शर्यती लावून काढत साजरा केल्यास लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे गुरांचे बाजार, शर्यती, जत्रा, प्रदर्शने भरविण्यासही प्रतिबंध घालण्यात आले आहेत. सर्व शेतकरी, पशुपालकांनी साध्या पद्धतीने पोळा सण साजरा करण्याची दक्षता घ्यावी, ग्रामस्थांचे समुपदेशन करावे. अशा सूचना सर्व संबंधित विभागांसह ग्रामविकास अधिकारी, तलाठी यांनी लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचेही जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.



### पशुधन सुरक्षिततेची काळजी घेऊन सण साजरा करा

जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागाकडून लम्पी साथरोग नियंत्रणात आला असून प्रशासन आणि शेतकरी पशुपालकांसह सर्वांच्या सहभागातूनच लम्पीचा संसर्ग रोखणे ही सामूहिक जबाबदारी आहे. यातून पशुधनाचे आरोग्य जपले जाईल. त्यानुसार गोवंशाचे पूजन करीत मिरवणूक न काढता पोळा हा सण घरगुती वातावरणात, सुरक्षिततेची काळजी घेऊन साजरा करावा.

**-आयुष प्रसाद**
**जिल्हाधिकारी जळगाव**






# यावे गणराय

## गणपतीची अनेकविध रूपं

सध्या अवघे समाजमन गणेशोत्सवाच्या तयारीत गर्क आहे. लवकरच नेहमीच्या उत्साहात गणेशाचे आगमन होईल. मात्र पूजा करताना ही देवता नेमकी कोण आहे, कालौघात तिची ओळख, स्वरूप कसे बदलत गेले, पुराणे याबद्दल काय सांगतात हे जाणून घेण्याजोगे आहे. गणपतीबाबतही अनेक संशोधकांनी संशोधन केले असून बरीच माहिती समोर आली आहे. त्या अनुषंगाने घेतलेला वेध...

**डॉ. अंबरीष खरे**
ज्येष्ठ अभ्यासक

गणेशाच्या स्वागताची तयारी जवळपास पूर्ण झाली असून भाविक आतुरतेने आपल्या लाडक्या देवतेची वाट बघत आहेत. लवकरच हा आनंदोत्सव सुरू होईल आणि वातावरण भारून जाईल. श्री गणेश हा विघ्नहर्ता, सुखकर्ता आहे. या स्वरूपातच आपण गणेशाचा विचार करतो. परंतु इतिहासाच्या कवाडांमधून याकडे बघता; गणपतीसंदर्भातील आख्यायिका, उपलब्ध असणारी पुराणे, कथा यातून समोर येणाऱ्या माहितीनुसार ही देवता मुळात विघ्नांचा राजा असणाऱ्या 'विघ्नराज' या स्वरूपाची आहे. 'विघ्नेश्वर' हे गणपतीचे नाव सगळीकडे आलेले दिसते. शिव-पार्वतीच्या या मुलाकडे विघ्नांचे आधिपत्य दिले होते. अर्थातच यामुळे तो विघ्नांचा स्वामी झाला. असे असताना विघ्नांपासून स्वत:चा बचाव करायचा असेल तर गणेशाची प्रार्थना केली पाहिजे आणि विघ्न आणणे तसेच दूर करणे या गोष्टी त्याच्या अधीन आहेत, हे ओळखून सेवा केल्यास तो तुम्हाला साह्य करू शकतो, हा विचार पुढे आला आणि त्याची उपासना सुरू झाली.

'विनायक' हे गणपतीचे नाव अनेकदा वापरलेले दिसते. हा देखील अधिपती असणारा एक देव असून आज आपण त्याला गणेश स्वरूपातच बघतो. पण उत्तर-वैदिक साहित्याच्या उत्पत्तिकाळात, साहित्यग्रंथ तयार होताना मानवगृह्यसूत्र, अथर्ववेदीय शान्तिकल्प यासारख्या ग्रंथांमध्ये आपल्याला चार विनायकांचे वर्णन सापडते. यावरूनच विनायक ही एकच देवता नसल्याचेही समजते. हे विनायक लोकांना ग्रासू शकत असत. झपाटू शकत असत. एखाद्याच्या मागे संकटांचा ससेमिरा लावण्याची, अहित करण्याची, मानसिक अशांती निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. म्हणजेच यांच्या प्रभावाने विद्यार्थ्यांचा विद्याभ्यास होणार नाही, वाण्याचा व्यवसाय होणार नाही, अध्यापकाला आचार्यपद मिळणार नाही असे वर्णन सापडते. अशा प्रकारे झपाटले गेलेल्या व्यक्तीला विचित्र स्वप्ने पडणे, मुंडण केलेले वा जटा वाढवलेले लोक स्वप्नात दिसणे, रस्त्यावर जाताना आपल्या पाठीमागे कोणी तरी येत असल्याचा भास होणे अशी काही लक्षणे दिसतात, अशी माहिती ग्रंथांमध्ये सांगितली आहे.

एखाद्याबाबत असे होत असेल तर त्याला विनायकाने झपाटले असल्याचे समजावे, असे या प्राचीन ग्रंथांमध्ये सांगितले आहे आणि यातून बाहेर पडण्यासाठी विनायकांची शांती करण्याचे सूचित केले आहे. इथे विनायकांना स्नान घालण्याचा म्हणजेच 'विनायक स्नपन' या नावाचा विधीही सांगितला आहे. यात त्यांची स्थापना करून पूजन करणे, विविध प्रकारचे नैवेद्य दाखवणे, अग्नी प्रज्वलित करून त्यात आहुती देणे असा पूजाविधी सांगण्यात आला असून हे केल्यास विनायक प्रसन्न होतात आणि त्रास देत नाहीत, असे सांगत आश्वस्त करण्यात आले आहे. या चार विनायकांची नावे शालकटंकट, कूष्माण्डराजपुत्र, उस्मित आणि देवयजन अशी आहेत.

वेदांमधील 'गणानां त्वा गणपतिं हवामहे' ही एक प्रसिद्ध ऋचा आपल्याला माहिती आहे. याच ऋचेमध्ये 'ज्येष्ठराज' असा एक शब्द येतो. यावरून 'ज्येष्ठा' नावाच्या देवतेचा प्रमुख वा तिच्याशी संबंधित असणारा असा हा गणपती आहे का, असा प्रश्न संशोधकांनी उपस्थित केला आहे. 'ज्येष्ठा'चा अर्थ थोरली किंवा मोठी. ज्येष्ठा गौरी आपल्याला माहीत आहे, ती अलक्ष्मीचे प्रतीक म्हणून. लक्ष्मी असते तेथे अलक्ष्मी नसते, हेही आपण जाणतो. आजही गावांमध्ये 'अक्काबाईचा फेरा आला' अशा पद्धतीचे शब्दप्रयोग असतात. ही अक्काबाई म्हणजे अलक्ष्मी असते. म्हणजेच अलक्ष्मी येते आणि तुमच्याकडील सगळे धनधान्य, संपत्ती, आरोग्य घेऊन जाते, अशी एक कल्पना आपल्याकडे दिसते. 'ज्येष्ठा' अशी असेल तर विनायकाशी तिचा संबंध असण्याचा विचार सुसंगत वाटतो. थोडक्यात, या त्रासदायक देवता आहेत, पण पूजा केली तर त्यांचा लोभ राहतो आणि तुमचे कल्याण होते, त्रास होत नाही अशा स्वरूपाचा विचार वा देवतांचे (पान २ वर)

# विचार-संस्कृतीचा जागर हाच आमचा उत्सव : धनंजय बापट



श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचा यंदा अमृत महोत्सव (७५ वर्षे) आणि दैनिक तरुण भारतची शताब्दी (१०० वे वर्ष) आहे. यानिमित्त 'तरुण भारत'च्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. एरवी अनेक संस्था आपल्या वर्धापन दिनी मनोरंजनपर कार्यक्रम आयोजित करतात. 'तरुण भारत'ने मात्र संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात आलेल्या शताब्दी महोत्सवाला वैचारिक, सांस्कृतिक व सामाजिक जाणिवेचा नवा आयाम दिला आहे. 'बीज अंकुरे अंकुरे' आणि 'तुळस लावा, पर्यावरण वाचवा' अशी प्रचंड यशस्वी झालेली अभियाने या वर्षात आणखी पुढे जाणार आहेत आणि समाजातील सर्व थरांना सोबत घेऊन पर्यावरण रक्षणाचे मोठे कार्य त्यातून उभे राहणार आहे. या विषयावर दैनिक तरुण भारतचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. धनंजय बापट** यांची सोनाली ठेंगडी यांनी मुलाखतीच्या स्वरूपात साधलेला हा मनमोकळा संवाद...



तरुण भारत १०० वर्ष शताब्दीचे


**● शतक महोत्सवी वर्षात असलेल्या दैनिक तरुण भारतच्या आतापर्यंतच्या प्रवासाकडे आपण कसे पाहता?**

**उत्तर -** दैनिक तरुण भारत गेल्या १०० वर्षांपासून अविरत सुरू असलेले मराठीतील एकमेव विचारपत्र आहे. अनेक विचारपत्रे स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही होती. जवळजवळ २००० सालापर्यंत त्यातील अनेक तगली. त्यानंतर मात्र त्यातील बहुतांश विचारपत्रे बंद पडली. त्यामागील कारणे नेतृत्वाचा अभाव, आर्थिक अडचणी आणि वैचारिक भूमिकेतील सुस्पष्टतेचा अभाव इत्यादी होती. दै. तरुण भारतने मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी वैचारिक बांधिलकी कायम राखून आणि व्यवस्थापन, व्यावसायिक दृष्टिकोन आणि काळानुसार बदलांचा स्वीकार करून आपल्या अस्तित्वाची प्रासंगिकता, उपयोगिता आणि औचित्य टिकवून ठेवली. दै. तरुण भारतचे संचालन करणारे व्यवस्थापनातील लोक आणि संपादक बदलत राहिले. मात्र, विचारांचा गाभा तोच राहिला. ध्येय तेच राहिले. मात्र, संघाच्या विचारधारेशी जोडलेले हे विचारपत्र असले, तरी ते केवळ संघाच्या कार्यक्रमांच्या बातम्या देणारे मुखपत्र होऊ नये, ही पूजनीय बाळासाहेबांची इच्छा होती. त्यामुळेच तरुण भारताने बातम्यांच्या बाबतीत सर्वसमावेशकता, वस्तुनिष्ठता आणि विश्वासार्हता या तीन मूल्यांचा आग्रह कायम जोपासला. परिणामी तरुण भारतची वैचारिक बांधिलकी पक्की राहिली. योगायोगाने यंदा संघाचेही शताब्दी वर्ष आहे. शतकभरापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली व त्याच काळात तरुण भारतही साप्ताहिक स्वरुपात सुरू झाला. संघाच्या स्थापनेचा उद्देश हिंदू समाजाला संघटित आणि बलिष्ठ करणे व त्यायोगे समृद्ध, संपन्न आणि बलवान राष्ट्राचे निर्माण करणे हा होता. आद्य सरसंघचालक प. पू. डॉ. हेडगेवारांचे ते स्वप्न होते. त्यातूनच संघाचा उदय झाला. तत्कालीन साप्ताहिक तरुण भारतची स्थापना बॅरिस्टर अभ्यंकरांनी, त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून केली. ते आरंभी साप्ताहिक होते. काही दिवस नियतकालिकासारखे चालत राहिले. अधे-मधे बंदही राहिले. मात्र, त्यांनी तरुण भारताच्या प्रयोगात सातत्य ठेवले. १९४४ साली भाऊसाहेब माडखोलकरांच्या संपादकीय नेतृत्वात स्वरूपात तरुण भारतला नियमित दैनिकाचे स्वरूप मिळाले. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर तरुण भारतवर संकट आले होते. त्याला तोंड देऊन तरुण भारत टिकला. तोवर देश स्वतंत्र झाला होता. त्याचवेळी राष्ट्रप्रेमी विचारधारेच्या लोकांनी प. पू. बाळासाहेब देवरस यांनी पुढाकार घेऊन श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेची स्थापना करून तरुण भारतचे संचालन सुरू केले. याच काळात रा. स्व. संघाचा विस्तार सुरू होता. अगदी लाहोरमध्येसुद्धा शाखा भरत होती. संघविचार सर्वत्र पोहोचविण्याच्या उद्देशाने १९४९ साली श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेची स्थापना झाली. यंदा त्या संस्थेचा अमृत महोत्सव आणि तरुण भारतची शताब्दी आहे. यंदा संघाच्या शताब्दीनिमित्त माननीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी पंचसूत्री दिली आहे. या पंचसूत्रीमध्ये जे पाच मुद्दे आहेत, त्यात कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, नागरी कर्तव्य, पर्यावरण रक्षण आणि स्व यांचा समावेश आहे. या पंचसूत्रीला धरूनच दैनिक तरुण भारतने आपल्या शताब्दी महोत्सवातील कार्यक्रमांची आखणी केली आहे. आमची राष्ट्रीय विचारधारेशी असलेली बांधिलकी या माध्यमातून नव्याने अधोरेखित करीत आहोत. शिवाय, समस्त समाजाचे कल्याण साधण्यासाठी आवश्यक असलेली पंचसूत्री पुढे नेण्यात आम्हाला खारीचा वाटा उचलता येत असल्याचा आनंदही या उत्सवी वर्षात व्यक्त करीत आहोत.



**● आजच्या काळात वृत्तपत्र टिकण्यासाठी 'व्यावसायिकता' (प्रोफेशनॅलिज्म्) गरजेची आहे. पण त्याच वेळी 'वैचारिक प्रतिबद्धता' जपण्याचाही तुम्ही प्रयत्न कसा करता?**

**उत्तर -** खरे तर वृत्तपत्र हे फक्त माहिती देणारे माध्यम न राहता आपली राष्ट्रीय ओळख जपणारे आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध करणारे शक्तिशाली साधन आहे, हीच आमची धारणा आहे आणि हेच आमचे प्रयोजनही आहे. तरुण भारतचे अग्रलेख, संपादकीय पानावरील अन्य लेख, पुरवण्या या सर्वांची रचना/नियोजन वाचकांना सांस्कृतिक दृष्टीने समृद्ध करणारे असते. तसेच बातमी देताना सकारात्मकता आणि नैतिक मूल्यांची जाणीव ठेवली जाते. भडकपणा, उथळपणा, सवंगपणा येणार नाही, याची काळजी घेतली जाते. एखाद्या कुटुंबासमोर कोणती सामग्री जावी, याचे भान ठेवले जाते. बलात्कार, हिंसा, द्वेष, विघटनकारी विचार अशा बाबतीत संयम बाळगून बातम्यांची मांडणी केली जाते. पर्यावरण, कुटुंब प्रबोधन, समरसता, स्वदेशी, सद्भाव हे विषय अग्रक्रमाने घेतले जातात. सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे 'बौद्धिक प्रशिक्षण' व्हावे, असे साहित्य देण्याचा आमचा प्रयत्न असतो. वृत्तपत्र छापणे व वितरण करणे, हे खर्चिक असते. त्यामुळे वाचकांपर्यंत पोहोचण्याकरिता तरुण भारत यशस्वीपणे डिजिटल प्लॅटफॉर्मचा उपयोग करीत आहे. वेबसाईट, ई-पेपरच्या माध्यमातून तरुण भारत देश-विदेशांतील हजारो वाचकांपर्यंत पोहोचला आहे.



**● विचारपत्र आणि व्यावसायिक वृत्तपत्र असे संतुलन साधताना कधी-कधी द्विधा मन:स्थितीचा सामना करावा लागतो काय?**

**उत्तर -** आमची भूमिका स्पष्ट असणे हेच आमच्या यशाचे व सातत्याचे खरे अधिष्ठान आहे. आधी सांगितल्याप्रमाणे तरुण भारत हे आधीपासूनच एक विचारपत्र राहिले आहे. आम्ही एक विशिष्ट विचारधाराच नव्हे, तर एक सामाजिक, कौटुंबिक संस्कार घेऊन चालत आलोय्. माध्यमांनी वाचकांच्या सवयी बिघडविल्या. आज अनेक लोकांना 'व्यभिचार' वाचायला आवडू लागलाय, याची खंत आम्हाला वाटते. त्यामुळेच अनेक वृत्तपत्रे अनाचार, अत्याचार, व्यभिचारादि अनिष्टांचे कळत-नकळत गुणगाण करणारा मजकूर भरभरून देतात. आम्ही आम्ही 'व्यभिचार' नव्हे तर 'विचार' देतो, 'विकृती' नव्हे तर 'संस्कृती'चे गुणगान करतो. ते करतानाच लोकांची अभिरुची घडविणे, समाजाला सुसंस्कृत बनवणे, प्रबोधन करणे ही देखील वृत्तपत्रांची जबाबदारी आहेच. ती जबाबदारी आम्ही शतकभर निगुतीने पार पाडली. अनेक लोक तरुण भारत न वाचण्याचे कारण अन्य वृत्तपत्र स्वस्तात मिळणे हे असल्याचे सांगतात. अमूक वर्तमानपत्रापेक्षा तरुण भारत एक रुपयाने महाग आहे, असेही आम्हाला सांगितले जाते. पण, हा एक रुपयाचा फरक आम्ही वैचारिक संपन्नतेत पाहतो. दैनिकाच्या धबडग्यात राबताना आणि उदात्त विचार-संस्कृतीसंबंधीच्या प्रबोधनाचा प्रवाह अखंडित ठेवताना आम्ही उच्च जीवनमूल्ये देतो, दर्जेदार साहित्य देतो, विविधांगी लेखन देतो म्हणून आमचे मूल्य (किंमत नव्हे) अधिक आहे. मात्र, व्यावसायिकतेत तरुण भारत तसूभरही मागे पडलेला नाही. आपल्या घरात नवीन पिढीसाठी उच्च आदर्श मूल्ये आणायची की, त्यांच्यावर अनाचार-व्यभिचाराचे संस्कार होऊ द्यायचे, हे घरातील पालकांनी आणि थोरामोठ्यांनी ठरवायचे (पान २ वर)

### मोठ्या प्रमाणात व्हावेत सामूहिक तुळशी विवाह

तुळशी रोपणाच्या उदंड यशानंतर मोठ्या प्रमाणातील सामूहिक तुळशी विवाह (२ ते ५ नोव्हेंबर २०२५ या काळात होणारे सोहळे) हे तरुण भारतचे उपक्रमाच्या रूपातील नवे ध्येय राहणार आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आम्ही कामाला लागलो आहोत. यातही नागरिकांच्या दणदणीत प्रतिसादाची प्रतीक्षा आहे.

### सामाजिक समरसतेचा अध्याय

पक्षीय, धार्मिक, जातीय, वय, लिंग, आर्थिक गट असा कोणताही भेद न ठेवता तुळस रोपण मोहिमेत प्रत्येक समाज घटकाने आपला वाटा उचलला, याबद्दल आम्हाला कृतज्ञता वाटते. धार्मिकतेकडून सामाजिक एकरूपतेकडे नेणारा तुळस रोपण हा उपक्रम खऱ्या अर्थाने सामाजिक समरसतेचा अध्याय झाला आहे.

### लोकसहभागामुळे साकारली लोकचळवळ

दैनिक तरुण भारतच्या चमूने आपल्या अथक प्रयत्नांनी विदर्भात तब्बल १६०० ठिकाणी ५० हजारांहून अधिक तुळस रोपांची लागवड केली आहे. तरुण भारतमधील प्रत्येक कर्मचाऱ्याने किमान १०० तुळशीची रोपे लावली आणि त्यांचे वाटप केले. लोकसहभागामुळे या उपक्रमाचे रूपांतर लोकचळवळीत झाले आहे.



## सिनेसृष्टी

रमेश विनायक पोफळी
७७७५९००८२४



# चित्रपटात अर्धशास्त्रीय नृत्याभिनयाचा आविष्कार
# वैजयंतीमाला

'दुनिया का मजा ले लो दुनिया तुम्हारी है ।'

१९५१ सालच्या हिंदीतील पहिल्याच 'बहार' चित्रपटात वैजयंतीमाला हातात डफ घेऊन नाचत येऊन सामूहिक नृत्य सहज व स्वच्छंद मुरलेल्या अभिनेत्रीसारखे सादर करतात. 'हैऽऽ' अशी नटखट शीळ घालून 'दुनियाका मजा ले लो-' सुरू होते.

'सैया दिल में आना रे आकर फिर ना जाना रे'

अवघ्या १५-१६ वर्षांची शोडषी वैजयंतीमाला प्रेमात उगवलेल्या अंकुराने आनंदात नायकाचा फोटो समोर ठेवून नृत्याभिनयात वरील गाणे म्हणते. उमललेल्या कळीसारखे टवटवीत सौंदर्य व अल्लड अदाकारीने प्रसंग दिलखेचक होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नव्या युगाची प्रथम शास्त्रीय नृत्यांगना नायिका अभिनेत्री म्हणून वैजयंतीमाला याच आहेत. या अभिनेत्रीने पहिल्याच चित्रपटापासून इंडस्ट्रीतील समस्त निर्माते निर्देशक यांचे लक्ष ओढवून घेतले. १९५४ सालच्या 'नागीन' चित्रपटातील त्यांच्या सज्जड अभिनयाने व हेमंतकुमार यांच्या मधुर संगीताने त्या आधीचे सर्व रेकॉर्ड मोडीत काढले.

'मन डोले मेरा तन डोले...' क्ले-व्हायोलिनवर कल्याणजींनी वाजविलेल्या या गाण्यात सपेरा स्त्रीच्या पेहरावात खांद्यावर तिराचा भाता घेऊन वैजयंतीमाला यांचा प्रवेश नागीण नृत्याच्या पदन्यासासह होतो. दुसऱ्या अंतऱ्यात दोन्ही हात वर करून बोटे जुळवून हातांच्या मधून टाकलेला मोहक कटाक्ष विलोभनीय वाटतो. बिन वाजवीत उभे असलेल्या नायकाजवळ येऊन डोळे मिटून तल्लीन होऊन डोलण्याचा उत्तुंग अभिनय साकारतात.

'मेरा दिल ये पुकारे आजा । मेरे गमके सहारे आजा'

वरील गाण्यातील आर्त आस नागीण चित्रपटात वैजयंतीमाला यांना लागली असते. मदभऱ्या पावसाळी वातावरणाचा मजा प्रियकराशिवाय अधुरा आहे.

'तू नहीं तो, ये ऋतू, ये हवा, क्या करु क्या करु'

अशी नैराश्यवत अगतिकता ती प्रकट करते.

'तेरे मन की गंगा और मेरे मन की जमुना का
बोल राधा बोल ये संगम होगा की नही'

ओढ्यातून झरणाऱ्या पाण्यातील प्रवाहात वैजयंतीमालांनी स्विमिंग वेशात पोहत पोहत आपल्या नशिल्या अंदाजात 'संगम' चित्रपटातील हा गाण्यातील प्रसंग अभिनित केला आहे. हा प्रसंग व 'बुड्ढा मिल गया' गाण्यातील प्रसंग सिनेमाचे आकर्षण ठरले होते.

'औरत ने जनम दिया मरदो का ।
मरदोने उसे बाजार दिया
जब जी चाहा मछला कुचला ।
जब जी चाहा धुत्कार दिया'

वैजयंतीमाला या दिग्गज अभिनेत्रीचा खऱ्या अर्थी 'साधना' चित्रपटात अभिनयाचा कस लागला. वेश्येच्या भूमिकेत पुरुष जातीने केलेले शोषण चपखल अभिनयात प्रदर्शित करून कसोटीत उतरल्या. स्त्रीचे शोषण केल्यावर जगण्यासाठी दिलेल्या रोटीचा तुकडादेखील उपकार म्हणून देण्यात येतो.

'जिसे तू कबूल करले । वो दवा कहांसे लावू'

शरदचंद्र यांच्या कथेवर आधारित 'देवदास' चित्रपटात चंद्रमुखीच्या भूमिकेत आपले संपूर्ण अभिनय कौशल्य पणास लावले. वैफल्याने ग्रासलेल्या व सदैव मद्यात धुंद असणाऱ्या देवदासला मनविताना त्याचे चित्त थाऱ्यावर आणण्यासाठी 'चंद्रमुखी' या गाण्यात विनवणी करते. दिलीप कुमार व वैजयंती दोघांचाही अभिनय केवळ पडद्यावरचा उरत नाही तर त्यात वास्तवता प्रकट होते.

'उडे जब जब जुल्फे तेरी । कुवारीयों का दिल मचले'

'नया दौर'मधील दिलीप व वैजयंतींचे या गाण्यावरचे अजरामर भांगडा नृत्य कोण विसरेल? प्रेमातील छेडछाड या सामूहिक भांगडा नृत्यात परस्परांना चिडवून उभयतांनी अप्रतिम सादर केले.

'आजा रे परदेसी । मै तो कबसे खडी इस पार'

या गाण्याबद्दल लता मंगेशकर म्हणाल्या, वैजयंतीमाला गिरीकन्येच्या वेशात अत्यंत लोभस दिसत होत्या. पहाटेच्या वेळी हेमंत ऋतूत फुललेल्या व दवबिंदूत भिजलेल्या कुसुमाप्रमाणे भासत होत्या. प्रियकराला गाण्यातून साद घालतानाचा त्यांचा छद्मी प्रकार अभिनयाची उंची गाठतो.

'ढुंडो ढुंडो रे साजना, ढुंडो मेरे कान का बाला'

१९६१ सालच्या 'गंगाजमुना' चित्रपटातील या गाण्याने व त्यांनी साकारलेल्या 'धन्नो' या पात्राने नवा कीर्तिमान स्थापित केला. भोजपुरी भाषेतील विशिष्ट ग्रामीण लहेजा सांभाळून अभिनय फुलविला. संवाद हे केवळ पुस्तकरूपाने वाचण्यासारखे नसून अभिनयाची जोड देऊन त्यातील आशय फुलवावा लागतो.

प्रीतीत रात्र घालविल्यावर सकाळी कानातील बाली नसल्याचे जाणवते. स्त्री सुलभ लज्जाभावाने हे गाणे सुरू होते.

'दो हंसोका जोडा बिछड गयो रे'

हे विरह गीत या चित्रपटाची ओळख ठरले. वैजयंतीमाला यांच्या नृत्यलालित्याचा उपयोग अनेक निर्मात्यांनी करून अमर कलाकृती सादर केल्या.

'बक्कड बम बम बाजे डमरू' - 'कठपुतली' चित्रपटातील मोर नृत्य.

'बोलरी कठपुतली डोरी' वरील चित्रपटातील कठपुतलीच्या आविर्भावातले नयनरम्य नृत्य.

'मेरे सामने जब तू आता है' - 'लीडर' चित्रपटातील एका गाण्यातील हा अंतरा खुलवून नायकाला प्रत्युत्तर दिले आहे.

'नील गगन की छावो मे' - 'आम्रपाली'च्या लिबाजात तबला सतारीच्या साथीत सजलेले हे अमर नृत्य गीत वैजयंती यांचीच देण.

वैजयंतीमाला यांची चित्रपट कारकीर्द हा पुस्तकाचा विषय आहे. १३ ऑगस्ट १९३६ रोजी तामिळनाडूतील त्रिपालिकेत वैजयंतीमाला यांचा जन्म झाला. त्यांनी भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्य शैलीत पारंगतत्व मिळविले. कर्नाटक संगीत गायिका व नृत्य प्रशिक्षक म्हणूनही कार्य केले. १९४९ मध्ये तामिळ फिल्म 'वडकई'पासून सुरुवात झाली. १९५० साली तामिळ फिल्म 'जीवितम'मध्ये काम केले व दक्षिण भारतीय नायिकामध्ये प्रमुख म्हणून प्रसिद्ध झाल्या.

१९५१ साली आलेला 'बहार' हा त्यांचा पहिला हिंदी चित्रपट आहे. त्या प्रसिद्ध व कुशल नृत्यांगना आहेत. त्यांनी हिंदीत अर्धशास्त्रीय नृत्य प्रकार प्रचलित केलेत. त्यांच्या थिरकत्या पदण्यासामुळे त्यांना 'ट्विनकल टोज' हा किताब मिळाला. ५०-६० च्या काळात हिंदी चित्रपटात प्रथम श्रेणीच्या नायिका कलाकार म्हणून ख्याती प्राप्त झाली. तिच्याशी विवाहाची आकांक्षा तत्कालीन अनेक दिग्गज कलाकारांनी ठेवली, पण त्यांनी चित्रपटातील जवळीक व संबंध तेवढ्यापुरतेच मर्यादित ठेवले. १९६८ साली त्या डॉ. चमनलाल बाली यांच्याशी विवाहबद्ध झाल्यात. १९७६ साली सुचिंद्र या पुत्ररत्नास जन्म दिला. १९८६ साली डॉ. बाली यांचे निधन झाले. त्यांनी जनसंघातून राजकारण प्रवेश केला. नंतर काँग्रेसमध्ये प्रवेश करून राज्यसभेवर नियुक्त झाल्यात. काही काळ राजकारणात राहिल्या. मुलासमवेत आजही सुखी आयुष्य वयाच्या ८९ व्या वर्षात जगत आहेत. ठसठशीत व उमद लावण्य लेवून पदलालित्यातून अभिनयाचा कळस गाठण्यासाठी चंद्राची शीतल झळाळी,

लाघवी हास्य टपोऱ्या नेत्रांची योग्य हलचल इ. आयुधांनी सात्त्विक प्रेमभाव, कधी करारी मुद्रा, कधी शोषित स्त्री तर त्याच टपोऱ्या नेत्रात गंगा जमना दाटून आणत कापोलावरून ओघळणारे अश्रुबिंदूने व्यक्त केलेला मनाचा कोंडमारा व वेदना व्यक्त करणारा शाश्वत अभिनय. केवळ डीव्हाईन!

स्वातंत्र्यपूर्व काळात जुलमी सत्तेच्या जोखडात कोरड्या झालेल्या शुष्क मनांना नव्या युगात वैजयंतींसारख्या अभिनेत्रींनी अभिनयाद्वारे आनंदाने जगण्याची आस निर्माण करून दिली.

१९५१ ते १९७० पर्यंत ५३ हिंदी व इतर भाषांतील अनेक चित्रपटात योगदान देऊन, वयाची मर्यादा व कौटुंबिक जबाबदाऱ्या ओळखून चित्रपटापासून स्वतःला दूर ठेवले.

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून फिल्म फेअर अवॉर्ड, १९५८ सालचा 'साधना', १९६१ चा 'गंगा जमना', १९६४ चा 'संगम' सर्वोत्कृष्ट सहअभिनेत्रीचा फिल्म फेअर अवॉर्ड. १९५५ चा 'देवदास' भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्कार १९६८. भारत सरकारतर्फे पद्मविभूषण पुरस्कार २०२४. नवीन पिढीतील विशेषतः स्त्री अभिनेत्रींनी वैजयंतीमाला यांच्या चित्रपटाद्वारे प्रेरणा घेऊन दर्जेदार अभिनयाचे व नृत्याचे योगदान चित्रपटसृष्टीला द्यावे, हीच इच्छा! पद्मविभूषण व चित्रपटभूषण वैजयंतीमाला बाली यांना उत्तम आरोग्यासह शतायुषी आयुष्य लाभो, हीच त्या जगन्नीयंत्याकडे प्रार्थना.

# यावे गणराय

(पान १ वरून)

असे स्वरूप प्राचीन काळी असावे. त्यामुळे ज्येष्ठा गौरीचे आगमनही एरवी वाईट मानल्या जाणाऱ्या मूळ नक्षत्रावर होते. या दोन्ही देवता भाद्रपदातच पूजल्या जातात. अनेक अभ्यासक या सगळ्याचा, संबंधित पुराणकथांचा, प्राचीन ग्रंथांच्या अभ्यासातून समोर येणाऱ्या विषयांचा अभ्यास करत असतात.

पुराण वाङ्मयाच्या पुढच्या काळातही आपल्याला गणपतीच्या कथा आढळतात. पण इथे थोडी गंमत दिसते. जसे की, याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये आधी उल्लेख केल्याप्रमाणे चार विनायक नसून ही सर्व नावे एकाच विनायकाची आहेत आणि त्याचे पूजन केले असता सर्व विघ्नांमधून मुक्ती मिळते, हा विचार समोर आलेला दिसतो. मधल्या काळात झालेला हा बदल विचारात घेण्याजोगा आहे. त्यामुळेच या काळात विघ्ने दूर करण्यासाठी विनायकाचे पूजन करण्यास सांगितले गेल्याचे दिसते. गणपतीच्या जन्माच्या गोष्टी प्राचीन ग्रंथांमधून समजतात आणि तो गजमुख असणारा देव असल्याचेही समजते. मात्र, आधीच्या चार विनायकांचे सविस्तर वर्णन आपल्याला उपलब्ध नाही. त्यामुळेच ते गजमुख होते की नाही, त्यांचे स्वरूप नेमके कसे होते हे सांगता येत नाही. पण पुराणकथांमधून गणपतीची मूर्ती स्पष्ट होत जाते. त्याला किती हात आहेत, डोके कसे आहे, हातात कोणकोणती आयुधे आहेत हे सगळे वर्णन या कथांमध्ये केलेले दिसते. प्राचीन काळच्या गणेशमूर्ती भारतातच नव्हे, तर भारताबाहेरही सापडतात. अफगाणिस्तानमधील गार्देझ येथील उभ्या गणेशाची मूर्ती प्रसिद्ध आहे. शिव आणि ब्रह्मदेवाने त्याला गणांचा अधिपती केले आणि तो मुख्य झाला, पूजनात त्याचे अग्रमानांकन ठेवण्याची पद्धत पडली, हेदेखील पुराणांमधून समजते. विघ्न आणण्याची ताकद असणाऱ्या देवतेचे पूजन पहिल्यांदा करून त्याला शांत केले तर पुढचे कार्य चांगल्या प्रकारे पार पडेल, असा विचार त्यामागे दिसतो. अशा प्रकारे हळूहळू गणेशाविषयीचे विचार बदलत गेल्याचे आपण समजून घ्यायला हवे.

नंतरच्या काळात गणेशाचे पूजन करणारा 'गाणपत्य' हा एक संप्रदाय प्रसिद्ध झाला. आपल्याकडे पंचायतन पूजा असते. त्यात एक देवता मध्यभागी तर चारही बाजूंनी चार देवता असतात. शिव, विष्णू, सूर्य, गणेश आणि देवी (अन्नपूर्णा) अशा पाच देवतांचे यात पूजन असते. हे पूर्वापार प्रचलित होते. आदिशंकराचार्यांनी याचा जास्त प्रसार केला. त्यामुळे याचे श्रेय त्यांना दिले जाते. यामागचा त्यांचा विचार महत्त्वाचा होता. तो म्हणजे तुम्ही शैव असाल तर शिव मध्यभागी ठेवा आणि उरलेल्या चार देवतांचीही पूजा करा. यातून अन्य देवतांचा द्वेष करण्याचे काही कारण नाही, हा विचार मांडला असावा. गणेशाला प्रधान मानणारे लोक गाणपत्य असतात. पंचायतनातही गणेश आहे, हे लक्षात घेण्याजोगे आहे. त्यानंतरच्या काळात गाणपत्य संप्रदायातही वेगवेगळे संप्रदाय तयार अथवा उपपंथ तयार झाले. खेरीज गणेशपुराण आणि मुद्गल पुराण ही दोन पुराणे पूर्णपणे गणेशाशी संबंधित असून आपल्याला माहीत असणारी बरीचशी स्तोत्र, पूजाविधी, वेगवेगळ्या आख्यायिका, कथा यांचा मुख्य स्रोत ही दोन पुराणेच आहेत.

आपल्याकडे तंत्रमार्ग होता. यातही गणपतीची उपासना केली जात असे. गणपतीचे 'एकदन्त' हे एक स्वरूप आहे. दुसरा दात परशुरामाशी झालेल्या युद्धात तुटला होता. त्यासंबंधीच्या कथाही आपल्याला माहीत आहेत. एकदन्त स्वरूपातील गणेश महागणपती म्हणून ओळखला जातो. सृष्टीची निर्मिती करणारे आदितत्त्व या स्वरूपात त्याच्या या रूपाकडे काही परंपरांमध्ये पाहिले जाते. म्हणजेच ब्रह्मदेवाची निर्मितीही महागणपतीने केली, असे मानले जाते. असाच 'हरिद्रा गणपती' आहे. विशेषतः याच गणपतीची पूजा करणारा एक संप्रदाय होता. त्या काळी गणपतीचा चेहरा आणि एक दात असा एक लोखंडी ठसा असायचा. तो तापवून हा ठसा अनुयायाच्या हातावर उमटवला जायचा. अशा प्रकारे हा शिक्का ते अभिमानाने अंगावर मिरवत असत. गणपतीची उपासना करणारे असेही लोक होते. याच प्रकारे वाममार्ग या पद्धतीनेही गणपतीची पूजा करण्याचा प्रघात होता. 'उच्छिष्ट' गणपती हे त्याचे एक स्वरूप दिसते. इथे लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे तंत्रामध्ये जातिपातीला महत्त्व नाही. स्त्री-पुरुष असा भेद केला जात नाही. त्यामुळे सर्व लोक या उच्छिष्ट गणपतीची पूजा करत असत. त्याला मद्य, मांस, मत्स्य यांचा नैवेद्य दाखवला जात असे.

संपत्ती वा ऐश्वर्य प्राप्त व्हावे म्हणूनही गणपतीची पूजा केली जात असे. एरवी आपण त्याला बुद्धीची देवता समजतो. परंतु, संपत्ती प्राप्त होण्यासाठीही त्याची पूजा करण्याचे काही विधी आपल्याला सापडतात. 'संतान गणपती' पुत्रप्राप्तीच्या हेतूने पूजला जातो. या सगळ्यावरून गणेश ही देवता सगळीकडे प्रचलित होती, हे स्पष्ट होते. प्राचीन काळी तो विघ्नांचा अधिपती होता, पण कालौघात सुख, संपत्ती, संतान असे सर्व काही देणारा, सकलदाता असा देव ठरला. या देवतेचा सगळा प्रवास जाणून घेणे, त्याची 'सगळ्या मनोकामना पूर्ण करणारा देव' अशी ओळख बनणे हे सगळेच अभ्यासण्याजोगे आहे. भाद्रपद आणि माघ महिन्यातील चतुर्थींना गणेशाचा उत्सव मोठ्या प्रमाणात केला जातो. पार्थिव याचा अर्थ मातीपासून बनवलेला. या पार्थिव गणपतीचे पूजन विशेष करून भाद्रपदात केले जाते. मातीच्या गणपतीची पूजा हे भाद्रपदातील पूजेचे वैशिष्ट्य होय. आता हाच उत्सव आपण साजरा करणार आहोत. तेव्हा या उत्सवाची जोमाने तयारी पूर्ण करू या आणि पूजन करून गणेशाचे आशीर्वाद प्राप्त करू या!

# विचार-संस्कृतीचा जागर हाच आमचा उत्सव : धनंजय बापट

(पान १ वरून)

आहे. आम्ही मूल्य देत आलो, आम्ही मूल्य देत राहू हे नक्की.

यासंदर्भात एक महत्त्वाची बाब सांगितली पाहिजे. ती अशी की, तरुण भारतची स्वतंत्र ओळख आहे. समाजात त्याला मान्यताही आहे. तरुण भारत हाच एक ब्रँड आहे. त्यामुळे कोणत्या आणि कशा जाहिराती छापायच्या याचे धोरणही ठरलेले आहे. असे असूनही आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्याचा पाया घातला गेला आहे. आर्थिक बाबतीतही एक विश्वास निर्माण झाला आहे, हे मी जबाबदारीने सांगू शकतो. व्यावसायिकतेच्या बाबतीतही आम्ही मागे नाही, हे महत्त्वाचे आहे आणि गरजेचेही आहे.

**• साधारणतः वृत्तपत्रे ही कोणत्या तरी व्यक्तीच्या, उद्योगपतीच्या किंवा औद्योगिक घराण्याच्या मालकीची असतात. पण तरुण भारतच्या बाबतीत अशी स्थिती नाही. अशा स्थितीत वैचारिक वृत्तपत्र यशस्वीपणे चालविणे, हे मोठे आव्हान आहे. ते तुम्ही कसे स्वीकारले?**

उत्तर - आमचे कर्मचारी, वाचकांचा पाठिंबा, वैचारिक निष्ठा आणि संचालकांची निःस्वार्थ वृत्ती हे चार घटक म्हणजे आमचे मुख्य भांडवल आहे. जबाबदारी घेतानाच माझी ही धारणा स्पष्ट होती आणि या चार भांडवलांच्या आधारावरच सर्व नियोजन आणि प्रयत्न केले. या दृष्टीने 'टीमवर्क' उभे करणे हे पहिले पाऊल होते. सर्व उपक्रमांत आणि नियोजनांत प्रत्येकाचा सहभाग कसा राहील, त्यांना प्रोत्साहन कसे देता येईल, याचा विचार केला. तसेच एका कुटुंबाप्रमाणे सर्वांची काळजी घेतली. आज प्रत्येकाच्या मनात 'हा माझा तरुण भारत आहे' अशी भावना आहे. 'खर्च कमी ठेवून कार्यक्षमतेने व्यवस्थापन' ही माझी भूमिका सर्वांनी स्वीकारली. छोट्या-छोट्या गोष्टींकडे लक्ष दिले जाते. कर्मचारीच त्याची काळजी घेतात. 'ही फक्त नोकरी नाही, राष्ट्रसेवा आहे' हा भाव कर्मचाऱ्यांमध्ये रुजला आहे. त्यामुळे 'कमी साधनात प्रभावी व दर्जेदार काम' करण्याची वृत्ती वाढली आहे. आज प्रत्येक जण स्वतःला 'टीमचा भाग' समजतो. त्यांच्या परिश्रमामुळेच राबविलेले अनेक नवनवीन उपक्रम यशस्वी झाले.

याशिवाय, बांधिलकी असलेला वाचक वर्ग हे तरुण भारताचे मोठे भांडवल आहे. छपाई, पाने, आकर्षक लेआऊट, बातम्या या सर्वच बाबतीत उत्तम वृत्तपत्र निघू शकते, हा विश्वास या वाचकांच्या मनात निर्माण झाला.

## आम्ही 'व्यभिचार' नव्हे 'विचार' देतो; 'विकृती' नव्हे 'संस्कृती' देतो

आज अनेक लोकांना 'व्यभिचार' वाचायला आवडू लागलाय, याची खंत आम्हाला वाटते. त्यामुळेच अनेक वृत्तपत्रे अनाचार, अत्याचार, व्यभिचारादि अनिष्टांचे कळत-नकळत गुणगाण करणारा मजकूर भरभरून देतात. आम्ही आम्ही 'व्यभिचार' नव्हे तर 'विचार' देतो, 'विकृती' नव्हे तर 'संस्कृती'चे गुणगान करतो. लोकांना आवडेल ते देण्यासाठी प्रयत्न करतानाच लोकांची अभिरुची घडविणे, समाजाला सुसंस्कृत बनवणे, प्रबोधन करणे ही देखील वृत्तपत्रांची जबाबदारी आहेच. ती जबाबदारी आम्ही शतकभर निगुतीने पार पाडली. अनेक लोक तरुण भारत न वाचण्याचे कारण अन्य वृत्तपत्र स्वस्तात मिळणे असे सांगतात. अमूक वर्तमानपत्रापेक्षा तरुण भारत एक रुपयाने महाग आहे, असेही आम्हाला सांगितले जाते. पण, हा एक रुपयाचा फरक आम्ही वैचारिक संपन्नतेत पाहतो. दैनिकाच्या धबडग्यात राबताना आणि उदात्त विचार-संस्कृतीसंबंधीच्या प्रबोधनाचा प्रवाह अखंडित ठेवताना आम्ही उच्च जीवनमूल्ये देतो, दर्जेदार साहित्य देतो, विविधांगी लेखन देतो म्हणून आमचे मूल्य (किंमत नव्हे) अधिक आहे...

तरुण भारतचा वाचक संवेदनशील आहे. त्यांच्या भावनांचा अनादर होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली जाते. त्यामुळे हे आपलेच वृत्तपत्र आहे, ही वाचकांची भावना कायम आहे. या वाचकांचे आमच्या अनेक उपक्रमांत सक्रिय सहभाग आणि योगदान असते. आमच्या संचालकांची निःस्वार्थवृत्ती आणि वैचारिक निष्ठा तर वादातीत आहे. या चार मुख्य भांडवलांचा संपूर्ण आणि कुशलतेने उपयोग केल्यामुळे हे आव्हान मला यशस्वीपणे स्वीकारता आले.

**• शताब्दी वर्षात रा. स्व. संघाच्या पंचसूत्रीवरील कार्यक्रमांची आखणी आपण कशी केली?**

उत्तर - सर्वप्रथम आम्ही वडाची रोपे महिलांना वितरित केली. त्यात कुटुंबाचा आधार असणाऱ्या महिलांचा सहभाग होता. म्हणजे कुटुंब प्रबोधन झाले. त्यानंतर आम्ही 'बीज अंकुरे अंकुरे' हा उपक्रम घेतला. यात लोकांनीच मोठ्या वृक्षांच्या बिया गोळा करून आम्हाला आणून दिल्या आणि आम्ही त्या अंकासोबत वितरित केल्या. यातही कुटुंबांतील प्रत्येक घटक सहभागी झाला. एक प्रकारे कुटुंब प्रबोधन आणि पर्यावरण रक्षण अशी दोन्ही सूत्रे यातून साध्य झाली. तिसरा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे आणिबाणीत लोकशाहीसाठी संघर्ष करणाऱ्यांचा सन्मान. आणिबाणीच्या काळात लोकशाहीला दडपण्याचा प्रयत्न झाला. दडपशाहीला विरोध करणाऱ्यांना तुरुंगवास झाला. अशा सर्वांचा आम्ही सत्कार केला. हा उपक्रम नागरी कर्तव्य या श्रेणीत मोडतो. आणिबाणीच्या काळात नागरी अधिकारांवर गदा आली होती. त्याविरुद्ध लढा देणाऱ्या सेनानींचा गौरव हा त्यादृष्टीने औचित्यपूर्ण आहे, असे वाटल्यामुळे आम्ही नागरी कर्तव्याचा भाग म्हणून आणिबाणीतील महनीय लढवय्यांचा सत्कार सोहळा विदर्भात सर्वत्र घेतला.


विशेष म्हणजे, सर्व उपक्रम आम्ही स्वबळावर केले. कोणतेही प्रायोजकत्व न घेता तरुण भारतने हे उपक्रम सक्षमपणे चालवले. हा आमच्या 'स्व'चा सामाजिक आविष्कार होता.

**• दैनिक तरुण भारतची ही देदीप्यमान वाटचाल सामान्यांसमोर यावी यासाठी आपण काही उपक्रमांचा विचार केला आहे का?**

उत्तर - दैनिक तरुण भारतची शतक महोत्सवी वाटचाल ही आमच्यासाठीच नव्हे, तर प्रत्येक राष्ट्रप्रेमी व्यक्तीसाठी अतिशय महत्त्वाची घटना आहे. या विचारपत्राच्या १०० वर्षांतील वाटचालीचा आढावा घेणारा एक विशेषांक आम्ही लवकरच आमच्या वाचकांच्या हाती देणार आहोत. विशेष म्हणजे 'अमृतयोग' या नावाने निघत असलेल्या या दर्जेदार विशेषांकाचे मूल्य अवघे १४ रुपये राहणार आहे.

**• शताब्दीच्या वर्षात 'तुळस रोपणा'ची मोहीम हाती घ्यावी, हा विचार कसा आला?**

उत्तर - माननीय सरसंघचालकांनी दिलेल्या पंचसूत्रीतील पर्यावरण रक्षणाचा मुद्दा हा संपूर्ण समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरण रक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, या भावनेतून तुळस रोपण मोहिमेचा जन्म झाला. तुळस ही वनस्पती १०० टक्के प्राणवायू देणारी आणि आरोग्यदायी आहे. ती अनेक आजारांवर गुणकारी असून जमिनीची सुपिकता वाढविणारी आहे. आपल्या पूर्वजांनी फार विचारपूर्वक तुळशीला आपल्या धर्म-अध्यात्म-संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात महत्त्वाचे स्थान दिले. असे हे छोटे, पण बहुगुणी रोपटे लावायला सोपे, वागवायला आणि वाढवायला सोपे आहे. त्याचे गुणधर्म अपार असल्याने ठिकठिकाणी तुळस वाटप आणि तुळस रोपण हा उपक्रम आम्ही राबविण्याचे ठरवले. त्यातून समाजाचे एवढे मोठे कल्याण साधले जाणार आहे की, आज आपण त्याची कल्पना करू शकत नाही. ज्या-ज्या भागात अधिकाधिक प्रमाणात तुळस लावली जाईल, त्या भागांमध्ये प्राणवायूचे प्रमाण वाढेल, त्या भागात तापमानाची झळ कमी होईल, रोगराईवर नियंत्रण येईल. त्याचा परिणाम मानवाचे जीवन अधिक सुखकर होईल. जगभरात तुळशीच्या उपयोगितेवर झालेली संशोधने भारतीय संस्कृतीतील तुळशीच्या महत्त्वावर शिक्कामोर्तब करणारीच आहेत.



## हा वैचारिक क्रांतीचा सोहळा

अनेक लोक आपल्या संस्थेचा रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव, हीरक महोत्सव मोठमोठ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून जल्लोषासह साजरा करतात. आम्ही तरुण भारत म्हणून वैचारिक जागर करीत एका नव्या समाजानुकूल वैचारिक क्रांतीचा सोहळा अनुभवत आहोत.

**• हा उपक्रम राबविण्यातील आव्हाने कोणती होती?**

उत्तर - आजकाल समाजात कोणतीही गोष्ट फक्त सांगून स्वीकारली जात नाही. ती कोणत्या पद्धतीने सांगितली जाते यावर त्या योजनेची स्वीकारार्हता अवलंबून असते. तुळस गुणकारी आहे, औषधी गुणधर्माने युक्त आहे, प्राणवायू देणारी आहे, तिचे धार्मिक महत्त्व आहे वगैरे सांगून लोक या मोहिमेत सहभागी होतीलच, असे गृहीत धरता येत नव्हते. म्हणून मग आम्ही 'कार्बन क्रेडिट रेटिंग'च्या भाषेत लोकांना तुळशीचे महत्त्व समजावून सांगितले. आध्यात्मिक व धार्मिक महत्ता सांगताना आधुनिक संशोधनातील या वनस्पतीचे महत्त्वही सांगितले. ही पद्धत तरुण पिढी, विज्ञानाचे उपासक आणि अगदी शाळकरी विद्यार्थ्यांसाठीही अचूक ठरली. हा विषय मोठ्या प्रमाणात सर्वदूर गेला आणि आमची मोहीम प्रचंड यशस्वी झाली.

**• तुळस लावा उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद कसा होता?**

उत्तर - तुळस रोपणासोबत आम्ही प्रातिनिधिक स्वरूपात मंदिर, मठ, विहार, गुरुद्वारा, समाज भवन यांच्या स्वच्छतेचीही मोहीम राबविली. सर्व समाजांतील व थरांतील नागरिकांनी याला भरभरून प्रतिसाद दिला. या प्रतिसादाचे वर्णन निव्वळ 'अभूतपूर्व' असेच होऊ शकते. अगदी वारकऱ्यांपासून ते ख्रिश्चन समुदायापर्यंत सर्वांनी आपापल्या प्रार्थनास्थळी श्रद्धेने तुळशीचे रोपण केले. सामाजिक समरसतेचे अनोखे उदाहरण या उपक्रमाने घालून दिले. भंडारा जिल्ह्यातील सानगडी नावाच्या छोट्याशा गावात एका दिवसात दोन हजार तुळशीची रोपे लावली गेली. नागरिकांनी विविध धार्मिक प्रसंगी काढतात तशा दिंड्या काढून तुळशीचे रोप मिरवत नेले आणि त्याचे श्रद्धापूर्वक रोपण केले. या उपक्रमात आम्ही विद्यापीठे, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, पोलिस विभाग यांनाही जोडले. चांगल्या हेतूने जेव्हा एखादे पाऊल उचलले जाते, तेव्हा सकारात्मक भावनेने मानवी श्रृंखला कशी साकारत जाते, याचा प्रत्यय आम्ही या निमित्ताने घेतला.

**• या अभियानात तरुण भारतचा सहभाग कोणत्या स्वरूपाचा होता?**

उत्तर - संपूर्ण उपक्रम समाजासाठी आणि समाजाच्या सहभागाने झाला असला, तरी यामागे राबणारे हात तरुण भारतातील कर्मचाऱ्यांचे होते. आमच्या कर्मचाऱ्यांनी संपूर्ण विदर्भात संपर्क साधून लोकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आणि अगदी नागपूरबाहेरच्या कार्यक्रमांनाही जातीने हजेरी लावली. तुळशीची किती रोपे लावली यापेक्षाही तरुण भारतच्या कर्मचाऱ्यांनी या दृढनिश्चय आणि निष्ठेने, एकजुटीने हे कार्य केले ते व्यवस्थापन म्हणून माझ्यासाठी जास्त महत्त्वाचे आहे. त्यांची एकजूट आणि निष्ठा हीच आमची ताकद आहे आणि हा आमच्यासाठी अभिमानाचा विषय आहे.

**• या उपक्रमाचा पुढील टप्पा कोणता असेल?**

उत्तर - तुळस रोपण अभियानाचा पुढील टप्पा हा दिवाळीनंतरचा 'तुळशी विवाहा'चा राहणार आहे. सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणात सामूहिक तुळशी विवाह व्हावेत, असा आमचा प्रयत्न राहणार आहे. निसर्ग आणि संस्कृती यांच्या मिलनाचे प्रतीक असणारा हा तुळशी विवाहाचा प्रसंग आपल्या परंपरेचा ठेवा म्हणून आपल्याला पुढे न्यायचा आहे. याविषयी लवकरच दै. तरुण भारतच्या माध्यमातून आपल्याला सविस्तर माहिती मिळेल.

दैनिक तरुण भारतची वैचारिक बांधिलकी निर्विवाद आहे. मात्र, समता, शूचिता, सामंजस्य आणि वृत्तपत्र म्हणून आपले कर्तव्य यांत कुठेही तडजोड केली जात नाही. संस्कारांचा गाभा तरुण भारतने कायम जपला असून वाचकांना आमच्याशी जोडून ठेवणारा हाच महत्त्वाचा दुवा आहे. काळानुरूप डिजिटल स्वरूपात आलेल्या तरुण भारतची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. डिजिटलची वाचकसंख्याही फार मोठी आहे. तंत्रज्ञानाची छाप असलेल्या नव्या काळातील हे यश तरुण भारतच्या वाटचालीत फार मोठी उपलब्धी मानले जाईल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, तरुण भारतचा वाचक हा नव्या काळाच्या भाषेत सांगायचे तर अत्यंत 'कमिटेड' आहे. याच वाचकाच्या भरवश्यावर तरुण भारतने १०० वर्षांचा मोठा पल्ला गाठला आहे. यापुढेही या दैनिकाची वाटचाल अशीच दमदारपणे राहील आणि पत्रकारितेच्याच नव्हे तर सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रातही तरुण भारतचे नाव अत्यादराने कायम घेतले जाईल, असा मला विश्वास वाटतो.

# गुणकारी तुळस

भारतीय संस्कृती परंपरेत तुळस महत्त्वाची मानली जाते. तुळस ही मांगल्याचे, पावित्र्याचे प्रतीक आहे. वारकरी संप्रदायात तुळशीला प्राधान्य देण्यात आले आहे. तुळशीला जसे धार्मिक, सांस्कृतिक महत्त्व आहे, तेवढीच तुळस वैज्ञानिक, शास्त्रीयदृष्ट्या आणि आरोग्याच्या दृष्टीनेही लाभदायक मानली जाते. आयुर्वेदात तुळशीच्या पानांना, बियांना महत्त्व असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या तुळशीचे अनेक प्रकार आहेत. पुराणातील काही संदर्भानुसार ज्या घरात तुळस लावलेली असते आणि नियमित सकाळी तुळस पूजन केले जाते त्यांच्यावर लक्ष्मीची कृपा असते, असे मान्यता आहे. म्हणूनच की काय, कुठल्याही चित्रपटात अथवा मालिकांमध्ये आदर्श स्त्रीचे रूप म्हणून तिला सकाळी शुचिर्भूत होऊन तुळशीची पूजा करताना दाखवतात. तुळशीला आपल्या संस्कृतीत मातेचे रूपही मानतात. आजूबाजूचे वातावरण शुद्ध होऊन सकारात्मक लहरी तुळशी निर्माण करते. आरोग्याला उत्तम, धन आणि निरोगी काया हे समृद्धीचे लक्षण मानले गेले आहे. कोरोना काळात रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी तुळशीचे सेवन करण्याचा सल्ला दिला जात होता.

'तुलसी यस्य भवने प्रत्यहं परिपूज्यते
तद्गृहं नोपसर्पन्ति कदाचित यामकिंकरा : ।'

अर्थात, ज्या घरात नियमित तुळशीचे नियमित पूजन केले जाते, त्या घरातील सदस्य कमी आजारी पडतात. तुळशीच्या मंजिरी विष्णूला वाहिल्यास भगवान प्रसन्न होतात, असे शास्त्रात सांगितले आहे.

दरवर्षी कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी किंवा द्वादशी तिथीला भगवान विष्णूचे रूप असलेल्या शाळिग्रामसोबत तुळशीचा विवाह केला जातो. शास्त्रामध्ये तुळशी विवाहाची एक कथा आहे. तुळशी ही पूर्वी वृंदा होती आणि तिचा पती जालंदर हा राक्षस पती होता. वृंदा पतिव्रता असल्याने तिला तिच्या पतीचे रक्षण करण्याचे वरदान मिळाले होते. या वरदानामुळे देवांना जालंदरचा वध करणे शक्य होत नव्हते. देवांच्या विनंतीवरून भगवान विष्णूंनी जालंदरचा वध करण्यासाठी वृंदाचा पतिव्रत धर्म मायारूपाने मोडला आणि जालंदरचा वध झाला. यामुळे वृंदा दुःखी झाली. रागाच्या भरात तिने भगवान विष्णूंना दगड होण्याचा शाप दिला. भगवान विष्णूंनी तिचा शाप स्वीकारला आणि त्यांचे शाळिग्राममध्ये रूपांतर झाले. त्या शाळिग्रामची पूजा भाविक करतात. माता लक्ष्मीने विष्णूंना शापमुक्त करण्याची प्रार्थना केली तेव्हा वृंदाने त्यांची शापातून मुक्तता केली आणि ती पतीचे मस्तक घेऊन सती गेली. मान्यतेनुसार ज्या ठिकाणी वृंदा सती गेली तिथे एक रोप उगवले, ज्याला 'विष्णुप्रिया तुळशी' असे नाव दिले. विष्णूंनी असे सांगितले की, या दगडात शाळिग्राम नावाने माझे वास्तव्य राहील, ज्याची नेहमी तुळशीसोबत पूजा केली जाईल. तेव्हापासून कार्तिक महिन्यातील द्वादशी तिथीला शाळिग्राम आणि तुळशी यांच्या विवाहाची प्रथा सुरू झाली. शास्त्रामध्ये ही तिथी अतिशय शुभ मानली जाते. कारण या दिवशी भगवान विष्णू योगनिद्रेतून जागे होतात आणि शुभ कार्यक्रमांचा पुन्हा शुभारंभ होतो.

अशी ही अनेक गुणांनी युक्त अशी तुळशी अनेक लहान-मोठे आजार बरे करते. आयुर्वेदानुसार तुळशीच्या पानांमध्ये अँटिबॅक्टेरिअल, अँटीफंगल आणि असे अनेक गुणधर्म असतात तसेच तुळशीची पाने पोटाचे विकार दूर करण्यास मदत करतात. अशी गुणकारी तुळस प्रत्येकाने घरीदारी लावावी आणि सामाजिक समारंभात पुष्पगुच्छ देण्याऐवजी तुळशीचे रोप भेट म्हणून द्यावे.

स्नेहल खंडागळे
नागपूर

# तुझिये कृपेचेनि बळे, वितुळती भ्रांतीची पडळे

## दीपमाळ

प्रकाश एदलाबादकर
९८२२२२२११५

येत्या बुधवारी श्रीगणेश चतुर्थी आहे. आपल्या सर्वांच्या लाडक्या गणपतीबाप्पाच्या आगमनाच्या तयारीत आपण गुंतलेलो आहोत. बुधवारपासून पुढे दहा दिवस या बुद्धिदात्या देवतेचे वास्तव्य पृथ्वीतलावर असणार. आपल्या संपूर्ण नगरालाच नव्हे, तर अख्ख्या महाराष्ट्रालाच एक उत्सवी स्वरूप येईल. लोकमान्यांनी श्रीगजाननाची जी सामाजिक उपासना सुरू केली, त्याला आता शतकाच्या वर काही वर्षे लोटली आहेत. ज्या उद्देशाने लोकमान्यांनी त्या काळी या उत्सवाचा प्रारंभ केला, तो उद्देश आज कितीसा शिल्लक आहे, हा प्रश्न वेगळा आहे. मुद्दा हा की, याही उत्सवात कालानुरूप बदल घडत गेले. सनईच्या मंगल सुरात येणारे बाप्पा आता डीजेच्या कर्णकर्कश आवाजात आणले जातात. परिवर्तन हवेच, परंतु हे असे नको. दुसरे असे की, परिवर्तनशील समाजच जिवंत राहू शकतो. बदलत्या काळातही श्रीगणेश ही देवता तितकीच प्रेरणा देण्यास समर्थ आहे. समाजातील अनेक स्तर या निमित्ताने एकत्र येऊन सहजीवनाचा, साहचर्याचा अनुभव घेतात. समाजातील सर्व प्रकारच्या व्यक्तींना एकाच सूत्रात गुंफण्याचे आणि समाज समरस करण्याचे आज घडीला आवश्यक असलेले कार्य या देवतेच्या सार्वजनिक उपासनेतून सिद्ध होते. समाजाच्या सर्वच घटकांमध्ये ही देवता तेवढीच लोकप्रिय आहे. अशा होकारात्मक दृष्टीने आपण या उत्सवाकडे पाहिले पाहिजे. या विघ्नहर्त्याच्या रूपगुणांनी लोभावून, मराठी सारस्वतातील अनेक मानकऱ्यांनी गणेशाला अत्यंत नम्र भावाने अभिवादन केले आहे. शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी या देवतेला दिलेला अग्रपूजेचा मान आणि त्यासाठी गणेशाच्या अंगावर चढविलेली शब्दालंकाराची आरास विलोभनीयच नव्हे, तर भक्तिभावाने ओतप्रोत भरलेल्या मनाला एका विशिष्ट अवस्थेत पोचविणायचे अतूट सामर्थ्य असलेली शब्दकळा आहे. साहित्याच्या या आदिदेवतेला वंदन करण्यासाठी अभंग, आरत्या, स्तोत्रे, भूपाळ्या यांसारख्या अनेक रचना अक्षरशः शेकडो रूपात उपलब्ध आहेत.

श्रीज्ञानेश्वरीच्या आरंभालाच ज्ञानदेवांनी स्वसंवेद्य अशा आत्मरूपाला वंदन केले आहे.

ओं नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरुपा ॥

ही ग्रंथारंभीची ओवी, श्रीगणेशाची नामरूपातील परब्रह्म प्रतिमा वर्णन करणारी आहे, असे ज्ञानेश्वरीच्या एका ज्येष्ठ अभ्यासकाने मला सांगितले होते. ज्ञानदेवांसारख्या योगीराज सारस्वत शिरोमणीलाही गणेशाचे वाङ्मय रूपच सर्वार्थाने फुलवावेसे वाटले यामागेसुद्धा काही गूढ असेल काय?

अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारे ॥
हे तिन्ही एकवटले । तेच शब्दब्रह्म कवळले ।
ते मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥

श्रीगणेशाच्या ठायी सकलकलांचाच नव्हे, तर सर्व चराचर सृष्टीचाच उगम मानला गेला आहे. त्यामुळेच या देवतेवर ज्ञानदेवांनी ओंकाराचे उत्प्रेक्षण केलेले दिसते. ओंकाराचे साकार आणि उत्क्रांत रूप म्हणजेच श्री गणेश! श्रीगणेश सर्व विद्यांचा अधिष्ठाता आहे. बुद्धीची देवता म्हणून आपण गणेशाची आराधना करतो. त्यामुळेच ज्ञानदेवांनी तिला वाङ्मय रूपकाने वानावे यात नवल नाही.

हे शब्दब्रह्म अशेष । तेचिं मूर्ती सुवेष ।
जेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ॥

असा श्रीगणेश ज्ञानदेवांच्या प्रतिमासृष्टीत स्थित आहे. श्रीगणेशाच्या अवयवांची आणि आयुधांची, ज्या रूपकात्मक पद्धतीने, माउलीने सौंदर्यमीमांसा केली आहे ; ती अन्यत्र सापडणे कठीण आहे. स्मृती हे गणेशाचे अवयव आहेत. अठरा पुराणे ही त्याची रत्नखचित भूषणे असून त्यांचा गर्भितार्थ ही त्या भूषणांची कोंदणे आहेत. महर्षी व्यासांची बुद्धी ही गणेशाची मेखला आहे. सहा शास्त्रे म्हणजे गणेशाचे सहा हात आहेत. त्याचा परशु हा तर्कशास्त्र आणि अंकुश हा न्यायशास्त्र आहे आणि मोदक हा वेदांत आहे. माउली म्हणते...

तरी तर्क तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।
वेदांतू तो महारसु । मोदकु मिरवे ॥

असा हा 'विवेकवंतु सुपरिमळु' असलेला, ब्रह्मसुखाचा परमानंद असलेल्या शब्दब्रह्माला ज्ञानेश्वरांनी आपल्या विदग्ध आणि लालित्यपूर्ण वाणीने वंदन केले आहे. समर्थ रामदासांनी केले गणेशाचे वंदन अत्यंत उत्कट, भव्य आणि समर्थांच्या एकूण वाङ्मयीन प्रतिमेला साजेसे दणदणीत आहे. ग्रंथराज दासबोधातील पहिल्या दशकातील दुसरा समास हा समर्थांनी गणेशाच्या स्तवनासाठीच खर्ची घातला आहे. समर्थांचा गणेश भव्य आणि चपळ आहे, गतिशील आहे. तो एका जागी स्थिर नाही.

भव्यरूप वितंड । भीममूर्ती महाप्रचंड ।
विस्तीर्ण मस्तकी उदंड । सिंधूर चर्चिला ॥
स्थिरता नाही येकक्षण । चपळ विशई अग्रगण ।
साजिरी मूर्ती सुलक्षण । लावण्य खाणी ॥

समर्थांनी आपल्या आयुष्यभर कोदंडधारी श्रीरामाचे कृतिशील रूप आणि बलभीम हनुमंताचे चपळरूप यांचे



अनुसरण केले त्यामुळे त्यांचा गणेशही गतिशील आहे. यात नवल ते काय? समर्थांची वाणी रोखठोक आणि स्पष्ट आहे. त्यांच्या वर्णनात खडबडीतपणा आहे, पण निवेदनाची भव्यता, प्रतिभेचा उत्तुंग विलास ठायी ठायी प्रत्ययाला येतो. समर्थांना अभिप्रेत असलेला गणेश संपूर्ण पृथ्वीला आंदोलित करणारा आहे. ते म्हणतात...

तुझिये कृपेचेनि बळे । वितुळती भ्रांतीची पडळे ।
आणि विश्वभक्षक काळे । दास्यत्व कीजे ॥
येतां कृपेची निजउडी । विघ्ने कापती बापुडी ।
होऊनि जाती देशधडी । नाममात्रे ॥

समर्थांनी श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतल्यावर त्यांना तेथे श्रीरामाचा साक्षात्कार झाला अशी कथा सांगतात. म्हणूनच त्यांना त्यांच्या आवडत्या भीममूर्तीचे दर्शन गणेशाच्या ठायी झाले असावे.

लवथवीत मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद ।
क्षुष्ठ घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ॥
चतुर्भुज लंबोदर । कांसे कसिला पीतांबर ।
फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ॥

असे वर्णन करणाऱ्या समर्थांनीच, मोरगावच्या मयूरेश्वराच्या दर्शनाने मनात आलेल्या उत्कट भक्तिभावाला शब्दरूपाने वाट करून दिली. तीच गणपतीची आरती 'सुखकर्ता दुखहर्ता' आजघडीला प्रत्येक मराठी घरात म्हटली जाते.

झुंड प्रचंड मिरवी गजकर्ण थापा ।
तेजाळ अंकुश म्हणे दुरितासी कापा ॥
फर्सा पुसूनि सरसावतसे अघाला ।
भक्तासि विघ्न रचिता रिचविती घाला ॥
साठी सहस्र गण त्या सरिसा निघाला ॥
तनु वितंड चंडसी । प्रचंड शुंड दंडसी ।
सुरंग रंग रेखिला । घवघवीत देखिला ॥

अशा प्रकारचा बलवान, आक्रमणशील आणि अन्यायाच्या परिमार्जनासाठी हातातील शस्त्र उगारलेला गणेश समर्थांच्या भावसृष्टीत विराजमान आहे. म्हणूनच त्यांनी त्यांच्या स्फुरणदायी भाषेत त्याचे वर्णन केलेले आहे. या चौदा विद्यांच्या गोसाव्याचे समर्थकृत वर्णन आपल्याला नतमस्तक तर करतेच; पण भयचकितही करते. संतश्रेष्ठ एकनाथांनीही भागवत पुराणाच्या प्रारंभी गणेशाला वंदन केलेले आहे. नाथ म्हणतात की, गणेश व्यक्त आणि अव्यक्त यांच्या पलीकडचा आहे. नाथांनी केलेल्या गणेशवंदनावर, ज्ञानेश्वरांनी केलेल्या गणेशवंदनाची बरीचशी छाप दिसून येते. तरीही त्यातील अभिव्यक्ती आणि अनुभूती नाथांच्या प्रतिभेला साजेशी आहे.

पाहता नरु ना कुंजरू । व्यक्ताव्यक्तासी परू ।
ऐसा जाणोनि निर्विकारु । नमनादरु ग्रंथार्थी ॥
प्रकृती पुरुष चरण दोनी । तळी घालिसी बोजावुनी ।
तयावरी सहजासनी । पूर्णपणी मिरविसी ॥

नाथांनी श्रीगणेशाचे रूपक वाङ्मयीन न साधता बव्हंशी आध्यात्मिक वळणाने साधलेले दिसते. नाथ म्हणतात, 'गणेशाचे प्रचंड मस्तक सुखरूप आहे. त्याचे तोंड हरुषाचे आहे. सोंड आनंदस्वरूप असून त्याच्या मुखात परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चारही वाणींचा वास आहे. त्याचा एकदंत हा अखंड एकत्वाचे दर्शन घडवितो.' 'तुजमाजी वसू चराचरा' अशी गणेशाची आणि चराचर सृष्टीची अद्वैतावस्था वर्णन करणाऱ्या एकनाथांनी 'नमन एकदंता । एकपणे तूंचि आता । एकी दाविसी अनेकता । परि एकात्मता न मोडे ॥' या शब्दात अनेकत्व दर्शविणाऱ्या परंतु स्व-रूपात एकात्मता न भंगू देणाऱ्या अद्वैतरूप गणेशाचे दर्शन घडविलेले आहे. भावार्थ रामायणातही नाथांनी प्रारंभी जे गणेशस्तवन केले आहे, त्यात असेच म्हटलेले आहे की, 'यालागी जैसा अससी तैसियासी । नमन निरावकाशे सावकाशी । तव अंगत्व भुलले अंगासी । भज्य भजकांसी अद्वैत ॥' नाथांप्रमाणेच संत नामदेवांच्या गाथेमध्येही गाथेच्या प्रारंभी गणेशवंदन केलेले आहे. नामदेवांनी केलेली गणेशस्तुती शब्दालंकारयुक्त आणि चमत्कृतीपूर्ण नसली, तरी श्रद्धायुक्त भक्तीने ओथंबलेली आहे. 'प्रथम नमू गजवदनु । गौरीहराचा नंदनु । सकळ सुरवरांचा वंदनु । मूषकवाहनु नमियेला ॥ अशी प्रार्थना त्यांनी केली आहे. गणेशाच्या आराधनेचे फळ सांगताना नामदेव म्हणतात...

सातवे रात्री मदनु शंभरे नेला ।
प्रद्युम्न समुष्ठामाजी टाकीला ।
तै कृष्णे विघ्नहरू पूजिला ।
प्रद्युम्न आला रतिसहित ॥

'ज्ञानमोदक' या ग्रंथाचे कर्ते आणि एक थोर गणेशभक्त गोसावीनंदन यांनी जे गणेशाचे आध्यात्मिक रूपक वर्णिलेले आहे, ते सुद्धा साधकांना आकर्षित करणारे आहे. गोसावीनंदनांचा गणेश निरहंकाराचा शेंदूर लावतो आणि वैराग्याचे वस्त्र नेसतो. सत्त्वगुणांचा मुकुट आणि सुखदुःखाची कुंडले घालतो. चारही पुरुषार्थाची कंकणे घातलेला गणेश स्वानुभवाच्या मूषकावर आरूढ झालेला आहे. मराठी सरस्वतातील हे विविध शैलीतील गणेश वंदन परंपरेने निर्माण झालेले आहे. गणपती हे दैवत केवळ विद्याध्ययन करणाऱ्यांचेच दैवत नाही. रंगभूमीवरील कलावंतांचेही ते अधिष्ठान आहे. मानवी जीवनात श्रद्धा, भक्ती, मांगल्य, कर्तव्यपरायणता, कलाविष्कार, विद्याभ्यास, शास्त्रावगाहन,म्हणून जे जे काही आहे त्या सर्वांविषयी अपरंपार निष्ठा निर्माण करण्याचे सामर्थ्य गणेशाच्या ठायी आहे. गणेशाचे स्वरूप काळानुसार बदलत गेले. या बदलत्या जीवनालाही त्याचीच प्रेरणा आहे. बदलत्या रूपातही ही देवता प्रत्येक युगात लोकमानसाशी एकरूप झालेली दिसते. समाजधारणेच्या संकल्पनांना पोषक आणि लोकसंस्थांच्या संवर्धनांना प्रेरक अशा गणेशाने प्राचीन काळापासूनच समूहमन जिंकलेले आहे. लौकिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही पूजनात या देवतेला अग्रपूजेचा मान प्राप्त झाला आहे. त्या श्रीगणेशाला, बुद्धिदात्याला एकाच कळकळीची प्रार्थना आहे की, या मातीतील संतांनी आणि सत्पुरुषांनी अपेक्षिलेली उच्च जीवनमूल्यांची आणि उदात्ततेची बीजे आमच्या हृदयात अंकुरावी; जेणेकरून सध्याच्या संभ्रमावस्थेतून आणि संक्रमणावस्थेतून आमच्या भविष्याचा मार्ग सुकर होईल.

---

# आधारवडांचे बोन्साय

## सुखात्म

डॉ. अविनाश भास्कर मोहरील
९४२३१२३९०६

आमच्या पिढीला खराखुरा आधार देणारा, कुटुंबातील सर्वांना एकमेकांशी बांधून ठेवणारा आमच्या कुटुंबातील शेवटचा आधारवड कोसळला. जुन्या काळात ज्याला खऱ्या अर्थाने कुटुंब संबोधले जायचे तशा पद्धतीचे माझ्या आईचे कुटुंब. ३ भाऊ, त्यांची एकूण १४ मुले, त्यांची मुले असे मिळून जवळपास ६०-७० जणांचे मोठे कुटुंब. यामधील तीन आजोबा व तीन आज्या या खऱ्या अर्थाने या कुटुंबाचे आधारवड होते. तीन वेगवेगळ्या घरांमध्ये जरी राहात असले, तरी त्यांच्या सर्व मुलांमध्ये व नातवांमध्ये एक प्रकारची छान एकरूपता होती. चुलत-मामे असा काही भेदच नव्हता. कारण या सहा मोठ्या आधारवडांनी हा संपूर्ण परिवार मजबुतीने धरून ठेवला होता. या सर्व पसाऱ्यामध्ये मतभेद नव्हते असे नाही, भांडणे नव्हती असेही नाही; असे सर्व असले, तरीही प्रसंगी सारेच एकत्र येऊन मनातील वाद संपवून छान एकत्रपणे नांदत होते. कारण या सर्वांना तसे करायला भाग पाडत होते हे सहा आधारवड. नातीगोती जपण्याचे, त्यानुसार सर्व आचार-उपचार करण्याचे कार्य ही मंडळी मोठ्या निष्ठेने करायची. खरे तर फार काही उल्लेखनीय कार्य त्यांनी कुणीही केले नव्हते. सामाजिक दृष्टीने अगदीच अपवाद सोडला तर फार मोठे योगदान कुणाचेही नव्हते. परंतु आपल्या कुटुंबाचा बाज सांभाळण्याचे व त्या अनुषंगाने परिवाराला व त्याच्याशी निगडित सर्व परंपरांना सांभाळण्याचे कार्य मात्र त्यांनी मनोभावे केले. लोकांना या परिवाराशी जोडण्याचे कार्य त्यांनी केले. येणारे-जाणारे पाहुणे, त्यांचे आदरातिथ्य, त्यांना हवी ती मदत अशा प्रकारच्या माणसे जोडण्याच्या प्रक्रिया ही मंडळी मोठ्या जिव्हाळ्याने करायची. या सर्वांच्या वागण्याची एक विशिष्ट पद्धत होती व त्या पद्धतीचाच परिपाक म्हणून संपूर्ण परिवार त्यांच्या निमित्ताने मनाने जोडलेलाच राहायचा. आम्हा नातवांच्या मनात तर आमच्या बालपणीच्या रम्य आठवणी केवळ याच मंडळींच्या अशा सर्वांना जोडण्याच्या प्रवृत्तीमुळे अजूनही ताज्या आहेत. आमचे बालपण जे अतिशय रम्य व एकत्रितपणे नांदून आम्ही जगले, ते सारे काही कुटुंबाच्या आधारवडांमुळेच. आज त्या साऱ्या बाबींबद्दल नव्या पिढीला सांगितल्यास त्यांना त्या सर्व परिकथाच वाटतात. असेही जगणे असू शकते? भावंडे अशा प्रकारे इतके दिवस आई-वडिलांना सोडून केवळ आजी-आजोबांसोबत राहू शकतात? इतकेच काय, पण उन्हाळ्याच्या सुट्या अशा प्रकारे घालविल्या जातात, यावर त्यांचा विश्वासच बसत नाही. तो काळच वेगळा होता व त्या काळात कुटुंबाला घट्ट बांधून ठेवणारे मजबूत आधारवडही होते.

उन्हाळ्याची सुटी कधी लागते याची चातकासारखी वाट बघणे सुरू असायचे. आमच्या आईच्या त्या भल्यामोठ्या कुटुंबाची एक शाखा मेहकरजवळ नागापूर नावाच्या एका गावाला होती. आमचे एक आजोबा-आजी तेथे राहायचे. साधारण दोन वर्षांमधून एकदा आम्हा सर्व नातवंडांचा तेथे जाण्याचा बेत ठरायचा. गावातले ते भले मोठे घर, घराच्या अंगणात मोठे तुळशी वृंदावन, त्याच्या पलीकडे गोठा, त्यात गायी-म्हशी असा सगळा खटला होता. शेती होती, बैलगाड्या होत्या, रेंग्या होत्या, बैलांना नावे होती, आमराई होत्या. असे एकंदरीत जुन्या काळातील गावाला शोभणारे सारे काही तेथे होते आणि हे सारे सांभाळणारे आजी-आजोबादेखील होते. उन्हाळ्यात आम्ही साधारण १०-१२ नातवंडे त्या आजी-आजोबांकडे पोहोचायचो. सगळी धमाल असायची. घरच्या वरच्या बाजूला आजोबांनी आंब्यांचा माच लावलेला असायचा. मनात येईल तेव्हा तेथे चढायचे व वाटेल तेवढे आंबे खायचे. आंबे संपत आले की, आजोबा कधी त्या माचाची शिग भरून टाकायचे ते कळायचेच नाही. अंगावर डाग लागतील, कपडे खराब होतील अशा कोणत्याही बाबींचा विचार न करता रसाने माखून जाऊन आंबे खाणे चालायचे. मग तेथला मामा पोहणे शिकायला न्यायचा. मोठ्या विहिरीमध्ये गावातील पोट्टे पाट्टे (गावाकडचा विशेष शब्द) मस्त उड्या मारायचे. स्वीमिंग पूलमधील आता शिकवले जाणारे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण बघितल्यावर आम्हाला शिकविलेले स्वीमिंग म्हणजे रानटीच होते. विहिरीच्या काठावर मी व माझा भाऊ बसलो असताना मामाच्या एका मित्राने दोन बाजूने आम्हाला पकडून कपड्यांसकट पाण्यात मारलेली उडी, त्यानंतर नाकातोंडात गेलेलं पाणी आणि दूरवर असलेला लटकता दोर पकडण्यासाठी आम्ही दोघांनीही मारलेले हातपाय... आणि पोहणे जमले. दुसऱ्या दिवशी आपणहून वरून पाण्यात उड्या मारल्या. थकून परत घरी गेल्यावर आजीच्या हातचा गंजभर मस्त दहीभात क्षणात फस्त व्हायचा. जरासा वेळ जात नाही तर आजोबा आंबे माचून आमच्यासाठी रस करीत बसायचे. दुपारच्या वेळी घरात बसून कुणी पत्ते खेळणार, कुणी गोठ्यातील धांड्यांपासून चष्मे किंवा बैलगाड्या अशा छान छान वस्तू बनविणार, असे सारे घरात बसून खेळायचे खेळ चालायचे. उन्हे जराशी कलली की, मामासोबत बैलगाडीत बसून शेतात जायचे. बैलगाडी चालवायची, विटीदांडू खेळायचा व सायंकाळी घरी भूक लागली म्हणून ओरडत परत यायचे. वाढीच्या वयाची पोरे घरात आहेत म्हणून आजीने पुन्हा भले मोठे दडपे पोहे बनविलेले असत. ते फस्त केले की, मग सर्वांनी मिळून आजीसोबत शुभंकरोती व अथर्वशीर्ष म्हणायचे. ते आटोपले की, आजी रात्रीच्या स्वयंपाकाला लागायची. रात्री आम्हाला आवडतो तसा मऊ गुरगुट्या भात, मेतकुट आणि खास आमच्यासाठी आजीने बनविलेले लिंबाचे गोड लोणचे असा बेत. जेवण झाल्यावर वेध लागायचे ते म्हणजे रात्री अंगणात गाद्या घालून त्यावर लोळायचे आणि मग आजी गोष्ट सांगायची. टिपूर चांदण्याखाली आणि निद्रिस्त झालेल्या गावाच्या नीरव शांततेत आमच्यापैकी जवळपास सगळे गोष्ट ऐकता ऐकताच आजीच्या जवळच झोपी जायचो. जवळपास महिनाभर कधी या आजी-आजोबांकडे किंवा कधी त्या आजी-आजोबांकडे आमच्या सुट्या व्यतीत व्हायच्या.

वर वर बघता या सबंध प्रक्रियेत कुटुंबाचे हे आधारवड सकृतदर्शनी फार मोठ्या गोष्टी करायचे असे भासत नसेलही कदाचित; परंतु त्यांच्या या सबंध कामांमधून एक महत्त्वाची गोष्ट व्हायची, ज्याचे मोल आजच्या घडीला जास्त कळते. आम्हा नातवंडांसाठी हे सारे करत असताना त्यांनी आमच्या मनामध्ये त्यांच्याबद्दल जी अतूट ओढ निर्माण केली, त्यामुळे आम्हा सर्व भावंडांमध्ये एकत्रितपणाचा भाव निर्माण झाला. कुटुंबाला एका सूत्रात बांधून ठेवण्याचा तो मोठा प्रयास ही मंडळी करायची व तेच त्यांचे सर्वश्रेष्ठ योगदान होते. आज त्या आजी-आजोबांची जागा त्यांच्या पुढच्या पिढीतील लोकांनी घेतलीय. मग ते आता आधारवड नाहीत का, असा प्रश्न साहजिकच मनात येणार. तेदेखील आधारवडच आहेत, परंतु बदलत्या सामाजिक स्थितीमध्ये त्यांची मुळे घट्ट रुजण्यासाठी कसदार जमीन उरलेली नाही. असे महिनाभर आजी-आजोबांसोबत राहण्याची स्वप्नेदेखील मुलांना आम्ही पडू देत नाही. स्पर्धेच्या जगात आम्हाला आमच्या मुलांसाठी उन्हाळ्याच्या सुटीतही वेगवेगळे क्लासेस लावावे लागतात. जरासे मोठे झाले की, उन्हाळ्यातही त्यांच्या परीक्षा असतात. घरच्या महत्त्वाच्या कार्यक्रमांना मुलांना परीक्षा, क्लासेस इत्यादी व्यस्ततेमुळे नेता येत नाही तर मग आजी-आजोबांचा सहवास कसा लाभणार? पर्यायाने ओढ कशी निर्माण होणार? म्हणूनच आधारवड असूनही त्यांची प्रेममयी घनगर्द सावली कशी मिळणार, हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. अर्थात हे सारे कुणीही मुद्दाम करीत नाही तर बदललेली सामाजिक परिस्थितीच कौटुंबिक आधारवडांना बोन्सायच्या रूपात नेते आहे.

सध्याच्या जगात आधारवडांना जपण्याकरिता मन व जागा अपुरी पडत जाते आहे. त्यांचे बोन्साय होत आहेत. तरीदेखील संवेदनशील मनाच्या प्रत्येकाने जमेल त्यांची जपणूक करणे गरजेचे आहे. कारण आधारवड नसतील तर आपण सारेच पोरके होऊ.



---

# समृद्ध भारत

## प्रबंधांची बीजे

श्रीरंग श्री. हिर्लेकर
९४२२१११८९३

समृद्ध भारत म्हणताना केवळ आर्थिक वैभव इतका मर्यादित अर्थ अभिप्रेत नसून सर्वार्थाने समृद्धी असे आहे. आर्थिक संपन्नता होती म्हणून तर परकीय आक्रमकांनी ती अक्षरशः खरवडून काढली. इतके होऊनही गतवैभवाच्या अनेक खुणा आजही प्राचीन मंदिराच्या तिजोरीत आणि बंद दालनात दिसतात आणि त्या एखाद्या देशाच्या वार्षिक बजेटपेक्षा जास्त असतील. केरळच्या पद्मनाभम् मंदिराचे उदाहरण सर्वांना ज्ञात आहेच. मला अभिप्रेत असलेली संपत्ती मात्र निराळीच आहे. 'श्री' या शब्दाची व्यापकता विशाल आहे. त्यासाठी विष्णुसहस्रनामातील श्लोक अप्रस्तुत होणार नाही.

'श्रीवत्सवक्षा श्रीवास: श्रीपति: श्रीमतांवर:।
श्रीद: श्रीश: श्रीनिवास: श्रीनिधि: श्रीविभावन:।
श्रीधर: श्रीकर: श्रेय: श्रीमान् लोकत्रयाश्रय:॥'

विष्णू कसा, तर या इतक्या-इतक्या वैभवांनी युक्त. आर्थिक संपन्नतेसोबत बौद्धिक, प्रातिभ, वैचारिक, नैतिक, आध्यात्मिक, प्रापंचिक, भौतिक, साहित्यिक, कला या आणि अशा असंख्य गुणांनी आमची श्रीमंती ओसंडून वाहत होती. आम्ही सर्वार्थाने समृद्ध होतो. गतवैभवाचे कौतुक सांगण्याच्या नादात आम्ही वस्तुस्थिती विसरतो. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' या म्हणीप्रमाणे आमचे हसे होते. अतिशयोक्तीची उदाहरणे सांगायची तर अशी- व्हॉट्स्ॲपवर एक पोस्ट अनेकांनी निश्चितच वाचली असेल आणि तत्परतेने पुढेही पाठवली असेल. त्यात म्हटल्याप्रमाणे भीष्मांनी युधिष्ठिराला श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्र सांगितले. मात्र, काही दिवसांनी ते कोणालाच आठवेना. अशावेळेस सहदेवाजवळ म्हणे एक स्फटिक होता आणि त्यात ध्वनिमुद्रणाचा गुणधर्म होता. त्यात ते ध्वनिमुद्रित झाले होते. ते पुन्हा सर्वांनी ऐकले व नंतर व्यासांनी लिहून काढले. सारांश काय तर आमच्या पूर्वजांना ध्वनिमुद्रण तंत्र अवगत होते. रेकॉर्डरमध्ये स्फटिकाचा उपयोग असतो हे खरे, पण म्हणून फक्त एकटा स्फटिकच काही ध्वनिमुद्रण करत नाही. अजूनही काही आवश्यक असते. जर सहदेवाजवळ हे यंत्र होते तर लगेच प्रश्न उत्पन्न होतो की जगात काय असे एकच यंत्र होते? जर असेल तर गीता उपदेशाच्या दिवशी ते कोठे होते? कोविड उच्छादातसुद्धा या लोकांना एक संधी आढळली. कोरोना या शब्दाची मोडतोड करून अनेकांनी तो शब्द शिवपुराणात शोधला आणि लगेचच या संकटाची जाणीव आमच्या पूर्वजांना होती, अशा पोस्ट पसरवल्या.

हे कौतुक सर्वच क्षेत्रात आढळत असले, तरी वैद्यकीय, स्थापत्य या जिव्हाळ्याच्या आणि अंतराळ या कुतूहलाच्या विषयांत जरा जास्तच दिसते. आधुनिक वैद्यकाने टेस्ट ट्यूब तंत्र सांगताच कौरवांच्या जन्मांत अनेकांना त्याचे मूळ दिसले. धन्वंतरी, चरक, सुश्रुत, वाग्भट, शारंगधरांच्या विद्वत्तापूर्ण योगदानाने प्रत्यक्ष वेदाइतके महत्त्व प्राप्त केलेल्या आयुर्वेदाचा आम्हाला दैनंदिन आयुष्यात विसर पडतो आणि अवयवारोपण तंत्र समजले की, शंकराने गणपतीला हत्तीचे डोके चिकटवले; ही कथा आम्ही हौसेने सांगतो. अथर्ववेदातील कृमिनाशक सूक्तातील जंतूंमुळे आजार होतात. या उल्लेखांचे आम्हाला लुई पाश्चरनंतर स्मरण होते आणि हळदीचे पेटंट हातून जाऊ लागताच तिची आयुर्वेदप्रणीत महती समजते. कोणतेही नवीन वैद्यकीय तंत्र आले की, हे सर्व आमच्या ऋषींनी पूर्वीच सांगितले होते, असे गोडवे आपण गातो. नासाने अंतराळात काही नवीन सांगितले की, आम्हाला ज्योतिष आणि वेदांतील नक्षत्रकथा आठवतात आणि त्यांचा अन्वयार्थ नव्याने लावला जातो. पृथ्वी गोल असून ती सूर्याभोवती फिरते हे आमच्या ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट आणि लगध-वराहमिहिरांना ठाऊक असलेले सत्य, पण हा साक्षात्कार आम्हाला आजच का व्हावा? कॅलक्युलस किंवा गणितातील पाय आम्हाला माहीत असूनही आम्ही गप्प का बसतो? पायथॅगोरसची भूमिती दिसली की शूल्बसूत्रे आठवतात. बौद्धायन, भास्कराचार्य आणि वैदिक गणिताच्या सूत्रांचे स्मरण मुलांना ॲबॅकस शिकायला पाठवण्यापूर्वी का होत नाही? 'बळी तो कान पिळी' या डार्विनच्या सिद्धांताचे मूळ, उपनिषदातील 'जीवो जीवस्य जीवनम्' या शब्दांत आढळते. पण हे सर्व कधी तर डार्विननंतर. वनस्पतींना जीव असतो, भावभावना असतात, हे संस्कृत कवींच्या अद्भुत, रसिक आणि चिकित्सक बुद्धीने त्यांच्या विशाल साहित्यात जागोजागी लिहिलेच; पण महाभारतात भृगु आणि भरद्वाज महर्षींच्या विज्ञाननिष्ठ चर्चेनेही वनस्पती शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पंचविषयांचे ग्रहण त्यांच्या पंचज्ञानेद्रियांतून करतात, हेच सांगितले.

४ वेद, ६ शास्त्रे, १४ विद्या, १८ पुराणे, ६४ कला, शेकडो उपनिषदे आणि या सर्वांच्या शीर्षस्थ असलेले श्रीमद्भगवत्गीतेतील तत्त्वज्ञान, पतंजलींचे योगशास्त्र या सर्वांची महती काय सांगावी? आमची विचारपद्धती निवृत्तीपर होती असे कारण सांगितले जाते, पण तसे नसून आयुर्वेद, वृक्षायुर्वेद, हस्त्यायुर्वेद, संगीत आणि नृत्यकलेचा गांधर्ववेद, वात्सायनाचे कामशास्त्र, युद्धशास्त्र शिकवणारा धनुर्वेद, कुस्ती, व्यायाम आणि मल्लशास्त्र सांगणारे मल्लपुराण यांची समृद्धी बघितल्यावर आमचे जीवन किती बहुरंगी-बहुआयामी होते, हे ठळकपणे समजते. मात्र, १४० कोटी लोकसंख्या असूनही ऑलिम्पिक स्पर्धेत १४० सुवर्णपदके मिळविणारे खेळाडू गेल्या ७५ वर्षांत मिळत नाहीत हेही खरे. लाल मातीतील कुस्तीचे डावपेच आम्ही विसरतो आणि मॅटवरील कुस्तीत रंगतो. साध्यासोप्या व्यायाम पद्धतीला, सूर्यनमस्कारांना दूर सारून हेल्थ क्लबमधील आधुनिक व्यायाम उपकरणांची आम्हाला भुरळ पडते. निरामय आयुष्यासाठी आचार पद्धती सांगणारा आयुर्वेद विसरून आजारी पडल्यावर विदेशी उपचार पद्धती आम्हाला जवळची वाटते. आधुनिक वैद्यकशास्त्राने हात टेकले की आम्ही वैद्याचे पाय धरतो.



आधुनिक शास्त्राला अज्ञात अशा अनेक गोष्टी आम्हाला ज्ञात होत्या हे खरे; पण बाहेरच्यांनी संशोधन केल्यावरच आम्ही जागे होतो हेही खरे. अगस्तीचे रासायनिक विद्युतघट, भरद्वाजांची विमानविद्या आणि बरेच काही आमच्याजवळ होते, ही वस्तुस्थिती आहे. अणुस्फोट झाला की दचकून जागे होत कणाद महर्षींचा अणू दृष्टीसमोर तरळू लागतो. विदेशातील स्थापत्याची अद्भुत आश्चर्ये बघताना महाभारतातील मयसभा आठवते. निसर्गाच्या रौद्र शक्तीपुढे हजारो वर्षे टिकून राहिलेल्या विशाल, आखीवरेखीव, प्रमाणबद्ध आणि सूक्ष्म मोजमापांच्या आविष्काराचे दर्शन घडविणाऱ्या वेरुळ शिल्पांची रहस्ये न उलगडता, ते लुप्त ज्ञान पुन्हा प्रकाशात कसे आणता येईल, याचा विचार न होता आम्हाला पिकनिकमध्येच आनंद वाटतो. सिव्हिल इंजिनीअरिंग विषयात मयसंहितेचा अभ्यास का केला जात नाही? आमच्या धातुविज्ञानातील प्रगतीची साक्ष आज दिल्लीतील लोहस्तंभ ऊन-पावसाला दाद न देता शेकडो वर्षे उभा आहे. नालंदा विद्यापीठातील ग्रंथसंपदा परकीय आक्रमकांनी पेटवून दिली. ती संपदा इतकी मोठी होती की, आग सतत सहा महिने जळत होती. आमचे बहुतेक विचारवैभव जळून नष्ट झाले. उरलेसुरले ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञांनी त्यांच्या सोयीने बदलले. सुदैवाने जे थोडे वाचले त्याच आधारावर आम्ही पूर्वजांचे फक्त गोडवे गातो.

### काय चुकले यावर संशोधन व्हायलाच हवे

कोणत्याही शास्त्रात जगात काही नवीन दिसले की, हे सर्व ज्ञान आम्हाला होते, हे सांगण्यात धान्यता वाटते. मग इतके दिवस आम्ही काय करत आहोत? नेमका दोष कोठे आहे? अतोनात परकीय आक्रमणे झालीत हे खरे; पण आपण ती का सहन केली? हवा तसा प्रतिकार झाला नाही. कारण शुक्रनीती, कणिकनीती, कौटिल्याची राजनीती आणि पंचतंत्रातील कथा आम्ही आचरणात न आणता फक्त ग्रंथातच ठेवल्या. सहिष्णुता आडवी आली. 'शठं प्रति शाठ्यं' हे आम्ही विसरलो.

### रोगनिदान हे वैद्याचे इतिकर्तव्य नसून त्याने योग्य उपायही करावेत

शिक्षण क्षेत्रात स्वभाषेचे महत्त्व आम्ही समजून घेत नाही. 'संस्कृति संस्कृताश्रित:' संस्कृती ही संस्कृतच्या आश्रयाने राहते. शाकुंतल वाचून जर्मन पंडित गोएथे आनंदाने नाचला किंवा भारतापेक्षा जास्त संख्येने विदेशात संस्कृत विद्यापीठे आहेत, हे सांगताना आपणही संस्कृत शिकावे, अशी प्रेरणा काही घेत नाही. संस्कृत हीच संगणकाच्या आज्ञावलीकरिता सर्वात सोयीची आणि सुयोग्य भाषा आहे, हे संगणकतज्ज्ञ 'उर्ध्वबाहुविरोम्यश्च' असे उच्चरवाने सांगत असूनही आपल्याच अनेकांना ती मृत भाषा वाटते हे खरे दुर्दैव. झाले ते झाले, पण स्वातंत्र्यप्राप्तीचा हीरक महोत्सव करण्याची वेळ आली तरी आमची अनास्था संपली नाही. यामागे अनेक स्वाभाविक, सामाजिक आणि ऐतिहासिक कारणे आहेत हे खरे. अभ्यासक्रमात राष्ट्राभिमान निर्माण करता येईल, अशा शेकडो जागा आहेत. चिंतनातील तल्लीनतेचे उदाहरण म्हणून 'युरेका युरेका' म्हणत रस्त्याने नागडे पळणाऱ्या आर्किमिडीजच्या उदाहरणापेक्षा पाणिनीचे उदाहरण सांगायला हवे. शिष्यांसह जंगलातून जात असता अंगावर आलेला वाघ बघितला अन् त्याच्या व्यापक घ्राणेंद्रियावरून व्याघ्र शब्दाची व्युत्पत्ती शिकवताना वाघाने पाणिनीला खाऊन टाकल्याची कथा लिहायला हवी. भारताच्या सीमेवरून पराभूत होऊन पळालेला अलेक्झांडर हा जगज्जेता नसून पहिले बाजीराव हेच एकमेव अपराजित सेनापती, असे शिकवायला हवे. अभ्यासक्रमातील इतिहासाचे पुनर्लेखन करायला हवे.

### अच्छे दिन येत आहेत

जे काम स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्वरित सुरू व्हायला हवे होते त्याची सुरुवात आता होत आहे. 'राजा कालस्य कारणं।' राजाच्या आचरणावरून समाजाला वळण लागते. २०१४ पासून खूप काही बदलले. द्रष्ट्या आणि राष्ट्राभिमानी नेत्यांच्या हाती देशाची सूत्रे आली. भारतीय ज्ञानपरंपरा योजनेचा पुरेपूर उपयोग घ्यायला हवा. शेकडो नव्हे तर हजारो प्रबंध लिहिता येतील इतकी बीजे त्यात आहेत. गतवैभव पुन्हा प्राप्त होण्याची आशा आता पल्लवित झाली आहे. अपेक्षेपेक्षा थोडा उशीर होत असला, तरी पण पुन्हा एकदा सर्वार्थाने संपन्न भारत आपल्या हक्काच्या विश्वगुरुत्वपदी विराजमान होईल. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'इतिहासाची सहा सोनेरी पाने' हा ग्रंथ लिहिला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या शताब्दीपूर्वी सातवे पान लिहिले जावे.






# समरसतेचा गोपाळकाला!

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८



गोपाळकाला गोड झाला। गोपाळाने गोड केला ॥ च्या जयघोषात गोपाळकाला खाण्याचा आनंद काही औरच! लहानपणापासून प्रसाद म्हणून लाभणारा गोपाळकाला जसं जसं वय वाढत जातं तसा तो सर्वार्थाने अधिकाधिक आवडू लागतो. गोकुळाष्टमी आणि गोपाळकाला हे मनामनात रुजलेलं घट्ट समीकरण! पूर्वी प्रत्येक पदार्थ म्हणजे जणू त्या त्या सणावरचे निदर्शक असत. आतासारखे केव्हाही, कोणतेही पदार्थ चटकन केल्या जात नसत. विकत तर मुळीच मिळत नसत. त्यामुळे त्या सणांची खवय्येगिरीसाठीही खास ओढ असे. खरं तर गोपालकाला अगदी सहज करण्यासारखा पदार्थ! परंतु तो विशेषत्वाने राखला गेला तो कृष्ण जन्माच्या आनंदी सोहळ्यासाठी! कृष्णाच्या शिकवणुकीची आठवण ठेवून, तसे आचरण करण्यासाठी आपण सारे भारतीय आजही गोकुळाष्टमी श्रद्धेने साजरी करतो.

कृष्ण जन्माष्टमीस मातीचे सुंदर गोकुळ करणे म्हणजे जणू घरात मातीकामाची कार्यशाळाच भरत असे. सानथोर सारेच उल्हासाने सामील होत. बाळकृष्ण, यशोदा, गवळणी, सवंगडी, गायी-वासरे, कावळा, पुतना मावशी आणखी काय काय... इवल्या स्वरूपात अख्खं गोकुळच साकारलं जायचं. ज्वारी तसंच इतर धान्याचा वापर करून छान सजावटीने ते सजवण्यात घरातले सारे रंगून जात. बालमन मात्र काल्यात रमलेलं असे. उपवास ठेवून कृष्ण जन्माचा सोहळा रात्री बारा वाजता साजरा केला की, दुसऱ्या दिवशी बालगोपालांच्या मेळ्याने दहीहंडी फोडून सर्वांना हा प्रसाद दिल्या जायचा. त्याची चव मग कित्येक दिवस जिभेबरोबरच मनभर रेंगाळत रहायची.

गोपाळकाल्याचे वैशिष्ट म्हणजे तो कितीही आवडत असला तरी, आपल्याला मिळालेल्या काल्यातील थोडातरी काला दुसऱ्याला देऊन त्याचा गोडवा अधिक वाढवायचा. मोह कमी करण्यास शिकवण्याची किती नामी युक्ती पूर्वजांनी योजली असेल नाही का? गोपाळकाल्याचा प्रसाद एकमेकांना नमस्कार करत, देतघेत ग्रहण करण्याने नकळत देण्याच्या आनंदाची लयलूट होते. एखाद्याला जास्त मिळाला गोपाळकाला तरी तो पूर्ण सेवन न करता आधी त्याची नजर चोहिकडे भिरभिरते, शोध घेते. कोणी प्रसादापासून वंचित तर नाही ना! असल्यास त्याच्या हातावर थोडा प्रसाद ठेवल्यावर जो आनंद कृष्ण भक्ताला होतो तो अवर्णनीयच! सर्व वयोगटातील सर्व स्तरातील प्रत्येक जण समान भावनेने याचा आनंद घेतात. हीच खरी गोपालकाल्याची ताकद आहे. सर्वजण तितक्याच श्रद्धेने एकमेकांशी सलोख्याने वागत सर्वांभूती परमेश्वर हा भाव जागृत ठेवतात. यातूनच समाजमनात समतेची बीजे रोवली जातात. म्हणूनच आनंदाचे डोही रंगण्यासाठी, सामाजिक ऐक्यासाठी कीर्तन महोत्सवाचा शेवट नेहमीच काल्याच्या कीर्तनाने करतात. शिवाय ज्ञानेश्वरी, दासबोध, भागवत इत्यादी ग्रंथांच्या पारायणाची समाप्ती काल्यानेच करण्याची पद्धत रूढ झाली आहे. वारकरी संप्रदायाच्या वारीची सांगतासुद्धा गोपाळकाला करूनच होते. त्यात कितीतरी घरच्या लाह्या, पोहे, लोणचे यांची भर पडते. घरोघरी खास काल्यासाठी लोणचे बाजूला काढून ठेवले जाते. आपल्याकडचे थोडे तरी लोणचे गोपाळकाल्याच्या नैवेद्यात असणार आहे, या भावनेने त्या गृहिणींचा आनंद गगनात मावेनासा होतो. तिथे जातीभेदास थारा नसतो, सारेच भक्तिपंथी रममाण असतात. ही परंपरा आपल्या संस्कृतीची उदात्तता दर्शविते. श्रीकृष्णाने शिकवलेल्या समतेच्या प्रांगणी सारे फुगड्या खेळत, त्याची आराधना करतात.

गोपालकाला हा केवळ प्रसाद नसून सामुदायिक ऐक्याचे अधिष्ठान आहे. कृष्णाच्या शिकवणूकीची आठवण करून केलेला एक भक्तीआनंदाचा सोहळा आहे. भगवान श्रीकृष्ण हे आपल्या छोट्या लीलांमधून मोठा आशय दर्शविणारे जीवन मार्गदर्शक ठरतात. श्रीकृष्णाला देवाचा अवतार मानलं गेलं आहे तरी, सर्वांना तो आपल्यातलाच एक वाटत असतो. कृष्ण कळायला हवा असेल तर, त्याच्या लीलांमध्ये रंगून जाता आलं पाहिजे. होय ना! हे रंगणं सहजतेने होण्यासाठी गोपाळकाला एक प्रतीक होय. गायी चरायला घेऊन जाणारे बाळकृष्णाचे सगळे सवंगडी आपापली शिदोरी सोबत आणत असत. 'आणिती शिदोऱ्या आपापल्या,

***जया जैसा हेत तैशा त्या चांगल्या,***
***शिळ्या विटक्या भाकरी, दही भात लोणी,***
***मेळवोनी मेळा करी चक्रपाणी,***
***एका जनार्दनी अवघ्या देतो कवळ,***
***ठकविले तेणे ब्रह्मादी सकळा'***

आपल्या सवंगड्यांपैकी कोणातच न्यून भाव निर्माण होऊ नये म्हणून, गोपाळकृष्ण सर्व शिदोरी एकत्र करून त्याचा काला करून आपल्या कृपेचे नवनीत दही-दूध त्यात मिसळायचे. एक घास स्वतः खावून साऱ्यांना भरवायचे. एकमेकांना भरवण्याचा आनंद घेत गोपालकाला कसा पटकन संपायचा कोणाला कळायचे नाही. मग तिथे गरीब श्रीमंत वा इतर कोणता असा भेद कुठे उरणार ना!

कोणाची रात्रीची भाकरी, कांदा, चटणी तर कोणाचा दहीभात, कोणाचे लोणी तर कोणाचे लोणचे कृष्ण स्पर्शाने त्याला अमृताची चव येई. ती अवीट गोडी चाखायला देवलोकातून देवही येत असत. एखाद्याला एक शीत मिळाले तरी, ते स्वतःला भाग्यवान समजत असे. अशी या गोपाळकाल्याची महती आहे. आपण सारे परमेश्वराची एकसारखीच लेकरं आहोत. हीच शिकवण कृष्णाने आपल्याला त्याच्या या कृतीतून दिली आहे. ऐक्यभाव, संघटन, सहकार्य, बंधुत्व, समता यांचे महत्व शिकविणाऱ्या दहिहंडी आणि गोपाळकाल्याचा आनंद घेताना, भावी पिढीत खरे मूल्य रुजवण्याची जी गरज आहे ती आपण निश्चितच यातून पूर्ण करू शकू. फक्त तसा दृष्टिकोन विकसित केला की काम फत्ते!

जर आपण सर्वांनी एकजूट होऊन कृष्णासारखा स्नेहप्रेमाने गंधाळलेला खराखुरा समरसतेचा गोपालकाला अनुभवला तर चोहिकडे आनंदी आनंदच दुथडी भरून वाहू लागेल. श्रीकृष्णाने प्रस्थापित केलेल्या मार्गावर पाऊल ठेऊन, आपण सारे समाजातील अपप्रवृत्तींच्या विरोधात ठामपणे उभं राहू या ! तीच खरी दहीहंडी असेल नाही का? एकजुटीच्या लोण्याचा स्नेहस्निग्ध गोळा साऱ्यांनाच अनुपम गोडवा देऊन जाईल.

समता, बंधुता, एकात्मता याचे प्रतीक म्हणून जेव्हा आपल्याला गोपाळकाल्याकडे बघता येईल तेव्हा, भारतीय ऐक्याचे अनोखे दर्शन जगास घडवू शकू. कृष्णाने काल्यातून साऱ्या विश्वाला समता-समानता म्हणजे काय ते दाखवून दिले आहे. चला तर आपण सारे मिळून गोपाळकाल्याचा आनंद घेऊ या!

## चिंतन

रविबाला काकतकर/ ७४९८४५०४७५

# मर्यादित धारणा आणि समज कसे बदलावेत?

'मी इंग्लिश नीट बोलू शकत नाही, एकटी प्रवास करू शकत नाही, व्यासपीठावरून बोलायला भीती वाटते,' अशी विविध स्वसंवादात्मक, आपल्या क्षमता मर्यादित करणारी वाक्ये आपण अनेकदा स्वतःशी बोलत असतो. विल्यम्स जेम्स हा प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ म्हणतो स्वतःमध्ये बदल घडवायचे असतील तर आपल्या स्वसंवादात बदल करा. सतत नकारात्मक वाक्ये आपण आपल्याशीच बोलत राहतो तेव्हा आपले अंतर्मन त्यावरच विश्वास ठेवते. आपले सुप्तमन शब्द हे शब्दशः घेत असते. त्यामुळे आपण त्यावरच पूर्ण विश्वास ठेवून आहे तसेच, राहतो किंवा तसेच बनत जातो. यातून स्वतःसाठी मर्यादित धारणा किंवा समज घडतात. यातून बाहेर पडण्यासाठी नवीन स्वसंवादात्मक वाक्ये अतिशय काळजीपूर्वक बनवणे



आवश्यक असते. सर्वप्रथम 'मला यातून बाहेर यायचे आहे का?' हा प्रश्न स्वतःला विचारणे अत्यावश्यक होय. त्याचे उत्तर,'होय नक्कीच' असे असेल तर पुढचा प्रवास संयुक्तिक ठरेल. ही प्रक्रिया जाणून घेऊ या. केवळ नवीन सकारात्मक वाक्ये म्हणणे पुरेसे नसते. त्यावर विश्वास बसणे गरजेचे असते. त्यासाठी काही उपाय! स्वतःच्या ज्या धारणा सीमित मानतो, त्यालाच आव्हान देण्यासाठी, आपण नेमकी हीच क्षमता किंवा कौशल्य याआधी केव्हा वापरलं आहे याचा शोध घेणे. 'मी इंग्रजी बोलू शकत नाही' या वाक्याचे खरे-खोटेपणा तपासण्यासाठी बघावे की, मोडके तोडके का होईना थोडे इंग्रजी वापरून माझे काम मी याआधी कधी केले आहे? एखाद्या अमराठी माणसाला कधी प्रश्न विचारला होता? उदाहरणार्थ 'अ टिकिट फॉर पुणे' किंवा 'धीस ट्रेन व्हेअर इट गो' वगैरे काहीही, प्राथमिक म्हटल्यानंतर त्या माणसाला ते कळलं होतं आणि माझं काम झालं होतं का? कधी अमराठी मित्र-मैत्रिणीशी संवाद साधला होता आणि 'अरे मी थोडं का होईना पण इंग्रजी बोलू शकतो,' हे मला समजलं होतं. असे पुरावे स्वतःसाठी लिहून काढावेत. दुसरं वाक्य-'मी एकटी प्रवास करू शकत नाही'. स्वतःलाच विचारावं, प्रत्येकच वेळी मला बाहेर जाताना कोणी बरोबर लागलं का? भाजी आणायला कधी एकटी जाऊ शकले, काकूकडे, मैत्रिणीकडे एकटी घराबाहेर पडले. म्हणजे नेहमीच अजिबातच कायमच मी या गोष्टी करू शकत नाही, असं आहे का? मी व्यासपीठावरून नाही पण, चार लोकांसमोर माझी मते, विचार कधी मांडू शकले होते? या सर्वांची उत्तरे होय असतील तर, आपल्यालाच जाणवेल की, प्रत्यक्षात वास्तव वेगळे आहे. मी जर याआधी आठ-दहा लोकांसमोर प्रभावीपणे बोलू शकलो होतो तर, व्यासपीठावरून १०० लोकांसमोरही बोलू शकेन. यामुळे, पुराव्यांनीशी मी आता

> **केवळ नवीन सकारात्मक वाक्ये म्हणणे पुरेसे नसते. त्यावर विश्वास बसणे गरजेचे असते. त्यासाठी काही उपाय! स्वत:च्या ज्या धारणा सीमित मानतो, त्यालाच आव्हान देण्यासाठी, आपण नेमकी हीच क्षमता किंवा कौशल्य याआधी केव्हा वापरलं आहे याचा शोध घेणे.**

स्वतःलाच सिद्ध करू शकलो की, आधी जे नकारात्मक बोललो त्यात फक्त ५० टक्केच सत्य होतं. मी तेच नकारात्मक जर सतत बोलत राहिल्यामुळे त्यातून बाहेरच येऊ शकत नव्हतो. यासाठी माझी प्रगती होईल, असे नवीन स्वसंवादाचे वाक्य आवश्यक ठरेल.' मी उत्तम इंग्रजी बोलू शकते, मी सहजपणे एकटी प्रवास करू शकते, मी व्यासपीठावरून प्रभावीपणे बोलू शकतो,' इत्यादी! आता जाणवेल की, या नव्या वाक्यातदेखील ५० टक्केच सत्य असेल. मग आपणच विचारायचं की, कुठल्या वाक्याचा भडीमार माझ्या अंतर्मनावर करणे मला उपयुक्त असेल? अर्थातच, नव्या सकारात्मक वाक्याचा! यासाठी नवीन वाक्य प्रभावी, नेमकं समर्पक हवं. वर्तमानातील हवं. त्यात 'मी' हा शब्द हवा. ही नवी वाक्ये सतत स्वतःशी उच्चारत राहिल्यामुळे जे मी करू वा बनू इच्छितो यासाठी, मी आता करून तर बघतो, या मानसिकतेपर्यंत पोहचतो आहोत. आपल्या विचार आणि कृती त्या दिशेने आपोआप घडू लागतील. इंग्रजीत या वाक्यांना अफर्मेशन्स म्हणतात. जीवनात जे जे करण्याची इच्छा आहे पण, करू शकत नाही त्या प्रत्येक बाबीसाठी ही प्रक्रिया उपयुक्त ठरेल. त्यासाठी हा नवा प्रवास अनुभवायलाच हवा.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# गोपाळकाला गोड झाला...

**काल्याचे कीर्तन**

बारसे हा आपल्या संस्कृतीच्या सोळा संस्कारांपैकी एक संस्कार आहे. बाळाचा जन्म झाला, त्याचं बारसं झालं, नाव ठेवलं. गोकुळात काय स्थिती होती?

***गोकुळीच्या सुखा, अंतपार नाही देखा।***
***बाळकृष्ण नंदाघरी, आनंदल्या नरनारी ॥***
***गुढिया तोरणे, करिती कथा भक्ती गाणे।***
***तुका म्हणे छंदे, येणे वेधिली गोविंदे ॥***

श्रीकृष्णाच्या आगमनाने आनंदी झालेलं गोकुळ श्रीकृष्णाच्या भोवती फिरत होतं. श्रीकृष्ण बाळ हळूहळू मोठं झालं आणि त्याच्या खोड्या वाढल्या. त्याच्या बाललीला वाढल्या. पुढे तो कांबळीवाला झाला आणि काठी घेऊन गोधन चारायला जाऊ लागला. त्याचे अनेक सोबती होते गरीब-श्रीमंत ! सगळेच त्या ठिकाणी सारखे होते.सर्वांची शिदोरी एकत्र करून ते खात, तोच गोपालकाला!

पुढे हा गोपालकाला वारकरी संप्रदायात प्रमुख ठरला. कीर्तन करून हा गोपालकाला केला जाई. काल्याचे किर्तन म्हणजे कृष्णाच्या बाललीला! गोकुळाष्टमी आणि दहीहंडी उत्सवाशी संबंधित असलेले कीर्तन, कृष्णाच्या विविध कथा भक्ती आणि तत्वज्ञानावर आधारीत-असे हे किर्तन असते. काला हे वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य आहे. श्रीकृष्णाने यमुनेच्या वाळवंटामध्ये गोपाळांबरोबर जो काला केला, अगदी तसाच काला वारकरी संप्रदायात केला जातो. जीवा-शिवाचे ऐक्य सांगणारे काल्याचे किर्तन म्हणजे प्रसन्नतेचे कीर्तन! काला हे त्याग, समर्पण, विश्वास असे परिपूर्णतेचे कीर्तन आहे. सामान्य माणसाला प्रसाद हा काल्याच्या कीर्तनातून मिळतो. वाळवंटात केलेला काला, भगवान कृष्णाच्या चारित्र्याचा विचार म्हणजेच काला !

काल्याचे वाङ्मयात तीन प्रकार आहेत. दहीभात, अभेद आणि काला ! असे हे तीन प्रकार असून, काल्याच्या कीर्तनात तीन प्रकारचे अभंग घेतले जातात. बाळक्रीडा, गवळण आणि काला! दुसऱ्यांना खाऊ घालण्याची भारतीयांची संस्कृती यात आहे. भगवान कृष्णाच्या अवतारात परिपूर्णता आहे. कृष्ण म्हणजे काळा, कृष्ण म्हणजे आकर्षित करणारा असेही कृष्ण शब्दाचे अर्थ होतात.

वैकुंठामध्ये सर्व काही आहे पण, काला नाही. म्हणून, तो अवीट असणारा काला खाण्याकरता आम्ही पुन्हा वैकुंठातून मृत्यूलोकात परत येऊ, असं प्रत्यक्ष देव म्हणतात. वाळवंटाचे तीन गुण आहेत. बरे, नीट आणि उत्तम! काल्यात भारतीय संस्कृती बघायला मिळते. स्वतः जेवणे ही प्रकृती, दुसऱ्यांचे हिसकावून घेणे ही विकृती आणि दुसऱ्यांना जेऊ घालणे ही संस्कृती ! काल्याचा विषय हा श्रीकृष्णाचे चरित्र, काल्याचे ठिकाण वाळवंट, काल्याचा देव श्रीकृष्ण, काल्याचे भक्त गोपाळ! देव भक्तीचे अवीट सुख! श्रीकृष्णाने यमुनेच्या वाळवंटात केलेला काला देऊन सर्व गोपालांना तृप्त केले.

गोपालकाला ज्याला दहीहंडी असे म्हणतात, हा श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जाणारा उत्सव आहे. महाराष्ट?ात विशेषत्वाने गोविंदा चमू मानवी मनोरा तयार करून, दही-लोण्याचे माठ फोडतात.

कृष्ण जयंतीच्या उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट



प्रसादालासुद्धा गोपालकाला असं म्हणतात. या व्यतिरिक्त वर्षभरात जेव्हा काल्याचे किर्तन होते, तेव्हा कीर्तनानंदात गोपाल काला होतो. म्हणून याला गोपालकाल्याचे कीर्तन म्हणतात. ज्ञानेश्वरी किंवा दासबोधाचे पारायण, अनेक दिवस चालणाऱ्या एखाद्या ग्रंथ वाचनानंतर, एक्का, एकादशीचे पारणे, कीर्तन महोत्सव, अशावेळी शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन होते. वारकरी संप्रदायात वारीची सांगता गोपालकाला करूनच होते.

गोपाल म्हणजे गाईचे पालन करणारा आणि काला म्हणजे एकत्र मिसळणे, कालवणे! पोहे, ज्वारीच्या-धानाच्या लाह्या, लिंबाचे किंवा आंब्याचे लोणचे, दही/ताक, चण्याची डाळ, साखर, फळांच्या फोडी इत्यादी मिळून काला तयार केला जातो. श्रीकृष्ण आणि सर्व सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा काला तयार करीत आणि सर्वजण वाटून, स्वतः भगवान आवडीने खात असे मानतात.

गोपालकाला म्हणजे पांढऱ्या रंगाच्या पाच रसात्मक स्वादांचा जास्तीत जास्त प्रमाणात, निर्गुण चैतन्याशी संबंध दर्शविणारा व पूर्णावतारी कृष्णकार्याचे दर्शक असलेला समुच्चय ! काला हा शब्द एकसंध व सातत्य असणाऱ्या क्रियेशी संबंधित आहे. श्रीकृष्णाच्या वेदांगी पूर्णकारी कार्याचे प्रतिनिधित्व करतो. पोहे दही, दूध, ताक, लोणी हे प्रमुख पाच घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत. पोहे हे वस्तुनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक म्हणजेच श्रीकृष्णाला धरून ठेवणारे त्याचे सवंगडी ! दही म्हणजे वात्सल्य भावातून प्रसंगी शिक्षा करणाऱ्या मातृभक्तीचे प्रतीक आहे. दूध म्हणजे गोपींच्या सहज, सगुण आणि मधुरा भक्तीचे तर ताक हे गोपींच्या विरोध भक्तीचे प्रतीक आहे. लोणी हे सर्वांच्या श्रीकृष्णावरील अद्वैत प्रेमाच्या निर्गुण भक्तीचे प्रतीक आहे. या दिवशी ब्रम्हांडात कृष्णतत्त्वाच्या आपतत्वात्मक प्रवाही गतिमान लहरींचे आगमन होते. काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात.

शरीर व मन यांना पोषक असे या दिवशी वायुमंडल आपतत्वाने भारित असल्याने, देहातील पंचप्राणांच्या वहनाला पोषक असल्याने, मनाला उत्साह देणारे व देहाची कार्यक्षमता वाढविणारे असते. कीर्तनामध्ये मधोमध एक छोटीशी दहीहंडी टांगली जाते. त्याला एक मातीचे गाडगे बांधले जाते. त्यात थोड्याशा लाह्या आणि दही असतं. कुठले तरी वारकरी आपल्या टाळानेच ते गाडगे फोडतात आणि 'गोपालकाला गोड झाला, दैवी होता त्याला मिळाला'

हा गजर करतात आणि त्यानंतर गोपालकाल्याचं भजन होतं. एक भजन आपण बघू या.

***चला बाई पांडुरंग पाहू वाळवंटी।***
***मांडीयेल्या काल्या भवती गोपाळांची दाटी ॥***
***आनंदे कवळ देती एका मुखी एक।***
***म्हणती सानथोर अवघे सकळीक ॥***
***हमामा हुंबरी पोवा वाजविती मोहरी।***
***घेतलासे फेरा माजी घालुनिया हरी ॥***
***लुब्धल्या नरनारी अवघ्या पशुजाती।***
***विसरल्या देहभान शंका नाही चित्ती ॥***
***पुष्पांचा वर्षाव झाला आरतीयांची दाटी।***
***तुळशी गुंफोनिया माळा घाली कंठी ॥***
***यादवांच्या गोपी मनोहर कान्हा।***
***तुका म्हणे सुख वाटे मोहुनिया मना ॥***

तर असे हे गोपालकाल्याचे कीर्तन किंवा भजन! आजच्या पिढीला किमान काही शब्द कळावेत, म्हणून हा लेखनप्रपंच आहे. या संबंधात अनेक कथाही आहे.

मात्र, स्वानुभवाने एक गोष्ट इथे सांगते. मंदिरात वगैरे अनेक वेळा मोठ्या प्रमाणात काला कालवण्याचे काम करण्याचे भाग्य मला लाभले. गावातल्या अनेक घरांतून काल्याचं सामान येतं. ते काही एकदम एकत्र येत नाही. तेव्हा आलेली प्रत्येक वस्तू/मग ते ताक-दही असो, पोहे असू देत किंवा लोणचे! काल्याच्या चवीत तसूभरही फरक पडत नाही. तो तेवढाच अप्रतिम लागतो. आणखी एका काल्याच्या गीताच्या काही ओळी सांगते.

***श्रीकृष्ण म्हणे रे गड्या, पेंद्या वाकड्या***
***हाथर घोंगड्या, सोड गाठोड्या शिदोरीच्या***
***हरी करितो गोपालकाला, तीरी बसून यमुनेच्या***
***शिदोऱ्या सोडल्या पुऱ्या, भाज्या एकाच्या पुऱ्या, दहिभात***
***एकाच्या दिवस वरणात निंब रं, निंब रं शेवयावर***
***तूपसाखरीवरी दूध, एक सोडी भाकरीत पिठलं***

भगवंताचे सोबती अशा प्रकारच्या शिदोऱ्या आणायचे. श्रीमंत-गरिबाचा भेद मिटविण्यासाठी भगवंत सगळं एकत्र करून त्याचा काला करायचे. यासंबंधी आणखी एक कथा सांगितली जाते. हा देवांनाही दुर्लभ असलेला काला खाण्यासाठी एकदा इंद्रादिक देवांनी माशांचं रूप घेतलं आणि कालिंदीत लपून बसले. मात्र, सर्वज्ञ भगवंताने ते ओळखलं आणि आपल्या मित्रांना सांगितलं की, कोणीही काला खाऊन पाण्यात हात धुवायचे नाही. त्यासंबंधीची एक ओवी फार सुंदर आहे.

***एक शीत नका ठेऊ, हात घासा***
***हात घासा की, घोंगड्याला पुसा***

तर असा हा गोपालकाला! असं म्हटलं जातं की, उपवास असला आणि जर हातावर कुणी गोपालकाला घातला तर तो तसाच मुखात घालावा. टाकून देऊ नये. तुम्हीही आषाढी-कार्तिकी द्वादशी, जन्माष्टमी, तुळशीचे लग्न अशा समयी गोपालकाला खाल्ला असेलच. वर्षभर आपल्यासाठी राबणाऱ्या बैलांचा सण म्हणजे बैलपोळा! आज तान्हा पोळा! त्या बाळगोपाळांसोबतही आपण काल्याचा प्रसाद करू शकतो आणि श्रावण महिन्याची सांगता करू शकतो. बैलपोळा म्हटलं की झडत्या आठवतात. हाही प्रादेशिक साहित्याचा काव्यप्रकारच आहे. पुन्हा भेटूच काव्याच्या नवीन विषयासह !

www.tarunbharat.net
शनिवार, २३ ऑगस्ट २०२५
तरुण भारत आकांक्षा
छोटे उस्ताद

• भारताच्या साक्षरतेच्या इतिहासात एक प्रेरणादायक पर्व उलगडलं आहे. "उल्लास" म्हणजेच अंडरस्टॅण्डींगलाईफलॉंग लर्निंग फॉर ऑल इन सोसायटी या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत मिझोरामने नुकतीच "पूर्णपणे साक्षर" राज्य म्हणून मान्यता मिळवली आहे. हे केवळ त्या राज्याचं नव्हे, तर संपूर्ण देशाचं यश आहे. साक्षरतेकडे जाणारी ही वाटचाल भारताच्या शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाची साक्ष देते. भारताच्या साक्षरतेची गरुडभरारी आता १२ टक्क्यांवरून ८० टक्क्यांपर्यंत पोहचली आहे.

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**

# नकलाकार लायर बर्ड




हॅलो?', 'कोण आहे रे तिकडे?' असे निरनिराळे आवाज काढणारे पोपट आपण नेहमीच पाहतो. पण, पक्षिजगतात असाही एक पक्षी आहे, जो रडणाऱ्या बाळाची हुबेहुब नक्कल करतो. कॅमेरा क्लिकचा आवाज करतो. घड्याळाच्या टिकटिकचा आवाज काढतो. कारचे हॉर्नचाही आवाज काढतो आणि झक्कास शीळ घालून मादीला आकर्षित करतो. ध्वनींचा ऑर्केस्ट्रा ठरलेल्या या पक्ष्याचे नाव आहे लायर बर्ड! मराठीत त्याला वीणा पक्षी असेही याला म्हणतात. याच्या हुबेहुब आवाज काढण्याच्या कलेचा तो स्वरक्षणासाठीही वापर करतो. लायर बर्डला जर स्वतःच्या जीविताला धोका वाटला तर समूहातील पक्ष्यांचा जसा एकत्रितपणे आवाजाचा कल्ला ऐकू येतो तसाच आवाज काढून जणू तो दाखवून देतो की, मी एकटा नाहीये! असं म्हणतात की, तो मानवाचाही आवाज काढून माणसाची नक्कल करतो. ऑस्ट्रेलियास्थित लायर बर्डस्??ना तीन सिरिंजल स्नायू असतात. आवाज काढण्याची क्षमता या स्नायूंमुळे निर्माण होऊन लायर बर्ड त्याचा वापर करतो. नर लायरबर्ड मादीपेक्षा लांब आणि मोठा असतो. त्याचे पंख आणि शेपटी लांब असून आकर्षक असते. अतिशय सुंदर पक्षी असलेला हा लायरबर्ड नृत्य करतो. अन्य पक्ष्यांचे गाणे, कुत्र्यांचे भुंकणे, कारचे हॉर्न, सायरन आणि अगदी मानवी आवाजाचीही नक्कल करण्याची त्याची खासियत आहे. जगातील सर्वात सुंदर पक्ष्यांपैकी एक असलेला लायर बर्ड साधारणपणे ऑस्ट्रेलियातच आढळतो. हिवाळ्याच्या दिवसात नर पक्षी मादीला रिझवण्यासाठी शिट्टीचा आवाज काढतो. मादी केवळ एकच अंडं देते. ५० दिवसपर्यंत उबवल्यानंतर त्या अंड्यातून पिल्लू बाहेर येते. नंतर मादीच त्या पिलाची काळजी घेत मोठंही करते. कीटक, गांडुळे, कोळी आदी लायर बर्डचे आवडते खाद्य आहे. तो एक लाजाळू पक्षी आहे. त्यामुळे, तो सहजासहजी दिसत नाही. केवळ आवाजावरूनच त्याची ओळख पटते. तपकिरी रंगाचा लायरबर्ड आपल्या माथ्यावर रंगीबेरंगी आणि वळलेल्या शेपटीच्या पंखांमुळे अधिक सुंदर दिसतो. नराच्या शेपटीचा आकार वीणेसारखा असल्यामुळे या पक्ष्याला मराठीत वीणा पक्षी म्हणून ओळखतात.

**नर लायरबर्ड मादीपेक्षा लांब आणि मोठा असतो. त्याचे पंख आणि शेपटी लांब असून आकर्षक असते. अतिशय सुंदर पक्षी असलेला हा लायरबर्ड नृत्य करतो.**

## Math Puzzle

*Convert below upward pyaramid into down ward pyramid. You can move only 3 circles for this.*





Previous Word puzzle Answer
: Brother

## मजेदार चौरस

• खाली दिलेल्या चौकोनातील पहिल्या ओळीत वाहतूकीच्या साधनांचे वेगवेगळे चिन्ह दिलेले आहेत • उरलेल्या अन्य रिकाम्या चौकोनात हे चिन्ह अशाप्रकारे लिहावयाचे आहे की प्रत्येक ओळीत प्रत्येक चिन्ह केवळ एकदाच येईल • प्रत्येक आडव्या, उभ्या आणि तिरप्या ओळीत हे चिन्ह

**वाहतूकीचे नियम पाळा व अपघात टाळा**



## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२**



**भाग ७**

# काई आणि माओ

चीनमधील शांघाय शहराच्या जवळच्या खेड्यात हांग नावाचा शेतकरी रहात होता. त्याला तीन मुले होती. शेंग, योंग आणि काई. काही कारणाने तो कर्जबाजारी झाला. त्याला शेती विकणं भाग पडलं. त्याने पिठाची गिरणी चालवायला सुरूवात केली. अचानक त्याची प्रकृती बिघडली आणि तो स्वर्गवासी झाला. शेंग, योंग आणि काई तिघे तरुण होते. शेंगनं आपल्या वडिलांची गिरणी चालवायला सुरूवात केली. योंगनं, वडिलांनी पाळलेलं गाढव घेतलं. त्याच्या पाठीवर ओझं लादून पैसे मिळवायला सुरूवात केली. काईच्या वाट्याला घरात पाळलेला सोनेरी बोका आला. त्याचं नाव 'माओ' होतं.

सोनेरी केसांच्या माओला सिंहासारखी सोनेरी आयाळ होती. त्याचं शेपूट खूपच गोंडेदार होतं. बघितल्याबरोबर त्याची छाप पडत होती. त्याला माणसांची भाषा कळत होती.

'माओ, मला माफ कर राजा, मी तुला इतरांसारखं दूध, मासे नाही देऊ शकत,' काई म्हणत असे.

'काही हरकत नाही मालक. मी आपल्या शेंग दादाच्या गिरणीतले उंदीर खात जाईन. आपल्या घराच्या आवारातल्या पाली, सरडे, खारी खात जाईन. पण, मला एक वचन द्या. मी जेव्हा जे सांगेन, ते ते तुम्हाला ऐकावं लागेल. पहा कसं तुमचं नशीब बदलून टाकेन.' आपल्या लांब लांब मिशीवर ताव देऊन बोकोबा म्हणत आणि कामाला निघून जात. 'माओ, तू काय माझं नशीब बदलणार! तू तर छोटंसं मांजर आहेस, तू काय करामती करणार?' मनातल्या मनात पुटपुटत, काई गावातून फेरफटका मारत असे. माओ गिरणीत जाऊन कोपऱ्यात लपून बसत असे. डोळे मिटून मेल्याचं सोंग घेत गिरणीत पीठ खायला उंदीर आले की, त्यांच्यावर झेप घेऊन फस्त करीत असे. घुशी, पाली, सरडे, पक्षी अतिशय शिताफीनं पकडत असे.

'मालक तुम्ही मला एक काठी, मोठी पिशवी आणि माझ्या मापाचे गम बूट आणून द्या. माझी खात्री आहे, हा सौदा तुम्हाला महागात पडणार नाही.' काईच्या मांडीवर बसत, आपली मान त्याच्या हाताला घासत, घशातून गुरगुरत माओ म्हणाला.'ठीक आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे करून बघायला काय हरकत आहे? त्यात काही फायदाही नाही आणि तोटाही नाही. हा माओ छोटा असल्यापासून फार हुशार आहे.' काईनं विचार केला त्यानं माओला, एक मोठी पिशवी, छोटी काठी आणि गम बूट आणून दिले. माओचे घारे आणि मण्यांसारखे डोळे चमकायला लागले. गमबूट घालून, काठीला पिशवी बांधून, माओ ऐटीत आपल्या दौऱ्यावर निघाला.

एका मोकळ्या वावरात सशांची खूप घरं होती. माओने काकड्या आणि लुसलुशीत पानं तोडून आपल्या पिशवीत ठेवली. आसपास बरेचसे गुबगुबीत ससे, मोकळेपणानं बागडत होते. माओ झोपेचं सोंग घेऊन तिथे पडून राहिला. एक सशाला कोवळ्या काकडीचा वास आला. माओ झोपला आहे असं समजून, त्यानं पिशवीत तोंड घातलं. माओनं तत्परतेनं दोरी आवळून सशाला पकडलं. सशाला घेऊन तो थेट राजमहालात गेला. राजेसाहेब विश्रांती घेत होते. माओनं राजाला त्रिवार मुजरा केला आणि अत्यंत विनम्रतेने म्हणाला, 'महाराज, आमचे मालक झिंग झँग झू यांनी, त्यांच्या शेतातला सर्वोत्कृष्ट ससा तुमच्यासाठी भेट म्हणून तुम्हाला पाठवला आहे.' 'तुझ्या मालकांना सांग, त्यांची भेट आम्हाला आवडली,' राजा म्हणाला. काईला 'झिंग झँग झू' हे नाव माओने दिले होते.

ज्या हुशारीने माओने ससा पकडला, त्याच शिताफीने त्याने, पोपट, बदक, कबुतर, खार, मोराचे पिलू, कासव असे विविध प्राणी-पक्षी पकडले आणि राजाला नजर केले. प्रत्येक वेळी, 'आपल्या मालकानं म्हणजेच झिंग झँग झू ने, आपल्यासाठी खास भेट पाठवली आहे.' हे सांगायला तो विसरत नसे. हा प्रकार दोन-तीन महिने चालला.

दरम्यानच्या काळात, राजा-राणी, राजकन्या आणि प्रधान सगळ्यांशीच माओची चांगली दोस्ती जमली होती. राजसेवकही त्याला सन्मानीय पाहुणा म्हणून चांगलाच मान देत.

या सगळ्या गोष्टींची काईला काहीच कल्पना नव्हती. तो आपल्या कामधंद्यासाठी काही व्यवसाय करायच्या खटपटीत होता.

'रस्ता रिकामा करा... कोणीही रस्त्यात थांबू नका. थोड्याच वेळात आपल्या महाराजांच्या खाशा स्वाऱ्या फेरफटका मारण्यासाठी आपल्या शाही रथातून, या रस्त्यावरून जाणार आहेत. सोबत राजकन्या आणि महाराणीसुद्धा असणार आहेत.'

महाराजांचे सेवक, रस्त्यावरून दवंडी पिटत जात होते. रस्त्यावर फिरणारे नागरिक बाजूला होऊन महाराजांचं दर्शन घ्यायला रस्त्याच्या कडेला उभे रहात होते. हुशार माओच्या डोक्यात काहीतरी कल्पना आली. तो धावतच घरी गेला. 'मालक, मालक लवकर माझ्याबरोबर चला. मी सांगतो तसं करा. म्हणजे तुमचं भाग्य उजळेल. चला, राजरस्त्याला लागून जी नदी आहे, त्या नदीत आंघोळ करत बसा. पुढचं सगळं मी बघतो.'

'अरे हा बोका मूर्ख आहे का? मला काहीही करायला लावतो! जाऊ दे, याचं ऐकावं. नाहीतरी, यात माझं नुकसान नाही आहे.' काईच्या मनात आलं. तो माओच्या पाठोपाठ राजरस्त्यावर गेला. कपडे काठावर ठेऊन, नदीत आंघोळ करू लागला. त्याच वेळी भरपूर घोडेस्वार, त्यानंतर महाराजांचा शाही रथ, त्यामागून पायी चालणारे सेवक असा ताफा राजरस्त्यावरून येताना दिसला. महाराजांचा रथ जवळ आला, तसा माओ रस्त्यावर येऊन जोरात ओरडला,'धावा धावा, माझे मालक, झिंग झँग झू, पाण्यात बुडताहेत, कुणीतरी त्यांना वाचवा. पाण्यातून बाहेर काढा.' महाराजांनी रथाच्या खिडकीतून बाहेर पाहिलं. माओ बोक्याला त्यांनी तत्काळ ओळखलं. त्याच्या मालकानं आपल्याला, बऱ्याच भेटी पाठवल्या होत्या, महाराजांना आठवलं. महाराजांनी रथ थांबवण्याची आज्ञा केली. सेवकांना बोलावलं, झिंग झँग झू यांना पाण्यातून वर काढण्याची आज्ञा केली.

राजसेवक काईला पाण्याबाहेर काढेपर्यंत माओ, रथाजवळ येऊन महाराजांना म्हणाला, 'काय करणार, अचानक खूप चोर आले. त्यांनी माझ्या मालकांच्या अंगावरचे भारी कपडे, मौल्यवान दागिने काढून घेतले आणि त्यांचा घोडा घेऊन पळून गेले. जाताना मालकांना पाण्यात ढकललं.' खरं तर माओनेच काईचे कपडे, नदीकाठावरच्या दगडाखाली लपवून ठेवले होते.

महाराजांनी सेवकांना सांगून काईसाठी भारी कपडे, मौल्यवान दागिने आणायला लावले. ते घातल्यावर काई फारच रूबाबदार आणि देखणा दिसायला लागला. महाराजांनी त्याला आपल्या शाही रथात बसायला सांगितलं. माओच्या मनाप्रमाणे सारं घडत होतं. तो रथाच्या, घोडेस्वारांच्या पुढे धावत होता. रस्त्याच्या दुतर्फा बरीच षेतं होती. तिथे बरेच मजूर, स्त्रिया काम करत होत्या. माओ त्यांच्याजवळ पोहोचला आणि म्हणाला,'हे पहा शहाण्या लोकांनो, आपले महाराज रथातून येत आहेत. ते तुम्हाला विचारतील, ही शेतं कुणाची आहेत? तेव्हा तुम्ही सर्वांनी झिंग झँग झू यांची आहेत असं सांगा. असं सांगितलं नाही तर तुम्हाला राजवाड्यात जाऊन फटके खावे लागतील.'

माओनं सांगितल्याप्रमाणे, महाराजांनी विचारल्यावर साऱ्यांनी झिंग झँग झू चं नाव सांगितलं. महाराज खुष झाले. त्यांनी काईला विचारलं,'तुमची बरीच शेती, जमीन जुमला दिसत आहे.' 'माझं कसलं महाराज, सारं तुमचंच आहे.' काईनं नम्र स्वरात उत्तर दिलं. महाराज आनंदले. सारा राजपरिवार, मोठ्या बगिच्यात वनविहार करण्यासाठी उतरला. त्याचवेळी माओ, तिथूनच जवळ असलेल्या जादुगाराच्या उंची महालात पोहोचला. माओनं चेहेऱ्यावर विनम्र भाव आणून, पहारेकऱ्यांला, आत जाऊन जादुगाराची भेट घ्यायची असल्याचं सांगितलं.

'आपण जगातले सर्वश्रेष्ठ जादूगार असल्याचं ऐकिवात आहे. आपण मोठ्यातला मोठ्या प्राण्याचं रूप घेऊ शकता का?' त्याने जादूगाराला विचारलं. 'अर्थात...दाखवू?' जादूगाराने हत्तीचं रूप घेतलं. माओनं खूप घाबरल्याचं सोंग घेतलं. परत माणसाचं रूप घेऊन जादूगाराने सात मजली हास्य केलं.'आता अगदी लहान म्हणजे उंदराचं रूप घेऊ शकता?' माओनं घाबरत विचारलं. जादूगारानं उंदराचं रूप घेतल्याबरोबर माओनं त्याला मटकावले.

इतक्यात महाराजांच्या खाशा स्वाऱ्या, जादुगाराच्या महालापाशी येऊन पोहोचल्या. माओ त्यांच्या स्वागतासाठी लगबगीने बाहेर गेला.'यावं यावं, झिंग झँग झूच्या महालात मी आपलं स्वागत करतो.' महाराज, महाराणी, राजकन्या आणि प्रधानजी सारे तिथलं वैभव पाहून खुश झाले. माओने तिथल्या नोकराचाकरांकडून शाही मेजवानीचं आयोजन करून घेतलं. 'आपल्या कर्तबगारीवर आम्ही बेहद खुश झालो आहोत. आपल्याला आमचा जावई व्हायला आवडेल?' महाराजांनी काईला विचारलं. 'मी स्वतःला भाग्यवान समजेन,' काई म्हणाला. थोड्याच दिवसात काईचा, राजकन्येशी थाटामाटात विवाह संपन्न झाला. महाराजांनी काईला आपल्या गादीवर बसवलं. काईनं माओसाठी राजदरबारात मानाचं खास पद तयार केलं. त्याची शाही तैनात ठेवली जाऊ लागली. आता हे माओराजे उंदराला घाबरवतात, खात मात्र नाहीत.

## प्रश्नसंच - २६




**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच क्र. २५ चे भाग्यवान विजेते

सलोनी कोकर्डेकर, रश्मी जोशी, वनिता सवाई, नम्रता तळपते, वसुधा सुवर्णपाठकी, उषा चौधरी, विजय मुळे, सतीश काळे, संजय काळे, सुरेखा वाणी, आरती कुळकर्णी, वेदिका जोशी, प्रसाद कावळे, क्षमा डोरले, जयश्री गोखले, नयना महाजन, वीणा कस्तुरे, राम कणीकर, मृदुला जोशी, वैष्णवी पाटील, शुभांगी सूर्यवंशी, स्मिता अंधारे, स्मिता खर्डीकर, श्रद्धा भारत, नीला धानोडकर, कविता दातार, प्रियंका मालशे, सुनिता जोगळेकर, रवींद्र धांडे, लता कुमरे, नारायण तायडे, रवींद्र टोंगळे, जयश्री डोईजड, शीला कुळकर्णी, डॉ.आनंद पळसोदकर, अनघा वाचासुंदर, सुहास खर्डीकर, संदेश पाटील, शर्वरी परब, सुनिता सोनारे, आशा पै, नीता कुलकर्णी, शीला पडोळे.

### प्रश्नसंच - २५ उत्तरे

१) सत्य २) सत्य ३) असत्य ४) सत्य ५) असत्य ६) असत्य ७) असत्य ८) असत्य ९) असत्य १०) सत्य

१) **तुझी भक्ती कळून आली । तू खुशालचंद असशी मुळी । तू राहू नको ये स्थळी । अपमान करण्या सद्गुरूंचा ॥**
अ) महाराज विठोबा घाटोळास ब) काही शिष्य पितांबरास क) दासगणू लोकांना ड) महाराज लक्ष्मणास

२) **तुम्हा गरज असेल जरी । तरी आणून घाला वारी । एक ब्रह्म जगदांतरी । ओतप्रोत भरले असे ॥**
अ) गजानन महाराज देविदास व बंकटलालास ब) बंकटलाल देविदासास क) महाराज दामोदरपंतास ) बंकटलाल दामोदरपंतांना

३) **आत्मा अवघ्यांचा आहे एक । तेथे न पडे कदा फरक । शरीरभेद व्यावहारिक । त्याचे कौतुक काही नसे ॥**
अ) दासगणू बाळाभाऊस ब) महाराज बाळाभाऊस क) महाराज बंकटलालास ड) महाराज भाकरे यास

४) **आता मात्र डोळे मिटिसी । कां रे देवा ब्राह्मणांविशी ? काय आहे लागली तुसी । गाढ निद्रा तेधवा ॥**
अ) महाराज पुंडलिकास ब) महाराज पांडुरंगास क) दासगणू महाराज परशुरामास ड) दासगणू गणपतीला

५) **मी म्हणतो तेच सांगा । पदरचे न घाला बघा । आमच्या वाक्यामाजी उगा । फरक तुम्ही करू नये ॥**
अ) दासगणू बंकटलालास ब) दासगणू निमोणकरांना क) महाराज सदाशिवास ड) महाराज झ्यामसिंगास

६) **त्याचकडे मजला न्यावे । वृत्त अवघे कळवावे । ते सांगतील ते ऐकावे। आपला हेका करू नका ॥**
अ) भास्कर कोणालातरी ब) जानकीराम बंकटलालास क) बाळाभाऊ पितांबरास ड) महाराज झ्यामसिंगास

७) **हेच हरीचे नामस्मरण । कां न केले मागे जाण । प्राण देहाते सोडून । जाता वैद्य बोलविसी ॥**
अ) महाराज भास्करास ब) दासगणू बंकटलालास क) महाराज माधवास ड) बाळाभाऊ रतनसास

८) **समर्थांचे तुम्ही भक्त । म्हणून तुम्हा आणिले परत । मानवाचे अवघे बेत । सिध्दीस जाणे अशक्य ॥**
अ) महाराज पुंडलिकास ब) बाळाभाऊ कंवरास क) दासगणू लोकांस ड) महाराज गोविंददासास

९) **त्या पिशाचे थोतांड । गावी माजले उदंड । त्याचा पाहिजे काढिला दांड । लोकां सावध करावया ॥**
अ) पाटील बंधू हरी पाटीलास ब) देशमुख पाटीलांना क) कृष्णाजी पाटील हरीस ड) पाटील बंधू भास्करास

१०) **मारुती रामरूप झाला । परी रामासन्निध नाही बसला । तो उभाच पहा राहिला । कर जोडुनी रामापुढे ॥**
अ) दासगणू लोकांना ब) पितांबर लोकांना क) महार महाराजांना ड) बंकटलाल भास्करास

## वारसा

**प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२**

# प्रतापी प्रतापगड

१० नोव्हेंबर १६५९ मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी/सप्तमी शके १५८१ रोजी महाराष्ट्रातील एक अद्वितीय राजकारण प्रतापगडी सफल झाले. रणदुल्लाखानाच्या शिकवणीत तयार झालेला व स्वतःच्या कर्तृत्वाने पुढे आलेला अफजलखान आणि जेमतेम तिशी गाठणारे शिवाजी महाराज यांचं हे युद्धकारण दक्षिणेच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे ठरले. महाबळेश्वरच्या निबिड अरण्याने वेढलेला हा दुर्ग पारघाट अन्? आंबेनळीच्या घाटाची राखण करीत होता. शिवरायांच्या चाणाक्ष नजरेने ही जागा अचूक हेरली. एका निर्णायक क्षणी जावळीच्या चंद्रराव मोरेची जुलमी चंदरराई शिवरायांनी नष्ट केली आणि हा बिकट मुलुख स्वराज्यात दाखल झाला. स्वराज्याची कक्षा विस्तारली. रायरीपासून वासोट्यापर्यंतचा मुलुख स्वराज्यात आला. स्वराज्याची सीमा थेट कोकणात समुद्रापर्यंत भिडली. आदिलशाही सत्तेचा महाड पोलादपूर कडचा राबताच तुटला. महाराष्ट्राच्या संरक्षणाचे ऐतिहासिक महत्त्व ज्या किल्ल्याने ओळखले आणि राखले त्या प्रतापगडाचे अनेक अर्थांनी महत्त्व आहे. रायगड, सिंहगड यासारख्या नामवंत किल्ल्यांत प्रतापगडाची गणना प्रामुख्याने केली जाते. त्याचे कारण हा किल्ला नावाप्रमाणेच अतिशय प्रतापी व शत्रूला अजिंक्य असा वाटत होता. शिवाजी महाराजांना जावळी खोरे जिंकल्यानंतर एक अजिंक्य किल्ला बांधण्याची आवश्यकता वाटणे, अपरिहार्यच होते. त्यांनी इ.स.१६५६ मध्ये मोरो त्र्यंबक पिंगळे यांना हा किल्ला बांधून घेण्यास आज्ञा दिली. १६५७-५८ मध्ये हा बुलंद किल्ला तयार झाला. प्रतापगडाचा काच सहन न झाल्याने, वाई प्रांताचा सुभेदार म्हणून अफजलखानाची शिवाजी महाराजांचं पारिपत्य करण्यासाठी नियुक्ती झाली. खाशा शहजादा औरंगजेबाचा ही पराभव करणारा हा कावेबाज, धोरणी, माहितगार सेनापती होता. वस्तुतः अफजलखानाची स्वारी हे त्या किल्ल्यावर एक आव्हान ठरावे, असेच होते. पण, शिवाजी महाराज व त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमापुढे आणि डावपेचांपुढे त्याचा टिकाव लागला नाही आणि शेवटी तो गड अफजलखानाच्या पराभवाने शिवाजी महाराजांना राखणे शक्य झाले. प्रतापगडचे युद्ध म्हणजे काळ-काम आणि वेगाचे गणित होते. खानवधाच्या अकल्पित घटनेतून आदिलशाही पूर्ण सावरण्याआधीच चंदन, वंदन, वैराट, वसंतगड आदी ठाणी जिंकून कराड, कोल्हापूर गाठून दुसरा तडाखा दिला गेला. दक्षिण महाराष्ट्राचा बुलंद किल्ला पन्हाळगडही जिंकला गेला. महाराजांना खऱ्या अर्थाने राष्ट्रीय किर्ती या प्रसंगाने मिळाली. या प्रकरणाने शिवाजी महाराजांचे नाव सबंध हिंदुस्थानात पसरले. हिंदुस्थानातील सर्व सत्ताधीशांना व युरोपियनांना यापुढे शिवाजी महाराजांची दखल घ्यावी लागली. या साऱ्या शिवगौरवाला साक्षी असणारा किल्ले प्रतापगड म्हणजे एक बुलंद आणि बळकट किल्ला आहे.



१६५९ ते १८१८ या प्रदीर्घ कालखंडात १६८९ मधील काही महीन्यांचा कालावधी सोडला तर हा किल्ला शत्रूला कधीच मिळाला नाही.

महाड पोलादपूरकडून किंवा वाई महाबळेश्वरकडून आलं की, कुंभरोशी किंवा वाडा नावाचं छोटं गाव लागतं. गडाच्या आग्नेय दिशेला पार नावाचा खेडं आहे. दोन्ही गावांमधून प्रतापगडावर जाता येतं. तीनशे मीटर लांब आणि चारशे मीटर रुंदीचा काहीसा फुलपाखराच्या आकाराचा हा छोटेखानी किल्ला आहे. दक्षिणेच्या टेहळणी बुरूजाखालून जाणारी वाट तटबंदीत लपवलेल्या पश्चिमाभिमुख महाद्वारातून आत शिरते. या मुख्य दाराखेरीज आणखी पाच चोर दरवाजे गडाला आहेत. किल्ल्याची रचना मजबूत तर आहेच पण, त्याची मजबुती अधिक टिकविण्यासाठी शिवाजी महाराजांनी दूरदर्शीपणाही दाखविला आहे. या किल्ल्याचे दोन भाग आहेत. दोन्ही भागांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सर्व बाजूंनी अत्यंत मजबूत तटबंदी व बुरुज बांधलेले आहेत. या बुरुजांना निरनिराळी नावेही दिलेली आहेत. दक्षिण बुरुज, केदार बुरुज, सूर्या बुरुज, कडेलोट, राजपाहऱ्याचा बुरुज, रेडक्या बुरुज, दुपदरी बांधणीचा यशवंत बुरुज, टेहळणीचा बुरुज हे सर्व बुरुज किल्ल्याच्या मजबुतीला आणि भव्यतेला शोभणारी आहेत. देवाचे तळे, मोठे तळे, गोड तळे, नासके तळे ही पाण्याची ठिकाणे आहेत. खुद्द बालेकिल्ल्यावर शिवरायांचा वाडा होता. गडावर मुख्य आकर्षण आहे श्री भवानी मंदिर!

शिवाजी महाराजांनी आपल्या कुलदेवतेचे स्मारक म्हणूनही हा किल्ला सर्वांच्या स्मरणात राहावा, अशा विचारानेच बांधलेला आहे. महाराजांनी १६६१ मध्ये किल्ल्यात तुळजाभवानीचे मंदिर बांधले. आई भवानीची, अष्टभुजा महिषासुरमर्दिनीची अतिशय देखणी मूर्ती मूर्ती गंडकी शिळेपासून घडवलेली आहे. सभामंडप, किर्तनमंडप, पुराणमंडप आणि गाभारा अशा दालनांनी युक्त या मंदिरासमोरील दीपमाळा देखण्या आहेत. दीपमाळांजवळच नगारखाना, मुख्य देवडी यांसारख्या रचनाही या किल्ल्याच्या परिसरात आहेत. ही सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर, खऱ्या अर्थाने या किल्ल्याला प्रतापगड हे नाव कोणत्या ऐतिहासिक प्रसंगाने दिले असेल, याचा सहज उलगडा होऊ शकतो.

# साप्ताहिक राशिभविष्य

रविवार, दि. २४ ऑगस्ट २०२५ ते शनिवार, ३० ऑगस्ट २०२५

मिलिन्द माधव ठेंगडी/ज्योतिष शास्त्री, ८६००१०५७४६

## कार्यक्षेत्रात महत्त्वपूर्ण घडामोडी

मेष

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण कुंडलीतील पंचम या अतिशय शुभ स्थानातून सुरू होत आहे. तेथे केतू व स्वराशीचा सूर्यदेखील आहेत. अशात सध्या आपला राशिस्वामी मंगळ सहाव्या स्थानात असल्याने हा आठवडा व्यवसाय व नोकरीच्या ठिकाणी काही महत्त्वपूर्ण, आकस्मिक तसेच वेगवान घडामोडी घडविणारा ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. या स्थितीत आपणास सर्वप्रकारच्या शारीरिक व मानसिक ताणतणाव, दगदग यापासून दूर राहण्याची गरज आहे. काहींना कौटुंबिक वातावरण सांभाळावे लागेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल.

**शुभ दिनांक - २४, २६, २७, २८.**

## मानापमानाच्या घटना टाळा

वृषभ

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील चतुर्थ या सुख स्थानातून सुरू होत आहे. सध्या आपला राशिस्वामी शुक्र पराक्रम स्थानात बुधासोबत आहे. धनस्थानातील गुरू व पंचमातील मंगळ हे काही चांगले सांपत्तिक योग निर्माण करणारे ठरू शकतात. यामुळे स्थावर संपत्तीविषयक काही सकारात्मक हालचाली या राशीच्या मंडळींच्या संदर्भात संभवतात. जमीन, घर, फ्लॅट, वाहन वा अन्य मोठी खरेदीचे विचार पूर्णत्वास जाऊ शकतात. वारशाचे मुद्दे मार्गी लागू शकतात. नोकरी-व्यवसायात प्रगतिकारक स्थिती निर्माण व्हावी. हितशत्रूंच्या कारवायांवर लक्ष ठेवा.

**शुभ दिनांक - २४, २६, २८, ३०.**

## कर्तव्यपूर्तीत खरे उतराल

मिथुन

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील पराक्रम स्थानातून सुरू होत आहे. अशात राशिस्वामी बुध धन स्थानात व्ययेश शुक्रासोबत व राशिस्थानी शुभंकर गुरू अशी स्थिती आहे. एखादी मोठी खरेदी, सण-उत्सवांची तयारी, प्रवासाच्या योजना, शिक्षणासंबंधीच्या प्रक्रिया, वाहन खरेदी वगैरेत काहीसा मोठा खर्च करावा लागू शकतो. युवा वर्गाच्या संदर्भात विवाह योग जुळण्याची शक्यता आहे. काही मंडळींच्या बाबतीत कार्यक्षेत्रात, परिवारात मानापमानाचे तुरळक प्रसंग, हेवेदावे, मानसिक त्रागा निर्माण होण्याची शक्यता दिसते. पुरेसा संयम व जीभेवर ताबा ठेवलात तर कर्तव्यपूर्तीत खरे उतराल, समाधान मिळेल.

**शुभ दिनांक - २४, २६, २७, २९.**

## प्रासंगिक धारिष्ट्य आवश्यक

कर्क

या आठवड्याच्या सुरुवातीला राशिस्वामी चंद्र कुंडलीच्या धन स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. तेथे त्याच्या सोबत रवी व केतू आहे. शिवाय राशिस्थानी बुध व शुक्र आहेत. सर्वसाधारणपणे आनंदी, समाधानकारक असा हा आठवडा राहणार आहे. सण, उत्सव, विविध कार्यक्रम यात रममाण व्हाल. पाहुणे, नातलग, मित्र परिवाराच्या भेटीगाठी आनंददायक ठरतील. सप्ताहाच्या सुरुवातीला मात्र काही मंडळींना मानापमान, हितशत्रूंच्या कारवाया, हेवेदावे अशा काही घटनांना तोंड द्यावे लागू शकते. या काळात प्रासंगिक धारिष्ट्य दाखवून परिस्थितीचा सामना करावा लागेल. कुटुंबातील सदस्य, कार्यक्षेत्रातील सहकारी आपल्या बाजूस उभे राहतील.

**शुभ दिनांक - २६, २७, २९, ३०.**

## संतती व शिक्षणसंबंधी सुखद योग

सिंह

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्याच राशीमधून सुरू होत आहे. शिवाय राशिस्वामी रवी केतूसोबत स्वराशीतच आहे. अशात भाग्येश मंगळ धनस्थानात असून तो पंचम स्थानाला बळ देत आहे. शुभंकर गुरूची पंचमावर दृष्टी आहे. पंचम हे शिक्षण व संततीचे महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे या सप्ताहात या राशीच्या काही मंडळींना संतती योग येऊ शकतात. शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी वर्गाला तसेच शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या मंडळींनाही हा सप्ताह सुखद जावा. दुसरीकडे शनीच्या दृष्टीमुळे हृदयरोग, छाती व श्वसनाचे विकार असणाऱ्यांसाठी हा काळ काहीसा त्रासदायक ठरू शकतो.

**शुभ दिनांक - २४, २५, २७, २८.**

## आर्थिक स्थिती मजबूत होणार

कन्या

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण कुंडलीतील व्यय स्थानातून सुरू होत आहे. त्याच्यासोबत स्वराशीचा रवी व केतू आहेत. अशात राशिस्वामी बुध शुक्रासोबत लाभात असून आपल्या राशीत मंगळ आहे. धनेश शुक्राची शुभता व शुभंकर गुरू आपली आर्थिक स्थिती मजबूतपणे सांभाळणार आहेत. सुरुवातीला काहीसा खर्च होणार असला, तरी नंतर काहींना विशेष इन्सेन्टिव्ह, विशेष कामाचा मोबदला म्हणून वाढीव आर्थिक लाभ होऊ शकतो. शनी-मंगळ प्रतियोग पाहता हा काळ विशेषतः आरोग्याबाबत संमिश्र स्वरूपाचा ठरण्याची शक्यता आहे. कुठेतरी एखादी नाजुक, दुःखद किनारही राहू शकेल. तेव्हा सावध असावे. संयमाने परिस्थितीचा सामना करावा.

**शुभ दिनांक - २६, २७, २८, २९.**

Expert ज्योतिषी
विवेक जोशी
B E, M Tech
यांच्याकडून जाणून घ्या
आपल्या लव लाइफ, लग्न संबंधित, नोकरी व्यवसायाविषयी प्रकृतीच्या संबंधित, संतती संबंधित समस्याबाबत
शुल्क ३५०/- इतक्या माफक दरात
9518539682
GPAY व WhatsApp नंबर वर फी पाठवा व संपर्क साधा
आपले जन्म तारीख, वेळ व गाव तसेच प्रश्न पाठवावे. अपॉइंटमेंट त्याच किंवा पुढच्या दिवसाची दिली जाईल.
दीनदयाल नगर, ढोमणे हॉलच्यामागे, नागपूर

## विशेष कामगिरीचे कौतुक, गौरव

तूळ

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील लाभ स्थानातून सुरू होत आहे. तेथे स्वराशीचा शुक्र व केतू त्याच्या सोबतीला आहेत. अशात राशिस्वामी शुक्र बुधासोबत दशम कर्मस्थानात आहे. अशी अनुकूल व शुभ ग्रहस्थिती लाभलेली असल्यामुळे आपल्या नोकरी-व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील. या आठवड्यात आर्थिक अनुकूलतेसोबतच काही विशेष कामगिरीसाठी कौतुक व सन्मान मिळवून देऊ शकेल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. प्रसंगी वृद्धिंगत होईल. कुटुंबात समाधान व उत्साहाचे वातावरण राहावे. सप्ताहाच्या मध्यात काही मंडळींना आकस्मिकपणे उद्भवणाऱ्या एखाद्या मोठ्या खर्चाची तयारी ठेवावी लागू शकते.

**शुभ दिनांक - २४, २८, २९, ३०.**

## प्रयत्न वाढवा, अधिक लाभ

वृश्चिक

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील दशम कर्म स्थानातून सुरू होत आहे. तेथे स्वराशीचा रवी व केतू त्याच्या सोबत आहेत. अशात राशिस्वामी मंगळ लाभ स्थानात आहे. तो शनीने दृष्ट असला तरी हा योग शुभ स्थान पंचमातून होत असल्याने फारशी त्रासदायक स्थिती नाही. उलट हा योग विशेषतः नोकरी-व्यवसायासाठी उपकारक ठरू शकणार आहे. व्यावसायिक प्रगतीसाठी प्रयत्न वाढवले तर चांगले यश मिळेल, याची खात्री बाळगा. आर्थिक बाजू उत्तम राहील. कुटुंबातून उत्तम सहकार्य मिळेल. संततीच्या व पारिवारिक सुखाच्या दृष्टीने काही चांगले योग येतील

**शुभ दिनांक - २४, २७, २९, ३०.**

## कार्यक्षेत्रात चढ-उताराची स्थिती

धनू

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील भाग्य स्थानातून सुरू होत आहे. तेथे चंद्राला भाग्येश रवी व केतूची साथ मिळाली आहे. अशात राशिस्वामी गुरू सप्तम स्थानातून आपल्या राशीवर उत्तम दृष्टी ठेवून आहे. साधारणतः सुखेनैव असणाऱ्या या सप्ताहात काही किरकोळ घटना मनाचा विरस करणाऱ्या असू शकतील. शनी व मंगळ या दोघांचीही आपल्या राशीवर दृष्टी येत असल्याने काहीशा विपरीत योगांनाही तोंड द्यावे लागू शकते. विशेषतः कार्यक्षेत्रात जरा चढ-उताराचे वातावरण निर्माण होऊ शकते. एखाद्या आकस्मिक स्थितीसाठी मोठी आर्थिक तरतूद करावी लागू शकते.

**शुभ दिनांक - २४, २५, २८, ३०.**

## आरोग्य, आर्थिक ताळेबंद सांभाळा

मकर

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील अष्टम या पीडादायक स्थानातून सुरू होत आहे. तेथे त्याला स्वराशीचा रवी व केतूची साथ आहे. अशात राशिस्वामी शनी पराक्रम स्थानात असून योगकारक शुक्र सप्तमातून राशीला बळ देत आहे. हे योग प्रामख्याने अष्टमातून होत असल्याने सप्ताहाच्या सुरुवातीला काही मंडळींना आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. दीर्घकाळापासून असलेले लहान-मोठे त्रास या काळात बळावू शकतात. जुनी दुखणी पुन्हा डोकेवर काढू शकतात. यामुळे प्रसंगी आर्थिक स्थितीत कमतरता निर्माण होऊ शकते. खर्चवाढ तसेच काही आर्थिक पेच निर्माण होण्याचीही शक्यता आहे.

**शुभ दिनांक - २४, २६, २८, ३०.**

## कुंभ - मनाचा तोल ढळू नये

कुंभ

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या राशीच्या सप्तम स्थानातून सुरू होत आहे. हे जोडीदाराचे स्थान आहे. तेथे चंद्राला रवी व केतूची साथ मिळाली आहे. राशिस्वामी शनी धन स्थानात तर योगकारक शुक्र सहाव्या कर्म स्थानात आहे. ही ग्रहस्थिती आपणास अनेक दृष्टीने उपयोगी ठरणार आहे. विशेषतः जोडीदाराच्या कार्यक्षेत्रात प्रगती, त्याच्या आरोग्यात सुधार व्हावा. व्यावसायिक भागीदाराशी असलेले संबंध अधिक दृढ होतील. कारण अष्टम स्थानातील मंगळाच्या आठमुठेपणामुळे सध्या तरी काही मोठा आर्थिक बदल, मोठी लक्षणीय उलाढाल होण्याची शक्यता कमी आहे. आपल्या प्रयत्नांना कुटुंबातून उत्तम सहकार्य मिळेल. कामे होतील.

**शुभ दिनांक - २४, २५, २८, २९.**

## चढउताराचे प्रसंग, तणाव, क्लेश

मीन

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील सहाव्या कर्मस्थानातून सुरू होत आहे. अशातच सध्या आपल्या राशीत शनी बसलेला असून त्याच्यावर सप्तम स्थानातून मंगळाची दृष्टी आहे. आपला राशिस्वामी गुरू मात्र चतुर्थ या सुख स्थानात आहे. ही संमिश्र स्वरूपाची ग्रहस्थिती आहे. प्रामुख्याने घर व कर्म स्थानात काही चढउताराचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे. खर्चवाढ आणि अनारोग्याची स्थिती निर्माण होऊ शकते. परिवारातील काही सदस्यांची वागणूक मानसिक त्रासदायक, क्लेशकारक ठरण्याची शक्यता आहे. नोकरी-व्यवसायात तणावाची स्थिती निर्माण होऊ शकते. कुटुंबातील एखादी आकस्मिक घटना आपला आर्थिक समतोल बिघडवू शकते. रस्त्यावरील वावर सावध असावा.

**शुभ दिनांक - २५, २६, २८, ३०.**

# गाथा पर्यावरणाची

मिलिंद बेंडाळे

# शहरांचे पर्यावरणीय आरोग्य ढासळतेय...

**बदलत्या हवामानाचा परिणाम शहरांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे शहरातील कथित सामान्य सुरक्षित जीवन सातत्याने बाधित होत आहे. आजघडीला कधी शहरे पाण्याने तुंबतात, तर कधी पाण्याच्या टंचाईचा सामना करतात. शहरांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर असतो. शहरांच्या पायाभूत सुविधांवर भर देताना त्यांचे पर्यावरणही जपले पाहिजे, तरच शहरातील नागरिकांचे जीवन सुसह्य होईल.**

पावसाळा काही प्रमाणात अशांतता आणतो; परंतु ही अस्थिरता ही एक नवी सामान्य बाब बनत आहे, जी बदलत्या हवामानाचे लक्षण आहे. आपली शहरे वाढता वीज वापर, पाण्याची मागणी आणि बिघडत्या सार्वजनिक पायाभूत सुविधांशी झुंजत आहेत. ऊर्जा आणि पाणी प्रणालींवर दबाव आणत आहेत. कमी होत जाणारी हिरवळ, गायब होणारे तलाव, तुंबलेले नैसर्गिक नाले आणि खराब कचरा व्यवस्थापन या सर्वांमुळे मुसळधार पावसात शहरात पूर येतो आणि उष्णतेच्या लाटेत पाण्याची टंचाई निर्माण होते. या पृष्ठभूमीवर काही शहरांमध्ये झालेले काम इतरांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे. निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांमध्ये नैसर्गिक किंवा मानवनिर्मित हिरवीगार जागा आणि पाणवठ्यांचा समावेश आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. 'तलावांचे शहर' उदयपूर हे हिरव्या आणि पाण्याच्या एकात्मिक पायाभूत सुविधा काय करू शकते, याचे एक उत्तम उदाहरण आहे. पावसाळ्यात, रामसर वेटलँड सिटी म्हणून ओळखले जाणारे उदयपूरचे तलाव वनस्पती आणि जलजन्य प्राण्यांनी भरलेले असतात. ते पावसाचे पाणी साठवतात. पृष्ठभागावरील प्रवाह कमी करतात. भूजल पुनर्भरण करतात. पर्यावरण थंड करतात आणि जवळच्या मोठ्या तलावांमधून येणारे पाणी शोषून घेतात. अशा पायाभूत सुविधा टिकवून ठेवण्यासाठी आणि हवामान आणि पाण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी लवचीकता निर्माण करण्यासाठी भारतीय शहरांनी तीन प्रमुख उपायांवर कृती केली पाहिजे.



पहिले म्हणजे शहराच्या मास्टर प्लॅनमध्ये हिरव्या आणि निळ्या जागांचा समावेश केला पाहिजे. त्याचा विकास सामान्यतः २० वर्षांसाठी केला जातो. बेकायदेशीर भू-वापर बदलाविरुद्ध स्पष्ट कायदेशीर तरतुदी असायला हव्यात. शहरी अधिकाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, दीर्घकालीनदृष्ट्या ही नैसर्गिक संपत्ती जलसुरक्षा आणि पूर तसेच उच्च तापमान कमी करण्यासाठी महत्त्वाची आहे. पाणथळ जागा (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ असूनही त्यात सर्व भारतीय राज्यांमध्ये पाणथळ जागा प्राधिकरणांची निर्मिती आणि संवर्धनासाठी निवडलेल्या पाणथळ जागा अधिसूचित करण्याची तरतूद आहे, तरीही केवळ गोवा, उत्तर प्रदेश आणि राजस्थानने या दिशेने प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे २०२७ पर्यंत एक हजार शहरी जंगले विकसित करण्याचे उद्दिष्ट असलेल्या नगर वन योजनेची अंमलबजावणी वेगात केली पाहिजे. दुसरे म्हणजे शहरांनी घरगुती सांडपाण्याचा पुनर्वापर व्यवस्थापित करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी विशेष योजना तयार केल्या पाहिजेत. अशा योजना स्थानिक जलाशय, तलाव तसेच जमिनीसारख्या शहरी जलस्रोतांचे सांडपाणी प्रदूषणापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे परिसंस्था त्यांच्या आवश्यक सेवा प्रभावीपणे प्रदान करू शकतात.

ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने (सीईईडब्ल्यू) केलेल्या एका अभ्यासात असे सुचविण्यात आले आहे की, एका मजबूत योजनेत पाण्याचे संतुलन आणि गुणवत्ता मूल्यांकन, पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याच्या उद्देशांसाठी (जसे की लॅण्डस्केप विकास, बांधकाम, रस्त्यावरील स्वच्छता, अग्निशमन केंद्रे, सार्वजनिक स्वच्छता सुविधा) पुनर्वापराचे पर्याय ओळखणे, पुनर्वापरासाठी व्यावहारिक लक्ष्ये निश्चित करणे, प्रक्रिया केलेल्या वापरलेल्या पाण्यासाठी वाटप यंत्रणा परिभाषित करणे आणि अंमलबजावणीसाठी संस्थात्मक रचना तयार करणे यांचा समावेश असावा. शहरांनी निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी स्थिर वित्तपुरवठा आणि नागरिकांचा सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. इंदूर आणि अहमदाबादमध्ये महानगरपालिका रोखे आणि राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधण्यासाठी वापरले जाणारे हायब्रिड वार्षिकी मॉडेल काय शक्य आहे ते दर्शवतात. सामान्यतः वनीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रीय भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण (सीएएमपीए) निधीचा वापर विद्यमान शहरी जंगले आणि हरित कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी केला पाहिजे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित पायाभूत सुविधांचे संचालन आणि देखभाल यासारख्या क्रियाकलापांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. पाणीपुरवठा, कचरा संकलन आणि विल्हेवाट आणि उद्याने आणि इतर हिरव्या जागांची देखभाल यासारख्या सेवांचा खर्च भागवण्यासाठी वापरकर्ता शुल्क आकारले पाहिजे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी अनुदाने सुरूच ठेवली पाहिजेत; परंतु शहरांनी नागरी जबाबदारीची मागणी करण्यास मागेपुढे पाहू नये. विकसित देशांमधील कोणतेही शहर सार्वजनिक सहभाग न घेता लवचीक पायाभूत सुविधा उभारू शकलेले नाही. भारतीय शहरे विकास, रोजगार आणि समृद्धीचे चालक आहेत; परंतु त्यांना हवामान धोक्यांचाही सामना करावा लागत आहे.


आपण शहरांचे पर्यावरणीय पाया (तलावे, जंगले आणि ड्रेनेज सिस्टिम) मध्ये गुंतवणूक करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचे भविष्य धोक्यात आणू. गेल्या काही दशकांमध्ये भारताने जलद शहरीकरण पाहिले आहे. भारतातील शहरांची वाढ मोठ्या प्रमाणात अनियोजित आहे. त्यामुळे अनेक आव्हाने आणि शहरी अराजकता निर्माण झाली आहे. अनियोजित शहरी वाढीचा सर्वात विनाशकारी परिणाम म्हणजे विद्यमान पायाभूत सुविधांवर दबाव. पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधांना वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी, पायाभूत सुविधांवर जास्त ताण येतो. तो त्याच्या रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरतो. यामुळे गर्दी, अपुरी सेवा आणि जीवनमान कमी होते. अनियोजित शहरी विकासामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. मर्यादित रस्ते जाळे आणि वाहनांच्या संख्येत अनियंत्रित वाढ यामुळे अनेक शहरांमध्ये प्रवास हा रोजचा संघर्ष बनला आहे. वाहतूक कोंडीमुळे केवळ मौल्यवान वेळ वाया जात नाही, तर इंधनाचा वापर, पर्यावरण प्रदूषण आणि आरोग्याचे धोकेदेखील वाढतात. व्यापक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे ही समस्या आणखी वाढते. ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, विविध शहरी भागात झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राहणीमान आणि सामाजिक असमानता कमी होत आहे.

याखेरीज, योग्य नियोजनाचा अभाव अनेकदा मौल्यवान जमिनीवर अतिक्रमणाला कारण बनतो. त्यामुळे गृहनिर्माण संकट आणि शहरी गरिबी वाढते. भारतातील अनियोजित शहरी विकासामुळे पर्यावरणाचे नुकसान झाले आहे. लोक अनेकदा वनजमिनीवर अतिक्रमण करतात. त्यामुळे जैवविविधतेचे नुकसान होते आणि परिसंस्थेमध्ये व्यत्यय येतो. अनियंत्रित बांधकाम, अयोग्य कचरा व्यवस्थापन आणि अनियंत्रित औद्योगिकीकरण प्रदूषण मातीची धूप आणि पाण्याची कमतरता निर्माण करते. शहरांची अनियोजित वाढ सामाजिक असमानता वाढवते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी शाश्वत शहरी नियोजन, पायाभूत सुविधा विकास आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांना एकत्रित करणारा बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. व्यापक शहरी नियोजनात गुंतवणूक करून, परवडणाऱ्या घरांना प्राधान्य देऊन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब करून आपण शहरांना चैतन्यशील, राहण्यायोग्य ठिकाणी रूपांतरित करू शकतो. महानगरांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. कधी कधी मुसळधार पाऊस प्राणघातक ठरू शकतो. पावसाळ्यात मुंबई, चेन्नई आणि बंगळुरूसारख्या शहरांमधील रस्ते पाण्याखाली जातात आणि सामान्य लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. भारतीय शहरांमध्ये दर पावसाळ्यात पूर येणे सामान्य आहे. जलद शहरीकरणामुळे, शहरातील तलाव गायब होत असून नाले कचऱ्याने भरले आहेत.

अलिकडच्या वर्षांमध्ये अशा पुरांपूर्वी दिल्ली आणि बंगळुरूमध्ये पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. तिथे पाणी साठवण्याच्या जागा कमी झाल्या आहेत. या वर्षी पावसाळ्यापूर्वी बंगळुरूमध्ये असे पाणी संकट निर्माण झाले की, लोकांना आवश्यक कामांसाठी खाजगी टँकरमधून जास्त किमतीत पाणी खरेदी करावे लागले. जून महिन्यात देशाची राजधानी दिल्लीमध्येही अशीच परिस्थिती दिसून आली. जूनमध्ये कडक उन्हामुळे पाण्याचे संकट इतके बिकट झाले की, लोकांना पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागले. बंगळुरूप्रमाणेच दिल्लीतील लोकांनाही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागले. या परिस्थितीचा विचार करून शहरांच्या पर्यावरणीय संतुलनाचे नियोजन केले तर काहीसा दिलासा मिळू शकतो.

*(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)*

## रविवारचे महाशब्दकोडे ५१०



*आडवे शब्द:-* 1) शेवटी समुद्राला जाऊन मिळणारा पाण्याचा मोठा प्रवाह, 3) कलुषित मत, 6) सूक्ष्म दृष्टी, 9) जिथेतिथे, 11) आकर्षक, 12) नापसंती, 13) 'शहाण्याला शब्दाचा × ×', 14) उलटी, 16) पक्ष्यांना पकडण्याचे जाळे, 17) चंबूगवाळे, 19) क्षुल्लक; कवडीमोल, 21) चढाव; घाट, 22) थर (रंगकामातील); सहभाग; हस्त, 24) बाशिंग बांधून बोहल्यावर चढणारी उपवर मुलगी, 25) नैतिक आचारविचार, 27) खेळातील सरशी, 29) हिंदीत विभाजन, 31) फौजेची एक तुकडी, 32) दूध आणि दुग्धजन्य पदार्थ मिळण्याचे स्थान, 34) आगमन कळविण्यासाठी दारावर केलेला आवाज, 35) एक संतकवी, 37) निषिद्ध, 38) राणा, 40) कसाई, 41) निश्चल दृष्टी, 43) कौरव आणि पांडवांची वीरगाथा, 45) सोपवणे (जबाबदारी); आरोप करणे; ओझे घालणे, 46) देखत, 48) हुंगण्यासाठी तंबाखूची पूड, 50) चलन (धातूचे), 51) अभ्यासक्रमातील थोड्या भागाची परीक्षा, 52) एक गुजराती शहर, 54) आधीचा, 56) बोलताना किंवा वागताना मनुष्य संकोचतो ती मनोवृत्ती, 58) एक बहुउपयोगी कंद, 59) सर्पाचा राजा; बाकी, 60) यात्रिक, 62) पुत्री, 63) बुद्धी, 65) असंतुष्ट, 66) पिछेहाट, 68) अधिकार; वर्चस्व; छाप, 70) तमाशातील एक लोकनाट्यप्रकार, 72) कृष्णाचा प्रिय पदार्थ, 73) वेळे - वर, 75) एक भाजीफळ, 76) उपलब्ध, 77) यज्ञ, 79) जळणाऱ्या प्रेताची कवटी फुटण्याचा प्रकार, 82) मकर-संक्रांतीला वाटतात तो पदार्थ, 84) कर्दनकाळ; पिशाच, 85) उद्धटपणा, 87) पंच, 89) सुदृढ; चैनी माणूस, 90) बैचैनी; तळमळ, 92) फुटून जोराने बाहेर आलेला (घाम), 95) दाटीवाटी, 96) लग्नाच्या संबंधाची देणगी, 97) एक वाद्य, 99) पूर्वी मिळवून ठेविल्यातून खर्च, 101) पुष्परस, 103) कीर्ती; अभिधान, 105) दहाचा समुदाय, 108) आदरसत्कार, 109) गरजेपुरते गोड बोलणे या अर्थाचा एक वाक्प्रचार, 110) हिमालयात उगम पावणारी एक नदी, 113) वाळलेले आले, 114) जलचर माशांचे श्वसनेंद्रिय, 115) माकड, 116) विवाहित स्त्रीच्या दृष्टीने तिच्या सासूचा एक मुलगा.

*उभे शब्द:-* 1) दारूबंदी, 2) गरीब, 3) लोंढा, 4) हत्या, 5) महागाई, 6) बाजारातील खरेदी, 7) चाहूल, 8) उत्साह; लहर, 9) समान स्वभावाचे, 10) पक्षातीत, 13) मनुष्य, 14) वाडवडिलांनी संपादिलेला, 15) शिकारीसाठी उभारलेली उंच जागा, 18) गच्ची, 20) ज्योतिर्गणित, होमिओपॅथी आणि धर्मशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील विख्यात विद्वतरत्न भाऊजी, 21) छैलछबेली, 23) नव्या दमाचा, 26) चलाखी; घबराट, 28) गुणित, 29) बोकड, 30) शिखांचे चौथे गुरु, 31) चटकन, 33) एक आनंदवाचक उद्गार, 36) कोठार, 37) माळ घालणे, 39) घोषित, 42) खपली, 43) शंकर, 44) जादूटोणा, 45) चिरीमिरी, 47) आकर्षक, 49) सारखा, 51) लबाड; सुरू, 52) शोभा, 53) तत्पर, 55) अजीजी, 57) आकर्षकता, 58) फिदा, 61) रूपमती, 62) भेग, 65) झणझणीत, 67) जखमी, 69) सापाची विषारी लाळ, 71) कारण, 73) अरण्य, 74) चिखल, 75) बाजू, 76) हाताचा सपाट भाग, 78) आपले राष्ट्रगीत, 80) प्रवीण, 81) बिदागी, 83) दिव्याची काजळी, 85) तारुण्यपीटिका, 86) अटक, 88) धोंडा, 91) अहंकार, 93) एक वाङ्मयीन अलंकार, 94) मोठी नदी, 96) एक फळ, 98) मोहरणे, 100) दिलखेचक, 102) भीतीचा धक्का, 103) एक धर्म - संस्थापक, 104) सामान्य, 105) श्वासरोग, 106) ज्योत, 107) दिलदार; सढळ, 108) रांजण, 110) काढा, 111) केसांची गुंतागुंत, 112) शंकराचे वाहन. *(उत्तर: पुढील अंकात)*

*मागील शब्दकोड्याचे उत्तर*

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सै | | कु | पु | त्र | | अ | | उ | चा | प | त्या | | ओ | | प | र | व | श | ता |
| रा | न | टी | | स्त | ब | क | | गा | | रा | | पु | ढा | का | र | | | प | |
| वै | | र | स | | ड | ब | घा | ई | | गं | गो | त्री | | | ख | | अ | थ | वा |
| रा | म | | प | रि | वा | र | | | उ | दा | र | | क | रो | ड | प | ती | | क |
| | हो | | शे | | | | स | मृ | द्ध | | ज | ग | णे | | | सा | त | व | डा |
| बा | द | | ल | ला | ट | रे | खा | | ट | | | हा | र | जी | त | | | | ति |
| क | या | स | | जि | | खी | | अ | प | ह | र | ण | | व | ग | ळू | न | | क |
| दा | | न | व | र | दे | व | | मृ | णा | ल | | | अ | | डा | | ख | र | डा |
| र | ग | | | वा | ठ | | पो | त | | क | र | प | ल्ल | वी | | | भ | | |
| | ल | | बा | णा | | वि | ळा | | म | ट | का | | ड | | | पो | र | क | ट |
| | ब | च | त | | स | वा | | गु | हा | | ना | द | | प्र | पं | च | | सा | रा |
| का | त | | मी | ठ | मो | ह | ऱ्या | | रा | न | | र | | | ढ | | क | | व |
| नो | | भा | | स | र | | | जा | णी | व | | वा | रं | वा | र | | स | पा | ट |
| का | स | व | | ठ | | स | त | त | | जा | गो | जा | ग | | पू | ज | क | | रा |
| नी | र | | आ | शी | र्वा | द | | मु | द | त | | | त | या | र | | स | रा | व |
| | का | र्य | र | त | | र | | च | र | | वे | ध | | ता | | ढो | | य | |
| ठा | र | | व | | बा | हू | | ल | ड | थ | ड | णे | | या | त्रि | क | | ग | |
| ऊ | | पु | णे | क | र | | बा | का | | प्प | | | फ | त | वा | | मो | ड | का |
| क | टो | रा | | स | का | र | ण | | ख | ड | ख | डा | ट | | र | द्द | ड | | ही |

AMRITA BHASKAR NANDANWAR 9822568532, 8329510310







## कोणे एके काळी


स्वाती काळे (कोलारकर)
swatimak@gmail.com


# गडावर आहे देवांची वस्ती

शिवाजी महाराज आज्ञापत्रात म्हणतात, 'गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण.' खरोखरंच आपल्या पूर्वजांनी गडकोटांवर असोशीने प्रेम केले आणि महाराष्ट्रात दूरवर पसरलेल्या सह्याद्रीच्या काळ्याकभिन्न कातळाने मराठमोळ्या प्रजेचे प्राणपणाने रक्षण केले. सह्याद्रीच्या राकट दगडांनी बनलेले गडकिल्ले स्वराज्याचा श्वास होता. रयतेचा ध्यास होता. पण या बळकट किल्ल्यांचा आत्मा मात्र त्यांच्या अंगाखांद्यावर विसावलेल्या देवदेवतांमध्ये आहे. उदंड यश देणाऱ्या प्राचीन मंदिरांमध्ये आहे.

राजे म्हणायचे, 'स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा.' स्वराज्यासाठी गडावरील सर्व देवतांनी तलवारी उपसल्या. गडमंदिरातील सर्व देव-देवतांचा स्थायीभाव वीररसपूर्ण आहे. हनुमान असो किंवा गणपती, दुर्गा मां असो किंवा इतर कोणी ग्रामदेवता; सर्व देवता जणू हाती त्रिशूळ-तलवारी घेऊनच जन्मल्या. कारण स्वराज्य निर्मितीच्या काळात गडकोटांचे रक्षण करण्यासाठी मावळ्यांच्या मनात वीरभाव जागृत करणे अतिशय गरजेचे होते. सह्याद्रीच्या प्रत्येक किल्ल्यावर देवदेवतांची अनेक अद्भुत रूपे आपल्याला पाहायला मिळतात. दुर्गा मातेची, शिवाची, गणेशाची अनेक वीररसपूर्ण रूपे गडदेवतांच्या रूपात शिवाजी महाराजांनी पूजली. त्यांची उपासना केली आणि आपल्या सवंगड्यांच्या मनात आत्मविश्वास जागा केला. सह्याद्रीच्या काळ्या कातळाने या गडदेवतांच्या रूपात स्वराज्याला भरभरून आशीर्वाद दिला.

पूर्वीपासूनच व्यापारी बाजारपेठांवर गडांची देखरेख असायची. जुन्नर नाणेघाट या सातवाहनकालीन व्यापारी मार्गाच्या संरक्षणासाठी उभा असलेला किल्ला शिवनेरी म्हणजे हिंदवी स्वराज्याचे भाग्यविधाते छत्रपती शिवरायांचे जन्मस्थान. यातील शिवाई देवीच्या प्राचीन गाभाऱ्यात दोन मूर्ती आहेत. एक मूर्ती चार हातांची असून तिच्या उजव्या हातात गदा तलवार आहे. शिवाई देवीचे वाहन असणाऱ्या सिंहानेही राक्षसावर हल्ला चढविला आहे. राक्षसाचे वाहन असणाऱ्या रेड्याला देवीने पायाने चिरडले आहे. या देवीच्या पुढे स्वयंभू तांदळादेवी उभी आहे. दोन्ही मूर्तींवर अखंड पाषाणातले कोरलेले घुमट आहे.

जुन्नरमध्ये शिवनेरी तर आहेच; पण कुकडी खोऱ्यातली शिवनेरीसोबतची हडसर, जीवधन, चावंड ही दुर्ग चौकडी नाणेघाटावर टकमक नजर ठेवून आहे, असं अजूनही वाटतं. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा बलदंड चावंड किल्ला. गडाच्या मध्यभागी एक गोलसर टेकडी आहे. त्या टेकडीवर चावंडेश्वरी देवी आजही मावळ्यांना आशीर्वाद देते आहे, असं जाणवतं. याच चावंड किल्ल्याच्या पश्चिमेला कुकडेश्वर हे झंझ राजाने नवव्या शतकात बांधलेले अद्भुत प्राचीन शिवमंदिर आहे. हडसर गडावर तलावाला वळसा मारून गेलो तर आपण थेट प्राचीन शिवमंदिरात पोहोचतो. हे मंदिर चिरेबंदी काळ्या दगडात बांधलेले आहे. या मंदिरातल्या कोनाड्यातील गणपती आणि गरुड मूर्तीवरील नक्षीकाम केवळ अप्रतिम आहे.

गडकिल्ल्यांवर काही ठिकाणी पायथ्याशी मंदिरे बांधलेली आहेत तर काही मंदिरे मध्यावर आहेत. नारायणगावच्या पूर्वेला उभ्या असलेल्या नारायणगडच्या पायथ्याशी मुक्ताई मंदिर आहे. या मुक्ताई देवीला नमस्कार करूनच येथील ग्रामस्थ गड चढायला सुरुवात करतात. येथूनच जवळ आपण अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझरच्या गणपतीकडे जाऊ शकतो.

जुन्नरच्या वायव्य भागात आणखीन एक गिरीदुर्ग आहे. त्याचं नाव निमगिरी. या किल्ल्यावर एक प्राचीन शिवलिंग आणि गजलक्ष्मीचे अप्रतिम शिल्प आहे. काही गडांवर पायथ्यावरच गणेश व हनुमान मंदिरे बांधलेली आहेत. देवगिरी किल्ल्यावरील गणेश मंदिरात अतिशय सुबक अशी गणेशाची मूर्ती आहे. या गडावर दक्षिणामुखी हनुमान विराजमान आहेतच; पण हेमाडपंथीय शैलीचे अतिशय सुंदर असे शिवमंदिरदेखील आहे. परांडा जो भुईकोट किल्ल्याचा उत्कृष्ट नमुना मानला जातो, अशा किल्ल्यावरसुद्धा महादेवाचे सुबक मंदिर आहे. संतोषगडावरही एक महादेवाचे उत्कृष्ट मंदिर आहे. गंमत म्हणजे या मंदिराला तातोबा महादेव म्हणतात. तेथे एक साधू बुवा राहायचा म्हणे. त्यानेच हे मंदिर बांधले, असे म्हटले जाते.

भवानी माता तर शिवाजी महाराजांचे आणि मावळ्यांचे आद्य दैवत. प्रतापगडावरील भवानी मातेचे सुंदर मंदिर बघितले की, डोळ्यांचे पारणे फिटते. छत्रपती शिवाजी महाराजांनी नेपाळमधील गंडकी नदीतून शालिग्राम शिळा आणली आणि त्यात ही मूर्ती घडवली असे म्हणतात. किल्ले प्रचीत गडावरही भवानी मातेचे सुबक देऊळ आहे. या मंदिरातली शस्त्रसज्ज भवानी मातेची मूर्ती पाहून हात आपोआप जोडले जातात. रायगडावरील भवानी टोकाला लागूनच नैसर्गिक गुहेमध्ये भवानी देवीची स्वयंभू मूर्ती आहे. जुन्या कागदपत्रांमध्ये श्रीदेवी भवानी राजहुडा असा तिचा उल्लेख आहे. रायगडावर अजून एक देवी आहे. होळीच्या माळ्याच्या डाव्या बाजूला शिर्काई या मुख्य देवीचे मंदिर आहे.

तोरणगडाच्या सुरुवातीलाच बिनीचा आणि कोठीचा दरवाजा लागतो. आतमध्ये एक छानशी देवळी आहे आणि तोरणाजाई देवीच्या मूर्ती आहेत. किल्ले तोरणाचा विस्तार भलामोठा असल्याने महाराजांनी त्याचे नाव प्रचंडगड असे ठेवले होते. या किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी खणले असताना खणखण आवाज येऊ लागला. २२ हंडे सोन्याच्या मोहरा सापडल्या. त्याचा वापर त्यांनी राजगड बांधण्यासाठी केला होता. जेथे मोहरा सापडल्या तेथे महिषासुरमर्दिनी तोरणाजाईची स्थापना केली गेली. या तोरण्याच्या खोकड टाक्याच्या दक्षिणेस सर्वात उंच माथ्यावर मेंगाई मंदिर आहे. मेंगाईच्या वरच्या हातात तलवार आहे. दुसऱ्या हातात त्रिशूल आहे आणि खालच्या डाव्या हातात राक्षसाचे मुंडके आहे.

पद्मावती माची राजगडाची मानाची माची समजली जाते. येथूनच राज्य कारभार चालायचा. न्याय निवाडे व्हायचे. पद्मावती माचीत सहाजिकच पद्मावती मंदिर आहे. पहिल्या शतकाची गोष्ट आहे. किल्ल्यामधील गुहेमध्ये ब्रह्मऋषी तप करत होते. त्यांची पत्नी पद्मावतीजवळच्या पर्णकुटीमध्ये राहात होती. तिच्यावरून या माचीला पद्मावती माची असे नाव पडले. ही मूर्ती महाराज स्वतः पुजायचे असं म्हणतात. चांदवड किल्ल्याच्या पायथ्याशी रेणुका मातेचे हेमाडपंथी मंदिर आहे. डोंगरकड्यातच तिचा मुखवटा बसवला आहे. तिथले ग्रामस्थ सांगतात की, ही रेणुका माता सकाळी बालिका दिसते, दुपारी तरुण यौवना दिसते आणि संध्याकाळी कातरवेळी वृद्धा भासते. या मूर्तीचे पूजन महाराजांनी केले आहे. शिवरायांच्या पूजनातील मूर्ती भोरच्या पंत सचिवांनी पद्मावती तलावात विसर्जित केली होती. परंतु पंतसचिवांच्या स्वप्नात ती सतत येत राहिली. त्यामुळे त्यांनी पुन्हा ही मूर्ती तलावाबाहेर काढली.

सिंहगडाच्या मध्यभागी जो उंचवटा आहे तो सिंहगडाचा बालेकिल्ला आहे. या बालेकिल्ल्याच्या मध्यभागी कोंढाणेश्वराचे मंदिर आहे. गाभाऱ्यात उत्तराभिमुखी महादेवाची पिंड आहे. मंदिराच्या वरच्या बाजूला तानाजी मालुसरे यांची समाधी आहे. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेला अमृतेश्वर भैरवनाथाचे मंदिर आहे. भैरव आणि त्याची शक्ती भैरवी अशा दोन उभ्या मूर्ती आहेत. भैरवाच्या हातातल्या मुंडातून रक्त पिण्यासाठी कुत्रा दोन पायांवरती तोंड वर करून आसुसलेला आहे. एक शिवबाण ज्याला चंद्रशेखर बाण म्हणतात, सिंहगडावर अगदी आत्तापर्यंत म्हणजे १९७६ सालापर्यंत होता. शिवकाळात एक साधुबुवा हा शिवबाण शिवपिंडीवर ठेवून तपश्चर्या करायचे. त्यांची धारणा होती की, शिवबाण ज्याला मिळणार तो सार्वभौम राजेपद भोगणार. बाजी पासलकरांनी शिवबाचे कर्तृत्व साधुबुवांना सांगून बाण त्यांच्याकडून आणून शिवबांना लाल महालात दिला. हा अद्भुतच बाण होता. हवेतून बाष्प शोषून घ्यायचा आणि नंतर थेंबाथेंबाने पाझरायचा. महाराजांनी सिंहगडावरच्या शंकराच्या पिंडीवरचा शिवबाण देवघरात ठेवला होता. आक्रमण झाल्यावर पेशवे त्यांच्या सर्व सोन्याच्या मूर्ती सिंहगडावरच घेऊन जायचे. सिंहगडाचे दैवी माहात्म्य अपार आहे.

सातारा जिल्ह्यातील खटाव आणि कोरेगाव तालुक्याच्या सीमेवर असलेला वर्धनगड वर्धनी मातेच्या मंदिरामुळे लोकप्रिय आहे. वर्धनी माता प्रमुख ग्रामदैवत आहे. त्यामुळे या गडावर गावकऱ्यांची कायम गर्दी असते. याचप्रमाणे अनेक ग्रामदेवता गडांवर स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या मावळ्यांना आशीर्वाद द्यायच्या. दुर्गाडी किल्ल्याची दुर्गा माता, अहमदनगर जिल्ह्यातील कळसुबाई शिखराच्या माथ्यावरची देवी कळसुबाई, कुर्डू गडावरची कुर्डाई देवी, रोहिडा किल्ल्यावरच्या वाघजाई बुरुजावर नांदणारी वाघजाई देवी, पटटागडची पटटाई देवी अशा अनेक ग्रामदेवतांनी महाराष्ट्राच्या रयतेला प्राचीन काळापासून कायम सुरक्षित ठेवले आहे.

रांगणागडावरची रांगणाई देवी म्हणजे कोकणातील लोकांचे आराध्य दैवत. तिच्या बाजूला शक्ती देवता हनुमान खंबीरपणे उभा आहे. विजयदुर्गावरील मारुती मंदिर छत्रपती शिवरायांनी बांधलेले आहे. विजयदुर्गाजवळ रामेश्वराचे कौलारू देवालय आहे. या मंदिरात ५० किलो चांदीची शंकराची मूर्ती आहे.

दौलतमंगळ किल्ल्यावरचे भुलेश्वराचे दर्शन घेण्यासारखे आहे. १३ व्या शतकातील हेमाडपंथी मंदिर व या मंदिराच्या प्रांगणातील शिल्पकला बघून आपण जागीच थबकतो. वाद्यगायनात रंगलेले यक्षगंधर्व, हरीण सिंहाची झुंज अशी अनेक कोरीव शिल्पे येथे बघायला मिळतात. शिवपिंड आणि नागमूर्तीचे दर्शन घ्यायचे आणि नंतर गडावर फेरफटका मारायचा. शिवलिंगाच्या समोरच्या खळग्यात ठेवलेला प्रसाद देव खातो, अशी सहज धारणा भाविकांमध्ये आहे.

लोहगडच्या टहाळदेवाबद्दल एक गोष्ट ऐकायला मिळाली. एका मुगल सुलतानाने लोहगड ते विसापूरच्या तटबंदीपर्यंत एक दणकट दोरखंड बांधला. जो या दोरखंडावरून शेवटच्या टोकापर्यंत चालत जाईल त्याला अर्धे राज्य इनाम मिळेल, असे जाहीर केले. गावच्या एका वीराने आव्हान स्वीकारले. तो दोरखंडावरून चालत गेला. पण अंतर पूर्ण करण्याच्या आत सुलतानाने दोर कापला. त्या अनाम वीराचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्या वीराच्या स्मरणार्थ एक शेंदूर लावलेला दगड बसवला आहे. येणारा प्रत्येक जण तेथे झाडाचा एक टहाळा वाहतो. म्हणून त्याला टहाळदेव म्हणतात.

आता लवकरच गणपतीचे आगमन होणार. नवरात्रीमध्ये देवी शक्तीचे जागरण होणार. सह्याद्रीच्या गडकड्यांवर नांदणाऱ्या वीररसपूर्ण शक्तींचे या निमित्ताने स्मरण करूया.

## संस्कारांच्या देशा


डॉ. रमा गोळवलकर
९४२२११४६२०


# अन्नसंस्कार -२ पूषा आणि अग्नी

विश्वाच्या या पसाऱ्यात पृथ्वीवर नांदणारी जीवसृष्टी समजून घेताना तिची काही वैशिष्ट्य माणसाला आपोआपच उलगडत गेली. त्यापैकी एक महत्त्वाचं लक्षण म्हणजे सजीव जन्माला येतो आणि मृत्यू पावतो. जन्म घेण्याच्या प्रक्रियेला प्रजोत्पादन म्हणतात. मग ते बीजाचं अंकुरणं असो की प्राणी जगतात घडून येणारं अलैंगिक आणि लैंगिक जनन असो; ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. त्यानंतर मृत्यूपर्यंत प्रत्येक क्षणी शरीराचं चलनवलन व्यवस्थित सुरू राहण्यासाठी ही ऊर्जा अपरिहार्यपणे हवीच असते. यात शरीराच्या विविध अवयवांची झीज भरून काढण्यापासून प्रत्येक पेशीचं भरणपोषण करण्यापर्यंतची सगळी कामं कशी बिनबोभाट होणं अपेक्षित आहे.

वनस्पती ज्या जमिनीत रुजतात तिच्यातलं पाणी आणि विविध उर्वरक (खतं) शोषून घेत सूर्यप्रकाशाशी प्रतिक्रिया करून ऊर्जा मिळवतात. प्राणी जगतातले शाकाहारी प्राणी प्रत्यक्ष वनस्पती चरून त्याचं रूपांतर ऊर्जेत करतात तर मांसाहारी प्राणी शाकाहारी प्राण्यांचं मांस खाऊन त्यातून ऊर्जा मिळवतात. थोडक्यात सूर्याची शक्ती वनराजी पचवते आणि तिच्या माध्यमातून इतर प्राणी जगतात प्रसारित केली जाते. सूर्याचा हा उपयोग ऋग्वेद काळापासून आपल्या पूर्वजांना माहीत होता. म्हणूनच त्यांनी सूर्याला पूषन् (संबोधन - पूषा) अर्थात पोषण करणारा असं म्हटलेलं आहे. त्याच्या या कामाची स्तुती करणारं पूषन् सूक्त (ऋग्वेद षष्ठ मंडल सूक्त ५७) देखील रचलेलं आहे.

अदितीच्या बारा पुत्रांपैकी हा सहावा आदित्य आहे. याचा निवास अन्नात असतो आणि हा सर्व प्रकारच्या धान्यांत विराजमान असतो. याच्यामुळेच अन्नात पौष्टिकता आणि ऊर्जा हे गुण येतात. अन्नात स्वाद आणि रस पूषाच्या तेजामुळेच निर्माण होतात. हा अज (बकरे) जुंपलेल्या रथावर आरूढ असतो. याच्या हाती लोहदंड असून त्याला तुपात घोळलेलं सातूचं पीठ हविर्द्रव्य (ज्याची आहुती दिली जाते) म्हणून अर्पण केलं जातं. थोडक्यात अन्नात उष्मांक (कॅलरीज) असतात आणि त्यांचा उद्भव या पूषातून होत असतो, ही जाणीव प्राचीन भारतीय विद्वानांना होती. यज्ञ संस्कृतीचा पुरस्कार करणारी ही मंडळी अग्निदेवतेच्या माध्यमातून विविध देवतांना आहुती पोहोचवून त्यांना प्रसन्न करून घेतात तसंच मृत पूर्वजांना श्राद्ध कर्मात तर्पण पिंडदान अन्न करून तृप्त करतात. म्हणजे स्वर्गलोकातले देव असोत की पितृलोकातले पितर दोघांच्याही संतुष्टीचा मार्ग त्यांना अन्न अर्पण करून सुकर होतो. या सगळ्याचा विचार करताना आणखी एक बिंदू प्रकर्षानं जाणवला. तो थोडक्यात सांगते.



संस्काराचा पहिला विधी पुजलेली चूल

तेज तत्त्वाचं प्रत्यक्ष प्रत्यंतर म्हणजे सूर्य. पृथ्वीवरचा सूर्याचा प्रतिनिधी म्हणजे आग. आकाश, वायू, तेज, जल आणि भूमी या पंचमहाभूतांपैकी फक्त आगच असं महाभूत आहे, जे माणसाला उत्पन्न करता येतं. भारतीयांनी त्या दिव्यत्वाला अग्निदेव म्हणून स+अंग, सपरिवार, स+आयुध स्वरूपात पूजलं. त्यात त्याचं वाहन म्हणून योजला तो मेंढा. पूषाचा अज आणि अग्नीचा मेष असे एकाच जातीचे पण वेगळ्या प्रकारचे दोन प्राणी या दोघांतलं साधर्म्य आणि भिन्नता दोन्हीही दाखवतात. तर, पूषाच्या कृपेनं शेतात पीक येतं. 'शब्दकल्पद्रुम' नावाच्या ग्रंथात दिलेल्या श्लोकात कापणीला आलेल्या कणसात दडलेलं पीक म्हणजे सस्य. कापणी केलेलं कणीस मळून तुसासह दाणा बाहेर काढला की, त्याला धान्य म्हणायचं. तूसं दूर सारली की सुटा झालेला दाणा म्हणजे आम आणि तो शिजवला की म्हणायचं अन्न.

सस्यं क्षेत्रगतं प्राहुः सतुषं धान्यमुच्यते ।
आमं वितुषमित्युक्तं स्विन्नमन्नमुदाहृतमब ॥

प्रत्येक पायरीवर एक प्रक्रिया म्हणजे संस्कार करण्यात येतो. आम म्हणजे मराठीत धान्य हाती येण्यासाठी शेतीत विविध प्रक्रिया कराव्या लागतात. नंतर त्या धान्याची साठवण, निवडण करून दाणे भरडणं, दळणं, भिजवणं, मळणं, लाटणं, उकडणं, उकळणं, वाफवणं, भाजणं, परतणं, तळणं, शिजवणं, मुरवणं अशा विविध प्रक्रिया करावयाच लागतात. त्यात बहुतांश प्रक्रिया अग्नीचा योग्य ताप देण्यामुळेच घडून येतात. जगाच्या पाठीवर शिजवलेलं अन्न खाणारा एकमेव प्राणी म्हणून माणूस विविध देशांत वसला. तिथल्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरून प्रत्येकानं स्वतंत्र खाद्यसंस्कृती निर्माण केली. पण आहारशास्त्राचा प्रदीर्घ आणि विस्तृत असा शास्त्रोक्त अभ्यास करणारे मात्र आपणच.

आयुर्वेदाचा बहुतांश भर हा योग्य आहारावर देऊन रोग आणि अनारोग्य दूर ठेवण्यावर असतो. त्यामुळे अन्नावर कोणते संस्कार करायचे आणि कोणते करायचे नाहीत, याचे नियम अतिशय काटेकोर आहेत. याशिवाय कोणत्या पदार्थासोबत कोणता पदार्थ खायचा किंवा खायचा नाही, याचादेखील सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. पण संपूर्ण भारतीय उपमहाखंडात खारट पदार्थांना फोडणी घालण्याची जी काही विलक्षण पद्धती गेल्या अनेक शतकांपासून इथे पाळली जाते त्याला तोड नाही. कधी सुरुवात फोडणीनं केली जाते किंवा कधी शेवट. चुलीवरच्या स्वयंपाकाची लज्जत शतपटीनं वाढते ते वरून घातलेल्या निखाऱ्याच्या फोडणीनं. आसेतुहिमाचल आसिंधुसिंधु सगळीकडे फोडणी घातली जाते. फोडणीत घालण्याचे पदार्थ जवळपास सारखेच असतात. पण प्रत्येक प्रांताच्या फोडणीचा सुगंध आणि चव वेगवेगळी असते.

पूर्वी आगपेटीचा शोध लागण्याआधी घराघरातल्या स्वयंपाकघरात चुलीत निखारा जपण्यात यायचा. त्याला गृह्याग्नी किंवा आवसथ्य अग्नी म्हणतात. गृहिणी दररोज शुचिर्भूत होऊन चुलीवर रांगोळी काढून हळदी कुमकुम वाहायची. त्यातल्या अग्निदेवतेचं पूजन करून नंतरच स्वयंपाकाला सुरुवात करायची. अन्न संस्काराचा हा पहिला विधी आहे. 'चूल पेटणे' हा सगळ्यांच भाषांत वाक्प्रचार म्हणून रूढ आहे. चूल पेटली की पोटात अन्न जाणार हे ठरलेलंच आहे.

कोणाकडची चूल विझली तर ती पुन्हा पेटवण्यासाठी शेजारच्या घरातून निखारा आणला जाई. शत्रुता-वैमनस्याची पराकाष्ठा म्हणजे विस्तव नाकारणे. म्हणून आपण मराठीत दोघांत असलेलं वितुष्ट किती पराकोटीचं आहे, हे सांगण्यासाठी म्हण वापरतो, 'त्यांच्यातून विस्तव जात नाही.' एकूण अन्नसंस्कारात पूषा आणि अग्नी यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

## काव्यनाद

### आहे कुणी का आपला?

ढाळायचे आहेत अश्रू
दे तुझा खांदा मला
कोरडे आयुष्य आहे
काय मी देऊ तुला?

पाना फुलांनी बहरल्या वेली
उन्हाने करपल्या
हात द्या हातात कोणी
आहे कुणी का आपला

गर्द संध्याकाळच्या
दाट झाल्या सावल्या
दीप लावा अंगणी
मेघात चंद्र लोपला

पाखरे होती छतावर
खायला दाणे दिले मी
आज मी आहे भुकेला
घास द्या ओठी मला

वेळ सोनेरी न आता
मी भिकारी पोरका
चार शब्द बोलण्याला
मित्र द्या कोणी मला

**विजय पांढरीपांडे**
७६५९०८४५५५



### बैल पोळा

झुल पांघरा पाठीशी
लावा बैलांना कासरा
नका घालू हो येसन
बैल खांद्याचा आसरा

कालू बगल्या नि जांभा
शोभा वाढवी दाराची
जिवा-शिवाच्या जोडीला
आस लागावी घराची

द्यावी खुराक बैलाला
सण पोळ्याचा हा आला
ढेप सरकी नि आटा
त्यात मिसळून घाला

बांधा गळ्यात कसाटी
पाठीवर झूल घाला
शिंग रंगवा हो लाल
सण राजाचा हा आला

नको वखरे डवरे
नको नांगरणी आज
उभा दारात सजून
राजा पांघरून साज

बैल पोळ्याच्या सणाला
करा पुरणाची पोळी
बैल राजाच्या जिवाच्या
लागे प्रेमाची ही गोडी

बैल राजा वर्षभर
कुणब्यांची सेवा करी
बैल राजाच्या कृपेने
पाणी समृद्धीचे भरी

**प्रा. वर्षा विलास कावरे**
९०२१६८३१७८



### ते सावळे आभाळ

ते आभाळ भेटते जेव्हा
तो अंधुक अंधार कळतो
व्यक्त आशेतल्या कलेवर
पाऊस वेडा कोसळतो.

तो प्रवाहात हृदयाच्या
मातीच्या गाभाऱ्यात
खोल खोल जाणिवा
अन् अंतर्मनात नाद.

तो भेटतो थेट मातीच्या
गर्भातल्या बीजांकुराशी
मायेच्या बिलगून बाता
तो सांधतो प्रेम बाळाशी.

तो पोचतो झाडाच्या काठी
त्यासही मायेचे शिंपण
अन् गर्द रंगाचे भाव
देतो सौंदर्य गोंदण.

सरितेच्या अथांग वारीत
भेटीस येऊन जातो
ती मिलन वाट कथेची
पात्राला कळवून गातो.

तुझं आभाळ सावळे होते
अन् कृष्ण छटा गहिवरते
अध्यात्म जोडून आभाळी
ती भक्ती मातीत अवतरते..

**श्रद्धा राऊत बुरले**
९६६५९५८८९४

### कलंदर..

फिरत आला दुनिया सारी
विश्वरूप ते सुंदर
रमत गमत मस्तीत निघाला
जीवन मुक्त कलंदर..

मध्यान्हाचे चटके शोषू
करी क्रोधावर मात
सूर्यास्ताची चाहूल येते
होते शीतल रात
रेत शय्येवर निवांत पडतो
निद्रेचा मिळे सहारा
पवित्र कुडीत देहाच्या
वाहे चैतन्याचा वारा
पूर्व दिशेला रंग सिंदुरी
भगवी झाली धरती
पक्षी करती किलबिल किलबिल
विणती कोवळी नाती..

मनात उसळून सागर लाटा
विकार मंथन त्यात
गलबताची लांब सावली
पहा डोलते पाण्यात
तरंग उठले पाण्यावरती
दूर निळा किनारा
मध्येच गिरकी घेऊन
होतो मासा बावरा
निसर्गाची हिरवी जादू
पहा रंगली प्रकृती
आविष्कार हा असा अनुपम
गुंग झाली मती..

गात चालला उंच स्वराने
मुक्त छंद नादात
सोबत घेऊन चालू लागला
फुलपाखरांची वरात
मृदगंध दरवळे
सुटला गार वारा
विरक्तीच्या वस्त्रावर
शोभतो केशर रंग प्यारा
जीवन मुक्त झालो आता
संयम श्वास गती
प्रसन्नचित्त मन गाभारा
साक्षात नवी अनुभूती..

**नागेश घाटे**
९४२२१६५९७७

### गौराई

जगदंबेच्या भेटीची
आस ध्यानी मनी
घराचे गोकुळ करून
जाते भाग्यदायिनी
तीन दिवसांचा सण
आरत्या आणि पूजा
पण वर्षभराची ऊर्जा
देऊन जाते अष्टभूजा
भाविक भक्तांची परीक्षा
घेते गुरुमाउली
अन् हत्तीचे बळ
देते मायेची सावली
जीवनाच्या प्रवासातल्या
कथा आणि व्यथा
लेकीच्या गुजगोष्टीत
रमते जगन्माता
जड पावलांनी परततांना



या माहेरवाशिणी
'थोड्यात गोडी' हा कानमंत्र
देणाऱ्या जणू मैत्रिणी
तीन दिवसांच्या माहेरपणाला
येते गौराई
आणि 'माय'ची ऊब
देऊन जाते आई

**मेघा विनोद लोहकरे**
९०११६९८४३

### विजिगीषा

जगण्याखातर दौडत नेले पोळ्यांनी
मरणे नंतर ठरवत नेले गोळ्यांनी
काहीहीपण करवत नेते विजिगीषा
सावज धरण्या कैद कबुलली कोळ्यांनी
कष्ट कुणाचे गणले नाही येथे बस
आकाराने ऐपत वदली झोळ्यांनी
एकाकीपण वाटे 'हरणे', तेव्हा तर
मुंगी काय नि हत्ती, राही टोळ्यांनी
माती सोबत सोनं सुद्धा गोटा पण
एकल होते तेव्हा विकते तोळ्यांनी
जाण्याबद्दल बोलत होते ओठ तरीही
पुन्हा येण्या सांगितले त्या डोळ्यांनी

**धनश्री धारकर**
९८२२९३४४९१

तरुण भारत // आसमंत

www.tarunbharat.net

भारतात जीएसटी लागू होऊन आठ वर्षे झाली. आता त्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्क लागू केल्यानंतर भारतात स्वदेशी वस्तूंच्या वापराची मोहीम नरेंद्र मोदी यांनी सुरू केली आहे. त्यासाठी बाजारात मागणी वाढविण्यासाठी सरकारने कर कमी करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. उत्सवकाळात उलाढाल वाढवून जीएसटी संकलन कमी होऊ न देण्याची दक्षता सरकार घेत आहे.

# जीएसटीतील सुधारणांचा फायदा कुणाला?



**कैलास ठोळे**
आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

देशाच्या स्वातंत्र्य दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यमवर्गीय, सामान्य माणूस आणि लघु आणि मध्यम उद्योगांना दिलासा देण्यासाठी जीएसटीमध्ये सुधारणांची घोषणा केली. १ जुलै २०१७ पासून देशात जीएसटीची अंमलबजावणी सुरू झाली. त्यावेळी त्याचे वर्णन 'करक्रांती' असे करण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी करसुधारणा म्हणून त्याकडे पाहिले गेले असले, तरी 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास अजून २२ वर्षे वाट पाहावी लागणार आहे. आपण पाश्चात्त्य देशांमधून ही कल्पना स्वीकारली आहे; परंतु भारतासारख्या खंडप्राय देशात आठ वर्षांमध्येही ती पूर्णपणे लागू करणे शक्य झालेले नाही. गेल्या सहा महिन्यांपासून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणांतर्गत जगातील विविध देशांवर आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेने निर्बंध लादण्याचा इशारा देऊनही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबविले नाही. त्यामुळे ट्रम्प यांनी आता ५० टक्के आयात शुल्काची अंमलबजावणी करण्याचे जाहीर केले. ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या बैठकीतूनही काहीच साध्य झाले नाही. अमेरिकेच्या नाक खुपसण्याच्या वृत्तीला भारताने विरोध करणे आणि धोरणात्मक निर्णयात लुडबूड करू न देणे हे योग्यच आहे. अशा परिस्थितीत ट्रम्प यांची एकाधिकारशाही वृत्ती पाहता आयात शुल्क कमी करण्याची शक्यता कमी आहे, असे गृहीत धरून मोदी यांनी 'स्वदेशी'चा नारा दिला आहे.

अमेरिकेबरोबरच्या ८० अब्ज डॉलरच्या निर्यातीतील तफावत दूर करणे आणि स्वदेशीला चालना देण्यासाठी देशांतर्गत खप वाढविणे तसेच निर्यातीसाठी अन्य देशांचा शोध घेणे आवश्यक होते. खप वाढवायचा असेल, तर लोकांची क्रयशक्ती वाढविली पाहिजे किंवा वस्तू स्वस्त झाल्या पाहिजेत. त्यातील दुसरा पर्याय मोदी यांनी स्वीकारला आहे. त्यासाठीच त्यांनी जीएसटीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. याला पंतप्रधानांचे मोठे व्हिजन म्हटले जात आहे. केंद्र सरकारने सध्याच्या चार स्लॅबऐवजी दोन स्लॅब (५ आणि १८ टक्के) प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये वस्तूंना गुणवत्ता आणि मानक श्रेणीमध्ये ठेवले जाईल. त्याचा उद्देश मध्यमवर्गीय, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना दिलासा देणे आहे. लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आणि कृषी क्षेत्रावरील कराचा भार कमी केला पाहिजे. यासोबतच सामान्य माणसाच्या खिशावरील करांचा भार कमी होईल, यावर सरकारचा भर आहे. केंद्र सरकारने आणलेल्या प्रस्तावावर कोणत्याही एका बैठकीत मंत्रिगट सहमत होण्याची शक्यता कमी आहे. कारण हा प्रस्ताव बराच व्यापक आहे. त्याच्या बैठका आतापासून सुरू झाल्या आहेत. दिवाळीपूर्वी त्यावर निर्णय होऊन ऐन सणासुदीच्या काळात जास्त उलाढाल व्हावी आणि सरकारच्या जीएसटी संकलनावरही प्रतिकूल परिणाम होऊ नये, याची दक्षता घेतली जात आहे.

यासोबतच जीएसटीची नोंदणी आणि परताव्यासंबंधी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व्यापक बदल केले जातील. त्यामुळे वेगवेगळ्या मंत्रिगटांमध्ये निर्णय घ्यावे लागतील. एका अधिकाऱ्याचे म्हणणे आहे की, गरज पडल्यास, सतत बैठका घेऊन प्रस्तावावर एकमत होईल. दिवाळीपूर्वी कार आणि दुचाकी खरेदी करणाऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी येऊ शकते. केंद्र सरकार वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) दर बदलण्याचा विचार करत आहे. त्यामुळे वाहने स्वस्त होऊ शकतात. सध्या प्रवासी वाहने आणि दुचाकी वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जातो. आता सरकार कार आणि मोटारसायकल-स्कूटरवरील कर कमी करू शकते. जीएसटी परिषद लवकरच या संदर्भात मोठा निर्णय घेऊ शकते. असे झाले, तर दिवाळीपूर्वी कार आणि दुचाकी खरेदी करणे सोपे होईल आणि लोकांचे पैसेही वाचतील. याशिवाय, इंजिनच्या आकारानुसार आणि वाहनाच्या लांबीनुसार १ ते २२ टक्के अतिरिक्त करदेखील आकारला जातो. यामुळे एकूण कर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचतो. तथापि, इलेक्ट्रिक कारवर पाच टक्के कराव्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त कर नाही. दुसरीकडे दुचाकी वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जातो. ३५० सीसीपेक्षा जास्त इंजिन असलेल्या वाहनांवर तीन टक्के अतिरिक्त कर आकारला जातो. आता त्यात सुसूत्रता आणली जाईल. त्यामुळे वाहने स्वस्त होऊ शकतात. उपकरही रद्द होणार आहे. त्याचा दिलासा खरेदीदारांना मिळेल. याचा फायदा सामान्य कार आणि बाईक खरेदीदारांना होईल. तथापि, महागड्या कार्सवर ४० टक्क्यांपर्यंत कर आकारला जाऊ शकतो.

जीएसटीचे दर कमी केल्याने लहान कार आणि बाईक बनवणाऱ्या कंपन्यांना फायदा होईल. आजकाल या कंपन्यांना वाहने विकण्यात अडचणी येत आहेत. कारण वाहने महाग झाली आहेत आणि कर्जावरील व्याजही वाढले आहे. यापूर्वी मारुती सुझुकी इंडिया आणि हिरो मोटोकॉर्पसारख्या कंपन्यांनी सरकारकडे कर कमी करण्याची मागणी केली होती. आता प्रस्तावित करानुसार कारच्या किमती ४० हजार ते एक लाख रुपयांनी कमी होऊ शकतात. वाहन उद्योग आधीच मंदीत आहे. अशा परिस्थितीत कार कंपन्यांनाही करकपातीचा फायदा होईल आणि ग्राहकांच्या खिशावरचा भारही कमी होईल. कररचनेनंतर वाहन विक्रीत प्रचंड वाढ होऊ शकते आणि उत्सवाच्या हंगामात विक्रीचा विक्रम मोडता येईल. प्रस्तावित जीएसटी २.० फ्रेमवर्क अंतर्गत सरकार वस्तू आणि सेवा कराचे दोन स्लॅब म्हणजेच ५ आणि १८ टक्के जीएसटी आणेल. विमा प्रीमियमवरील जीएसटी १८ टक्क्यांऐवजी शून्य किंवा ५ टक्क्यांच्या कक्षेत येऊ शकतो. याचा फायदा सामान्य लोकांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि विमा कंपन्यांना होईल. जीएसटीच्या दोन स्लॅबमुळे जीवन आणि आरोग्य विमा प्रीमियम, औषधे, टूथब्रश आणि केसांच्या तेलावर शून्य कर लागू शकतो. छोट्या कार, एसी, टीव्ही आणि फ्रीजवरील कर दर कमी होऊ शकतात. तथापि, तंबाखू आणि सिगारेट महाग होतील. अन्नपदार्थ, औषधे, वैद्यकीय उपकरणे, स्टेशनरी, शैक्षणिक उत्पादने, टूथब्रश आणि केसांच्या तेलासह आवश्यक वस्तू एक तर करमुक्त असतील किंवा पाच टक्क्यांच्या कक्षेत येतील.

सुधारणांनंतर टीव्ही, एसी आणि रेफ्रिजरेटरसारख्या वस्तू २८ ऐवजी १८ टक्के कराच्या श्रेणीत येऊ शकतात. सरकारने ऑटोमोबाईल्स, हस्तकला, कृषी उत्पादने, कापड आणि खते ही विशेष लक्ष देण्याजोगी क्षेत्रे मानली आहेत. यामुळे सिमेंट स्वस्त होऊ शकते. किरकोळ वस्तू आणि चप्पल-शूजदेखील स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. ट्रॅक्टरवरील सध्याचा १२ टक्के कर ५ टक्के स्लॅबमध्ये येऊ शकतो. एसी १८ टक्के कर स्लॅबमध्ये येऊ शकतो. सुधारणांच्या घोषणेमुळे वस्तूंची मागणी २.४ लाख कोटी रुपयांनी वाढण्याची अपेक्षा आहे. दरांमध्ये कपात केल्याने कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवरील भार कमी होईल. किरकोळ महागाई ०.४० टक्क्यांनी कमी होण्याची अपेक्षा आहे. सरलीकृत स्लॅब रचनेमुळे नमकिन, पराठे, बन आणि केक यासारख्या वस्तूंवरील वर्गीकरण वाद संपतील. पूर्वी त्यावर वेगवेगळे कर दर लागू होते. हिरे आणि मौल्यवान दगडांवर ०.२५ टक्के आणि दागिन्यांवर ३ टक्के असे विशेष दर सुरू राहतील. केंद्र सरकारने अमेरिकेच्या शुल्कवाढीला उत्तर देण्याची तयारी केली आहे. यासाठी वस्तू आणि सेवा करात मोठा बदल करण्याची योजना आहे. जीएसटीच्या कक्षेत येणारे बटर, फळांचा रस, सुका मेवा यासारख्या ९९ टक्के वस्तू पाच टक्क्यांच्या कक्षेत येतील. सोप्या शब्दांमध्ये सांगायचे, तर या वस्तू सात टक्क्यांनी स्वस्त होतील. त्याचप्रमाणे २८ टक्के कर श्रेणीत येणारे सिमेंट, एसी, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन यासारख्या ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये येतील. म्हणजेच त्या १० टक्क्यांनी स्वस्त होतील.

सरकारने जीएसटी सुधारणांचा हा प्रस्ताव राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या गटाकडे पाठविला आहे. हा गट त्याचा अभ्यास करेल. त्यानंतर तो सप्टेंबरमध्ये होणाऱ्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत ठेवला जाईल. जीएसटी सुधारणांचे तीन प्रमुख आधार असतील. पहिली संरचनात्मक सुधारणा. यामध्ये कररचना आणखी सुधारली जाईल. दुसरी कर दरांचे तर्कसंगतीकरण करणे. त्यामुळे आवश्यक वस्तू स्वस्त होतील. तिसरे नवीन नोंदणी आणि परतफेड सुलभ करणे. यामुळे इनपुट आणि आऊटपुट कर दरांमध्ये संतुलन येईल आणि इनपुट टॅक्स क्रेडिटचा संचय कमी होईल. या सुधारणांचा थेट फायदा सामान्य माणसाला होईल. कर कमी केला तर अधिकाधिक लोक आरोग्य विमा घेऊ शकतील. नव्या प्रस्तावानुसार कपडे, बूट आणि खते स्वस्त होतील. सध्या कपड्यांच्या कच्च्या मालावर १२ टक्के आणि तयार कपड्यांवर ५ टक्के जीएसटी आकारला जातो. सुधारणांनंतर दोन्हीवर ५ टक्के जीएसटी असेल. यामुळे वस्त्रोद्योगाचा खर्च कमी होईल. केवळ वस्त्रोद्योग क्षेत्रावर ट्रम्प टॅरिफचा १० अब्ज डॉलर्सचा परिणाम होईल. नवीन सुधारणांमुळे टॅरिफचा परिणाम कमी होईल. खतातील इनपुटवरील कर १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करता येईल. यामुळे शेतकऱ्यांना खत खरेदी करणे स्वस्त होईल. भरपाई उपकर रद्द केला जाईल.

## दुर्ग जिज्ञासा

# चांदवड

**प्राची श्रीकांत पालकर**
९८२३०४९१९८



नाशिक जिल्हा दुर्गसंपदेने नटलेला आहे. या जिल्ह्यात सह्यात्तीच्या सेलबारी डोलबारी, अजंठा सातमाळ या उपरांगेवर अनेक दुर्गम दुर्ग वसलेले आहेत. मुंबई-आग्रा महामार्गावर नाशिक शहरापासून ६० किलोमीटर अंतरावर चांदवड गाव आहे. सातमाळ डोंगररांगेतील चांदवड किल्ला अगस्ती ऋषींशी संबंधित आहे. चांदवडपासून मनमाड व लासलगाव रेल्वेस्थानक फक्त २० ते २५ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे चांदवडला रेल्वेमार्गाने गेलात तरी सोयीचे आहे. चांदवड हा नाशिक जिल्ह्यातील दुर्गम किल्ला असून किल्ल्याची उंची चार हजार फूट आहे. किल्ल्यावर पेशवे काळात बांधलेल्या टाकसाळीचे अवशेष, वाड्यांचे अवशेष, पाण्याची टाकी, कातळात खोदलेल्या गुहा तसेच चंत्तेश्वर महादेव मंदिर आणि गणपती मंदिर आहे. किल्ल्याला पौराणिक तसेच ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे.

चांदवड किल्ला गडमाची आणि बालेकिल्ला अशा दोन भागात विभागला असून माचीवरील चंत्तेश्वर महादेव मंदिरापर्यंत खाजगी गाडीने जाता येते. चांदवड किल्ला पूर्व पश्चिम पसरला आहे, त्याचा विस्तार खूप मोठा आहे. चांदवड गावाच्या पुढे सहा-सात किलोमीटरवर किल्ल्याकडे जाणारा मार्ग आहे. चांदवड गावात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा अप्रतिम वाडा आहे तसेच रेणुका मातेचे सुंदर मंदिर आहे. प्रथम रेणुका मातेचे दर्शन घ्यावे. दगडी बांधकाम असलेले हे मंदिर व मंदिरात जाण्यासाठी बांधलेल्या पायऱ्या आकर्षक आहेत. त्यानंतर चांदवड गावातील होळकरांचा वाडा पाहून घ्यावा. हा वाडा भक्कम, भव्य-दिव्य तसेच अप्रतिम नक्षीकाम व काष्ठशिल्पाने नटलेला आहे. विशाल दरवाजा, भव्य सभागृह, उंच उंच मनोरे यामुळे वाडा राजेशाही भासतो. मल्हारराव होळकरांना पेशव्यांकडून चांदवड प्रांताची जहागीर मिळाली तेव्हा हा देशमुखी वाडादेखील मिळाला. हा खरं तर रंगमहाल आहे; मात्र त्याकाळी रंगमहालाची ओळख म्हणजे ऐषोरामाचे स्थान अशी होती म्हणून होळकरांनी वाड्यात काही बदल करून घेतले. येथील भित्तिचित्रांचा मान राखत वाड्याला एक कलाकेंद्र, न्यायासन व राज्य कारभार चालविण्यास उपयुक्त असे स्थान बनविले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची राजगादी, होळकर वंशाची वंशपरंपरा दाखविणारी छायाचित्रे, काही शस्त्रे, रेणुका माता व अहिल्यादेवी यांची प्रतिकृती ठेवलेली पालखी वाड्यात आहे. वाड्यातल्या खांबावरील नक्षीकाम, खिडक्यांची बांधणी, भव्य दरवाजे पाहून मन प्रसन्न होते.

होळकर वाडा पाहून झाला की चंद्रेश्वर मंदिराकडे निघावे. वाटेत एक मोठा तलाव आहे. तलावाच्या बाजूने किल्ल्याकडे तसेच चंद्रेश्वर मंदिराकडे जाण्याचा रस्ता आहे. अहिल्याबाई शिवभक्त होत्या. त्या शंभू महादेवाच्या साक्षीने राज्य कारभार करीत होत्या. चंद्रेश्वर महादेवाचे मंदिर साधारणतः आठव्या शतकात बांधले गेले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या आवारात काही मूर्ती तसेच मंदिराच्या बाह्यांगावर सुरसुंदरीच्या मूर्ती कोरल्या आहेत. चंद्रेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन मंदिर परिसर फिरल्यावर, मंदिराच्या बाहेर कातळात कोरलेले टाके पाहून घ्यावे. जवळच असलेल्या मारुती मंदिरात दर्शन घेतले की वाटेतील दगडात बांधलेली भिंत आपले लक्ष वेधून घेते. या भिंतीत गणेशशिल्प तसेच भग्न वीरगळ आहे. भिंतीतील लोखंडी दरवाज्याच्या मागे कातळात कोरलेली गुहा व त्या गुहेत पाण्याचे टाके आहे. भिंतीच्या तळात गोमुख असून त्यातून लहान टाक्यात पाणी वाहत असते. थोडं पुढे चालत गेल्यावर एक गोलाकार तलाव दिसतो. या तलावाच्या काठावर काही समाधी बांधलेल्या दिसतात. तिथेच एका चौथऱ्यावर सात थडगीसुद्धा दिसतात. थोडं समोर एका घुमटीवजा मंदिरात श्री गणेशाचे दर्शन होते. समोरच्या पायवाटेने गड चढायला सुरुवात करायची, पठार गाठले की डावीकडे टांकसाळ आहे. टांकसाळीची इमारत उद्ध्वस्त झाली आहे. या रस्त्यावर अजून काही भग्न वास्तूंचे अवशेषदेखील दिसतात.

टांकसाळ पाहून किल्ल्याच्या पश्चिम बाजूस चढण्यास सुरुवात करावी. या वाटेवर कातळात कोरलेल्या पायऱ्या आहेत. पायऱ्या चढत जाऊन आपण गडमाथ्याच्या कड्याखाली पोहोचतो. येथील बुरुज, तटबंदी उद्ध्वस्त झाली आहे. या कड्याच्या पोटात एका रांगेत १० ते १२ गुहा खोदल्या आहेत. येथील पायऱ्या इंग्रजांनी सुरुंग लावून तोडल्या. त्या पायऱ्यांचे दगड पसरलेले दिसतात. गडावर जाणारा पायरी मार्ग इंग्रजांनी नष्ट केला. त्यामुळे आता एका लोखंडी शिडीवरून बालेकिल्ला चढावा लागतो. शिडी खूप मजबूत नाही. त्यामुळे दोर तसेच इतर प्रस्तरारोहण साहित्य सोबत असल्यास सोयीचे होते. शिडीच्या उजव्या बाजूस एक शिलालेख आहे. येथून इंद्राई किल्ला, साडेतीन रोडग्यांचा डोंगर व सातमाळा डोंगररांगेचे विहंगम दृश्य दिसते. पुराणकाळात चांदवडजवळील एका डोंगरावर अगस्ती ऋषींचा आश्रम होता. चांदवड गावातील लोकांनी त्यांना रोडग्यांसोबत खाण्यास तूप दिले नाही म्हणून ते चांदवडला चांडाळनगरी असा शाप देऊन अंकाई किल्ल्यावर निघून गेले, अशी आख्यायिका आहे. नांदगाव येथे सापडलेल्या चालुक्य नरेश चांद्रदित्य यांच्या ताम्रपटात चंद्रादित्यपूर असा चांदवडचा उल्लेख आढळतो. यावरून चालुक्य काळात हा किल्ला अस्तित्वात होता हे कळते. मात्र, किल्ला कोणी बांधला हा उल्लेख कुठे सापडत नाही. ११ व्या शतकात यादव काळातदेखील चंद्रादित्यपूरचा उल्लेख आढळतो. निजामशाहीच्या काळात बागलाण प्रांतातील किल्ले अलिवर्दीखानाने जिंकले; त्यात चांदवड किल्लाही समाविष्ट होता.

दुसऱ्या सुरत लुटीनंतर छत्रपती शिवाजी महाराज बागलाण प्रांतातून राजगडावर गेले. त्यावेळी हा प्रदेश औरंगजेबाच्या ताब्यात होता. त्यावेळी दाऊदखान खानदेशातून सैन्य घेऊन चांदवड किल्ल्यावर आला होता. त्यावेळी महाराजांना मोगलांशी याच परिसरात युद्ध करावे लागले, ती लढाई कांचनबारीची लढाई म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या वेळी मराठ्यांनी चांदवड घेण्याचा प्रयत्न केला होता. पुढे पेशवे पहिले बाजीराव यांच्या काळात चांदवड स्वराज्यात सामील झाला. काही काळाने नानासाहेब पेशव्यांनी मल्हारराव होळकरांना चांदवडची जहागीरदारी दिली. त्यावेळी या किल्ल्यांचा उपयोग तुरुंग म्हणून केला जात होता. होळकर परिवाराने या परिसराचा कायापालट केला. मल्हारराव होळकर गेल्यावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी राणी म्हणून कारभार हाती घेतला. त्यांनी या परिसरातील मंदिरांचा जीर्णोद्धार केला. पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होऊ नये म्हणून अनेक विहिरी, तलाव खोदले. किल्ल्यांवरसुद्धा पाण्याचे सुयोग्य नियोजन केले. चांदवड परिसराचा विकास केला. तुकोजी होळकरांच्या कारकीर्दीत थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मदतीने चांदवड किल्ल्यावर चांदीच्या रुपयांची टांकसाळ सुरू झाली. साधारणतः इ.स. १८०० पर्यंत ही टांकसाळ सुरू होती. इथे चांदीची नाणी पाडली जात असत. पुढे गडाचे किल्लेदार व टांकसाळ अधिकारी यांच्या वादामुळे टांकसाळ चांदवड गावात हलविली. त्यानंतर अहमद खान व आमिर खानाने चांदवड लुटले तसेच इंग्रजांनी हिंदुस्थानात आपले पाय रोवले. त्यानंतर इंग्रजांनी चांदवड किल्ला जिंकला व काही काळाने इंग्रजांनी चांदवडची टांकसाळ बंद केली.

चांदवडचा उल्लेख पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाशिवाय अपूर्ण आहे. ज्ञान, शौर्य, धर्म, कर्म, वचन, शासन या सहाही स्तरावर परिपूर्ण असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर! आपल्या हिंदुस्थानात अशा तत्त्वज्ञानी महाराणी होऊन गेल्या, ज्यांचे चरित्र आपल्या सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. सध्या आपण त्यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष साजरे करतो आहोत. अहिल्यादेवी यांनी देशातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. नवीन मंदिरे बांधली. काशी, गया, द्वारका, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, बद्रिकेदार, रामेश्वर असे आपले अनेक मानबिंदू असलेली धर्मस्थळे अहिल्यादेवी यांनी जपली. अमरकंटक, उज्जैन, ओंकारेश्वर, ओझर, इंदूर, त्र्यंबकेश्वर, गोकर्ण, घृष्णेश्वर, चौंडी, महेश्वर, चांदवड अशा अनेक ठिकाणी मंदिरे व इतर लोकोपयोगी बांधकामे केलीत. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत अहिल्यादेवी यांचे धर्मकार्य लक्ष वेधून घेते. धार्मिक व ऐतिहासिक स्थळे हे राष्ट्राचे मानबिंदू असतात. त्यांचे अस्तित्व टिकविणे हे राज्यकर्त्यांचे प्रथम कर्तव्य आहे, हीच शिकवण त्यांच्या कार्यातून प्राप्त होते. देव, देश आणि धर्म जपणारा राज्यकर्ता विश्वात वंदनीय होतो हे आपण अनुभवतो आहे. त्यामुळे अहिल्यादेवी यांचे धर्मकार्य प्रेरणादायी आहे व सदैव राहील.








# भाजपाचे दक्षिण कार्ड

**अजय तिवारी**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाची उपराष्ट्रपतिपदासाठी घोषणा करून भाजपाने एकाच वेळी अनेक लक्ष्य साधली आहेत. राधाकृष्णन अनुभवी आहेत. त्यांनी चार राज्यांमध्ये संवैधानिक जबाबदारी सांभाळली आहे. यामध्ये महाराष्ट्र, तेलंगणा, पुद्दुचेरी, झारखंड यांचा समावेश आहे.



राधाकृष्णन तामिळनाडूचे आहेत. त्यांना उमेदवारी देऊन भाजपाने काँग्रेससमोर दक्षिण कार्ड खेळले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह प्रत्येक खेळी विचारपूर्वक करतात. त्यांच्या उमेदवाराच्या विजयाचे गणित केवळ आकड्यांवर अवलंबून नसते, तर ते विरोधकांचे मानसिक खच्चीकरण करून निवडणुकीच्या मैदानात उतरतात. आताही 'इंडिया' आघाडीचा उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार दक्षिणेकडील असल्याचे लक्षात येताच राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) ने उपराष्ट्रपतिपदासाठी दक्षिणेचाच उमेदवार देऊन तिथल्या मतपेढीला हात घातला आहे. विरोधकांमध्ये फूट पाडण्याची त्यांची रणनीती आहे. 'इंडिया' आघाडीचा उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार बिहार आणि आंध्र प्रदेशचा असल्याची चर्चा होती. त्यामुळे भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून घोषित केले आहे. पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी त्याची औपचारिक घोषणा केली. राधाकृष्णन हे चार दशकांहून अधिक काळ राजकारण आणि सामाजिक जीवनात सक्रिय आहेत आणि त्यांना तामिळनाडूच्या राजकारणाचा एक आदरणीय चेहरा मानले जाते. त्यांचा राजकीय प्रवास राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून सुरू झाला. १९७४ मध्ये ते भारतीय जनसंघाच्या राज्य कार्यकारी समितीचे सदस्य झाले. ते ओबीसी समुदायातील कोंगू वेल्लार (गौंदर) जातीचे आहेत. हा समाज तामिळनाडूच्या काही भागात प्रभावशाली मानला जातो. १९९६ मध्ये ते भाजपा तामिळनाडूचे सचिव झाले. त्यानंतर १९९८ मध्ये ते पहिल्यांदा कोईम्बतूरमधून लोकसभा खासदार म्हणून निवडून आले आणि १९९९ मध्ये पुन्हा विजयी झाले. त्यांनी संसदेत वस्त्रोद्योगावरील स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. सार्वजनिक उपक्रम समिती, वित्त सल्लागार समिती आणि शेअर बाजार घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या विशेष समितीचे ते सदस्य राहिले आहेत.

राधाकृष्णन यांनी २००४ मध्ये भारतीय संसदीय पक्षाचा भाग म्हणून संयुक्त राष्ट्र महासभेला संबोधित केले. तैवानला भेट देणाऱ्या पहिल्या संसदीय शिष्टमंडळातही ते होते. ते २००४ ते २००७ पर्यंत भाजपाचे तामिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष होते. या काळात त्यांनी ९३ दिवस चाललेली १९ हजार किलोमीटर लांबीची रथयात्रा काढली. या प्रवासात त्यांनी नद्या जोडणे, दहशतवाद संपवणे, समान नागरी संहिता लागू करणे, अस्पृश्यता संपवणे आणि ड्रग्जविरुद्ध मोहीम असे मुद्दे उपस्थित केले. या प्रवासामुळे त्यांचे राजकीय स्थान आणखी वाढले. याशिवाय त्यांनी दोन पदयात्राही केल्या. २०१६ ते २०२० दरम्यान ते कोचीनस्थित कॉयर बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली, काथ्याची निर्यात २५३२ कोटी रुपयांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली. २०२० ते २०२२ दरम्यान ते भाजपाचे अखिल भारतीय प्रभारी होते. त्यांना केरळची जबाबदारी देण्यात आली होती. राधाकृष्णन यांच्यावर पक्षाने टाकलेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली. त्यांच्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा प्रभाव आहे. विचाराशी कोणतीही तडजोड करायची नाही, ही त्यांची वृत्ती. झारखंडचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आल्यानंतर अवघ्या चार महिन्यांमध्ये त्यांनी राज्यातील सर्व २४ जिल्ह्यांना भेट दिली आणि जनता आणि प्रशासनाशी थेट संवाद साधला. ३१ जुलै २०२४ रोजी त्यांना महाराष्ट्राचे राज्यपाल करण्यात आले. दरम्यान, २०२४ मध्ये त्यांना तेलंगणाचे राज्यपाल बनवण्यात आले. एवढेच नाही, तर त्यांना पुद्दुचेरीचे उपराज्यपालही बनवण्यात आले आहे.

राधाकृष्णन हे एक चांगले खेळाडू आहेत. महाविद्यालयीन स्तरावर ते टेबल टेनिस चॅम्पियन आणि धावपटू होते. याशिवाय त्यांना क्रिकेट आणि व्हॉलीबॉलचीही आवड आहे. त्यांनी अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान, चीन आणि अनेक युरोपीय देशांसह जगातील अनेक ठिकाणी प्रवास केला आहे. गेल्या महिन्यात जगदीप धनकड यांनी राजीनामा दिल्यानंतर आता 'एनडीए'ने त्यांना उपराष्ट्रपतिपदाची उमेदवारी दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) साधे कार्यकर्ते असलेले राधाकृष्णन हे एक संयमी आणि सौम्य प्रकृतीचे नेते म्हणून ओळखले जातात. धनकड यांचा उत्तराधिकारी निवडताना भाजपाला १८० अंशांचा टप्पा पार करावा लागला आहे. शेतकरी आंदोलनातील जाट समुदायाचा सहभाग लक्षात घेऊन २०२२ मध्ये झालेल्या उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत धनकड यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. धनकड यांची निवड करून जाट शेतकऱ्यांना 'एनडीए'ने संदेश देण्याचा प्रयत्न केला, की जाट आणि जाट समुदायाचे प्रश्न सरकारचे प्राधान्याचे आहेत आणि त्यांचे नेहमीच ऐकले जाते. आता तीन वर्षांनंतर राधाकृष्णन यांची त्याच पदासाठी निवड झाली आहे. तामिळनाडूचे मोदी म्हणून ओळखले जाणारे राधाकृष्णन यांची निवड 'ओबीसी सोशल इंजिनीअरिंग' आणि दक्षिणेत भाजपाच्या विस्तार योजनांवर लक्ष केंद्रित करून केली गेली आहे. आतापर्यंत कर्नाटक वगळता दक्षिणेकडील राज्यांमध्ये, विशेषतः तामिळनाडू आणि केरळमध्ये पक्षाला स्थान मिळवता आलेले नाही. राधाकृष्णन तामिळनाडूचे आहेत. पुढील वर्षी तेथे विधानसभा निवडणुका होणार आहेत.

धनकड हे एक आक्रमक वकील आणि स्पष्टवक्ते राजकारणी म्हणून ओळखले जातात. ते त्यांच्या तीक्ष्ण आणि संघर्षपूर्ण शैलीसाठी ओळखले जात. जोपर्यंत ते बंगालचे राज्यपाल होते, तोपर्यंत ममता बॅनर्जी सरकारशी असलेले त्यांचे मतभेद बातम्यांमध्ये येत राहिले. ते राज्यसभेचे अध्यक्ष झाले, तेव्हा ते तेथेही त्यांच्या टिप्पण्यांसाठी ओळखले जायचे. विरोधक अनेकदा धनकड यांना पक्षपाती व्यक्ती म्हणून पाहत असत. या पृष्ठभूमीवर आता राधाकृष्णन यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राधाकृष्णन यांचे व्यक्तिमत्त्व पाहता या संवैधानिक पदासाठी आणि भूमिकेसाठी ते अधिक योग्य आहेत. त्यांची निवड करून भाजपा आणि 'एनडीए'ने एकाच वेळी अनेक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. ओबीसी समाज आणि दक्षिणेला चुचकारण्याव्यतिरिक्त भाजपाने त्यांना उमेदवारी देऊन राज्यसभेमध्ये आक्रमकतेची नव्हे, तर संतुलनाची आवश्यकता आहे आणि राधाकृष्णन हे ते संतुलन राखण्यात धनकड यांच्यापेक्षा अधिक प्रभावी असतील, हा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. धनकड यांना काही मुद्द्यांवर मर्यादा होत्या; राधाकृष्णन मात्र सर्वसमावेशक आहेत. धनकड यांची राजकीय पृष्ठभूमी समाजवादी आणि काँग्रेसची होती. ते नंतर भाजपामध्ये सामील झाले, तर राधाकृष्णन हे भाजपाचे वैचारिक मार्गदर्शक असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीतून आले आहेत. धनकड यांच्या विपरीत राधाकृष्णन यांच्यावर कोणताही राजकीय भार नाही आणि त्यांना एकमत साधणारे संभाव्य उमेदवार म्हणून पाहिले जाते.

धनकड राजकारणाला जाती आणि प्रदेशापुरते मर्यादित ठेवत असत तर राधाकृष्णन यांच्याकडे राष्ट्रीय समावेशकता आहे. राधाकृष्णन हे चार दशकांहून अधिक काळ राजकारण आणि सामाजिक जीवनात सक्रिय आहेत. त्यांना तामिळनाडूच्या राजकारणातला एक आदरणीय चेहरा मानले जाते. त्यांची उमेदवारी भाजपाच्या सुविचारित रणनीतीचा एक भाग आहे. त्यात गुंतागुंतीची निवडणूक गणिते आणि खोल प्रादेशिक रणनीती समाविष्ट आहे. राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा ही केवळ त्यांच्या वैयक्तिक निष्ठेचे बक्षीस नाही, तर तामिळनाडू आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये आपला प्रवेश वाढविण्याच्या भाजपाच्या नवीन प्रयत्नांची रणनीती आहे. इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, जेव्हा राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाच्या उमेदवारांच्या नावांवरून विरोधकांमध्ये फूट पडली आहे. द्रमुकचे प्रवक्ते टीकेएस एलांगोवन यांनी राधाकृष्णन यांच्या उमेदवारीचे स्वागत केले असले, तरी द्रमुक 'इंडिया' आघाडीचा एक भाग आहे आणि आघाडीच्या निर्णयाचे पालन करेल. बऱ्याच काळानंतर एक तमिळ व्यक्ती देशाच्या उपराष्ट्रपतिपदी विराजमान होणार आहे. काँग्रेसच्या काळात प्रतिभा पाटील यांना राष्ट्रपतिपदासाठी उमेदवारी दिली होती, तेव्हा शिवसेनेने 'एनडीए'चा भाग असूनही त्यांना पाठिंबा दिला. कारण त्या महाराष्ट्राच्या होत्या. त्याचप्रमाणे प्रणव मुखर्जी यांना उमेदवारी दिली गेली तेव्हा शिवसेना आणि संयुक्त जनता दलाने 'एनडीए'मध्ये असूनही त्यांना पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे 'एनडीए'ने रामनाथ कोविंद यांचे नाव सुचवले, तेव्हा संयुक्त जनता दलाने विरोधी पक्षात असूनही त्यांना पाठिंबा दिला, कारण ते बिहारचे राज्यपाल होते.

गेल्या निवडणुकीमध्ये 'एनडीए'ने उपराष्ट्रपतिपदासाठी धनकड यांची निवड केली, तेव्हा तृणमूल काँग्रेसने मतदान करण्यापासून दूर राहून अप्रत्यक्षपणे भाजपलाच मदत केली होती. या पृष्ठूमीवर आता विरोधकांमध्ये फूट पडून राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतिपदी निवड होईल, असे दिसते.